# “मराठवाड्यातील मानव विकास निर्देशांक निम्न असल्याची कारणमीमांसाः एक अभ्यास”

(२०००-०१ ते २००९-१०)

पुणे विद्यापीठाच्या मानस, नीती व सामाजिक शास्त्रे विद्याशाखा अंतर्गत अर्थशास्त्र विषयातील विद्यावाचस्पती (पीएच.डी.) या पदवीसाठी सादर केलेला प्रबंध


● संशोधक ●

**श्री अतुल संगनाथ नौबदे**

● मार्गदर्शक ●

**डॉ. एस. एन. गंभीरे**

● संशोधन स्थळ ●

पदव्युत्तर अर्थशास्त्र संशोधन केंद्र

आबासाहेब गरवारे महाविद्यालय,

कर्वे रोड, पुणे - ४११ ००४.


मार्च २०१४

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १. | प्रमाणपत्र | |
| २. | प्रतिज्ञा | |
| ३. | ऋणनिर्देश | i |
| ४. | अनुक्रमणिका | iii |
| ५. | तक्तासूची | xii |
| ६. | आकृती सूची | xix |
| ७. | नकाशा सूची | xxii |
| ८. | संक्षिप्त रुपे | xxiii |
| | **प्रकरण १<br>मानव विकास : एक संकल्पना** | |
| १.१ | प्रस्तावना | १ |
| १.२ | मानव विकास एक स्वतंत्र दृष्टीकोन | ३ |
| १.३ | मानव विकास संकल्पनेची काही वैशिष्टे | ७ |
| १.४ | मानव विकास संकल्पना व व्याख्या | ८ |
| १.५ | मानव विकासाची आवश्यकता | १३ |
| १.६ | मानव विकास निर्देशांक | १५ |
| १.६.१ | निर्देशांकांचे घटक व गणन पध्दती | १७ |
| १.७ | आंतरराष्ट्रीय स्तरावरील इतर विविध निर्देशांकांचा थोडक्यात आढावा | २३ |
| १.८ | संयुक्त राष्ट्रसंघ विकास कार्यक्रम व त्यांची भूमिका | २४ |
| १.९ | सहस्त्रावधी विकास लक्ष्ये | २४ |
| | संदर्भ | २८ |

## प्रकरण २
## मराठवाडा विभागाची रुपरेखा


| | | |
|---|---|---|
| २.१ | प्रस्तावना | ३० |
| २.२ | मराठवाडा प्रदेशिक विभाग | ३१ |
| २.२.१ | ऐतिहासिक पार्श्वभूमी | ३१ |
| २.२.२ | स्थान व्याप्ती व सीमा | ४० |
| २.२.३ | भोगोलिक वैशिष्टे | ४१ |
| २.२.४ | प्रमुख शहर | ४१ |
| २.२.५ | लोकसंख्या | ४१ |
| २.२.६ | आर्थिक विकास | ४२ |
| २.२.७ | वाहतूक व दळणवळण | ४३ |
| २.२.८ | शिक्षण | ४३ |
| २.२.९ | प्रसिध्द व्यक्ती | ४४ |
| २.३ | हिंगोली | ४७ |
| २.३.१ | स्थान व व्याप्ती | ४७ |
| २.३.२ | भौगोलिक संरचना | ४७ |
| २.३.३ | लोकसंख्या | ४८ |
| २.३.४ | सिंचन | ४८ |
| २.३.५ | उद्योग | ४९ |
| २.३.६ | पर्यटन | ४९ |
| २.३.७ | प्रशासकीय यंत्रणा | ५० |
| २.४ | जालना | ५० |
| २.४.१ | स्थान व व्याप्ती | ५० |

| | | |
|---|---|---|
| २.४.२ | भौगोलिक संरचना | ५१ |
| २.४.३ | लोकसंख्या | ५१ |
| २.४.४ | सिंचन | ५२ |
| २.४.५ | उद्योग | ५२ |
| २.४.६ | पर्यटन | ५२ |
| २.४.७ | वाहतूक व दळणवळण | ५३ |
| २.४.८ | प्रशासकीय यंत्रणा | ५३ |
| २.५ | उस्मानाबाद | ५३ |
| २.५.१ | स्थान व व्याप्ती | ५३ |
| २.५.२ | भौगोलिक संरचना | ५४ |
| २.५.३ | लोकसंख्या | ५४ |
| २.५.४ | सिंचन | ५५ |
| २.५.६ | पर्यटन | ५५ |
| २.५.७ | वाहतुक व दळणवळण | ५५ |
| २.५.८ | प्रशासकीय यंत्रणा | ५५ |
| | संदर्भ | ५७ |
| **प्रकरण ३<br>मानव विकासाची सद्यस्थिती : भारत व महाराष्ट्र** | | |
| ३.१ | प्रस्तावना | ५८ |
| ३.२ | जागतिक मानव विकास अहवालातील निवडक देशांची स्थिती | ५९ |
| ३.२.१ | भारताच्या मानव विकास निर्देशांकाची स्थिती व वार्षिक वाढ | ६१ |
| ३.३ | राष्ट्रीय मानव विकास अहवालात महाराष्ट्र राज्याचे स्थान | ६४ |
| ३.३.१ | आरोग्य निर्देशांक | ६५ |

| | | |
|---|---|---|
| ३.३.२ | शिक्षण निर्देशांक | ६८ |
| ३.३.३ | उत्पन्न निर्देशांक | ७० |
| ३.४ | भारतातील विविध राज्याचे व जिल्ह्यांचे मानव विकास अहवाल | ७६ |
| ३.५ | महाराष्ट्र राज्याच्या मानव विकास अहवालात मराठवाडा विभागाचे स्थान | ८० |
| ३.६ | मानव विकास अहवाल व पारितोषिके | ८४ |
| ३.६.१ | इ.स. २००२ चे मानव विकास अहवाल पारितोषिके | ८४ |
| ३.६.२ | इ.स. २००४ चे मानव विकास अहवाल पारितोषिके | ८५ |
| ३.६.३ | इ.स. २००७ चे मानव विकास अहवाल पारितोषिके | ८५ |
| ३.६.४ | इ.स. २००९ चे मानव विकास अहवाल पारितोषिके | ८६ |
| ३.६.५ | मानव विकास यातील उत्कृष्ठ योगदानासाठी मेहबुब उल हक्क पारितोषिक | ८६ |
| | संदर्भ | ८८ |
| **प्रकरण ४<br>संशोधन पध्दती व संदर्भ साहित्यांचा आढावा** | | |
| ४.१ | प्रस्तावना | ८९ |
| ४.२ | मराठवाडा विभाग निवडीची कारणे | ९० |
| ४.३ | संशोधन विषयाची निवड व महत्त्व | ९२ |
| ४.४ | संशोधनाची उद्दिष्ट्ये | ९८ |
| ४.५ | गृहित्यकृत्ये | ९९ |
| ४.६ | कार्यात्मक व्याख्या | ९९ |
| ४.७ | संशोधन कालावधी | १०१ |
| ४.८ | संशोधनाची व्याप्ती व मर्यादा | १०१ |
| ४.९ | संशोधन पध्दती व सामग्री संग्रहण | १०२ |
| ४.९.१ | नमुना निवड व जनसंख्या | १०४ |

| | | |
|---|---|---|
| ४.९.२ | माहिती संकलन साधने | ११२ |
| ४.९.३ | सांख्यिकी विशलेषण पध्दती | ११३ |
| ४.९.४ | माहिती संकलनाचे नियोजन व माहिती संकलन | ११७ |
| ४.९.५ | माहितीचे दुय्यम स्त्रोत | ११८ |
| ४.९.६ | माहिती संकलनातील अडचणी | ११९ |
| ४.१० | प्रबंधाचा प्रकरणनिहाय आकृतीबंध | १२१ |
| ४.११ | संदर्भ साहित्याचा आढावा | १२३ |
| | संदर्भ | १५० |
| | **प्रकरण ५**<br>**हिंगोली जिल्ह्यातील महिला साक्षरतेसंबंधी माहितीचे विश्लेषण** | |
| ५.१ | प्रस्तावना | १५४ |
| ५.२ | प्रकरणाची रुपरेखा | १५५ |
| ५.३ | दुय्यम स्त्रोतामार्फत संकलित माहितीचे विश्लेषण | १५५ |
| ५.३.१ | शिक्षणातील महिलांचा सहभाग | १५६ |
| ५.३.२ | हिंगोली जिल्ह्यातील साक्षरता प्रमाण | १५७ |
| ५.३.३ | हिंगोली जिल्ह्यातील तालुकानिहाय शाळांची आकडेवारी | १५८ |
| ५.३.४ | हिंगोली जिल्ह्यातील तालुकानिहाय शाळेत पटनोंदणी झालेल्या मुलींची आकडेवारी | १६० |
| ५.४ | प्राथमिक स्त्रोतामार्फत संकलित माहितीचे विश्लेषण : सामाजिक पाश्वभुमी | १६२ |
| ५.४.१ | महिलांची वैवाहिक स्थिती | १६२ |
| ५.४.२ | महिलांच्या दारिद्र्य रेषेसंबंधित स्थिती | १६३ |
| ५.४.३ | महिलांच्या विवाहाच्या वयाची स्थिती | १६५ |
| ५.४.४ | महिलांच्या आईची शैक्षणिक स्थिती | १६८ |

| | | |
|---|---|---|
| ५.४.५ | महिलांच्या आईची इयत्तानिहाय शैक्षणिक स्थिती | १६९ |
| ५.४.६ | वडीलांची शैक्षणिक स्थिती | १७१ |
| ५.४.७ | महिलांच्या वडीलांची इयत्तानिहाय शैक्षणिक स्थिती | १७२ |
| ५.४.८ | महिलांच्या वडीलांच्या व्यवसायाची माहिती | १७४ |
| ५.४.९ | महिलांच्या आईच्या व्यवसायाची माहिती | १७६ |
| ५.४.१० | महिलांचा भांवडातील क्रमांकाची माहिती | १७७ |
| ५.४.११ | महिलांच्या लहान भावांच्या संख्येची स्थिती | १७९ |
| ५.४.१२ | महिलांच्या मोठया भावाची शैक्षणिक स्थिती | १८२ |
| ५.४.१३ | महिलांच्या मोठया बहिणीची शैक्षणिक स्थिती | १८४ |
| ५.४.१४ | महिलांच्या शाळेत जाण्याच्या आवडीची स्थिती | १८५ |
| ५.४.१५ | महिलांच्या शेजारच्या मैत्रीनी/मुलीच्या शाळेत जाण्यासंबंधित माहिती | १८६ |
| ५.४.१६ | महिलांची इयत्तानिहाय शैक्षणिक स्थिती | १८८ |
| ५.४.१७ | महिलांची त्याच्या घरापासून शाळेच्या अंतराची स्थिती | १९० |
| ५.५ | कारणमीमांसा संबंधीत माहितीचे विश्लेषण | १९३ |
| **प्रकरण ६<br>उस्मानाबाद जिल्ह्यातील अर्भक मृत्यूदरासंबंधी माहितीचे विश्लेषण** | | |
| ६.१ | प्रस्तावना | १९८ |
| ६.२ | प्रकरणाची रुपरेखा | १९९ |
| ६.३ | दुय्यम स्त्रोतामार्फत संकलित माहितीचे विश्लेषण | १९९ |
| ६.३.१ | तालुकानिहाय प्राथमिक आरोग्य केंद्राची स्थिती | १९९ |
| ६.३.२ | तालुकानिहाय आरोग्य उपकेंद्राची स्थिती | २०० |
| ६.३.३ | तालुकानिहाय प्रसुती गृहाची स्थिती | २०२ |
| ६.३.४ | तालुकानिहाय अर्भक मृत्यूची स्थिती | २०३ |

| | | |
|---|---|---|
| ६.३.५ | उस्मानाबाद जिल्ह्यातील संस्थात्मक प्रसुती संबंधीत माहिती | २०७ |
| ६.३.६ | तालुकानिहाय हिमोग्लोबिन तपासलेल्या किशोरवयीन मुलींची स्थिती | २०८ |
| ६.४ | प्राथमिक स्त्रोतांमार्फत संकलित माहितीचे विश्लेषण | २१० |
| ६.४.१ | महिलांची शैक्षणिक स्थिती | २१० |
| ६.४.२ | महिलांच्या पतीची शैक्षणिक स्थिती | २१२ |
| ६.४.३ | महिलांच्या सासू व सासरे यांची शैक्षणिक स्थिती | २१३ |
| ६.४.४ | महिलांच्या दारिद्र्यरेषेखालील कुटुंबाची माहिती | २१७ |
| ६.४.५ | महिलांच्या विवाहाच्या वयासंबंधित माहिती | २१८ |
| ६.४.६ | गांवातील शासकीय आरोग्य सोईच्या उपलब्धतेसंबंधित माहिती | २२० |
| ६.४.७ | शासकीय आरोग्य सुविधांचे घरापासूनचे अंतर | २२२ |
| ६.४.८ | गावातील खाजगी दवाखाना व त्याचे घरापासूनचे अंतर यासंबंधित माहिती | २२४ |
| ६.४.९ | महिलांच्या बाळंतपणासंबंधीत माहिती | २२६ |
| ६.४.१० | महिलांच्या यापूर्वीच्या प्रसुतीसंबंधित माहिती | २२७ |
| ६.४.११ | घरी झालेल्या प्रसुतीसंबंधित माहिती | २२९ |
| ६.४.१२ | प्रसुतीपूर्व तपासणीसंबंधित माहिती | २३० |
| ६.४.१३ | प्रसुतीनंतर बाळाच्या आरोग्यासंबंधित माहिती | २३३ |
| ६.४.१४ | अर्भक मृत्यू संबंधित माहिती | २३५ |
| ६.५ | कारणमीमांसा संबंधित विश्लेषण | २३७ |
| | **प्रकरण ७<br>जालना जिल्ह्यातील दरडोई उत्पन्नानासंबधित माहितीचे विश्लेषण** | |
| ७.१ | प्रस्तावना | २४२ |
| ७.२ | प्रकरणाची रुपरेखा | २४३ |
| ७.३ | दुय्यम स्त्रोतामार्फत संकलित माहितीचे विश्लेषण | २४३ |

| | | |
|---|---|---|
| ७.३.१ | जालना जिल्ह्याचे क्षेत्रवार निव्वळ दरडोई उत्पन्न | २४३ |
| ७.३.२ | जालना जिल्ह्यातील चालू कारखाने व त्यातील कामगारांची दैनिक सरासरी संख्या | २४४ |
| ७.३.३ | जालना जिल्ह्यातील दारिद्र्यरेषेखालील ग्रामीण कुटुंबाची संख्या | २४५ |
| ७.३.४ | जालना जिल्ह्यातील मुख्य व सिमांत कामगारांचे उद्योगनिहाय वर्गीकरण | २४६ |
| ७.३.५ | जालना जिल्ह्यातील तालुकानिहाय सरासरीच्या तुलनेत वर्षातील पर्जन्याची टक्केवारी | २४६ |
| ७.३.६ | जालना जिल्ह्यातील तालुकानिहाय दुकाने व व्यापारी संस्था | २४७ |
| ७.३.७ | जालना जिल्ह्यातील तालुकानिहाय औद्योगिक प्रकल्पांची संख्या | २४८ |
| ७.३.८ | जालना जिल्ह्यातील रोजगार हमी योजनेअंतर्गत रोजगार उपलब्ध कुटुंबाची आकडेवारी | २४९ |
| ७.३.९ | जालना जिल्ह्यातील ओलिताखालील स्थूल क्षेत्राची लागवडीखालील स्थूल क्षेत्राशी टक्केवारी | २५१ |
| ७.३.१० | जालना जिल्ह्यातील निरनिराळ्या उद्योगातील रोजगार | २५२ |
| ७.४ | प्राथमिक स्त्रोतामार्फत संकलित माहितीचे विश्लेषण | २५२ |
| ७.४.१ | कुटुंबाच्या साक्षरतेसंबंधित माहिती | २५३ |
| ७.४.२ | कुटुंबातील कमावत्या सदस्यांची माहिती | २५४ |
| ७.४.३ | कुटुंबांच्या व्यवसायासंबंधित माहिती | २५६ |
| ७.४.४ | कुटुंबांच्या सर्वसाधारण वार्षिक उत्पन्नासंबंधित माहिती | २५८ |
| ७.४.५ | कुटुंबाकडील शेतीसंबंधित माहिती | २६१ |
| ७.४.६ | शेतीतील पिकासंबंधित माहिती | २६३ |
| ७.४.७ | शेतीमालाच्या बाजारपेठेतील भावासंबंधित माहिती | २६४ |
| ७.४.८ | उदरर्निवाहासाठी खर्च होऊन मिळणा-या जास्तीच्या उत्पन्नाविषयी | २६६ |
| ७.४.९ | रोजगार हमी योजना संबंधी माहिती | २६८ |
| ७.४.१० | रोजगार हमी योजनेच्या लाभाविषयी माहिती | २७० |

| | | |
|---|---|---|
| ७.४.११ | रोजगार हमी योजना व कुटुंबाच्या उत्पन्नातील वाढीसंबंधी माहिती | २७१ |
| ७.४.१२ | उत्पन्न वाढीसंदर्भात इतर आवश्यक सुविधांची माहिती | २७३ |
| ७.५ | कारणमीमांसा संबंधित विश्लेषण | २७५ |
| **प्रकरण ८<br>सारांश, निष्कर्ष व शिफारशी** | | |
| ८.१ | प्रस्तावना | २८० |
| ८.२ | सारांश | २८० |
| ८.३ | निष्कर्ष | २८२ |
| ८.४ | गृहितकृत्याची पडताळणी | २९२ |
| ८.५ | शिफारशी | २९५ |
| **संदर्भ** | | ३०० |
| **परिशिष्ट्य अ :** गृहित्यकृत्ये परिगणना पध्दती | | ३१० |
| **परिशिष्ट्य ब :** प्रश्नसूची : हिंगोली जिल्ह्यातील निरक्षर व साक्षर महिला संबंधीत माहिती | | ३१३ |
| **परिशिष्ट्य क :** प्रश्नसूची : उस्मानाबाद जिल्ह्यातील संस्थात्मक प्रसुती व घरी प्रसुती झालेल्या महिला संबंधीत माहिती | | ३१६ |
| **परिशिष्ट्य ड :** प्रश्नसूची : जालना जिल्ह्यातील दारिद्र्यरेषेखालील व दारिद्र्य रेषेखाली नसलेल्या कुटुंबा संबंधीत माहिती | | ३३४ |
| **परिशिष्ट्य इ :** निरीक्षण सूची : जालना जिल्ह्यातील गांवासंबंधीत माहिती | | ३३८ |
| **परिशिष्ट्य ई :** हिंगोली, उस्मानाबाद व जालना जिल्ह्यातील माहिती संकलित गांवाची तालुकानिहाय यादी | | ३४१ |
| **परिशिष्ट्य उ :** हिंगोली उस्मानाबाद व जालना जिल्ह्यातील प्रतिसादकांची तालुकानिहाय यादी | | ३४४ |

## तक्तासूची


| अ.क्र. | तक्त्याचे शीर्षक | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १.१ | निर्देशांकानुसार वर्गवारीची पध्दती | १७ |
| १.२ | मानव विकास निर्देशांकाचे मानके व मूल्य | १७ |
| १.३ | यूएनडीपी : मानके व त्यांचे मूल्य | २१ |
| १.४ | भारत २००१ : मानके व त्यांचे मूल्य | २२ |
| १.५ | भारत २०११ : मानके व त्यांचे मूल्य | २२ |
| २.१ | हैद्राबाद संस्थानातील भाषानिहाय लोकसंख्या | ३४ |
| २.२ | हैद्राबाद संस्थानातील विभागांची माहिती | ३५ |
| ३.१ | उच्च व निम्न निर्देशांक असलेले देश १९९० | ६० |
| ३.२ | उच्च व निम्न निर्देशांक असलेले देश २०१३ | ६० |
| ३.३ | भारताच्या मानव विकास निर्देशांकांची स्थिती | ६१ |
| ३.४ | भारताच्या मानव विकास अहवालात विचारात घेतलेल मानक | ६४ |
| ३.५ | भारतातील विविध राज्याचे आरोग्य निर्देशांक (१९९९-२००० व २००७-०८) | ६५ |
| ३.६ | भारतातील विविध राज्याचे शिक्षण निर्देशांक (१९९९-२००० व २००७-०८) | ६८ |
| ३.७ | भारतातील विविध राज्याचे उत्पन्न निर्देशांक (१९९९-२००० व २००७-०८) | ७१ |
| ३.८ | भारतातील विविध राज्याचे व मानव विकास निर्देशांक (१९९९-२००० व २००७-०८) | ७४ |
| ३.९ | राज्यांनी प्रकाशित केलेले मानव विकास अहवाल व वर्ष | ७७ |
| ३.१० | महाराष्ट्रातील विविध विभागांचे मानव विकास निर्देशांक | ८० |
| ३.११ | महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांचा मानव विकास निर्देशांक | ८२ |
| ४.१ | महाराष्ट्रातील विविध विभागांचे मानव विकास निर्देशांक | ९१ |

| | | |
|---|---|---|
| ४.२ | मराठवाड्यातील जिल्हानिहाय मानव विकास निर्देशांकाची स्थिती | ९२ |
| ४.३ | मराठवाड्यातील जिल्हानिहाय व मानकानिहाय मा.वि. निर्देशांकाची स्थिती | ९३ |
| ४.४ | मराठवाड्यातील जिल्हानिहाय दरडोई उत्पन्नाची स्थिती | ९४ |
| ४.५ | मराठवाड्यातील जिल्हानिहाय साक्षरता प्रमाण स्थिती | ९६ |
| ४.६ | मराठवाड्यातील जिल्हानिहाय महिला साक्षरता प्रमाण स्थिती जनगणना २००१ | ९६ |
| ४.७ | मराठवाड्यातील जिल्हानिहाय अर्भक मृत्यूची स्थिती | ९७ |
| ४.८ | तालुका निहाय महिला सक्षरतेचे प्रमाण | १०७ |
| ४.९ | तालुका निहाय अर्भक मृत्यूदर संख्या | १०८ |
| ४.१० | तालुका निहाय ग्रामीण दारिद्र्यरेषेखालील कुटूंबे | ११० |
| ४.११ | जिल्हा निहाय निवडलेल्या जनसंख्येची माहिती | १११ |
| ४.१२ | पर्थदर्शक अभ्यास केलेल्या गांवाची व प्रतिसादकांची संख्या | ११६ |
| ५.१ | महाराष्ट्रातील शिक्षणातील महिलांचा सहभाग | १५६ |
| ५.२ | हिंगोली जिल्ह्यातील महिला साक्षरतेचे प्रमाण | १५७ |
| ५.३ | हिंगोली जिल्ह्यातील तालुकानिहाय शाळेची स्थिती | १५८ |
| ५.४ | हिंगोली जिल्ह्यातील तालुक्यातील शाळेतील मुलींची पटनोंदणी स्थिती | १६० |
| ५.५ | औंढा नागनाथ व कळमनुरी तालुक्यातील महिलांची वैवाहिक स्थिती | १६२ |
| ५.६ | औंढा नागनाथ व कळमनुरी तालुक्यातील महिलांच्या दारिद्र्य रेषेसंदर्भातील स्थिती | १६३ |
| ५.७ | औंढा नागनाथ तालुक्यातील महिलांच्या वैवाहिक वयाची स्थिती | १६५ |
| ५.८ | कळमनुरी तालुक्यातील महिलांच्या वैवाहिक वयाची स्थिती | १६६ |
| ५.९ | औंढा नागनाथ व कळमनुरी तालुक्यातील महिलांच्या आईची शैक्षणिक स्थिती | १६८ |
| ५.१० | औंढा नागनाथ तालुक्यातील महिलांच्या आईची इयत्तानिहाय | १७० |

| | | |
|---|---|---|
| | शैक्षणिक स्थिती | |
| ५.११ | कळमनुरी तालुक्यातील महिलांच्या आईची इयत्तानिहाय शैक्षणिक स्थिती | १७० |
| ५.१२ | औंढा नागनाथ व कळमनुरी तालुक्यातील महिलांच्या वडिलांची शैक्षणिक स्थिती | १७१ |
| ५.१३ | औंढा नागनाथ तालुक्यातील महिलांच्या वडिलांची इयत्तानिहाय शैक्षणिक स्थिती | १७३ |
| ५.१४ | कळमनुरी तालुक्यातील महिलांच्या वडिलांची इयत्तानिहाय शैक्षणिक स्थिती | १७३ |
| ५.१५ | औंढा नागनाथ तालुक्यातील महिलांच्या वडिलांच्या व्यवसायाची माहिती | १७४ |
| ५.१६ | कळमनुरी तालुक्यातील महिलांच्या वडिलांच्या व्यवसायाची माहिती | १७५ |
| ५.१७ | औंढा नागनाथ तालुक्यातील महिलांच्या आईच्या व्यवसायाची माहिती | १७६ |
| ५.१८ | कळमनुरी तालुक्यातील महिलांच्या आईच्या व्यवसायाची माहिती | १७७ |
| ५.१९ | औंढा नागनाथ तालुक्यातील महिलांचा भावंडातील क्रमांकासंबंधित माहिती | १७८ |
| ५.२० | कळमनुरी तालुक्यातील महिलांचा भावंडातील क्रमांकासंबंधित माहिती | १७८ |
| ५.२१ | औंढा नागनाथ तालुक्यातील महिलांच्या लहान भावांच्या संख्येची स्थिती | १७९ |
| ५.२२ | कळमनुरी तालुक्यातील महिलांच्या लहान भावांच्या संख्येची स्थिती | १८० |
| ५.२३ | औंढा नागनाथ व कळमनुरी तालुक्यातील महिलांच्या मोठया भावाची शैक्षणिक स्थिती | १८२ |
| ५.२४ | औंढा नागनाथ व कळमनुरी तालुक्यातील महिलांच्या मोठया बहिणीची शैक्षणिक स्थिती | १८४ |
| ५.२५ | औंढा नागनाथ व कळमनुरी तालुक्यातील महिलांच्या शाळेत जाण्याच्या आवडीसंबंधित माहिती | १८६ |
| ५.२६ | औंढा नागनाथ व कळमनुरी तालुक्यातील महिलांच्या शेजारच्या मैत्रिणी/मुली यांची शाळेत जाण्यासंबंधित माहिती | १८७ |
| ५.२७ | औंढा नागनाथ तालुक्यातील महिलांची इयत्तानिहाय शैक्षणिक स्थिती | १८९ |

| | | |
|---|---|---|
| ५.२८ | कळमनुरी तालुक्यातील महिलांची इयत्तानिहाय शैक्षणिक स्थिती | १८९ |
| ५.२९ | औंढा नागनाथ तालुक्यातील महिलांची त्याच्या घरापासून शाळेच्या अंतरासंबंधित माहिती | १९० |
| ५.३० | कळमनुरी तालुक्यातील महिलांची त्याच्या घरापासून शाळेच्या अंतरासंबंधित माहिती | १९१ |
| ५.३१ | हिंगोली जिल्ह्यातील महिला साक्षरता कमी असल्यासंबंधित अनुसूचीमध्ये नमूद कारणे | १९३ |
| ५.३२ | SPSS नुसार सर्वच घटकांचे विश्लेषण | १९५ |
| ५.३३ | SPSS नुसार मुख्य घटकांचे विश्लेषण Component Matrix[a] | १९६ |
| ६.१ | उस्मानाबाद जिल्ह्यातील तालुकानिहाय प्राथमिक आरोग्य केंद्राची स्थिती | २०० |
| ६.२ | उस्मानाबाद जिल्ह्यातील तालुकानिहाय आरोग्य उपकेंद्राची स्थिती | २०१ |
| ६.३ | उस्मानाबाद जिल्ह्यातील तालुकानिहाय प्रसुती गृहाची स्थिती | २०२ |
| ६.४ | उस्मानाबाद जिल्ह्यातील तालुकानिहाय अर्भकमृत्यूसंबंधित स्थिती | २०३ |
| ६.५ | उस्मानाबाद जिल्ह्यातील अर्भकमृत्यू दर | २०६ |
| ६.६ | उस्मानाबाद जिल्ह्यातील संस्थात्मक प्रसुती संबंधित माहिती | २०७ |
| ६.७ | तालुकानिहाय हिमोग्लोबिन तपासलेल्या मुलींची माहिती | २०८ |
| ६.८ | वाशी उस्मानाबाद व तालुक्यातील महिलांची शैक्षणिक स्थिती | २१० |
| ६.९ | उस्मानाबाद व वाशी तालुक्यातील महिलांच्या पतीची शैक्षणिक स्थिती | २१२ |
| ६.१० | उस्मानाबाद व वाशी तालुक्यातील महिलांच्या सासरे यांची शैक्षणिक स्थिती | २१४ |
| ६.११ | उस्मानाबाद व वाशी तालुक्यातील महिलांच्या सासूची शैक्षणिक स्थिती | २१५ |
| ६.१२ | उस्मानाबाद व वाशी तालुक्यातील दारिद्र्यरेषेखालील कुटुंबासंबंधित स्थिती | २१७ |
| ६.१३ | उस्मानाबाद व वाशी तालुक्यातील महिलांच्या विवाहाच्या वयासंबंधित महिती | २१९ |
| ६.१४ | उस्मानाबाद व वाशी तालुक्यातील गावांतील शासकीय आरोग्य | २२१ |

| | | |
|---|---|---|
| | सेवा सुविधांच्या उपलब्धतेसंबंधित माहिती | |
| ६.१५ | उस्मानाबाद व वाशी तालुक्यातील घरापासूनचे शासकीय आरोग्य सेवा सुविधांचे अंतर | २२३ |
| ६.१६ | उस्मानाबाद व वाशी तालुक्यातील खाजगी दवाखान्याविषयी माहिती | २२४ |
| ६.१७ | उस्मानाबाद व वाशी तालुक्यातील खाजगी दवाखान्याविषयी माहिती | २२५ |
| ६.१८ | उस्मानाबाद व वाशी तालुक्यातील महिलांच्या बाळंतपणाची संख्या यासंबंधित माहिती | २२६ |
| ६.१९ | उस्मानाबाद व वाशी तालुक्यातील यापूर्वीच्या प्रसुतीसंबंधीत माहिती | २२७ |
| ६.२० | उस्मानाबाद व वाशी तालुक्यातील महिलांची घरी केलेल्या प्रसुतीसंबंधित माहिती | २२९ |
| ६.२१ | उस्मानाबाद व वाशी तालुक्यातील महिलांच्या प्रसुतीपूर्व तपासणी संबंधित माहिती | २३१ |
| ६.२२ | उस्मानाबाद व वाशी तालुक्यातील महिलांच्या प्रसुतीपूर्व केलेल्या तपासणी संबंधित माहिती | २३२ |
| ६.२३ | उस्मानाबाद व वाशी तालुक्यातील महिलांच्या बाळाच्या आरोग्या संदर्भात माहिती | २३४ |
| ६.२४ | उस्मानाबाद व वाशी तालुक्यातील अर्भकमृत्यूसंबंधित माहिती | २३६ |
| ६.२५ | उस्मानाबाद जिल्ह्यातील अर्भक मृत्यूदरासंबंधित अनुसूचीमध्ये नमूद कारणे | २३७ |
| ६.२६ | SPSS नुसार सर्व घटकांचे विश्लेषण | २३९ |
| ६.२७ | SPSS नुसार मुख्य घटकांचे विश्लेषण Component Matrix[a] | २४० |
| ७.१ | जालना जिल्ह्यातील निव्वळ दरडोई उत्पन्न | २४४ |
| ७.२ | जालना जिल्ह्यातील चालू कारखाने व त्यातील कामगारांची दैनिक सरासरी संख्या | २४४ |
| ७.३ | जालना जिल्ह्यातील दारिद्र्य रेषेखालील ग्रामीण कुटुंबांसंबंधित आकडेवारी | २४५ |
| ७.४ | जालना जिल्ह्यातील क्षेत्रवार मुख्य व सीमांत कामगारांचे उद्योगनिहाय वर्गीकरण | २४६ |
| ७.५ | जालना जिल्ह्यातील तालुकानिहाय सरासरीच्या तुलनेत वर्षातील | २४७ |

| | | |
|---|---|---|
| | पर्जन्याची टक्केवारी | |
| ७.६ | जालना जिल्ह्यातील तालुकानिहाय दुकाने व व्यापारी संस्था यातील कामगारांची आकडेवारी | २४८ |
| ७.७ | जालना जिल्ह्यातील तालुकानिहाय औद्योगिक गुंतवणूक | २४९ |
| ७.८ | जालना जिल्ह्यातील तालुकानिहाय रोजगार मागणी केलेल्या व रोजगार उपलब्ध करुन दिलेल्या कुटुंबांची संख्या | २५० |
| ७.९ | जालना जिल्ह्यातील ओलिताखालील स्थूल क्षेत्राची लागवडीखालील स्थूल क्षेत्राशी टक्केवारी | २५१ |
| ७.१० | जालना जिल्ह्यातील निरनिराळे उद्योग व त्यामध्ये कार्यरत कामगारांची संख्या | २५२ |
| ७.११ | भोकरदन व बदनापूर या तालुक्यातील कुटुंबप्रमुखाच्या साक्षरतेसंबंधित माहिती | २५३ |
| ७.१२ | भोकरदन व बदनापूर तालुक्यातील कुटुंबातील कमावत्या सदस्यासंबंधित माहिती | २५५ |
| ७.१३ | भोकरदन तालुक्यातील कुटुंबांच्या व्यवसायासंबंधित माहिती | २५७ |
| ७.१४ | बदनापूर तालुक्यातील कुटुंबांच्या व्यवसायासंबंधित माहिती | २५७ |
| ७.१५ | भोकरदन तालुक्यातील कुटुंबांचे सर्वसाधारण वार्षिक उत्पन्न | २५९ |
| ७.१६ | बदनापूर तालुक्यातील कुटुंबांचे सर्वसाधारण वार्षिक उत्पन्न | २५९ |
| ७.१७ | भोकरदन तालुक्यातील कुटुंबांकडील शेती संबंधित माहिती | २६१ |
| ७.१८ | बदनापूर तालुक्यातील कुटुंबांकडील शेतीसंबंधी माहिती | २६२ |
| ७.१९ | भोकरदन व बदनापूर तालुक्यातील कुटुंबांकडील बागायती शेतीमध्ये घेत असलेल्या पिकांसंबंधी माहिती | २६३ |
| ७.२० | भोकरदन तालुक्यातील कुटुंबांकडील शेतमालास योग्य भावासंबंधी माहिती | २६४ |
| ७.२१ | बदनापूर तालुक्यातील कुटुंबांकडील शेतमालास योग्य भावासंबंधी माहिती | २६५ |
| ७.२२ | भोकरदन तालुक्यातील कुटुंबांकडील जास्तीच्या उत्पन्नासंबंधी माहिती | २६६ |
| ७.२३ | बदनापूर तालुक्यातील कुटुंबांकडील जास्तीच्या उत्पन्नासंबंधी माहिती | २६७ |

| | | |
|---|---|---|
| ७.२४ | बदनापूर तालुक्यातील कुटुंबांकडील जास्तीचे उत्पन्नासंबंधी माहिती | २६८ |
| ७.२५ | भोकरदन व बदनापूर तालुक्यातील कुटुंबांकडील रोजगार हमी योजनेसंबंधी माहिती | २६९ |
| ७.२६ | भोकरदन तालुक्यातील रोजगार हमी योजनेचा लाभ घेतलेल्या कुटुंबांसंबंधी माहिती | २७० |
| ७.२७ | बदनापूर तालुक्यातील रोजगार हमी योजनेचा लाभ घेतलेल्या कुटुंबांसंबंधी माहिती | २७० |
| ७.२८ | भोकरदन तालुक्यातील रोजगार हमी योजना व उत्पन्नातील वाढीसंबंधी माहिती | २७१ |
| ७.२९ | बदनापूर तालुक्यातील रोजगार हमी योजना व उत्पनातील वाढीसंबंधी माहिती | २७२ |
| ७.३० | भोकरदन व बदनापूर या तालुक्यातील उत्पन्न वाढीच्या अनुषंगाने इतर सुविधांची माहिती | २७४ |
| ७.३१ | जालना जिल्ह्यातील दरडोई उत्पन्नासंबंधित अनुसूचीमध्ये नमूद कारणे | २७६ |
| ७.३२ | SPSS नुसार सर्व घटकांचे विश्लेषण | २७७ |
| ७.३३ | SPSS नुसार मुख्य घटकांचे विश्लेषण Component Matrix[a] | २७८ |

# आकृती सूची



| अ.क्र. | आकृतीचे शीर्षक | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १.१ | परस्पर क्षमतांचे सशक्तीकरण | ७ |
| ३.१ | भारताच्या मानव विकास निर्देशांकांची स्थिती | ६२ |
| ३.२ | भारताचा मानव विकास निर्देशांक झालेली सरासरी वार्षिक वाढ | ६३ |
| ३.३ | भारतातील विविध राज्याचे आरोग्य निर्देशांक (१९९९-२००० व २००७-०८) | ६६ |
| ३.४ | भारत व महाराष्ट्र यांच्या आरोग्य निर्देशांकातील तुलना | ६७ |
| ३.५ | भारतातील विविध राज्याचे शिक्षण निर्देशांक (१९९९-२००० व २००७-०८) | ६९ |
| ३.६ | भारत व महाराष्ट्र यांच्या शिक्षण विषयक निर्देशांकातील तुलना | ७० |
| ३.७ | भारतातील विविध राज्याचे उत्पन्न निर्देशांक (१९९९-२००० व २००७-०८) | ७२ |
| ३.८ | भारत व महाराष्ट्र यांच्या उत्पन्न विषयक निर्देशांकातील तुलना | ७३ |
| ३.९ | भारतातील विविध राज्य व मानव विकास निर्देशांक (१९९९-२००० व २००७-०८) | ७५ |
| ३.१० | भारत व महाराष्ट्र यांच्या मानव विकास निर्देशांक तुलना | ७६ |
| ३.११ | महाराष्ट्रातील विविध प्रशासकीय विभागांचे मा.वि निर्देशांक | ८१ |
| ३.१२ | महाराष्ट्रातील जिल्ह्यांचा मानव विकास निर्देशांक | ८३ |
| ५.१ | हिंगोली जिल्ह्यातील तालुकानिहाय शाळेची आकडेवारी | १५९ |
| ५.२ | हिंगोली जिल्ह्यातील तालुक्यातील शाळेतील मुलींची पटनोंदणी आकडेवारी | १६१ |
| ५.३ | औंढा नागनाथ व कळमनुरी तालुक्यातील महिलांच्या दारिद्र्य रेषेसंबंधित स्थिती | १६४ |
| ५.४ | औंढा नागनाथ व कळमनुरी तालुक्यातील महिलांच्या वैवाहिक वयाची स्थिती | १६७ |
| ५.५ | औंढा नागनाथ व कळमनुरी तालुक्यातील महिलांच्या आईची शैक्षणिक स्थिती | १६९ |

| | | |
|---|---|---|
| ५.६ | औंढा नागनाथ व कळमनुरी तालुक्यातील महिलांच्या वडिलाची शैक्षणिक स्थिती | १७२ |
| ५.७ | औंढा नागनाथ व कळमनुरी तालुक्यातील महिलांच्या लहान भावांच्या संख्येची स्थिती | १८१ |
| ५.८ | औंढा नागनाथ व कळमनुरी तालुक्यातील महिलांच्या मोठ्या भावाची शैक्षणिक स्थिती | १८३ |
| ५.९ | औंढा नागनाथ व कळमनुरी तालुक्यातील महिलांच्या मोठ्या बहिणीची शैक्षणिक स्थिती | १८५ |
| ५.१० | औंढा नागनाथ व कळमनुरी तालुक्यातील महिलांच्या शेजारच्या मैत्रिणी/मुली यांची शाळेत जाण्यासंबंधित माहिती | १८८ |
| ५.११ | औंढा नागनाथ व कळमनुरी तालुक्यातील महिलांची त्याच्या घरापासून शाळेच्या अंतरासंबंधित माहिती | १९२ |
| ६.१ | उस्मानाबाद जिल्ह्यातील एकूण अर्भकमृत्यू संख्या | २०३ |
| ६.२ | तालुकानिहाय अर्भकमृत्यू आकडेवारी | २०४ |
| ६.३ | उस्मानाबाद जिल्ह्यातील अर्भकमृत्यूदर | २०५ |
| ६.४ | उस्मानाबाद जिल्ह्यातील संस्थात्मक प्रसुतीचे प्रमाण | २०६ |
| ६.५ | उस्मानाबाद जिल्ह्यातील हिमोग्लोबिन तपासलेल्या एकूण मुलींची स्थिती | २०८ |
| ६.६ | वाशी उस्मानाबाद व तालुक्यातील महिलांची शैक्षणिक स्थिती | २१० |
| ६.७ | उस्मानाबाद व वाशी तालुक्यातील महिलांच्या पतीची शैक्षणिक स्थिती | २११ |
| ६.८ | उस्मानाबाद व वाशी तालुक्यातील महिलांच्या सासरे यांची शैक्षणिक स्थिती | २१४ |
| ६.९ | उस्मानाबाद व वाशी तालुक्यातील महिलांच्या सासूची शैक्षणिक स्थिती | २१४ |
| ६.१० | उस्मानाबाद व वाशी तालुक्यातील दारिद्र्यरेषेखालील कुटुंबासंबंधित स्थिती | २१६ |

| | | |
|---|---|---|
| ६.११ | उस्मानाबाद व वाशी तालुक्यातील महिलांच्या विवाहाच्या वयासंबंधित महिती | २१८ |
| ६.१२ | उस्मानाबाद व वाशी तालुक्यातील गांवातील शासकीय आरोग्य सेवा सुविधाच्या उपलब्धतेसंबंधित माहिती | २२० |
| ६.१३ | उस्मानाबाद व वाशी तालुक्यातील यापूर्वीच्या प्रसुतीसंबंधित माहिती | २२६ |
| ६.१४ | उस्मानाबाद व वाशी तालुक्यातील महिलांची घरी केलेल्या प्रसुतीसंबंधित माहिती | २२८ |
| ६.१५ | उस्मानाबाद व वाशी तालुक्यातील महिलांच्या प्रसुतीपूर्व तपासणी संबंधित माहिती | २३० |
| ६.१६ | उस्मानाबाद व वाशी तालुक्यातील महिलांच्या बाळाच्या आरोग्य | २३३ |
| ६.१७ | उस्मानाबाद व वाशी तालुक्यातील अर्भकमृत्यूसंबंधीत माहिती | २३४ |
| ७.१ | भोकरदन व बदनापूर या तालुक्यातील कुटूंबप्रमुखाच्या साक्षरतेसंबंधित माहिती | २५२ |
| ७.२ | भोकरदन व बदनापूर तालुक्यातील कुटूंबातील कमावत्या सदस्यासंबंधित माहिती | २५४ |
| ७.३ | भोकरदन व बदनापूर तालुक्यातील कुटूंबाच्या व्यवसायासंबंधी माहिती | २५६ |
| ७.४ | भोकरदन व बदनापूर तालुक्यातील कुटूंबांचे सर्वसाधारण वार्षिक उत्पन्न | २५८ |
| ७.५ | भोकरदन व बदनापूर तालुक्यातील कुटूंबांकडील शेती संबंधी माहिती | २६० |
| ७.६ | भोकरदन व बदनापूर तालुक्यातील कुटूंबांकडील शेतमालास योग्य भाव संबंधी माहिती | २६३ |
| ७.७ | भोकरदन व बदनापूर तालुक्यातील रोजगार हमी योजना व उत्पनातील वाढीसंबंधी माहिती | २७१ |

## नकाशा सूची


| अ.क्र. | नाकाशाचे शीर्षक | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| २.१ | महाराष्ट्रात मराठवाडा विभागाचे स्थान | ४० |
| २.२ | संशोधनासाठी निवडलेल्या जिल्ह्यांचे मराठवाड्यातील स्थान | ४६ |
| ३.१ | विविध राज्यातील जिल्हानिहाय मानव विकास अहवाल | ७८ |

# संक्षिप्त रुपे

| | |
|---|---|
| • ALR | Adult Literacy Rate<br>प्रौढ साक्षरता दर |
| • APL | Above Poverty Line<br>दारिद्र्यरेषेवर |
| • BPL | Below Poverty Line<br>दारिद्र्यरेषेखाली |
| • CER | Combined Enrolment Ratio<br>संयुक्त पटनोंदणी प्रमाण |
| • GDI | Gender Development Index<br>लिंगभाव विकास निर्देशांक |
| • GDP | Gross Domestic Product<br>देशांतर्गत स्थूल उत्पन्न |
| • HDI | Human Development Index<br>मानव विकास निर्देशांक |
| • HDR | Human Development Report<br>मानव विकास अहवाल |
| • HPI | Human Poverty Index<br>मानव दारिद्र्य निर्देशांक |
| • LEI | Life Expectancy indicator<br>सरासरी आयुर्मान |
| • PQLI | Physical Quality of Life Index<br>भौतिक जीवनमानाचा निर्देशांक |
| • UNDP | United Nations Development Programme<br>संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रम |

# प्रकरण – १
# मानव विकास : एक संकल्पना

## १.१ प्रस्तावना :

'एखाद्या राष्ट्राची संपत्ती म्हणजे त्या राष्ट्राजवळ असलेल्या मौल्यवान धातूंचा साठा होय'[१] असे मत व्यापारवाद्यांचे होते. अर्थशास्त्राचे जनक ॲडम स्मिथ यांच्या इ.स. १७७६ मधील 'Wealth of Nation' या ग्रंथातून राष्ट्राच्या संपत्ती संबंधी वरील मतावर टीका करताना ते म्हणतात, 'सोने-चांदी सारख्या धातूंचा साठा ही देशाची संपत्ती असू शकत नाही तर राष्ट्राची खरी संपत्ती म्हणजे राष्ट्राची उत्पादन क्षमता होय'[२]. राष्ट्राजवळ जेवढा चलनातील पैसा अधिक तितके उत्पादनास अधिक उत्तेजन मिळते आणि अधिक वस्तू व सेवा उपलब्ध होऊन राष्ट्र अधिक श्रीमंत होते म्हणजेच राष्ट्राचा विकास होतो व पर्यायाने मानवाचा पण विकास होतो. या बाबी जगातील शासन कर्त्यांच्या विचारांत प्रामुख्याने दिसून येतात. त्यामुळे विकासाचा केंद्रबिदू 'मानव' नसून राष्ट्रांच्या संपत्तीतील वाढ हाच होय. जगातील प्रत्येक देश ध्येय व धोरणे निश्चित करताना उत्पन्नाच्या वाढीसाठी आग्रही होता. त्यासाठी देशात औद्योगिक क्रांती घडवून आणली खरी पण त्यासोबतच विषमतेची दरी सुध्दा वाढत गेली. जगात लोक गरीबी, दारिद्र्य, उपासमार व रोगराई इ. गोष्टींना सोबत घेऊन जीवनाचा गाडा ओढू लागले, यातून स्वतःला प्रगत समजणारे तथाकथित देशसुध्दा मुक्त राहू शकले नाहीत. यावरुन असे म्हणता येईल की, केवळ संपत्तीत वाढ झाली म्हणजेच देशाचा विकास झाला असे नाही तर त्यासाठी इतर बाबीपण महत्वाच्या असतात.

जगात देशाच्या विकासाचे मोजमाप करण्यासाठी उत्पन्नाचे मोजमाप या एकमात्र एककाचा वापर केला जात होता. परंतु केवळ उत्पन्न/उत्पादन वाढवून माणसाची क्रयशक्ती वाढेल, तो कदाचित जास्त वस्तू व सेवा यांचा उपभोग घेऊ शकेल; पण त्यामुळे मानवाचा विकास झाला असे म्हणता येईल काय? अशी शंका निर्माण होऊ

लागली. यातूनच १९९० पासून असा विचारप्रवाह निर्माण झाला की, मानव विकास घडून येण्यासाठी आर्थिक बाबींव्यतिरिक्त अन्य बाबी देखील निश्चितपणे जबाबदार आहेत. विकासाच्या केंद्रस्थानी मानवच असावयास हवा, हे पुन्हा एकदा जगासमोर प्रभावीपणे मांडण्याची आवश्यकता होती. या गरजेतूनच आशिया खंडातील प्रसिध्द अर्थशास्त्रज्ञ डॉ. मेहबूब उल हक्क व नोबेल पारितोषिक विजेते प्रसिध्द अर्थशास्त्रज्ञ डॉ. अमर्त्य सेन यांनी 'मानव विकास' या घटकांकडे जगाचे लक्ष वेधून घेतले.

सूक्ष्मपणे विविध संदर्भसाहित्याचा आढावा घेतल्यास असे लक्षात येते की, मानव विकास ही शास्त्रातील नवीन संकल्पना नसून ॲरिस्टॉटलपासून अमर्त्य सेनपर्यंत विविध विचारवंतांनी याबाबत आपले विचार मांडलेले आहेत. याबाबत जगप्रसिध्द विचारवंत खालील प्रमाणे आपले विचार व्यक्त करतात.

*" Wealth is not the good*
*we are seeking*
*it is merely useful for*
*the sake of something else"*

*-Aristotle*[3]

पण जगाने याकडे दुर्लक्ष केलेले होते म्हटले तर वावगे ठरणार नाही. मात्र १९४० नंतर च्या काळात आर्थिक विकासाच्या बाबतीत अर्थशास्त्रज्ञांनी आर्थिक वृध्दीपेक्षा मानव विकासास अधिक महत्त्व दिलेले दिसून येते. देशात किती वस्तू व सेवांचे उत्पादन होते? हाच प्रश्न गेली अनेक वर्ष विचारला जात होता. परंतु अलिकडच्या काही काळात देशातील लोकांच्या सुरक्षिततेच्या संदर्भात प्रश्न विचारण्यात येऊ लागले. याचाच अर्थ आर्थिक विकासामध्ये लोकांना किती प्रमाणात विविध पर्याय उपलब्ध होत आहेत, ही बाब महत्त्वाची मानली जात आहे. कारण, जरी उत्पन्न हा एक महत्त्वाचा घटक असला तरी पैसा म्हणजेच मानवाचे सर्वस्व व त्यावरच त्याचे जीवन अवलंबून आहे असा त्याचा अर्थ मुळीच होत नाही. तर पुरूष-स्त्री साक्षरता, शिक्षण,

आरोग्य, विकासाची समान संधी, आयुर्मान इ. गोष्टी महत्त्वाच्या आहेत. कारण मानवाच्या सर्वच व्यवहारांचे अंतिम उद्दिष्ट, 'मानव विकास' हेच आहे.

मानव विकासाच्या लोकप्रियतेच्या मुळामध्ये प्रसिध्द अर्थशास्त्रज्ञांचे बौध्दिक योगदान आहे. या विचाराचे मुख्य प्रवर्तक जगप्रसिध्द पाकिस्तानी अर्थशास्त्रज्ञ डॉ. मेहबूब उल हक हे आहेत. या विकासाच्या संकल्पनेस जगातील बहुतांश विकासलक्ष्यी विचारवंतानी व समर्थकांनी पाठिंबा दिला. यात जगप्रसिध्द अर्थशास्त्रज्ञ व नोबेल पारितोषिक विजेते डॉ. अमर्त्य सेन हे एक मुख्य विचारवंत आहेत. मानव विकासाचे चार आवश्यक स्तंभ आहेत ते म्हणजे समानता, स्थिरता, उत्पादन आणि सक्षमीकरण होय. यात आर्थिक विकास या घटकास महत्त्वाचे स्थान आहे. परंतु त्यात समानता, वितरण, उपयोग आणि दीर्घकालीन स्थिरता या बाबी लक्षात घेऊन त्याच्या स्पष्टीकरणावर भर देणे आवश्यक आहे.

### १.२ मानव विकास एक स्वतंत्र दृष्टिकोन :

विकासाशी संबंधित विविध संकल्पनामध्ये मानव विकास व विकासांच्या इतर संकल्पना या एकसारख्याच भासू लागतात. परंतु हे जाणीवपूर्वक लक्षात घेण्याची आवश्यकता आहे की,

१) मानवी भांडवल

२) मानवी हक्क

३) मानव संसाधन विकास

४) सामाजिक विकास

५) मानवाच्या मुलभूत गरजांची पूर्तता

६) गरिबी हटाव कार्यक्रम

इत्यादी उपरोक्त संकल्पनांपासून मानव विकास ही एक स्वतंत्र व वेगळी संकल्पना आहे. बहुतेक वेळा असा गैरसमज विचारात घेतला जातो की, मानवी

भांडवल व मानव संसाधन विकास या संकल्पनेचा समानार्थी शब्द म्हणजेच 'मानव विकास संकल्पना' होय, पण असे नाही. मानवी भांडवल ही संकल्पना सर्वप्रथम सन १९६० मध्ये स्कूहल्ट्स यांने मांडली, जी संकल्पना मानवामधील अंगभूत कौशल्य व उत्पादन क्षमता यांच्याशी संबंधित आहे. जसे भौतिक भांडवल (उदा. यंत्र, साधने, सामुग्री इ.) हे राष्ट्रीय उत्पादन वाढीमध्ये सहभागी होते. त्याप्रमाणे स्कूहल्ट्स यांच्या मते, मानवामधील अंगभूत कौशल्यांचा उपयोग सुध्दा राष्ट्रीय उत्पन्न वाढीसाठी केला जाऊ शकतो. अशाप्रकारे मानवी भांडवल व मानव संसाधन विकास या संकल्पनांचा आराखडा हा मानवी भांडवलावर आधारभूत आहे. ज्यामध्ये मानव हे एक साधन आहे तर जास्तीजास्त राष्ट्रीय उत्पादनातील वाढ हे साध्य आहे. मानवामध्ये शिक्षण, आरोग्य, पोषण इ. मार्फत केलेली गुंतवणूक ही केवळ वैयक्तिक व्यक्तीस, कुटूंबास व समाजास जास्तीत जास्त नफा (Rate of Return) मिळवून देण्यासाठी केलेली असते.

दुसऱ्या अंगाने असे म्हणता येईल की, मानव विकास संकल्पनेमध्ये मानव हे साधन नसून ते एक साध्य आहे. म्हणून मानवामध्ये शिक्षण, आरोग्य, पोषण इ. मार्फत केलेली गुंतवणूक ही यासाठी महत्वाची नाही की, त्याद्वारे जास्तीत जास्त राष्ट्रीय उत्पन्न वाढविता येईल. किंबहुना असे म्हणता येते की, मानव विकासात केलेली गुंतवणूक ही वैयक्तिक, कुटुंबास व समाजास जास्तीत जास्त नफा (Rate of Return) मिळवून देण्यासाठी केलेली नसून ती मानवाच्या क्षमता विकसित करण्यासाठी महत्त्वाची असते. प्रसिध्द अर्थशास्त्रज्ञ पॉल स्ट्रीटेन यांनी मानव विकास व मानव संसाधन विकास यातील फरक स्पष्ट करताना खालील बाबी सांगितल्या आहेत[४].

- मानव संसाधन विकास करताना केवळ समाजातील उत्पादक लोकसंख्येचा विचार केला जातो. तर मानव विकासात मात्र समाजातील सर्व स्तरावरील उदा. वृध्द, दुर्बल, आजारी व अपंग इ. लोकांच्या विकासाच्या दृष्टीकोनातून विचार केला जातो.

- मानव संसाधन विकास प्रकियेत वैयक्तिक व्यक्तीसच गृहित धरण्यात येते, कारण, त्याच्यापासूनच फायदा होणार असतो. मात्र मानव विकास कार्यक्रमात सर्वच व्यक्तींना सहभागी करून घेण्यात येते.
- महिलांच्या संबंधित या दोन्ही विकास प्रक्रियेतील फरक हा स्पष्टपणे जाणवतो. तो असा की, मानव संसाधन विकासात महिलांना फक्त एक उत्पादनाचे साधन म्हणूच पाहिले जाते तर मानव विकासात मात्र महिला या उत्पादनाचे साधन नसून त्या एक साध्य आहेत यामध्ये त्यांच्या पोषणाकडेही अधिकतम महत्त्व दिले जाते.

मानव संसाधन विकास व मानव विकास या दोन्ही संकल्पना स्पष्ट करताना हेही लक्षात घेणे आवश्यक आहे की, त्या एकमेकांशी संलग्न आहेत. मानव विकास हे एक मुलभूत पाया तयार करते, ज्याद्वारे मानव संसाधनांचा विकास हा चांगल्या प्रकारे होऊन राष्ट्रीय उत्पादन वाढीस मदत होते.


मानव विकास संकल्पनेच्या साह्याने प्रामुख्याने खालील तीन बाबी साध्य करणे आवश्यक आहेत. कारण, मानवाच्या आवडी-निवडीच्या परिघाचा विस्तार करण्यासाठी याची आवश्यकता आहे.

- कार्यक्षमता (Efficiency): कार्यक्षमता म्हणजे अस्तित्वातील संसाधनांचा जास्तीतजास्त उपयोग करणे होय. मानव विकासाच्या दृष्टिकोन हा भौतिक साधनांचा जास्तीत जास्त विस्तार करून मानवाच्या आवडी-निवडीचा विस्तार करणे व जास्तीत जास्त समाधान मिळवून देणे असा आहे. मानव विकासासाठी कार्यक्षमता हा घटक महत्त्वाचा आहे कारण, इतर कोणत्याही विकासाच्या सिध्दांताप्रमाणे मानवी गरजांच्या पूर्ततेसाठी साधनांचा पुरवठा आणि सेवा यांमध्ये कशी वाढ होईल याचा विचार केलेला नाही.

- समानता (Equity) : समानता ही बदलात्मक व विभाजनात्मक न्याय यांच्याशी निगडीत असते, विशेषतः वेगवेगळ्या लोकांमध्ये संधीचे विभाजन या अर्थाने लक्षात घेणे आवश्यक आहे.
- स्वातंत्र्य (Freedom) : स्वांतत्र्य म्हणजे निवडीची शक्यता ही मानव विकास पध्दतीतील कार्यक्षमता व समानता यांच्यातील दुवा होय. डॉ. सेन यांच्या मते, 'स्वातंत्र्यास घटनात्मक व साधनात्मक महत्व आहे. स्वातंत्र्य हे महत्त्वपूर्ण आहे कारण ते दोन्ही मानवी क्षमतांना कार्यान्वीत करणारे व प्रत्येकांच्या गरजा आणि संधीची समान विभागणीस प्राधान्य देते.'

सामाजिक संधीच्या विभाजनाने बाजारपेठ विस्तारीत होतात आणि कामगारांची उत्पादन क्षमता वाढते. तसेच समानतेमुळे कार्यक्षमताही वाढते. स्वातंत्र्याचे अस्तित्त्व सृजनशीलता विकसित होण्यास मदत करते आणि कार्यक्षमता वृध्दिंगत करते. एक समृध्द अर्थव्यवस्था व्यक्तिगत समाधानासाठी अधिक संधी पुरविते, जेव्हा कार्यक्षमता लोकशाही स्वातंत्र्यास स्थैर्य निर्माण करून देते. समानतेमध्ये सर्व पातळीच्या लोकांमध्ये साधक बाधक सार्वत्रिक चर्चा शक्य करून देते जेणे करून स्वातंत्र्य, समतेसोबतच विकसित होते. हे खालील आकृतीच्या साह्याने अधिक स्पष्ट होईल.

**आकृती क्र. १.१**
**परस्पर क्षमतांचे सशक्तीकरण**




संदर्भ : मानव विकास अहवाल २००२ पृ. ५३

## १.३ मानव विकास संकल्पनेची काही वैशिष्ट्ये :

मानव विकास संकल्पना समजण्यासाठी या संकल्पनेची काही मुलभूत वैशिष्ट्ये लक्षात घेणे आवश्यक आहे ते खालील प्रमाणे स्पष्ट करण्यात आलेली आहेत.

- चालू/अपूर्ण प्रक्रिया (Under Construction): मानव विकास संकल्पना ही एक अपूर्ण व चालू अवस्थेतील प्रकिया आहे. या संकल्पनेस आजतागायत पूर्णत्व प्राप्त झालेले नाही. विषयातील नाविन्य, विषयातील गुंतागुंत, अजूनही यात बरेच घटक योग्य पध्दतीने हाताळण्याची आवश्यकता आहे. एक शास्त्र म्हणून उदयास येण्याच्या दृष्टीने यात अनेक कमतरता शिल्लक आहेत.

- बहुआयामी संकल्पना (Multidimensional paradigam): ही एक बहुआयामी संकल्पना आहे. एकाच वेळी विविध अंगानी विचार करते. उदा. अनेकतत्वादी व पूर्णतावादी (pluralist and holistic) मूल्य. मानव विकास या संकल्पनेचे हे वैशिष्ट्य या संकल्पनेस अधिक वृध्दिंगत करते खरे पण, याबरोबरच अधिक गुंतागुंतीचे ही बनवते.
- आंतरविद्याशाखीय (Interdisciplinary): ही संकल्पना अशा आंतरविद्याशाखेचा नमुना आहे की, ज्यात अर्थव्यवस्थेच्या दर्जेदार नीती व राजकीय तत्त्वांना स्पर्श करते. विशेषतः कल्याणकारी, सामाजिक आवडी-निवडीशी निगडीत सिंध्दांत ज्यांना संख्याशास्त्र व गणिताचा भक्कम आधार आहे. याही पुढे जाऊन असे म्हणता येईल की, ही विकास पध्दती एकत्रितपणे राजकीय, सामाजिक आणि सामाजिक धोरणे या सिध्दांताच्या आव्हानांना सामोरे जाते.
- कृतियुक्त (Action-oriented): मानव विकास ही एक कृति-युक्त प्रक्रिया आहे. संयुक्त राष्ट्रसंघ विकास कार्यक्रमाच्या माध्यमातून ही प्रक्रिया जगातील विविध शासन व्यवस्था, विकासाशी निगडीत यंत्रणा, लोक, स्वंयसेवी संस्था यांच्या पर्यंत पोहचली आहे. मानवाच्या जीवनमानामध्ये अशा पध्दतीने बदल करणे आवश्यक आहे, ज्यात मानवास विविध व उपयुक्त आवडी-निवडीच्या संधी असतील. अशा पध्दतीचे कार्य प्रत्यक्षपणे करणे आवश्यक आहे. व अशा पध्दतीचे कार्य आंतरराष्ट्रीय स्तरावरून तालुका स्तरापर्यंत संयुक्त राष्ट्रसंघ विकास कार्यक्रमाच्या माध्यमातून चालू आहे.

## १.४ मानव विकास संकल्पना व व्याख्या :

विकास ही संकल्पना फक्त आर्थिक विकासापुरती मर्यादित राहिलेली नसून ती दरडोई उत्पन्नापेक्षा विविध अंगानी व्यापलेली आहे. (उदा. शैक्षणिक दर्जा, आरोग्य इ.)

म्हणजेच विकास म्हणजे फक्त उत्पन्नातील वाढ नसून लोकांच्या सर्वांगीण कल्याणात आणि आर्थिक क्षमतातील वाढ होय.

मानव विकास एक बहुआयामी (Multidimensional paradigam) संकल्पना आहे. थोडक्यात यास जोडून असे म्हणता येईल की, मानव विकास व आर्थिक विकास यातील मूलभूत फरक म्हणजे आर्थिक विकास या संकल्पनेत केवळ 'उत्पन्न वाढ' या एकाच घटकाचा समावेश होतो तर, मानव विकास या संकल्पनेत 'आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय' अशा विविध घटकांचा विचार केला जातो. म्हणून मानव विकास या संकल्पनेस बहुआयामी संकल्पना संबोधले जाते. मानव विकास संकल्पनेचा उदय हा इ.स. १९८० मधील प्रसिध्द व महत्त्वपूर्ण विकासाच्या संकल्पनेवरील टीकेतून झालेला आहे. ज्यात राष्ट्राचा आर्थिक विकास व मानवासाठीच्या संधीतील वाढ यांचा समावेश होता. पाकिस्तानी अर्थशास्त्रज्ञ डॉ. मेहबूब उल हक्क यांनी मानव विकास पध्दती (paradigam) विकसित केली. सातत्यपूर्ण आर्थिक विकास होत असताना देखील समाजात असुरक्षितता सर्वत्र पसरत होती. ज्यामध्ये गुन्हेगारी, लोकसंख्या, एड्स इ. सारख्या समस्या होत्या. यामुळे अशा विकास पध्दतीची आवश्यकता हक्क यांना वाटत होती. मानव विकास ही एक विकासाची पध्दती (paradigam) आहे. ज्यात राष्ट्रीय उत्पन्नात वाढ व घट यापेक्षा भरपूर काही दडलेले आहे. यामध्ये मानवाभोवती अशा वातावरणाची निर्मिती करणे ज्यात मानव त्याच्या उत्पादन क्षमतांचा पूर्ण उपयोग करतील, तसेच ते त्यांच्या गरजेप्रमाणे जीवन जगतील. 'मानव हीच खरी राष्ट्राची संपती आहे.' विकासाच्या प्रकियेत मानवास केंद्रस्थानी ठेवणे म्हणजे मानव विकास होय. यासाठी दिर्घकालीन गुंतवणूकीची आवश्यकता आहे व ती गुंतवणूक लोकांच्या आरोग्यासाठी, शिक्षणासाठी, त्यांचे कौशल्य विकसित करणे इ. स्वरुपात केली, तरच ती शाश्वत गुंतवणूक होऊ शकेल. मानव विकासात अंगभूत असलेले विविध विचार प्रवाह थोडक्यात खालील प्रमाणे आहेत.

मानव विकासास दोन बाजू आहेत, एक म्हणजे मानवाच्या क्षमतांचा विकास (आरोग्य व ज्ञान इ. च्या माध्यमातून) व दुसरी म्हणजे लोकांनी त्याच्या क्षमतांचा वापर करणे होय.

- ❖ मानव विकास ही संकल्पना प्रामुख्याने खालील तीन घटकांचे प्रतिनिधित्व करते.[५]

  अ) सामान्य मानवाचे हक्क

  ब) क्षमतांचा विकास व संधीमध्ये वाढ

  क) समान विकासाच्या संधी.

- ❖ मानव विकास संकल्पनेच्या केंद्रस्थानी समजण्यात येणारे काही घटक खालील प्रमाणे आहेत.[६]

- ➢ सामाजिक सुधारणा – ज्ञानाचे आदान प्रदान, उत्तम आहार व आरोग्य सुविधा,
- ➢ समानतेत वाढ - स्त्री-पुरूष समानता, गरीब-श्रीमंत यांच्यातील दरी कमी करणे,
- ➢ सहभाग व स्वातंत्र्य - स्वंयरोजगार, लोकशाही राजकारण, कायदेशीर व राजकीय अधिकार अणि सांस्कृतिक स्वातंत्र्य,
- ➢ शाश्वतता - भावी पिढीसाठीची सर्वांगीण गुंतवणूक,
- ➢ सुरक्षितता – दैनदिन जीवनातील सुरक्षितता, भूक, बेरोजगारी, उपासमार, भांडणे यापासून संरक्षण.

अशा विविध घटकांचा विचार करता मानव विकाससंबंधित विविध अर्थतज्ज्ञ, संस्था यांनी व्याख्या केलेल्या आहेत. त्यातील काही व्याख्या खालील प्रमाणे आहेत.

अ) प्रसिध्द अर्थतज्ज्ञ डॉ. मेहबूब उल हक्क यांच्या मते, ''विकासाचा मुख्य उद्देश मानवास जास्तीत जास्त संधी उपलब्ध करून देणे. या संधी अमर्याद व वेळेनुरूप

बदलता येणाऱ्या असाव्यात. मानवाची मिळकत ही उत्पन्न वाढीच्या अंकात दिसण्याऐवजी त्यांत ज्ञान वृध्दी, उत्तम आहार व आरोग्य सुविधा, सुरक्षित जीवनमान, शारीरिक वेदना व गुन्हेगारीपासून सुरक्षितता, फावला वेळ घालविण्याचे समाधान, राजकीय व सास्कृतिक स्वातंत्र्य आणि समाजात मिसळण्याची जाणीव यात दिसेल. तसेच विकासाचा मुख्य उद्देश मानवासाठी अशा समाजिक वातावरणाची निर्मिती करणे ज्यात आरोग्यसंपन्न व नाविण्यपूर्ण जीवन जगता येईल.''[७] (The basic purpose of development is to enlarge people's choices. In principle, these choices can be infinite and can change over time. People often value achievements that do not show up at all, or not immediately, in income or growth figures: greater access to knowledge, better nutrition and health services, more secure livelihoods, security against crime and physical violence, satisfying leisure hours, political and cultural freedoms and sense of participation in community activities. The objective of development is to create an enabling environment for people to enjoy long, healthy and creative lives.)

आ) नोबेल पारितोषिक विजेते अर्थशास्त्रज्ञ डॉ. अमर्त्य सेन याच्या मते, ''मानव विकास हा एक असा दृष्टिकोन आहे, ज्यात मानव जीवनाचा एक भाग असलेल्या अर्थव्यवस्थेच्या विकासापेक्षा तेथील मानव जीवन वृध्दिंगत/विकसित होणे गरजेचे आहे.''[८] (Human development, as an approach, is concerned with what I take to be the basic development idea: namely, advancing the richness of human life, rather than the richness of the economy in which human beings live, which is only a part of it.)

इ) संयुक्त राष्ट्रसंघ विकास कार्यक्रम यांच्या जागतिक पहिल्या मानव विकास अहवाल १९९० नुसार, ''मानव विकास म्हणजे लोकांना मिळणाऱ्या संधीचा परीघ मोठा करण्याची एक प्रक्रिया होय.''[९]

ई) संयुक्त राष्ट्रसंघ विकास कार्यक्रम यांच्या जागतीक मानव विकास अहवाल १९९७ नुसार, ''मानव विकास ही अशी प्रक्रिया आहे की, ज्याद्वारे

सामान्य लोकांच्या निवडीचा विस्तार करून कल्याणाची उच्च पातळी गाठली जाऊ शकते.''[१०]

उ) महाराष्ट्र मानव विकास अहवाल २००२ नुसार, ''मानव विकास म्हणजे शिक्षण, आरोग्य आणि उपजीविकेचे साधन या जीवनाच्या तीन महत्त्वाच्या पैलूसाठी दिलेला लढा आणि त्यांची प्रत्यक्षात झालेली पूर्तता, याचा मिलाप होय.''[११]

ऊ) ''विकासाचा मूलभूत हेतू हा लोकांच्या आवडी-निवडीचा विस्तार करणे असा आहे''. सैध्दांतिक प्रक्रियेप्रमाणे अशा आवडी-निवडी या अनंत असू शकतात किंवा समयपरत्वे परिस्थितीनुसार त्यात बदलही होऊ शकतो[१२].

ए) विकासाचा मुख्य उद्देश असाही आहे की, ''दारिद्र्य रेषेखाली गणना करण्यात आलेल्यांची व विकासाच्या मुख्य प्रवाहापासून दूर राहिलेल्या लोकांची मदत करणे होय. जगात व्यापक प्रमाणावर असे स्विकारण्यात आलेले आहे की, कोणत्याही समाजाचा शेवटचा हेतू हा आर्थिक विकास नसून मानव विकास हाच आहे. तर केवळ आर्थिक विकासामुळे आपोआपच मानव विकास सुनिश्चित होणार नाही.''[१३]

ऐ) मानव विकास दृष्टोकोनाचा मुख्य भाग म्हणजे ''मानवास विकासाचा केंद्रबिंदू बनविणे हा आहे. या संकल्पनेचे महत्त्वाचे ध्येय म्हणजे लोकांचे शाश्वत कल्याण व लोकांसाठी विकास शोधून काढणे. लोकांनी, लोकांसाठी, लोकांकडून घडवून आणलेला विकास होय.''[१४]

क) ''केवळ उत्पन्न मिळविणे ही एक निवड आहे, ती महत्त्वाची ही आहे. परंतु ते संपूर्ण जीवनाचे सार नाही. उत्पन्न एक साधन आहे, तर मानव विकास एक ध्येय आहे. ''[१५]

थोडक्यात वरील सर्व व्याख्येचा विचार करता मानव विकास घडवून आणण्यासाठी मानवाशी संबंधित प्रत्येक घटकामध्ये सकारात्मक दृष्टिकोनातून वाढ होणे आवश्यक आहे.

## १.५ मानव विकासाची आवश्यकता :

जगामध्ये मानव विकासाचे महत्त्व वाढत आहे. संपूर्ण जगात प्रसार माध्यमे, राजकारणी, स्वंयसेवी संस्था, आणि शासन या शब्दाचा उपयोग मोठ्या प्रमाणात करू लागले आहेत. मानव विकास या शब्दामुळे प्रत्यक्ष मानवांच्या भावनांना हात घालता येतो. त्यामुळे मानव विकास साहाजिकच लोकप्रिय झालेला आहे. जनता ही देशाची खरी संपत्ती आहे. परंतु बहुतांश वेळा हे पूर्ण सत्य विसरले जाते. एकंदरीत मानव कल्याणाकरीता साधन सामुग्री आणि संपत्ती एकत्र करीत असतो. परंतु या सर्व प्रकारच्या विकास प्रक्रियेत लोकांचा सहभाग हवा, शेवटच्या दशकात संपूर्ण जगात साधनसामुग्री, संपत्ती यात अमूलाग्र वाढ झालेली आहे. परंतु या विकासाशी न जोडल्या गेलेल्या भरपूर लोकांचा या वाढत्या विकासात त्यांचा योग्य विकास होताना दिसत नाही.

जगामधील गरिबी, मोठ्या प्रमाणावर असलेली असमानता तसेच राजकीय इच्छाशक्तीचा अभाव यामुळे जगातील बहुतांश लोकांना खऱ्या आवडी-निवडीचे स्वातंत्र्य मिळत नाही. मानवास विकसित करण्यास निव्वळ आर्थिक बाबींसारखा एकच घटक कारणीभूत आहे असे म्हणता येणार नाही, तर इतर घटकांचा अभ्यास करून त्यांच्या सहाय्याने मानवी क्षमतांचा विकास करणे गरजेचे आहे. मानव विकास हा शिक्षण, आरोग्य व कुटुंबकल्याण यांच्या माध्यमातून साध्य करता येतो. मानव विकासाचा परिणाम समाजातील राजकीय, न्यायिक आणि सामाजिक परिस्थितीवर होत असतो. समाजाचा आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक विकास होणे अत्यंत गरजेचे आहे. मानव विकासाची गरज थोडक्यात खालील प्रमाणे स्पष्ट करता येईल.

अ) **मानवाची कार्यक्षमता वाढ :** मानव विकासात उत्तम आरोग्यासाठीच्या व दर्जेदार शिक्षणाच्या सोई सुविधा असणे गरजेचे आहे. या सोई सुविधांमुळे मानवाच्या विविध कौशल्याचा विकास होण्यास मदत होते. पर्यायाने समाजातील मानवाची सर्वांगीण उत्पादनक्षमता वाढण्यास मदत होते.

आ) **संधोधन व विकास :** देशाच्या आर्थिक विकासात संशोधन आणि विकासाचे महत्व अनन्यसाधारण आहे. देशाचा विकास हा संशोधनावर अवलंबून असतो. देशाच्या मनुष्यबळापैकी काही मनुष्यबळ हे सतत नवनवीन कार्यात गुंतलेले असते. त्यामुळे नवीन संशोधनास चालना देऊन नवीन ज्ञानाची प्राप्ती होते. या नवीन ज्ञानाचा उपयोग देशाच्या आर्थिक विकासात करून घेता येईल. विविध क्षेत्रातील मानवांच्या नवनिर्मितीमुळे संशोधन आणि संशोधनात्मक विकासाला चालना मिळते.

इ) **लोकसंख्येवर नियंत्रण :** मानव विकासात शिक्षणास महत्त्वाचे स्थान आहे. समाजातील सुशिक्षित लोकांना मोठ्या कुटुंबाचे तोटे समजतात. निरक्षरता हे एक भारतातील लोकसंख्या वाढीचे महत्त्वाचे कारण आहे. विशेषतः महिला निरक्षरतेचे प्रमाण फार जास्त आहे. समाजातील सुशिक्षित लोक वाढत्या लोकसंख्येवर नियंत्रण ठेवतात.

ई) **सामाजिक न्यायव्यवस्था टिकविणे :** मानव विकास झाला तर तेथील लोकांच्या राहणीमानाचा दर्जा उंचावतो. अशा ठिकाणी चांगले नागरिक म्हणून लोक जीवन जगण्याचा नेहमीच प्रयत्न करतात. अशा समाजातील लोक समाजविघातक कृत्ये घडवून आणत नाहीत. त्यामुळे सामाजिक न्यायव्यवस्था टिकून राहण्यासाठी याची मदत होईल.

उ) **पर्यावरणाची जाणीव :** मानवाच्या शाश्वत विकासासाठी चांगल्या पर्यावरणाची आवश्यकता आहे, हे सर्वमान्य आहे. जेव्हा सुशिक्षित लोकांना पर्यावरण प्रदूषणाचे

मानव जीवनावरील परिणाम, लक्षात येतात तेव्हा पर्यायाने हे लोक पर्यावरण चांगले ठेवण्याच्या दृष्टीने विचार करतात.

ऊ) **समानता :** मानव विकासात समानतेला महत्वाचे स्थान आहे. उच्च मानव विकास असलेला समाज समानतेला महत्त्व देतो. तसेच समाजातील शिक्षण, उद्योग व इतर बाबतीत समाजात समानता टिकवून ठेवण्याच्या दृष्टीने प्रयत्नशील असतो.

ए) **सक्षमीकरण :** मानव विकास होण्यासाठी समाजाचे सक्षमीकरण करणे गरजेचे आहे. मानव विकास असलेल्या समाजात पुरुष व स्त्री दोघेही सक्षम असतात. त्यामुळे समाजात समता प्रस्थापित होते. या समाजातील लोक सामाजिकता पाळतात.

ऐ) **आर्थिक विकास :** अर्थव्यस्थेमधील सर्व प्रकारच्या लोकांची सर्वांगीण क्षमता वाढीसाठी मानव विकास होणे गरजेचे आहे. उच्च कार्यक्षमता असलेले लोक त्यांच्या कामात नवनवीन अद्ययावत तंत्रे शोधून त्यांचा वापर कुशलतेने करतात. पर्यायाने वेळ व श्रमाची बचत होऊन देशाचा आर्थिक विकास होण्यास मदत होते.

**१.६ मानव विकास निर्देशांक :**

'मानवाच्या सर्वच व्यवहारांचे अंतिम उद्दिष्ट मानव विकास हेच असते' हे जरी सत्य असले तरी मानव विकास ही बहुअंगी संकल्पना असल्यामुळे तो मोजणे ही तितकी सोपी प्रकिया नाही. याला मूर्त रूप देण्याच्या गरजेतूनच सन १९९० मध्ये संयुक्त राष्ट्रसंघ विकास कार्यक्रम (UNDP) यांनी पहिला मानव विकास अहवाल प्रकाशित केला. या अहवालात मानव विकास म्हणजे काय? मानव विकास निर्देशांक कसा मोजायचा? तो कसा तयार करावा? यासंबंधी सविस्तरपणे उहापोह केलेला आहे. मानव विकास निर्देशांक तयार करण्याचे कार्य विख्यात अर्थशास्त्रज्ञ डॉ. मेहबूब उल हक्क यांनी केले. तर नोबेल पारितोषिक विजेते व कल्याणकारी अर्थशास्त्राचे पुरस्कर्ते डॉ. अमर्त्य सेन यांच्यामुळे त्याला शास्त्रीय स्वरुप प्राप्त झाले. मानव विकास निर्देशांकाचा मुख्य उद्देश

म्हणजे विकासाच्या अर्थशास्त्रज्ञाचे लक्ष मानवाचा सर्वांगीण विकास हे अग्रभागी ठेवून केलेला आर्थिक विकास, यावर नेणे हे होय.

अशा एका विशिष्ट निर्देशांकांची आवश्यकता डॉ. हक्क यांना वाटत होती, ज्याच्या माध्यमातून जनता, धोरणकर्ते, राज्यकर्ते हे आर्थिक विकासापेक्षा मानवी कल्याणात विकास मोजतील. मात्र डॉ. अमर्त्य सेन यांना प्रथमतः ही संकल्पना मान्य नव्हती कारण, मानवाच्या संपूर्ण क्षमता या एका निर्देशांकावरून स्पष्ट होणार नाहीत असे त्यांचे मत होते. मात्र हक्क यांचे मत असे होते की, एका साध्या निर्देशांकामुळे राज्यकर्त्यांचे, धोरणकर्त्यांचे लक्ष आर्थिक विकासापेक्षा मानव विकासावर केंद्रीत होईल. यातून मानव विकास निर्देशांक विकसित झाला. या मानव विकास निर्देशांकाची व्याख्या खालील प्रमाणे केली जाते.

अ) ''मानव विकासाच्या स्तरानुसार जगातील देशांचे क्रमांक ठरविण्यासाठी जो निर्देशांक वापरला जातो त्याला मानव विकास निर्देशांक म्हणतात.''[१६]

आ) '' लोकांचे आरोग्य, शिक्षणाचा कालावधी, साक्षरतेचे प्रमाण व दरडोई उत्पन्न इ. च्या मूल्यात होणाऱ्या बदलांचे मापन करण्यासाठी जी गणितीय पध्दती उपयोगात आणली जाते, तिला मानव विकास निर्देशांक म्हणतात.''[१७]

इ) ''मानव विकास निर्देशांक हा स्थूलमानाने आयुर्मान, ज्ञान प्राप्ती व चांगले राहणीमान या तीन सामाजिक घटकांची सरासरी होय. ''[१८]

ई) ''मानव विकास निर्देशांक म्हणजे सरासरी आयुर्मान निर्देशांक, शिक्षणाची प्राप्ती निर्देशांक व जीवनमान निर्देशांक या तिन्हीची समभारीत सरासरी होय. ''[१९]

लोकांचे सरासरी आयुर्मान, शिक्षणाचा कालावधी/प्रौढसाक्षरतेचे प्रमाण, संयुक्त पटनोंदणी व दरडोई उत्पन्न इ. मानकांना समान महत्त्व देऊन मानव विकास निर्देशांक काढला जातो. या निर्देशांकाचे एकूण मूल्य ० ते १ च्या दरम्यान निश्चित केलेले आहे. निर्देशांक १ असला तर तो सर्वात चांगला समजला जातो व देशांची क्रमवारी एक

पासून शून्यापर्यंत गुणानुसार लावली जाते. निर्देशांकानुसार देशांची वर्गवारी पुढील प्रमाणे केली जाते.

**तक्ता क्र. १.१**

**निर्देशांकानुसार वर्गवारीची पध्दती**

| **अ.क्र.** | **निर्देशांकाचे मूल्य** | **वर्गवारी** |
|---|---|---|
| १. | १-०.९ | अत्युच्च विकसित देश |
| २. | ०.९-०.८ | उच्च विकसित देश |
| ३. | ०.८-०.५ | मध्यम विकसित देश |
| ४. | ०.५ पेक्षा कमी | अल्प विकसित देश |

संदर्भ : डॉ. विनायक गोविलकर, मानव विकास निर्देशांक अर्थबोध, (२००९) दैनिक सकाळ

मानव विकास निर्देशांक काढण्यासाठी प्रत्येक उपनिर्देशांकाचे अपेक्षित उद्दिष्ट निश्चित करण्यात आलेले आहे. प्रत्येक उपनिर्देशांकासाठी कमाल व किमान असे मूल्य निश्चित करण्यात आले आहे. हे मूल्य ० ते १०० मध्ये मोजले जाते. या तिन्ही उपनिर्देशांकांना समान महत्त्व म्हणजेच संख्याशास्त्राच्या भाषेत समान भार देण्यात येतो.

**तक्ता क्र. १.२**

**मानव विकास निर्देशांकाचे मानके व मूल्य**

| **घटक** | **माप/मोजणी** | **किमान मूल्य** | **कमाल मूल्य** |
|---|---|---|---|
| दीर्घ व स्वास्थ्यपूर्ण जीवन | सरासरी आयुर्मान (LEI) | २५ वर्ष | ८५ वर्ष |
| ज्ञान प्राप्ती | साक्षरता प्रमाण (ALR) | ० टक्के | १०० टक्के |
| | संयुक्त पटनोंदणी प्रमाण (CER) | ० टक्के | १०० टक्के |
| राहणीमानाचा दर्जा/जीवनमान | वास्तव दरडोई स्थूल देशांतर्गत उत्पादन(डॉलर) (GDP ppp$) | १०० अमेरिकन डॉलर | ४०००० अमेरिकन डॉलर |

संदर्भ : मानव विकास अहवाल १९९०

**१.६.१ निर्देशांकांचे घटक व गणन पध्दती** :- मानव विकास निर्देशांक काढण्यासाठी खालील तीन घटक व त्यांचे स्वतंत्र निर्देशांक विचारात घेण्यात येतात. हे निर्देशांक खालील प्रमाणे काढण्यात येतात.

**१. दीर्घ व स्वास्थ्यपूर्ण जीवन** **(Life ecpetancy at Birth)**: यामध्ये सरासरी आयुर्मान या घटकाचा विचार केला जातो. सरासरी आयुर्मान म्हणजे मानवाच्या जन्मापासून ते मृत्यूपर्यंतचे आयुष्य होय. याचा अर्थ जन्माला आलेले नवीन अर्भक जास्तीत जास्त किती वर्ष जगू शकते याची काढलेली सरासरी होय. हे सरासरी आयुर्मान किमान २५ ते कमाल ८५ वर्ष यामध्ये मोजले जाते.

उदा. कमाल मूल्य — ८५ वर्ष, किमान मूल्य — २५ वर्ष व प्रत्यक्ष मूल्य ७८.९ वर्ष असल्यास पुढील सूत्राचा वापर करून आयुर्मान निर्देशांक काढता येईल.[२०]

$$\text{आयुर्मान निर्देशांक} = \frac{\text{प्रत्यक्ष मूल्य} - \text{किमान मूल्य}}{\text{कमाल मूल्य} - \text{किमान मूल्य}}$$

$$\frac{७८.९ - २५}{८५ - २५} = \frac{५३.९}{६०} = ०.९० \quad \text{..... p१}$$

**२. ज्ञान प्राप्ती** **(Education Attainment)**: यासाठी खालील दोन उपघटकांचा विचार केला जातो.

**अ) साक्षरता दर** **(Adult Literacy Rate)**: १५ वर्ष किंवा त्यापेक्षा जास्त वयाच्या व्यक्ती आपल्या दैनंदिन जीवनात वाचू, लिहू किंवा समजू शकतात त्यांना 'प्रौढ साक्षर' म्हणतात. म्हणजेच व्यक्तीमध्ये वाचण्याची आणि लिहिण्याची योग्यता असली पाहिजेत. एखादी व्यक्ती केवळ स्वाक्षरी करू शकते परंतु, त्याच्यामध्ये लिहिण्या-वाचण्याची योग्यता नसेल तर त्याला साक्षर म्हणता येत नाही. यास २/३ इतका भार दिला जातो तसेच याचे किमान मूल्य ० व कमाल मूल्य १०० असते.

उदा. कमाल मूल्य — १०० टक्के, किमान मूल्य — ० टक्के व प्रत्यक्ष मूल्य ९९.० टक्के असल्यास पुढील सूत्राचा वापर करून प्रौढ साक्षरता दर काढता येईल. [२१]

$$\text{साक्षरता दर} = \frac{\text{प्रत्यक्ष मूल्य} - \text{किमान मूल्य}}{\text{कमाल मूल्य} - \text{किमान मूल्य}}$$

$$\frac{९९.० - ००}{१०० - ००} = ०.९९$$

या घटकास २/३ भार द्यावयाचा आहे. त्यानुसार,

$$०.९९ \times \frac{२}{३} = ०.६६$$

**ब) संयुक्त पटनोंदणी प्रमाण**(Combined Enrolment Ratio): म्हणजे कोणत्याही शैक्षणिक पातळीवर ज्यांची नांवे नोंदवली आहेत, अशा विद्यार्थ्यांची संख्या होय. यात वयाची कोणतीही अट नाही. यामध्ये प्राथमिक, माध्यमिक व महाविद्यालयीन पातळीवर पटनोंदणी केलेले विद्यार्थ्यांची संख्या व त्यांचे एकूण लोकसंख्येशी काढलेले प्रमाण होय. यास १/३ भार दिला जातो तसेच याचे किमान मूल्य ० व कमाल मूल्य १०० असते.

उदा. कमाल मूल्य — १०० टक्के, किमान मूल्य — ० टक्के व प्रत्यक्ष मूल्य ९८. टक्के असल्यास पुढील सूत्राचा वापर करून साक्षरता दर काढता येईल.[२२]

$$\text{संयुक्त पटनोंदणी प्रमाण} = \frac{\text{प्रत्यक्ष मूल्य} - \text{किमान मूल्य}}{\text{कमाल मूल्य} - \text{किमान मूल्य}}$$

$$\frac{९८.० - ००}{१०० - ००} = ०.९८$$

या घटकास १/३ भार द्यावयाचा आहे त्यानुसार,

$$०.९८ \times \frac{१}{३} = ०.३३$$

वरील दोन्ही बाबींचा विचार करून शैक्षणिक प्राप्ती (EAI२/३ ALR+१/३=CER) मध्ये मोजतात. म्हणजेच साक्षरता प्रमाण-०.६६ व संयुक्त पटनोंदणी प्रमाण-०.३३ आहे. यानुसार शैक्षणिक प्राप्ती निर्देशांक खालील प्रमाणे असेल.

$$०.६६ + ०.३३ = \mathbf{०.९९}$$ ..... p२

**३ उच्च स्तरीय जीवनमान** (Standard of Living): जीवनमानाचे मापन करण्यासाठी वास्तव दरडोई स्थूल देशातंर्गत उत्पादन विचारात घेतले जाते. चांगले जीवन जगण्यासाठी संसाधनाची आवश्यकता असते. दरडोई उत्पन्न हे संसाधनाचे साधे व सोपे माप आहे. कारण ते आंतरराष्ट्रीय स्तरावर तुलना करण्याच्या दृष्टीने योग्य समजले जाते. मात्र त्यासाठी निरनिराळ्या देशातील दरडोई उत्पन्न एका समान एककात आणणे आवश्यक आहे. म्हणून ते प्रथम क्रयशक्ती समता डॉलर (purchasing power parity doller PPP$) मध्ये बदलावे लागते. ते किमान १०० व कमाल ४०,००० डॉलर मध्ये मोजतात. यामध्ये लॉगटेबलचा वापर करण्यात येतो.

उदा. कमाल मूल्य – ४०,००० डॉलर, किमान मूल्य – १०० डॉलर व प्रत्यक्ष मूल्य ३६६०० डॉलर असल्यास पुढील सूत्राचा वापर करून साक्षरता दर काढता येईल.[२३]

$$\text{दरडोई उत्पन्न निर्देशांक} = \frac{\log y\,(\text{दरडोई देशांतर्गत उत्पादन प्रत्यक्ष मूल्य}) - \log y\,(\text{किमान मूल्य})}{\log y\,(\text{कमाल मूल्य}) - \log y\,(\text{किमान मूल्य})}$$

$$\frac{\log ३६,६०० - \log १००}{\log ४०,००० - \log १००} = ०.९९$$

$$\frac{४.५६३४}{४.६०२} = ०.९९$$ ..... p३

वरील तिन्ही घटकातील ($P_१, P_२, P_३$) अंतिम मूल्यांच्या आधारे मानव विकास निर्देशांक काढण्यात येतो तो खालील प्रमाणे.

$$\text{मानव विकास निर्देशांक} = \frac{०.९९ + ०.९९ + ०.९९}{३} = ०.९५६$$

म्हणून, वरील उदाहरणातील मानव विकास निर्देशांक हा ०.९५६ आहे.

स्थानिक शासनानुसार देश, राज्य, शहर व गांव इ. साठी मानव विकास निर्देशांक विकसित करता येतो. मानव विकास निर्देशांक काढण्यासाठीची मानके, विविध ठिकाणी वेगवेगळी विचारात घेतली जाऊ शकतात. मानव विकास अहवाल तयार करण्यासाठी संयुक्त राष्ट्रसंघ विकास कार्यक्रम (UNDP), भारत देश (२००१) आणि महाराष्ट्र राज्य (२००२) यांनी विचारात घेतलेल्या मानकांची माहिती खालील प्रमाणे आहे.

- संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रम :

**तक्ता क्र. १.३**
**युएनडीपी : मानके व त्यांचे मूल्य**

| अ.क्र. | मानके | अधिकतम मूल्य | न्यूनतम मूल्य |
|---|---|---|---|
| १. | आयुर्मान | ८५ वर्ष | २५ वर्ष |
| २. | साक्षरता दर | १०० टक्के | ० टक्के |
| ३. | सरासरी पटनोंदणी दर | १०० टक्के | ० टक्के |
| ४. | दरडोई उत्पन्न *(PPP US$)* | ४०,००० डॉलर | १०० डॉलर |

संदर्भ : मानव विकास अहवाल १९९०

- भारत देश (२००१) :

**तक्ता क्र. १.४**

**भारत २००१ : मानके व त्यांचे मूल्य**

| अ.क्र. | मानके | अधिकतम मूल्य | न्यूनतम मूल्य |
|---|---|---|---|
| १. | उपभोगावरील खर्च (प्रति व्यक्ती प्रति माह) | रु. ३२५ | रु. ६५ |
| २. | साक्षरता दर ७+ | १०० टक्के | ० टक्के |
| ३. | औपचारिक शिक्षणाबाबत समायोगी संकल्पना *(Adjusted Literacy for Formal Education)* | ७ टक्के | ० टक्के |
| ४. | आयुर्मान (वर्षात) | ८० वर्ष | ५० वर्ष |
| ५. | दरडोई उत्पन्न *(PPP US$)* | ४०,००० डॉलर | २०,१०० डॉलर |

संदर्भ : राष्ट्रीय मानव विकास अहवाल २००१

- भारत देश (२०११) :

**तक्ता क्र. १.५**

**भारत २०११ : मानके व त्यांचे मूल्य**

| अ.क्र. | मानके | अधिकतम मूल्य | न्यूनतम मूल्य |
|---|---|---|---|
| १. | आयुर्मान | ८० वर्ष | ५० वर्ष |
| २. | साक्षरता दर ७+ | १०० टक्के | ० टक्के |
| ३. | सरासरी शिक्षणाचा कालावधी | ७ टक्के | ० टक्के |
| ४. | उपभोगावरील खर्च (प्रति व्यक्ती प्रति माह) | रु. १०९० | रु. २५५ |

संदर्भ : भारत मानव विकास अहवाल २०११

महाराष्ट्र शासनाने 'मानव विकास अहवाल महाराष्ट्र २००२' यामध्ये अर्भक मृत्यूदर, साक्षरता दर, सरासरी शिक्षणाचा कालावधी व दरडोई उत्पन्न इ. मानकांचा आधार घेतला आहे. या अहवालात सदर मानकांचे अधिकतम व न्यूनतम मूल्य विचारात घेण्याऐवजी चांगला प्रतिसाद मूल्य, कमी प्रतिसाद मूल्य व जिल्हास्तरीय प्रतिसाद मूल्य विचारात घेतले होते. अशा वेळवेगळ्या स्तरावर वेगवेगळी मानके विचारात घ्यावयाचे महत्त्वाचे कारण म्हणजे, संबंधित मानकांची सांख्यिकी आकडेवारी उपलब्धता होय.

## १.७ आंतरराष्ट्रीय स्तरावरील इतर विविध निर्देशांकांचा थोडक्यात आढावाः

मानव विकास निर्देशांकाप्रमाणेच जगामध्ये इतर काही निर्देशांक काढण्यात येतात. त्याचा थोडक्यात उहापोह खालील प्रमाणे केला आहे.

**अ) भौतिक जीवनाचा निर्देशांक** (PQLI): मॉरिस डी. मॉरीस या अर्थशास्त्रज्ञाने १९७९ मध्ये २३ विकसित देशांचा अभ्यास करताना या निर्देशाकांची रचना केली. यात सरासरी आयुर्मान, बाल मृत्यूदर व मूलभूत साक्षरता या तीन घटकांचा विचार करून भौतिक जीवनाचा निर्देशांक तयार केला जातो.

**ब) राहणीमान निर्देशांक** : पाच घटकांचा वापर करून राहणीमान निर्देशांक तयार करण्यात येतो. ते पाच घटक म्हणजे स्वच्छ पाणी-पुरवठ्याच्या सोई, वीज जोडणी प्रमाण, वर्षभर दोनवेळा पुरेसे जेवण मिळणे, निवासासाठी पक्क्या घरांची सोय व लोकसंख्येच्या प्रमाणात दवाखान्यात असलेली खाटांची सोय इ. आहेत.

**क) लिंगभाव विकास निर्देशांक** (GDI): लिंगभेद जास्त असेल तर लिंगभाव विकास निर्देशांक कमी असतो. हा निर्देशांक गणना करण्यासाठी पुढील घटक विचारात घेतले जातात ते म्हणजे स्त्रियांचे आयुर्मान, स्त्रियांमधील साक्षरता दर व शाळा प्रवेशाचा दर व स्त्रियांचे दरडोई उत्पन्न होय.

**ड) मानव दारिद्र्य निर्देशांक** (HPI): मानव विकास अहवालात सर्व प्रथम या संकल्पनेचा विचार मांडला गेला. मानवी जीवनातील तीन उणिवा ही संकल्पना मांडताना विचारात घेण्यात आलेल्या आहेत. त्या म्हणजे आयुर्मान (४० वर्षापेक्षा कमी जगणारे अल्पायुषी लोक किती?), शिक्षण (प्रौढ निरक्षरांचे एकूण लोकसंख्येत प्रमाण किती आहे?), राहणीमानाचा दर्जा (सार्वजनिक आरोग्य सोई, घरे, वीजपुरवठा, स्वच्छ पाणी, स्वच्छ परिसर इ. आहेत काय?).

## १.८ संयुक्त राष्ट्रसंघ विकास कार्यक्रम व त्यांची भूमिकाः

संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रम हा एक असा कार्यक्रम आहे ज्यात परिवर्तनाचा पुरस्कार केलेला आहे. लोकांचे जीवन चांगल्याप्रकारे होण्याकरीता आणि त्यांनी चांगल्या प्रकारे जीवन जगण्यासाठी आवश्यक ते ज्ञान, अनुभव आणि संसाधने यांची निर्मिती करणे हे संयुक्त राष्ट्रसंघ विकास कार्यक्रमाचे कार्य आहे. संयुक्त राष्ट्रसंघ विकास कार्यक्रमाला संपूर्णपणे सभासद राष्ट्रांकडून स्वैच्छिक देणगीच्या स्वरुपात निधी मिळत असतो. १६६ देशात या संघटनांचे कार्यालय आहे. हे आवश्यक ठिकाणी विकास कार्य पोहचविण्याचे व स्थानिक क्षमतांच्या विकासाकरिता स्थानिक सरकार यांच्या बरोबर कार्य करतात. याच्याही पुढे जावून असे म्हणता येईल की, सहस्त्रावधी विकास लक्ष्ये साध्य करण्याच्या अनुषंगाने देशांना विविध स्तरावर मदत करण्यासाठी आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय स्तरावर कार्य करत आहे. अविकसित राष्ट्रांना मदत करण्याचे महत्त्व लक्षात घेता ते अविकसित देशाला तज्ज्ञ सल्लागार, माहिती, प्रशिक्षण इ. बाबत भरपूर मदत पुरवत असतात.

संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रम मानव विकासाच्या प्रगतीचे मूल्यांकन तसेच स्पष्टीकरण करून वार्षिक अहवाल प्रकाशित करतात. या जागतिक अहवालाप्रमाणेच संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रम प्रादेशिक आणि स्थानिक स्तरावरही मानव विकास अहवाल प्रकाशित करण्यात आवश्यक ती सर्व मदत करतात.

## १.९ सहस्त्रावधी विकास लक्ष्ये (MGDs) :

सहस्त्रावधी विकासाचे लक्ष्ये साध्य करण्याकरिता १९९० च्या दशकात विश्व स्तरावर समिती स्थापन करून जागतिक पातळीवरचा सहभाग घेण्याकडे लक्ष देण्यात आले. जागतिक पातळीवरची विकासाची धोरणे आणि मागास समाजाच्या गरजांना महत्त्व देवून सहस्त्रावधी विकासाचे ध्येय, गरिबीचे उच्चाटन, शिक्षण, रोगराई, आरोग्य,

स्त्री-पुरुष समानता इ. बाबींना प्रोत्साहन देऊन आणि बालमृत्यू, एड्स यासारख्या अनेक रोगांचा नायनाट करण्याचे आव्हान स्विकारले आहे.

२०१५ सालापर्यंत कालबध्द कार्यक्रम आखून लक्षणीय बदल घडवून विकासाचे ध्येय निश्चित करण्याचे मान्य करण्यात आलेले आहे. यासाठी सर्वांनीच भरपूर काम करण्याची व त्यादृष्टीने नियोजन करण्याची आवश्यकता आहे. यासाठी अप्रगत देशांनी चांगले सरकार स्थापून योग्य प्रशासन देणे, आरोग्य, शिक्षण तसेच पैशांच्या गुंतवणूकीसंबंधीत लोकांमध्ये जागृती निर्माण करणे इ. बाबत प्रतिज्ञा घ्यावयाची आहे. तर प्रगत राष्ट्रांनी भांडवल पुरवठा आणि योग्य व्यापाराद्वारा त्यांना मदत करण्याची जबाबदारी घ्यावयाची आहे.

संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रमाच्या सहभागातून सहस्त्रावधी विकास लक्ष्ये साध्य करण्यासाठी जागतिक, राष्ट्रीय व प्रादेशिक स्तरावर यासंबंधित नियोजन करणे गरजेचे आहे. यानुसार आवश्यक राजकीय विचारसरणी व निश्चित धोरण आखण्यासंबंधी कार्य चालू आहे. खालील प्रमाणे थोडक्यात सहस्त्रावधी विकास लक्ष्ये मांडण्यात आलेली आहेत[२४].

अ) एका दिवशी १ डॉलरपेक्षाही कमी खर्चात जीवन जगणाऱ्या लोकांच्या प्रमाणात निम्यापर्यंत घट करणे.

आ) उपाशीपोटी राहण्याऱ्या लोकांचे प्रमाण कमी करून ते निम्यावर आणणे.

इ) प्राथमिक शिक्षणाचा सार्वत्रिक प्रसार करणे व हक्क देणे.

ई) स्त्री-पुरूष समानतेला प्रोत्साहन देणे व महिलांना अधिकार प्रदान करणे.

उ) प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षणातील प्रमाणात २००५ पर्यंत, आणि सर्वच पातळीवर २०१५ पर्यंत स्त्री-पुरूष असमानता दूर करणे.

ऊ) बाल मृत्यूच्या संख्येत घट करणे.

ए) प्रसुती आरोग्यात सुधारणा करणे.(बाळंतपणात (प्रसुतीकाळात) मरणाऱ्या माताच्या प्रमाणात घट करून ती तीन चतुर्थांश एवढी करणे)

ऐ) एच.आय.व्ही, एड्स, मलेरीया अशा रोगांचा कायमचा बदोबस्त करणे.

ओ) मलेरीया सारख्या दुसऱ्या दुर्धर रोगांच्या प्रसारावर नियंत्रण आणणे आणि त्याचे समूळ उच्चाटन करणे.

क) पर्यावरणाला दिर्घकाळापर्यंत टिकवून ठेवणे, काळजी घेणे व त्यासाठीचे नियोजन करणे.

ख) देशांच्या धोरणात आणि कार्यक्रमात कायम विकासाचा सिध्दांत निश्चित करणे. पर्यावरणाच्या घटकांचे होणारे नुकसान दूर करणे.

ग) २०२० पर्यत गलिच्छ वस्तीत वास्तव्य करणाऱ्या कमीत कमी १० अब्ज लोकांच्या जीवनात महत्त्वपूर्ण सुधारणा करणे

घ) आंतरराष्ट्रीय आणि राष्ट्रीय अशा दोन्ही ठिकांणी चांगले शासन हे गरिबी कमी करण्यासाठी कटिबध्द असेल. त्यासोबतच कोणत्याही प्रकारच्या भेदभावाविना व्यापार करणे व भांडवलाचा जास्तीत जास्त विकास करणे.

च) अप्रगत व विकसनशील देशाच्या विकासासाठी प्रशुल्क अणि निर्यातीत मुक्त प्रवेश देणे.

छ) समुद्रापासून दूर असलेले देश व लहान प्रदेशांच्या विकासाकरीता राज्यांनी जाणीवपूर्वक लक्ष देणे जरुरीचे आहे.

ज) दिर्घकालीन कर्ज योजना राबवून किंवा त्या प्रकारचा हेतूने राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय निर्णय घेवून, विकसनशील देशांना भांडवल पुरवठा होऊ शकेल अशा रीतीने आग्रही राहणे.

झ) विकसित देशाच्या सहकार्याने युवकांसाठी चांगल्या आणि उत्पादक कामाच्या दृष्टीने आराखडा विकसित करून अंमलात आणणे.

य) औषधी निर्माण करणाऱ्या कंपन्याच्या सहकार्याने अविकसित देशांना आवश्यक त्या औषधी त्यांना परवडणाऱ्या किमतीमध्ये उपलब्ध करून देणे.

र) खाजगी क्षेत्राच्या सहकार्याने नवीन तंत्रज्ञान निर्माण करून माहिती आणि संदेश व्यवहाराचा फायदा मिळवून देणे.

थोडक्यात, मानव विकास होण्यासाठी सर्वांगीण प्रयत्नांची आवश्यकता आहे, असेच म्हणावे लागेल. उपरोक्त प्रमाणे मानव विकास संकल्पना, त्याबद्दलचा स्वतंत्र दृष्टिकोन, मानव विकास संकल्पनेचे घटक, वैशिष्ट्ये, व्याख्या, आवश्यकता, मानव विकास निर्देशांक व ती काढण्याची पध्दती, मानव विकास निर्देशांकाचे विविध घटक किंवा मानके, आंतरराष्ट्रीय स्तरावर विचारात घेण्यात येणारे विविध इतर निर्देशांक व संयुक्त राष्ट्रसंघ विकास कार्यक्रम यांची भूमिका इ. बाबतचा उहापोह वरील प्रमाणे करण्यात आलेला आहे.

**संदर्भ :**

१. माथूर रितू (२०११), 'मानव विकास संकल्पना', यशदा, पुणे येथील सादरीकरण पृ.२

२. तत्रैव पृ.३

३. तत्रैव पृ.६

४. www.undp.org/content/india/en/home/library/hdr/human-development-training/day-1-session-1-introduction-to-human-development.html, Wednesday, April 13, 2011

५. www.undp.org/content/india/en/home/library/hdr/human-development-training/2-hours-training-modules.html, Wednesday, April 13, 2011

६. www.undp.org/content/india/en/home/library/hdr/human-development-training/2-hours-training-modules.html, Wednesday, April 14, 2011

७. http://www. undp.org.in

८. Ibid

९. United Nations Development Programme (1990), 'Human Development Report 1990', UNDP, New York, USA. p.10

१०. United Nations Development Programme (1997), 'Human Development Report 1997', UNDP, New York, USA. p. 17

११. Government of Maharashtra (2002), 'Human Development Report Maharashtra 2002', Planning Department, Government of Maharashtra, Mumbai. P.1

१२. गुजरात शासन (२००८), 'मानव विकास एक प्रस्तावना', मानव विकास निर्देशांक डायरी, गुजरात शासन, गुजरात राज्य, अहमदाबाद. पृ.१

१३. तत्रैव पृ.२

१४. तत्रैव पृ.२

१५. तत्रैव पृ.२

१६. गोविलकर विनायक (२००९), 'मानव विकास निर्देशांक : अर्थबोध', दैनिक सकाळ वृत्तपत्रातील लेख, पुणे. पृ.१

१७. तत्रैव पृ.१

१८. सोळुंके आर.एस. व जिभकाटे बी. एल.(२००६), 'अर्थशास्त्र' हिमालय पब्लिशिंग हाऊस, मुंबई. पृ.१३

१९. तत्रैव पृ.१४

२०. वेंगुर्लेकर योगिनी , धायगुडे एम.जी., लिमये दत्ता, राजमाचीकर अनुजा(२००६), 'नरेद्र अर्थशास्त्र', नरेंद्र प्रकाशन, पुणे. पृ. २०

२१. तत्रैव पृ.२१

२२. तत्रैव पृ.२२

२३. तत्रैव पृ.२२

२४. गुजरात शासन (२००८), 'मानव विकास एक प्रस्तावना', मानव विकास निर्देशांक डायरी, गुजरात शासन, गुजरात राज्य, अहमदाबाद. पृ.३०

***

# प्रकरण - २
# मराठवाडा विभागाची रुपरेखा

## २.१ प्रस्तावना :

जगात उद्भवलेल्या दुसऱ्या महायुध्दानंतर भारत या खंडप्राय व सुजलाम सुफलाम राष्ट्राची फाळणी होऊन भारत व पाकिस्तान ही दोन स्वतंत्र राष्ट्रे उदयास आली. संपूर्ण भारत देश त्यावेळी विविध संस्थानांमध्ये विखुरलेला होता. त्यावेळच्या ५६५ पैकी ५६२ संस्थांनांनी स्वतंत्र भारतात विलीन होण्यास सहमती दर्शविली आणि तशी कार्यवाही पण केली. मात्र, हैद्राबाद, काश्मीर आणि जुनागढ या तीन संस्थानांनी स्वतंत्र भारतात विलीन होण्यास नकार दर्शविलेला होता.

हैद्राबाद संस्थानामध्ये मराठवाडा, तेलंगाणा आणि कर्नाटकाच्या काही भागाचा समावेश होता. या संस्थानातील मराठवाडा या विभागास अतिप्राचीन इतिहास व संस्कृतीचा वारसा लाभलेला आहे. प्राचीन काळात मराठवाड्यावर वाकाटक, शिलाहार, बहामीचे चालुक्य, राष्ट्रकुट व कल्याणीचे चालुक्य तर, मध्ययुगीन काळात देवगिरीचे यादव, दिल्लीचे खिलजी, तुघलक व मोगल घराण्याने राज्य केले. अहमदनगरची निजामशाही, वऱ्हाडाची इमादशाही व विजापूरची आदिलशाही यांचीही मराठवाड्याच्या काही भागावर सत्ता होती. बहामनी राज्याची स्थापना मराठवाड्यातच ‘देवगिरी’ या ठिकाणी झालेली होती. हैद्राबाद संस्थानाची तेव्हाची लोकसंख्या साधारणतः १ कोटी ६३ लाख इतकी होती. हैद्राबाद संस्थानावर निजाम ‘मीर उस्मान अली खान बहादुर नियामुदौला निजाम-उल आसफाजाह’ याचे राज्य होते. या निजामांच्या राज्यातून मुक्त होऊन भारतीय संघराज्यात सामील होण्यासाठी ‘स्वामी रामानंद तीर्थ’ यांच्या नेतृत्वाखाली संपूर्ण हैद्राबाद संस्थानात मुक्तीसंग्राम सुरू झाला. यामुळे निजामाचा सेनापती ‘कासीम रझवी’ याने जनतेवर अनन्वित अत्याचार सुरु केले. निजाम शरण येत नाही आणि नागरिकांवरील अत्याचार वाढले आहेत, हे पाहून

१३ सप्टेंबर १९४८ रोजी पोलिस कार्यवाही सुरू झाली आणि हैद्राबादचे सेनाप्रमुख 'जन उल उद्रीस' यांनी १७ सप्टेंबर १९४८ रोजी शरणांगती पत्करली आणि खुद्द निजाम शरण आला व हैद्राबाद संस्थान भारतीय संघराज्यात सामील झाले.

१ मे १९६० रोजी संयुक्त महाराष्ट्र व गुजरात या दोन राज्यांची निर्मिती करण्यात आली. स्वतंत्र महाराष्ट्र राज्यात मुंबई, कोकण, पश्चिम महाराष्ट्र, विदर्भ आणि मराठवाडा अशा पाच प्रादेशिक विभागाचा समावेश होतो. 'मराठवाडा' हा महाराष्ट्राच्या गोदावरी खोऱ्यात वसलेला एक भाग असून या विभागात एकूण ८ जिल्ह्यांचा समावेश होतो. औरंगाबाद शहर हे या विभागाचे मुख्यालय आहे. अशा मराठवाडा या प्रादेशिक विभागाच्या व संशोधनाच्या दृष्टीने विचारात घेतलेल्या मराठवाड्यातील हिंगोली, जालना व उस्मानाबाद या जिल्ह्यांच्या पार्श्वभूमीचा उहापोह खालील प्रमाणे केलेला आहे.

## २.२ मराठवाडा प्रादेशिक विभाग :

### २.२.१ ऐतिहासिक पार्श्वभूमी :

मराठवाडा विभागास अतिप्राचीन ऐतिहासिक पार्श्वभूमी लाभलेली आहे. इतिहासकार ही पार्श्वभूमी स्पष्ट करताना प्रामुख्याने खालील तीन कालावधीत करतात.

- प्राचीन मराठवाडा
- मध्ययुगीन मराठवाडा
- निजामकालीन मराठवाडा

मराठवाड्याचा सातवाहनपूर्व काळातील राजकीय इतिहास आपणास फारसा माहित नाही. सातवाहनांच्या उदयापासून मराठवाड्यांच्या इतिहासाचा खऱ्या अर्थाने आरंभ होतो. औरंगाबाद जिल्ह्यातील 'पैठण' ही सातवाहनांची राजधानी होती. इ.स.पू. २३० ते इ.स. २३० या काळात एकुण ४६० वर्षे संपूर्ण दक्षिण भारतावर त्यांनी राज्य केले. मराठवाड्यातील तेर, भोकरदन आणि पैठण ही सातवाहन काळातील भरभराटीस

आलेली प्रसिध्द व्यापारी केंद्रे होती. त्याठिकाणी तयार होणाऱ्या मालाला परदेशात मोठी किंमत होती. आर्थिक बाबतीत सातवाहनांचे राज्य प्रगतीवर होते. त्यामुळे हा काळ दक्षिण भारताचा विशेषतः मराठवाड्याचा 'सुवर्णकाळ' ठरतो. प्राचीन मराठवाड्यात वाकाटक घराणे, राष्ट्रकुट घराणे, बदामीचे चालुक्य व उत्तर कल्याणीचे चालुक्य यांची सत्ता होती. मध्ययुगीन काळात देवगिरीचे यादव घराणे, खिलजी व तुघलक, बहामनी, निजामशाही, आदिलशाही, वऱ्हाडाची इमादशाही यांची सत्ता होती तर निजामकालीन मराठवाड्यासंबंधी माहिती खालील प्रमाणे आहे.

**अ) हैद्राबाद राज्याची स्थापना१७२४ :**

मोगल राजवटीच्या काळात सुरूवातीपासूनच अनेक मुसलमान कुटुंबे हिंदुस्थानात येऊन स्थायिक झालेली होती. निजाम उल मुल्क यांचे कुटुंबही त्यापैकीच एक होते. निजामाचे आजोबा अबीद अली हे इ.स. १६५५-५६ मध्ये मक्केच्या यात्रेच्या निमित्ताने समरकंद-बुखारा येथून हिंदुस्थानात आले. त्यांनी मोगल बादशहा 'शहाजहान' यांच्या दरबारात नोकरी पत्करली. शहाजहान व औरंगजेब यांच्यात सत्तेसाठी सुरु झालेल्या संघर्षात त्यांनी औरंगजेबाची बाजू घेतली. पुढे अबीद अली यांनी औरंगजेबाचा वजीर सादुल्लाखान यांची मुलगी व आपला मुलगा 'शहाबुद्दीन' उर्फ गाजीउद्दीन फिरोज जंग याचा विवाह केला. औरंगजेबाने इ.स. १६८७ साली कुतुबशाहीच्या गोवळकोंड्याला वेढा दिला. या लढाईत अबीद अली मारला गेला. यानंतर त्याचा पुत्र 'शहाबुद्दीन' हा गुजरातचा सुभेदार झाला व इ.स. १७१० मध्ये त्याचा मृत्यू झाला. या शहाबुद्दीनचा पुत्र म्हणजे 'मीर कमरुद्दीन उर्फ निजाम उल मूल्क' होय. याचा जन्म ऑगस्ट १६६१ मध्ये झाला. वयाच्या तेराव्या वर्षीच त्यांने सैन्यात अधिकारापद मिळविले तर चौदाव्या वर्षीच त्याला 'खान' ही पदवी देण्यात आली. औरंगजेबाच्या मृत्यूच्या वेळी निजामास विजापूरची सुभेदारी होती. मात्र, त्यानंतर दिल्लीच्या राजकारणात त्याला गौण स्थान देण्यात आले. फरुखसियर या मोगल बादशहाने मीर कमरुद्दीन यास निजाम उल-मुल्क

फिरोज जंग खान व चिन किलीचखान हा किताब बहाल केला. 'निजाम' या शव्दाचा अर्थ 'व्यवस्था' किंवा 'बंदोबस्त' असा होतो. फेब्रुवारी १७१३ मध्ये बादशहा फरुखाशियरने निजामाची नेमणूक दक्षिणेचा सुभेदार म्हणून केली. पण, या पदावर तो अधिक काळ राहिला नाही. इ.स. १७१५ साली त्याला पदावरुन कमी केले व त्या ठिकाणी सय्यद हुसेन अलीखान याची नेमणूक केली. यानंतर निजामाचे वास्तव्य दिल्लीत राहिले, परंतु तेथे सय्यद बंधूपैकी सय्यद अबदुल्ला याच्याशी कधीच पटले नाही. त्यामुळे बादशहा महंमदशहाने निजामाची माळव्याच्या सुभेदारीवर नियुक्ती केली. यानंतर १५ मार्च १७१९ रोजी निजामाने माळव्याकडे न जाता सरळ दक्षिणेची वाट धरली. त्याला दक्षिणेचा सुभेदार मुबारीज खान यांने रोखण्याचा प्रयत्न केला, परंतु ऑक्टोबर १७२४ मध्ये झालेल्या साखरखेडर्याच्या लढाईत निजामाने त्याचा पराभव केला. यानंतर महंमदशहा यांने निजामास पुन्हा दक्षिणेची सुभेदारी दिली. याचवेळी निजामाने मोगल बादशहाची दुर्बलता व राजकीय अस्थिरतेचा फायदा घेऊन इ.स. १७२४ मध्ये दक्षिणेत हैद्राबाद (भागानगर) येथे स्वतंत्र राज्याची स्थापना केली. हैद्राबाद संस्थानात आसफिया घराण्याचे झालेले निजाम खालील प्रमाणे आहेत[१].

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मीर कमरुद्दीन | पहिला निजाम | इ.स.१७२४ - १७४७ |
| २. | नासिरजंग | - | इ.स.१७४८ – १७५० |
| ३. | मुजफ्फरजंग | - | इ.स.१७५० – १७५१ |
| ४. | सालाबतजंग | - | इ.स.१७५१ – १७६३ |
| ५. | निजाम उल-मुल्क | दुसरा निजाम | इ.स.१७६३ – १८०३ |
| ६. | सिकंदर अलीखॉ | तिसरा निजाम | इ.स.१८०३ – १८२९ |
| ७. | नबाब नासिरुदौला | चौथा निजाम | इ.स.१८२९ – १८५७ |
| ८. | नबाब अफजलुदौला | पाचवा निजाम | इ.स.१८५७ – १८६९ |
| ९. | महबूब अलीखॉ | सहावा निजाम | इ.स.१८६९ – १९११ |
| १०. | मीर उस्मान अली | सातवा निजाम | इ.स.१९११ – १९४८ |

## ब) हैद्राबाद संस्थानाचे स्वरुप व रचनाः

देशातील सर्व संस्थानामध्ये हैद्राबाद हे संस्थान लोकसंख्येच्या दृष्टीने पहिल्या क्रमांकाचे तर आकाराच्या दृष्टीने दुसऱ्या क्रमांकाचे होते. या संस्थानाचे भू-क्षेत्रफळ ८२,३१३ चौ. मैल होते तर याचे वार्षिक उत्पन्न आठ कोटी रुपये होते. हे संस्थान देशाच्या अगदी मध्यभागी होते. त्याच्या एका बाजूस जुना मुंबई प्रांत तर दुसऱ्या बाजूस मद्रास प्रांत आणि उत्तरेस मध्यप्रदेश होता. या संस्थानात तेलुगू, मराठी, कन्नड व उर्दू इ. भाषा बोलणाऱ्या लोकांचा समावेश होता. या लोकांची भाषेनिहाय लोकसंख्या खालील प्रमाणे होती.

**तक्ता क्र. २.१**

**हैद्राबाद संस्थानातील भाषानिहाय लोकसंख्या**

| अ.क्र. | भाषेचे नांव | लोकसंख्या |
|---|---|---|
| १. | तेलुगू | ७५,२९,२२९ |
| २. | मराठी | ३९,४७,०८९ |
| ३. | कन्नड | १७,२४,१८० |
| ४. | उर्दू | २१,००,०८७ |

संदर्भः डॉ.अनिल कटारे व डॉ. एन. एन. नगराळे, मराठवाड्याचा इतिहास पृ.क्र.२११

हैद्राबाद संस्थानात मराठवाडा, तेलंगण व कर्नाटक या प्रदेशाचा समावेश होता. या प्रदेशांचे क्षेत्रफळ, लोकसंख्या व त्यामधील जिल्हे यांची माहिती खालीलप्रमाणे आहे.

**तक्ता क्र. २.२**
**हैद्राबाद संस्थानातील विभागांची माहिती**

| अ.क्र. | प्रदेशाचे नांव | क्षेत्रफळ (चौ.मैल मध्ये) | लोकसंख्या | जिल्हे |
|---|---|---|---|---|
| १. | तेलंगण | ४१५०२ | ८३,३५,१३१ | १. हैद्राबाद<br>२. मेदक<br>३. महबूबनगर<br>४. निजामाबाद<br>५. नलगोंडा<br>६. वरंगल<br>७. करीमनगर<br>८. आदिलाबाद |
| २. | कर्नाटक | १३६०५ | २३,३९,६५४ | १. बिदर<br>२. रायचूर<br>३. गुलबर्गा |
| ३. | मराठवाडा | २७५९१ | ५२१९५२८ | १. औरंगाबाद<br>२. बीड<br>३. परभणी<br>४. नांदेड<br>५. उस्मानाबाद |

संदर्भः डॉ.अनिल कटारे व डॉ. एन. एन. नगराळे, मराठवाड्याचा इतिहास पृ.क्र.२११

अशा या विस्तीर्ण पसरलेल्या निजामाच्या राजवटीचे वर्णन ‘सुलतानशाही’ किंवा ‘अमर्याद राजसत्ता’ असे करण्यात येते. याचे प्रशासन मध्ययुगीन सरंजामशाही स्वरुपाचे होते. त्यामुळे ब्रिटिश राजवटीखाली असलेल्या मुंबई शहर, कोकण आणि पश्चिम महाराष्ट्राच्या तुलनेत हा विभाग राजकीयदृष्ट्या दुर्लक्षित राहिला.

१८८९ साली निजाम राजवटीतील मराठवाडा विभागात जिल्हा आणि तालुका बोर्डाची स्थापना करण्यात आली असली तरी १९२१ पर्यत या संस्थानावरील सर्व सदस्य सरकार नियुक्त होते. शहरी विभागात १९३५ मध्ये नगर पालिकांची स्थापना करण्यात आलेली होती. या स्थानिक स्वराज्य संस्थेत सरंजामदार वर्गातील लोकांची

नियुक्ती होत असे. यामुळे जनसामान्य हे राजकीय तसेच संवैधानिक सुधारणांपासून वंचितच राहिले. राजकीय सक्षमीकरणाच्या प्रक्रियेची सुरूवात १९२० साली निजामाच्या प्रजाजनांचे राजकीय सुधारणा मंडळाच्या स्थापनेतून केली. परंतु हिंदूस्थानातील खिलाफत चळवळीमुळे प्रजेतील हिंदू-मुस्मिम हे एकत्रितरीत्या संघटित होतील, यामुळे या संस्थेवर बंदी घालण्यात आली.

निजामाच्या प्रजाजनांच्या संघटनेने १९३५ साली राजकीय संवैधानिक सुधारणांची मागणी केली, मात्र त्याचवेळी कडव्या मुसलमानांची 'इत्तेहाद-उल-मुसलमीन' ही संघटना निजामाच्या दरबारातील 'बहादूर-उल-जंग' या सरंजामदाराने स्थापन केली. हिंदू समाजात सुधारणा करण्याच्या दृष्टीने 'आर्य समाज' फार पूर्वीपासूनच कार्यरत असला तरी, त्याच्या कार्याचे स्वरुप सामाजिक-धार्मिक असल्याने १९३५ पर्यत कोणताही जातीय तणाव अस्तित्वात नव्हता. मात्र मुस्लिमांच्या 'इत्तेहाद-उल-मुसलमीन' या संघटनेच्या स्थापनेनंतर आर्य समाजाचे स्वंयसेवक आणि मुस्लिम संघटनेचे कार्यकर्ते यांच्यात धर्मांतराच्या प्रश्नावरून तणाव निर्माण होऊ लागले. १९३८ साली हैद्राबाद संस्थानातील लातूर येथे 'स्वामी रामानंद तीर्थ' यांनी 'स्टेट कॉंग्रेस' या राष्ट्रवादी विचारांच्या सर्वात प्रभावी राजकीय संघटनेची स्थापना केली. संघटनेच्या नावातील कॉंग्रेस चे 'इंडियन नॅशनल कॉंग्रेस' मधील 'कॉंग्रेस' शी साधर्म्य असल्याने या संघटनेवर बंदी घालण्यात आली. या बंदीला विरोध म्हणून स्वामी रामानंद तीर्थ यांच्या नेतृत्वाखाली राज्यव्यापी सत्याग्रह करण्यात आला. या दरम्यान संघटनेच्या अनेक कार्यकर्त्यांची तुरूगांत रवानगी केली गेली.

१९४७ साली हैद्राबाद संस्थानाने भारतात विलीनीकरण व्हावे, अशी मागणी 'स्टेट कॉंग्रेस' यांनी केली आणि ७ ऑगस्ट १८४७ रोजी 'भारत विलीनीकरण दिवस' साजरा करण्याचे आव्हान केले. याउलट 'इत्तेहाद-उल-मुसलमीन' यांनी निजामाच्या भारतात विलीन न होण्याच्या निर्णयास पाठिंबा दिला. तसेच या संस्थानातील

'साम्यवादी' पक्षाने निजामाच्या स्वातंत्र्याच्या निर्णयास सक्रिय पाठिंबा दिला. याच कालखंडात 'कासीम रिझवी' या धर्मांध नेत्यांने आपली 'रझाकार' ही निमलष्करी संघटना स्थापन करून हिंदूच्या विरोधात जिहाद पुकारला. हिंदू प्रजेवर अविरत अत्याचार करण्यात आले. याचीच प्रतिक्रिया म्हणजे हैद्राबाद संस्थानाचे 'पोलिस ॲक्शन' द्वारा विलीनीकरण झाल्यनंतर मराठवाड्याच्या ग्रामीण भागात मुस्लिमावर करण्यात आलेले आत्याचार होय.[२]

**क) हैद्राबाद संस्थानाचे संघराज्यात विलीनीकरण :**

हैद्राबाद संस्थानातील जनतेची आंदोलने आणि निजामाचे पोलिस व रझाकार हे जनतेवर करत असलेले अत्याचार व संघराज्यात विलीन होण्यास निजामाचा विरोध यामुळे भारत सरकारला १३ सप्टेंबर १९४८ रोजी या राज्यात पोलिस कारवाई करावी लागली. या कारवाईस 'ऑपरेशन पोलो' असेही म्हणतात[३]. स्वामीजी व दिगंबरराव बिंदू यांनी पंडित नेहरू, महात्मा गांधी व सरदास वल्लभाई पटेल यांच्याशी चर्चा करुन हैद्राबाद राज्याच्या विलीनीकरणासाठी भारत सरकारने पोलिस कारवाई करावी, अशी विनंती केली होती. त्यानुसार भारत सरकारने लोकहितासाठी या राज्यावर ॲक्शन घेण्याचे ठरवले. १३ सप्टेंबर १९४८ रोजी पहाटे चार वाजता पोलिस कारवाई सुरू झाली. याच दिवशी स्टेट कॉंग्रेसच्या कृतिसमितीने नागपूरला बैठक घेऊन यात निजामास पदच्युत करण्याची मागणी करणारा ठराव पास केला होता.

हैद्राबाद संस्थानावरील पोलिस कार्यवाहीचे प्रमुख संचालक लेफ्टनंट जनरल महाराज राजेंद्र सिंहजी, सदर्न कमांड हे होते. हैद्राबाद संस्थानात एकाचवेळी पाच दिशेने भारतीय लष्करांने प्रवेश करून कारवाई सुरु केली. लष्कराची विभागणी पाच भागात करण्यात आलेली होती. राजेंद्र सिंहजी यांच्या नेतृत्त्वाखाली पुढील अधिकारी त्या त्या विभागाचे नेतृत्त्व करत होते.

१. मेजर जनरल जयंतीनाथ चौधरी - सोलापूरहून प्रवेश करणाऱ्या सशस्त्र दलाचे कमांडर

२. मेजर जनरल डी.एस.ब्रार - सोलापूरच्या उत्तरेस मुंबई विभागातील सशस्त्र दलाचे कमांडर

३. ब्रिगेडियर शिवदत्त सिंग- मध्यप्रांत व व-हाडाकडील सशस्त्र दलाचे कमांडर

४. मेजर जनरल ए.ए.सुंद्रा - मद्रास समिती सशस्त्र दलाचे कमांडर


५. एअर व्हाईस मार्शल मुखर्जी - संपूर्ण हवाई हालचालीचे व कृतीचे नियंत्रक

अशा रीतीने भारतीय लष्करांने पाच भिन्न दिशेने हैद्राबाद राज्यात प्रवेश करून निजामी पोलिस व रझाकार यांच्याशी लढाई सुरू केली. सुरूवातीस रझाकारांनी चांगला प्रतिकार केला. परंतु नंतर मात्र भारतीय लष्करापुढे त्यांचा निभाव लागला नाही. १७ सप्टेंबर १९४८ रोजी सांयकाळी पाच वाजता मीर उस्मानअली खान बहादूर या निजामाने हैद्राबाद रेडिओवर भाषण करुन आपण युध्द थांबवित असल्याची घोषणा केली. यानंतर हैद्राबाद लष्कराचे प्रमुख जनरल अलुइद्रस यांनी शरण येत असल्याचे जाहीर केले. याच दिवशी हैद्राबादचे पंतप्रधान मीर लायक अली यांनी आपल्या मंत्रिमंडळाचा राजीनामा दिला. अशा प्रकारे १०९ तासांत पोलिस कारवाई यशस्वी झाली. व हौद्राबाद संस्थान संघराज्यात विलीन झाले.

हैद्राबाद संस्थानातील मराठवाडा भागात मराठी भाषिक लोक बहुसंख्य असले तरी १९४८ पर्यंत त्यांच्यात मराठीच्या अस्मितेची जाणीव नव्हती. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर हैद्राबाद राज्याच्या राजकारणात मराठी भाषिकांपेक्षा संख्येने अधिक असलेले तेलुगू भाषिकांचे वर्चस्व निर्माण झाले. स्वामी रामानंद तीर्थ याच्या 'स्टेट कॉंग्रेस' च्या नेतृत्वास बी. रामकृष्ण राव या तेलुगू भाषिक नेत्याने आव्हान दिले. १९४९ व १९५२ साली स्थापन करण्यात आलेल्या मंत्री मंडळात मराठी भाषिकांच्या तोंडाला पाने पुसण्यात आली. त्यातूनच आपण अल्पसंख्य असल्याने आपणावर अन्याय होतो, याची जाणीव

मराठी भाषिकांना झाली. मराठी भाषिक राज्यात आपल्यावर अन्याय होणार नाही, या आशावादामुळे मराठवाड्यातील नेत्यांनी संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीला एकमुखी पाठिंबा दिला. १९५६ साली राज्याची भाषावार पुनर्रचना करताना हैद्राबाद राज्यातील मराठी भाषिक प्रदेश द्विभाषिक मुंबई राज्यात विलीन करण्यात आला. अशा रितीने मराठवाडा हा महाराष्ट्राचा एक अविभाज्य भाग बनला तरी पण आवश्यक त्या प्रमाणात या भागाचा विकास झालेला नाही. मराठवाडा विभागाचे आर्थिक व सामाजिक मागासलेपण अजूनही स्पष्टपणे जाणवते. आर्थिक मागासलेपणाचे प्रमुख कारण म्हणजे ९० टक्के लोक शेती हा व्यवसाय करतात. ही शेती अनिश्चित पावसावर अवलंबून असल्यामुळे उत्पादनाची खात्री नसते. उद्योगधंदे अत्यल्प प्रमाणात आहेत. त्यामुळे दरडोई उत्पन्न कमी आहे. सामाजिक मागासलेपणाच्या कारणांचा विचार करता असे लक्षात येते की, एकूण साक्षरतेचे प्रमाण कमी आहे त्यातही महिला साक्षरतेचे प्रमाण अत्यंत कमी आहे. आरोग्याच्या सोई सुविधा कमी, कुपोषण, निकृष्ट राहणीमान, शेतमजूराचे प्रमाण अधिक असे विविध कारणे आहेत. तरी महाराष्ट्र शासन मराठवाड्याचे मागासलेपण कमी करण्यासाठी प्रयत्न करत आहे. पण, हे प्रयत्न अधिक वेगाने होणे आवश्यक आहेत असे वाटते. अशा या मराठवाडा विभागाचा प्रदेश महाराष्ट्राच्या नकाशात गुलाबी रंगाने खालील प्रमाणे दाखविण्यात आलेले आहे.

**नकाशा २.१**
**महाराष्ट्रात मराठवाडा विभागाचे स्थान**




२.२.२ **स्थान व्याप्ती व सीमाः**

१७° ३५' उत्तर ते २०° ४०' उत्तर अक्षांश आणि ७४° ते ७८° पूर्व रेखांशाच्या दरम्यान मराठवाडा विभागाचे स्थान आहे. विभागाच्या उत्तरेस बुलढाणा, वाशिम व जळगाव, पूर्वेस यवतमाळ व आंध्र प्रदेश राज्य, दक्षिणेस सोलापूर जिल्ह्याचा काही भाग व कर्नाटक राज्य तर पश्चिमेस अहमदनगर जिल्ह्याच्या सीमा आहेत. विभागाचे क्षेत्रफळ ७०४३९ चौ.किमी. एवढे आहे[४].

२.२.३ **भौगोलिक वैशिष्टये :**

मराठवाडा हा महाराष्ट्राच्या गोदावरी खोऱ्यात वसलेला एक भाग असून या विभागात एकूण ८ जिल्ह्यांचा समावेश होतो. औरंगाबाद शहर हे या विभागाचे मुख्यालय आहे. या प्रदेशातील जमीन सुपीक व काळीभोर आहे. बराच प्रदेश 'काळी' बेसॉल्ट व 'कालथरी' डॅलराईट या पाषाणाचा बनलेला आहे. प्रदेशाचा ३० टक्के भाग पर्जन्यछायेच्या प्रदेशात येतो. कोरडवाहू शेतीचे प्रमाण ९० टक्क्यावर आहे. या प्रदेशात पावसाचे सरासरी पर्जन्यमान १५° ते ३०° असल्याने व पर्जन्यातील अनिश्चिततेमुळे बहुसंख्य तालुके आवर्षणग्रस्त आहेत. नाशिक जिल्ह्यात उगम पावणारी गोदावरी नदी औरंगाबाद, जालना आणि परभणी जिल्ह्यातून वाहते.

२.२.४ **प्रमुख शहरे :**

मराठवाडा विभागात खालील मुख्य शहरांचा समावेश होतो.

- औरंगाबाद
- जालना
- उस्मानाबाद
- लातूर
- नांदेड
- परभणी
- बीड
- हिंगोली

२.२.५ **लोकसंख्या :**

२००१ च्या जणगणनेनुसार मराठवाडा विभागाची एकूण लोकसंख्या १५६२९ हजार असून त्यापैकी ८०६० हजार पुरूष तर ७५६९ हजार स्त्रिया आहेत. विभागात दर हजार पुरुषामागे ९३९ स्त्रियांचे प्रमाण आहे. याची एकूण लोकसंख्येशी टक्केवारी अनुक्रमे ५१.५७ व ४८.४३ टक्के आहे. विभागातील ६८.७७ टक्के लोक साक्षर आहेत. विभागात पुरूष व स्त्रियां यांच्या साक्षरतेचे प्रमाण अनुक्रमे ८१.४४ टक्के व ५५.८६ टक्के आहे.

२०११ च्या जणगणेनुसार मराठवाडा विभागातील एकूण लोकसंख्या १८७२८ हजार असून त्यापैकी ९७२५ हजार पुरूष तर ९००३ हजार स्त्रिया आहेत. याची एकूण लोकसंख्येशी टक्केवारी अनुक्रमे ५१.९३ व ४८.०७ टक्के आहे. विभागातील एकूण लोकसंख्येपैकी ७२.८८ टक्के लोक खेड्यात राहतात.

२.२.६ **आर्थिक विकास :**

निजाम राजवटीपासूनच हा भाग आर्थिक विकासाबाबत दुर्लक्षित आहे. त्यामुळे १९५६ पासूनच मराठवाडा मुंबई राज्यातील सर्वात अविकसित भाग आहे. या भागात शेती हाच मुख्य व्यवसाय आहे. भूधारणेची जमीनदारी पध्दत प्रचलित होती. त्यामुळे लागवडीखालील जमीन प्रामुख्याने वतनदार, मराठे आणि ब्राह्मणांकडे होती. मराठवाड्याचे वर्णन 'महाराष्ट्राचे धान्याचे कोठार' असे करण्यात येते. कारण या भागातल्या सुपीक जमिनीत ज्वारी, कापूस आणि कडधान्यांचे मोठ्या प्रमाणात उत्पादन करण्यात येते. या सोबत अलीकडील काळात सोयाबीन, ऊस या पिकांचे मोठ्या प्रमाणात उत्पादन घेण्यात येत आहे. जायकवाडी, विष्णुपुरी व येलदरी प्रकल्पाव्यतिरिक्त ३० मध्यम व ११५ लघु पाटबंधारे प्रकल्प स्थापन करण्यात आलेले आहेत. जलसिंचन व पाटबंधारे योजनेचा बराचसा अनुशेष अद्याप शिल्लक आहे.

मराठवाड्याची अर्थव्यवस्था कृषीप्रधान असल्याने या भागात झालेले औद्योगिकरण अत्यल्प आहे. या भागात १९५६ साली २१५ आस्थापना होत्या आणि त्यात १२०७६ लोकांना रोजगार उपलब्ध होत असे, तर २००८ मध्ये २१४४ आस्थापना होत्या व त्यामध्ये १,७४,७२० लोकांना रोजगार उपलब्ध होतो. मराठवाड्याचे महाराष्ट्रात विलीनीकरण होऊन देखील औरंगाबाद, लातूर व नांदेड या शहरांचा अपवाद वगळता अन्यत्र औद्योगिकरण अत्यल्प आहे. याचे मुख्य कारण म्हणजे राजकीय इच्छाशक्तीचा अभाव, वाहतूक व दळणवळणाचा अभाव, रस्त्यांची दुरावस्था,

तांत्रिकदृष्ट्या प्रशिक्षित मनुष्यबळाचा अभाव इ. सद्याच्या कालावधीत सहकारी तत्त्वावर चालवणारे साखर कारखाने आहेत पण, त्यांचा हंगाम चार महिन्यांचा असतो.

२.२.७ **वाहतूक व दळणवळण :**

आर्थिक विकासाच्या प्रक्रियेतील एक महत्त्वाचा घटक म्हणजे वाहतूक व दळणवळणाच्या साधनाची उपलब्धता होय. मराठवाड्यात वाहतूकीच्या आणि दळणवळणाच्या साधनांचे दुर्भिक्ष्य आहे. या भागातील एकूण रेल्वे मार्गांची लांबी ८३३ किमी. आहे. मराठवाड्याच्या बहुसंख्य भागात रेल्वे सेवा उपलब्ध नाही. मनमाड ते मुदखेड रेल्वेमार्ग रूंदीकरण किती कालावधी लागेल? हे सांगता येत नाही.

लातूर-कुर्डूवाडी रूंदीकरणाचे कार्य नुकतेच पूर्ण झाले आहे. या मार्गावरून मुंबई-लातूर व पुणे-हैद्राबाद या दोन गाड्या सोडण्यात आलेल्या आहेत. मराठवाड्याच्या दृष्टीने अंत्यत महत्त्वाचा असलेला सोलापूर-औरंगाबाद या रेल्वे मार्गास अद्याप मान्यता मिळालेली नाही. इंडियन एअरलाईन्सच्या हवाई वाहतूकीच्या नकाशात औरंगाबाद हे एकमेव शहर आहे. नांदेड येथे वायूदूत सेवा उपलब्ध आहे.

२.२.८ **शिक्षण :**

मराठवाड्यात सन १९४८ पर्यंत कोणत्याही प्रकारच्या उच्च शिक्षणाची सोय नव्हती. द्विभाषिक मुंबई राज्याच्या स्थापनेनंतर उच्च शिक्षणाचा या भागात प्रसार झाला. १९५८ साली मराठवाडा विद्यापीठाची स्थापना झाली. १९७२ साली परभणी येथे मराठवाडा कृषी विद्यापीठाची स्थापना करण्यात आली. स्वातंत्र्यपूर्व कालखंडात मराठवाडा विभागात आधुनिक उदारमतवादी शिक्षण जवळ-जवळ उपलब्ध नव्हतेच. मात्र इ.स. १९३० च्या सुमारास 'स्वामी रामानंद तीर्थ' यांनी राष्ट्रीय शाळांची स्थापना करून ही उणीव भरून काढली. स्वातंत्र्योंतर कलखंडात मात्र 'पिपल्स एज्युकेशन सोसायटी, मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ, छत्रपती शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, शारदा भवन, किसान शिक्षण प्रसारक मंडळ' इ. यांनी या भागात शिक्षण प्रसाराचे

कार्य केले. सन १९९४ साली नांदेड येथे 'स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाची स्थापना करण्यात आली. आज या भागात जवळपास सर्वच प्रकारची महाविद्यालये पहावयास मिळतात. लातूरचा 'लातूर पॅर्टन' महाराष्ट्रभर गाजला आहे.

२.२.९ **प्रसिध्द व्यक्ती**[५] :

मराठवाडा विभागातील विविध क्षेत्रातील प्रसिध्द व्यक्तीची नांवे त्याच्या कार्यक्षेत्रानुसार खालील प्रमाणे मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे.

❖ राजकारण

- स्वामी रामानंद तीर्थ
- मुकुंदराव पेडगांवकर
- गोविंदभाई श्रॉफ
- शिवाजीराव पाटील निलंगेकर
- शंकरराव चव्हाण
- कै.विलासराव देशमुख
- शिवराज पाटील चाकूरकर
- अशोकराव चव्हाण
- कै.प्रमोद महाजन
- गोपीनाथ मुंडे
- केशवराव धोंडगे
- गोपाळराव पाटील
- दिलीपराव देशमुख
- राजेंद्र दर्डा

❖ समाजकारण, शिक्षण व ग्रामीण विकास

- डॉ. ना. य. डोळे
- डॉ. जनार्दन वाघमारे
- डॉ. दयानंद डोणगांवकर
- कॉ.विठ्ठलराव देशपांडे
- प्रा. मुकुंद मुंडे
- लक्ष्मण गायकवाड

❖ व्यवसाय

- नंदकुमार धूत
- जवाहरलाल दर्डा
- मच्छिंद्र चाटे
- रणजित देशमुख

❖ साहित्य

- नरहर कुरूंदकर
- डॉ. रफिक झकेरिया

- डॉ. जनार्दन वाघमारे
- डॉ.गंगाधर पानतावणे
- डॉ. सूर्यनारायण रणसुभे
- लक्ष्मीकांत तांबोळी
- डॉ. यु.म.पठाण
- फ.मु.शिंदे
- प्र.ई.सोनकांबळे
- ऋषिकेश कांबळे
- प्रा दत्ता भगत
- कवि मुक्तविहार

❖ कला

- डॉ. लक्ष्मण देशपांडे
- मयुरी कांगो


❖ क्रीडा

- इक्बाल सिद्दिकी
- संजय बांगर

हिंगोली, जालना व उस्मानाबाद या जिल्ह्यांची पार्श्वभूमी ही मराठवाड्याच्या पार्श्वभूमीचाच एक भाग आहे. तरी थोडक्यात त्याचा स्वतंत्रपणे आढावा खालील प्रमाणे घेण्यात आलेला आहे. संशोधनाच्या दृष्टीने मराठवाडा विभागातील निवडलेल्या हिंगोली, जालना व उस्मानाबाद हे जिल्हे वेगळ्या स्वरुपात खालील नकाशात दाखविण्यात आलेले आहेत.

**नकाशा २.२**

**संशोधनासाठी निवडलेल्या जिल्ह्यांचे मराठवाड्यातील स्थान**



## २.३ हिंगोली :

दि. १ मे १९९९ रोजी परभणी जिल्ह्यांचे विभाजन होऊन हिंगोली जिल्हा अस्तित्त्वात आला. हिंगोली बाबत प्राचीन काळात विंगुली, विंगमुल्ह, लिंगोली असा उल्लेख आढळतो. हिंगोली हे तत्कालिन वाशिम (वत्सगुम्ल) जिल्ह्यातील नर्सी परगण्यातील एक गाव होते. निजामाने १९०३ मध्ये येथे लष्करीतळ स्थापन केले.

### २.३.१ **स्थान व व्याप्ती :**

१९.०५' उत्तर ते २०.०५' उत्तर अक्षांश आणि ७६.३०' ते ७७.३०' पूर्व रेखांशाच्या दरम्यान हिंगोलीचे स्थान आहे. जिल्ह्याच्या उत्तरेस बुलढाणा व वाशिम, पूर्वेस यवतमाळ व नांदेड, दक्षिणेस परभणी व नांदेड तर उत्तरेस परभणी व जालना या जिल्ह्याच्या सीमा आहेत. जिल्ह्याचे क्षेत्रफळ ४८२७ चौ.किमी. असून महाराष्ट्राच्या तुलनेत १.६० टक्के एवढा आहे[६].

### २.३.२ **भौगोलिक संरचना :**

दख्खन पठारावरील पूर्व महाराष्ट्र उपविभागाचा भाग आहे. या जिल्ह्याचा प्रदेश गोदावरी खोऱ्यात येत असेला तरी, पैंनगंगा खोऱ्यातील कयाधू-पूर्णा या खोऱ्यात समावेश होतो. समुद्रसपाटीपासून उंची साधारपणे ५०० मी. आहे. हा पठारी प्रदेश उंच सखल असून त्यात नद्यांची खोरी आहेत. जलप्रवाहाच्या झिजेमुळे काही ठिकाणी गाळाच्या जमिनीचा प्रदेश तयार झाला आहे. जिल्ह्याचा सर्व भाग 'डेक्कन ट्रॅप' या नावांने ओळखल्या जाणाऱ्या बेसॉल्ट खडकाचे आडवे पसरलेले थर पहावयास मिळतात. सदर जिल्ह्यातील हवामान कोरडे आहे. वार्षिक सरासरी पर्जन्यमान ८९०.२८ मिमि. आहे. हा प्रदेश उष्ण कटिबंधातील येत असल्यामुळे येथील उन्हाळा कडक असतो. येथे मे महिन्यात सर्वाधिक तापमानाची नोंद होते. उच्चतम तापमान ४१.९° से तर सरासरी किमान तापमान १२.६° से. असते. जिल्ह्यात पैंनगंगा, पूर्णा व कयाधू या तीन

महत्त्वाच्या नद्या वाहतात. या भागातील जमीन ही काळी कापसाची किंवा रेगूर नावाने ओळखली जाते. जिल्ह्यात २९०.८१ चौ.कि.मी. इतके वनक्षेत्र असून ते विरळ आहे[७].

२.३.३ **लोकसंख्या :**

२००१ च्या जणगणनेनुसार एकूण लोकसंख्या ९८७६० असून त्यापैकी ५०५३७३ पुरूष तर ४८१७८७ स्त्रिया आहेत. याची एकूण लोकसंख्येशी टक्केवारी अनुक्रमे ५१.१९ व ४८.८१ टक्के आहे. जिल्ह्यातील एकूण लोकसंख्येपैकी ८४.४० टक्के लोक खेड्यात राहतात. जिल्ह्यात दर हजार पुरूषामागे ९५३ स्त्रियांचे प्रमाण आहे. अनुसूचित जातीच्या लोकांचे प्रमाण १०.२० टक्के आहे तर अनुसूचित जमातीच्या लोकांचे प्रमाण ८.८० टक्के आहे. सात वर्ष व त्यावरील वयोगटावरील एकूण ८.२५ लक्ष लोकसंख्येच्या ५.५२ लक्ष (६६.८६) लोक साक्षर आहेत. ग्रामीण भागात ४.५१ (६६.८५ टक्के)लक्ष तर नागरी भागात १.०१ (७७.६० टक्के) लक्ष लोक साक्षर आहेत. जिल्ह्यातील पुरूष व स्त्रियां यांच्या साक्षरतेचे प्रमाण अनुक्रमे ८१.११ टक्के व ५१.९६ टक्के आहे.

२०११ च्या जणगणनेनुसार एकूण लोकसंख्या ११७८९७३ असून त्यापैकी ६०९३८६ पुरूष तर ५६९५८७ स्त्रिया आहेत. याची एकूण लोकसंख्येशी टक्केवारी अनुक्रमे ५१.६९ व ४८.३१ टक्के आहे. जिल्ह्यातील एकूण लोकसंख्येपैकी ८४.८३ टक्के लोक खेड्यात राहतात. जिल्ह्यात दर हाजार पुरूषामागे ९३५ स्त्रियांचे प्रमाण आहे. या जिल्ह्यातील ७६.९४ लोक साक्षर आहेत. ग्रामीण भागात ७४.०६ टक्के तर नागरी भागात ८४.५५ टक्के लोक साक्षर आहेत. जिल्ह्यातील पुरूष व स्त्रिया यांच्या साक्षरतेचे प्रमाण अनुक्रमे ८६.६२ टक्के व ६६.६८ टक्के आहे.

२.३.४ **सिंचन :**

जिल्ह्यात शेतीलायक क्षेत्र ४०४५९३ हेक्टर इतके आहे. त्यापैकी फक्त ५७१३५ हेक्टर इतके क्षेत्र सिंचनाखाली आहे. जिल्ह्यात इतर तालुक्यांच्या तुलनेत वसमत व कळमनुरी तालुक्यात सिंचन क्षेत्र चांगले आहे. सिंचन विभागाच्या बृहत

योजनेनुसार सिंचनासाठी खूप मोठ्या प्रमाणात वाद असून सिंचनाचे क्षेत्र १०७०३८ हेक्टर पर्यत वाढविणे शक्य आहे. जिल्ह्यात २ मोठे प्रकल्प, ४० लघुप्रकल्प (राज्य व स्थानिक स्थर), १५० कोल्हापुरी पध्दतीचे बंधारे (राज्य व स्थानिक स्थर), ५९ पाझर तलाव, ४६ गाव तलाव आहेत.

२.३.५ **उद्योग :**

औद्योगिकदृष्ट्या हिंगोली मागासलेला म्हणून गणला जातो. जिल्ह्यातील बहुतांश उद्योग प्राथमिक क्षेत्रातील व कृषिआधारित आहेत. जिल्ह्यात फक्त २७१ नोंदणीकृत उद्योग असून ३८ अनोंदणीकृत उद्योग आहेत. यामध्ये अन्नप्रक्रिया उद्योग, जिनींग आणि प्रोसेसिंग तसेच फॉब्रिकेशनशी संबंधित कामाचा समावेश होतो. या सर्व उद्योगातून २२०९ लोकांना रोजगार उपलब्ध झाला आहे. जिल्ह्यातील ३०४ उद्योग सूक्ष्म उद्योगात तर ०५ मध्यम उद्योगात मोडतात. या ०५ मध्यम उद्योगात ०३ साखर कारखाने, ०१ सुतगिरणी व ०१ ऑईल रिफायनरी आहे. महाराष्ट्र औद्योगिक महामंडळाची वसाहत हिंगोली, वसमत व कळमनुरी या भागात असून त्यांच्या मालकीची अनुक्रमे २०४.९०, १५.००, ९.०० हेक्टर जमीन आहे.

२.३.६ **पर्यटन :**

औंढा नागनाथ येथे बारा ज्यार्तिलिंगापैकी 'नागेश दारुकावने' हे ज्योर्तिलिंग आहे. त्याची प्राणप्रतिष्ठा प्राचीन काळी धर्मराजाने केली असल्याची व संत नामदेवांनी आपल्या भक्तीने शिवालय फिरविल्याची आख्यायिका आहे. याच तालुक्यात शिरड शहापूर येथे जैन धर्मियांच्या भगवान मल्लिनाथ यांची मूर्ती आहे. वसमत तालुक्यातील आरळ येथे हेमाडपंथी अन्नपूर्णा देवीचे मंदीर आहे. याच तालुक्यातील आसेगाव येथे जैन धर्मियांचे देवस्थान आहे. सेनगाव तालुक्यातील नर्सी (नामदेव) येथे संत नामदेव महाराजांची जन्मभूमी व समाधी स्थान आहे. कळमनुरी येथे अदिनाथ जैन मंदीर, महादेव लिंग मंदिर, नुरी साहेबांचा दर्गा, नायकवाडी मस्जीद, रामचंद्र महाराज मंदिर

इ. प्रसिध्द आहेत. हिंगोली शहरात श्वेतांबर मंदिर, शांतीनाथ मंदिर, जलेश्वर मंदिर, दत्त मंदिर, बालाजी मंदिर इ. आहेत.

२.३.७ **प्रशासकीय यंत्रणा :**

पाच तालुक्याचा समावेश असलेला हा जिल्हा आहे. यात हिंगोली, औंढा नागनाथ, कळमनुरी, सेनगाव व वसमत हे तालुके आहेत. प्रशासनाच्या सोयीच्या दृष्टीने दोन उपविभाग असून हिंगोली उपविभागात हिंगोली, कळमनुरी व सेनगांव तर वसमत उपविभाग वसमत व औंढा नागनाथ या तालुक्यांचा समावेश होतो. या जिल्ह्यात ०१ जिल्हा परिषद, ०५ पंचायत समिती, ०३ नगर परिषदा कार्यरत आहेत. जिल्ह्यात ७१० महसुली गावे व ५६५ ग्रामपंचायती आहेत. १२ पोलिस ठाणे व ०८ आउट पोस्ट आहेत.

## २.४ जालना :

१ मे १९८१ साली औरंगाबाद जिह्याचे विभाजन होऊन जालना हा जिल्हा अस्तित्वात आला. भौगोलिक दृष्ट्या हा जिल्हा राज्याच्या मध्यभागी येतो, त्यामुळे केंद्रीय दळणवळण मंत्रालयाने जालना शहराजवळील ‘इंदेवाडी’ येथे उपग्रह अनुश्रवण भूकेंद्र उभारले आहे.

२.४.१ **स्थान व व्याप्ती :**

१९.०१’ उत्तर ते २०.०३’ उत्तर अक्षांश आणि ७५.४’ ते ७६.४’ पूर्व रेखांशाच्या दरम्यान जालना जिल्ह्याचे स्थान आहे. जिल्ह्याच्या उत्तरेस जळगाव, पूर्वेस बुलढाणा व परभणी, दक्षिणेस बीड, व पश्चिमेकडे औरंगाबाद हे जिल्हे वसलेले आहेत. जिल्ह्याचे क्षेत्रफळ ७७१८ चौ.किमी. असुन महाराष्ट्राच्या तुलनेत २.५१ टक्के एवढे आहे[८].

२.४.२ **भौगोलिक संरचना :**

जालना जिल्हा दख्खन पठाराच्या क्षेत्रात येतो. या जिल्ह्याचा प्रदेश गोदावरी नदीच्या खोऱ्यात असून, जिल्ह्याच्या दक्षिण सिमेलगत ६० किमी अंतरावरून गोदावरी नदी वाहते. दुधणा व गिरणा या उपनद्या वाहतात, तर जालना शहराजवळून कुंडलिका ही नदी वाहते. समुद्रसपाटीपासून उंची साधारणपणे ५३४ मी. आहे. या जिल्ह्यात दोन प्रकारची जमीन आढळून येते, एक म्हणजे काळी व सुपिक तर दुसरी म्हणजे हलक्या प्रतीची व मुरबाड जमिन होय.

या जिल्ह्यातील हवामान समशितोष्ण आहे. वार्षिक सरासरी पर्जन्यमान ६४३ ते ८२५ मिमि आहे. सर्वत्र सारख्या प्रमाणात पाऊस पडत नाही. उच्चतम तापमान ३९.५०° से. तर सरासरी किमान तापमान ११.०° से. असते. जिल्ह्यात १०१.१८ चौ.कि.मी. इतके वनक्षेत्र आहे[९].

२.४.३ **लोकसंख्या :**

२००१ च्या जनगणनेनुसार एकूण लोकसंख्या १६.१२ हजार आहे. जिल्ह्यातील एकूण लोकसंख्येपैकी ८०.९३ टक्के लोक ग्रामीण आहेत. जिल्ह्यात दर हजार पुरूषामागे ९५२ स्त्रियांचे प्रमाण आहे. अनुसूचित जातीच्या लोकांचे प्रमाण ११.२२ टक्के आहे तर अनुसुचित जमातीच्या लोकांचे प्रमाण १.१९ टक्के आहे. जिल्ह्यात साक्षरतेचे प्रमाण ६४.४० टक्के आहे. ग्रामीण भागात ६१.३१ टक्के तर नागरी भागात ७७.४३ टक्के साक्षर आहेत. जिल्ह्यातील पुरूष व स्त्रियां यांच्या साक्षरतेचे प्रमाण अनुक्रमे ७९.१४ टक्के व ३५.४५ टक्के आहे.

२०११ च्या जणगणेनुसार एकूण लोकसंख्या १९५८४८३ असून त्यापैकी १०१५११६ पुरूष तर ९४३३६७ स्त्रिया आहेत. याची एकूण लोकसंख्येशी टक्केवारी अनुक्रमे ५१.८३ व ४८.१७ टक्के आहे. जिल्ह्यातील एकूण लोकसंख्येपैकी ८०.७४ टक्के लोक खेड्यात राहतात. जिल्ह्यात दर हाजार पुरूषामागे ९२९ स्त्रियांचे प्रमाण

आहे. या जिल्ह्यातील ७३.६१ लोक साक्षर आहेत. ग्रामीण भागात ७१.०९ टक्के तर नागरी भागात ८४.०४ टक्के लोक साक्षर आहेत. जिल्ह्यातील पुरूष व स्त्रियां यांच्या साक्षरतेचे प्रमाण अनुक्रमे ८५.२५ टक्के व ६१.२८ टक्के आहे.

२.४.४ **सिंचन :**

जिल्ह्यात एकही मोठा प्रकल्प प्रस्तावित नाही. औरंगाबाद जिल्ह्यातील जायकवाडीच्या मोठ्या प्रकल्पाच्या लाभक्षेत्रापैकी जालना जिल्ह्यात ३६१७५ हेक्टर लाभक्षेत्र असून २००९-१० मध्ये ९८८२२ हेक्टर क्षेत्र ओलिताखाली आणले गेले. ०६ मध्यम पाटबंधारे व ७८ लघु पाटबंधार प्रकल्पाचे काम पूर्ण झाले आहे. ३३५१९ सिंचन विहिरीत ६८७४९ विद्युत पंप व १५६८ डिझेल पंप सिंचनासाठी वापरात आहेत.

२.४.५ **उद्योग :**

जिल्ह्यात २००८ अखेर एकूण ११६ नोंदणीकृत कारखाने असून या कारखान्यात २६६७ कामगार संख्या आहे. त्यापैकी १४ कारखाने बंद आहेत. मूलभूत लोह व पोलादाचे उत्पादन करणारे ३४ कारखाने चालू असून त्यात १५१९ कामगार आहेत. धान्य गिरणी उत्पादनांसंबंधी २० कारखाने चालू असून त्यात २२९ कामगार आहेत.

२.४.६ **पर्यटन :**

जालना शहरातील मंमादेवी, आनंदस्वामी मठ, दुर्गामाता मंदिर प्रसिध्द असून अंबड येथील मत्स्याच्या आकारातील डोंगरावर मत्स्योदरी देवीचे हेमाडपंथी मंदिर आहे, येथे सुमारे ४०० वर्षापूर्वीचा चौघडा व कल्याणस्वामींचा मृदंग, वणूताईचा तानपुरा आहे. राजुरचा गणपती, जांब हे समर्थ रामदास यांचे जन्मगांव असून तेथे त्याचे मंदिर आहे.

२.४.७ **वाहतूक व दळणवळण :**

मनमाड ते काचीगुडा हा एकच रेल्वेमार्ग जालना जिल्ह्यातून जातो. जिल्ह्यातील त्याची लांबी ८८ किमी आहे. जिल्ह्यात वर्गीकृत रस्त्यांची लांबी ४३६०.२४ किमी इतकी आहे. त्यापैकी राज्य महामार्ग १०८७.०० किमी, प्रमुख जिल्हा मार्ग ९२९.३० व इतर जिल्हा रस्ते ७३१ किमी आहेत. २१८०.६१ किमी रस्त्यांचे डांबरीकरण झालेले असून १७४५.३३ किमी रस्ते खडीचे आहेत. २००९-१० मध्ये २१५ टपाल कार्यालये होती तर टेलिफोनची संख्या २१७२५ इतकी होती.

२.४.८ **प्रशासकीय यंत्रणा :**

आठ तालुक्याचा समावेश असलेला हा जिल्हा आहे. यात जालना, भोकरदन, जाफ्राबाद, बदनापूर, अंबड, घनसांगवी, परतूर व मंठा या तालुक्यांचा समावेश होतो. प्रशासनाच्या सोईच्या दृष्टीने दोन उपविभाग असून जालना उपविभागात जालना, बदनापूर, भोकरदन, व जाफ्राबाद या तर परतूर उपविभागत परतूर, अंबड, घनसांगवी, मंठा या तालुक्याचा समावेश होतो. या जिल्ह्यात ०१ जिल्हापरिषद, ०८ पंचायत समिती, ०४ नगरपरिषदा कार्यरत आहेत. जिल्ह्यात ७८१ ग्रामपंचायती आहेत.

## २.५ उस्मानाबाद :

उस्मानाबाद जिल्हा पूर्वीच्या हैद्राबाद राज्यातील मराठवाडा म्हणविला जाणाऱ्या मराठी भाषिक जिल्ह्यापैकी एक आहे. स्वतंत्र महाराष्ट्राच्या स्थापनेनंतर या जिल्ह्याचा समावेश मराठी भाषिक महाराष्ट्रात करण्यात आला. ऑगस्ट १९८२ मध्ये या जिल्ह्याचे विभाजन होऊन लातूर हा नवीन जिल्हा तयार झाला.

२.५.१ **स्थान व व्याप्ती :**

१७.३५' उत्तर ते १८.४०' उत्तर अक्षांश आणि ७५.१६' ते ७६.४०' पूर्व रेखांशाच्या दरम्यान उस्मानाबाद जिल्ह्याचे स्थान आहे. जिल्ह्याच्या दक्षिण पश्चिमेस सोलापूर, उत्तर पश्चिमेस अहमदनगर, उत्तरेस बीड, ईशान्य व पूर्वेस लातूर व दक्षिणेस

कर्नाटक राज्यातील अनुक्रमे बिदर व गुलबर्गा हे जिल्हे आहेत. जिल्ह्याचे क्षेत्रफळ ७५१२.४ चौ.किमी. असून महाराष्ट्रात त्याचा २४ वा क्रमांक लागतो[१०].

२.५.२ **भौगोलिक संरचना :**

उस्मानाबाद जिल्हा दख्खन पठाराच्या क्षेत्रात येतो. जिल्ह्याचा बराच भाग खडकाळ व उर्वरित भाग सपाट असून याची समुद्रसपाटीपासून उंची सरासरी ६०० मी. आहे. हा जिल्हा बालाघाट डोंगराच्या लहान कक्षेत व इतर तहसील सपाट प्रदेशावर येतात. जिल्ह्याचा काही भाग गोदावरी नदीच्या खोऱ्यात व काही भाग भिमा नदीच्या खोऱ्यात येतो. जिल्ह्यातील हवामान प्रामुख्याने कोरडे आहे. उन्हाळ्यामध्ये काही प्रमाणात वादळी वारे वाहतात. सरासरी पर्जन्यमान ७३९.९३ मि.मि. आहे. या ठिकाणी जमिनीची ढोबळ मानाने दोन प्रकारात विभागणी करण्यात येते. पहिली काळी व सुपिक जमिन तर दुसरी हालक्या प्रतीची आहे. जिल्ह्यात ५०.७४ चौ.कि.मी. इतके वनक्षेत्र आहे[११].

२.५.३ **लोकसंख्या :**

२००१ च्या जणगणनेनुसार एकूण लोकसंख्या १४८६५८६० असून त्यापैकी ७६९३६८ पुरूष तर ७१७२१८ स्त्रिया आहेत. जिल्ह्यातील एकूण लोकसंख्येपैकी ८४.३१ टक्के लोक खेड्यात राहतात. जिल्ह्यात दर हजार पुरूषामागे ९३२ स्त्रियांचे प्रमाण आहे. अनुसूचित जातीच्या लोकांचे प्रमाण १६.५३ टक्के आहे तर अनुसूचित जमातीच्या लोकांचे प्रमाण १.८७ टक्के आहे. साक्षरतेची टक्केवारी एकूण लोकसंख्येच्या ६९ टक्के आहे. ग्रामीण भागात ६७ टक्के साक्षरतेचे प्रमाण आहे.

२०११ च्या जणगणेनुसार एकूण लोकसंख्या १६६०३११ असून त्यापैकी ८६४६७४ पुरूष तर ७९५६३७ स्त्रिया आहेत. याची एकूण लोकसंख्येशी टक्केवारी अनुक्रमे ५२.०८ व ४७.९२ टक्के आहे. जिल्ह्यातील एकूण लोकसंख्येपैकी ८३.०४ टक्के लोक खेड्यात राहतात. जिल्ह्यात दर हाजार पुरूषामागे ९२० स्त्रियांचे प्रमाण आहे. या जिल्ह्यातील ७६.३३ टक्के लोक साक्षर आहेत. ग्रामीण भागात ७४.५०

टक्के तर नागरी भागात ८५.३१ टक्के लोक साक्षर आहेत. जिल्ह्यातील पुरूष व स्त्रियां यांच्या साक्षरतेचे प्रमाण अनुक्रमे ८५.३१ टक्के व ६६.६७ टक्के आहे.

२.५.४ **सिंचन :**

२००२-०३ या वर्षी एकूण सिंचनाखालील क्षेत्र ७६३२८ हेक्टर होते. २००९-१० अखेर जिल्ह्यात जि.प. लघुपाटबंधारे आणि राज्य स्तराचे एकूण ७९३ प्रकल्प आहेत. या सर्व प्रकल्पाच्या मदतीने १४८३४ हेक्टर क्षेत्र निव्वळ ओलिताखाली आलेले आहे.

२.५.५ **पर्यटन :**

जिल्ह्यात तुळजापूर येथे तुळजाभवानी मातेचे प्राचीन मंदिर आहे. कुंथलगिरी, ता. भूम येथे जैन मंदिर आहे. तेर येथे संत गोरोबा काका कुंभार यांचे मंदिर आहे. परंडा व नळदुर्ग येथे प्राचीन किल्ले असून नळदुर्ग किल्ल्यातील पाणी महल पर्यटकांचे प्रमुख आकर्षण आहे. रामलिंगाचे देवस्थान प्रसिध्द आहे. सोनारी येथे भैरवनाथाचे मंदिर आहे.

२.५.६ **वाहतूक व दळणवळण :**

उस्मानाबाद लातूर हा ५० किमी ब्रॉडगेज रेल्वेमार्ग आहे. जिल्ह्यात २००९-१० अखेर रस्त्यांची लांबी ५३०७.६० किमी होती. यात सिमेंट रस्ते ९४.१२ किमी, डांबरी रस्ते ३९१६.८८, खडीचे पक्के रस्ते १६५५.६ किमी व इतर वापरून २१४ किमी चे रस्ते आहेत. टपाल कार्यालयाची संख्या २८३ आहे. तर ३६०९६ दूरध्वनी आहेत.

२.५.७ **प्रशासकीय यंत्रणा :**

आठ तालुक्याचा समावेश असलेला हा जिल्हा आहे. यात उस्मानाबाद, परंडा, भूम, वाशी, कळंब, तुळजापूर, लोहारा व उमरगा या तालुक्यांचा समावेश होतो. प्रशासनाच्या सोईच्या दृष्टीने दोन उपविभाग असून उस्मानाबाद उपविभागात

उस्मानाबाद, उमरगा, लोहारा व तुळजापूर या तर भूम उपविभागत भूम, परंडा, कळंब व वाशी या तालुक्याचा समावेश होतो. या जिल्ह्यात ०१ जिल्हापरिषद, ०८ पंचायत समिती, ०८ नगरपरिषदा कार्यरत आहेत. जिल्ह्यात ६२२ ग्रामपंचायती आहेत.

थोडक्यात मानव विकास निम्न असलेल्या मराठवाडा विभागाची व त्यातील तीन जिल्ह्यांच्या पार्श्वभूमीचा अभ्यासाच्या दृष्टिकोनातून थोडक्यात आढावा घेतला आहे.

**संदर्भ :**


१. कटारे अनिल व नगराळे एन. एन. (१९९९), 'मराठवाड्याचा इतिहास', कल्पना प्रकाशन, नांदेड. पृ. २१०.

२. जीवन पवार (२००३), 'उस्मानाबाद जिल्ह्याच्या औद्योगिक समस्या व उपाययोजना', पुणे विद्यापीठास पीएच.डी.पदवीसाठीचा प्रबंध.पृ. २२,२३.

३. कटारे अनिल व नगराळे एन. एन. (१९९९), 'मराठवाड्याचा इतिहास', कल्पना प्रकाशन, नांदेड. पृ. २६३.

४. भांडवलकर एस.एस. व हनवते यु.एस. (१९९९), 'मराठवाड्याचा इतिहास', अभिजित प्रकाशन, लातूर. पृ. २६

५. www. mr.wikipedia.org

६. महाराष्ट्र शासन (२०१०), 'जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन', २०१० जिल्हाः हिंगोली, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई. पृ. २६

७. तत्रैव पृ. २७

८. महाराष्ट्र शासन (२०१०), 'जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन', २०१० जिल्हाः जालना, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई. पृ. १२

९. तत्रैव पृ. १३

१०. महाराष्ट्र शासन (२०१०), 'जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन', २०१० जिल्हाः उस्मानाबाद अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई.पृ. ९

११. तत्रैव पृ. १०,११.


***

# प्रकरण - ४
# संशोधन पध्दती व संदर्भ साहित्यांचा आढावा

## ४.१ प्रस्तावना :

प्रस्तुत संशोधनात मराठवाड्यातील मानव विकासाच्या स्थितीचा आढावा घेऊन सदर स्थितीची कारणमीमांसा करण्यात आलेली आहे. आजच्या काळात 'मानव विकास' ही संकल्पना सर्वत्र लोकप्रिय झालेली आपणास पहावयास मिळते आहे. समाजातील प्रत्येक घटक उदाः राजकारणी, विचारवंत, अर्थशास्त्रज्ञ, प्रसारमाध्यमे, स्वयंसेवी संस्था, लोकप्रतिनिधी, प्रशासक इ. सर्रासपणे या संकल्पनेचा वापर करत आहेत. याचा मुख्य आधार म्हणजे मानव विकास अहवाल व अहवालात दर्शविलेल्या मानव विकास निर्देशांकांची स्थिती होय. सन २००२ मध्ये महाराष्ट्र राज्याने स्वतंत्रपणे राज्याचा मानव विकास अहवाल प्रकाशित केला. या अहवालात राज्यातील विविध प्रशासकीय विभागांच्या मानव विकास निर्देशांकांच्या स्थितीबाबत चर्चा केलेली आहे. त्यामध्ये औरंगाबाद अर्थात मराठवाडा या प्रशासकीय विभागाचा मानव विकास निर्देशांक ०.६१३ आहे. जो राज्यातील सहा प्रशासकीय विभागाच्या तुलनेत सर्वात कमी आहे. त्यामुळे मराठवाड्याचा मानव विकास निर्देशांक निम्न का आहे? या संबंधीत कारणांचा शोध घेणे आवश्यक आहे व यासाठी विविध पध्दतीने संशोधन होणे आवश्यक आहे. संशोधनाशी निगडीत विविध विचारवंतांनी त्यांचे विचार व्यक्त केलेले आहेत.

वेबस्टरच्या शब्दकोशानुसार 'संशोधन म्हणजे तथ्ये वा तत्त्वे शोधण्यासाठी करण्यात येणारी चिकित्सा किंवा परीक्षण, किंवा एखादी गोष्ट शोधून काढण्यासाठी सतत व पध्दतशीर केलेले परीक्षण होय.'[१] (a careful, critical inquiry or examination in seeking facts or principles; diligent investigation in order to ascertain some thing[2]) मानवी जीवनाच्या व्यवहारातील आणि सृष्टीतील विविध समस्या सोडविण्याच्या दृष्टीने सातत्याने शोध घेणे आवश्यक आहे. सामाजिक, आर्थिक,

राजकीय आणि नैतिक स्वरुपाच्या घटना सभोवताली नेहमीच घडत असतात. यामध्ये निश्चित असा कार्यकारण संबंध असतो. परंतु, तो सहजासहजी लक्षात येत नाही. तेव्हा त्यातील कार्य आणि कारणभाव यांच्यातील सूक्ष्म संबंधाचे विश्लेषण करून त्याचा शोध घेणे हा सामाजिक संशोधनाचा एक उद्देश आहे. सामाजिक संशोधन हा केवळ एक शैक्षणिक उपक्रम नसून त्यातून काहीतरी नवीन शोधून काढण्याचा तो एक महत्त्वाचा मार्ग आहे. सामाजिक संशोधना संदर्भात श्रीमती पॉलीन व्ही. यंग असे म्हणतात की, ''सामाजिक संशोधन एक वैज्ञानिक योजना असून तिचा उद्देश तार्किक आणि क्रमबध्द पध्दतीद्वारे नवीन तथ्यांचा शोध घेणे किंवा जुन्या तथ्यांचे पुर्नपरीक्षण आणि त्यांच्यात आढळून येणारे अनुक्रम, अतःसंबंधी कार्यकारणभाव आणि त्यांना संचालित करणाऱ्या नैसर्गिक नियमांचे विश्लेषण करणे हा आहे.''[३] त्यामुळे संशोधन कार्य सातत्याने चालू राहणे हे समाज विकासाच्या दृष्टिकोनातून आवश्यक आहे.

थोडक्यात या प्रकरणात सदर संशोधन कार्यासाठी वापरलेली संशोधन पध्दती सविस्तरपणे मांडण्यात आलेली आहे. तसेच या संबंधी विविध संशोधन कार्याचा आढावा घेण्यात आलेला आहे.

## ४.२ मराठवाडा विभाग निवडीची कारणे :

महाराष्ट्र राज्यात मागासलेला भाग म्हणून मराठवाडा या विभागास ओळखले जाते. याचे मुख्य कारण म्हणजे १९४७ पर्यंत हा विभाग निजामांच्या अधिपत्याखाली होता. या विभागात बहुतांश मराठी भाषिक लोकांचे वास्तव्य होते त्यामुळे निजाम प्रशासकाने या ठिकाणी कोणत्याही प्रकारचा विकास करण्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केलेले होते. मराठवाडा स्वतंत्र महाराष्ट्रात विलीन झाल्यानंतर या विभागाच्या मागण्यांबाबत नेहमीच तोंडाला पाने पुसण्यात आलेली आहेत. महाराष्ट्र राज्याचा सन २००२ च्या मानव विकास अहवालानुसार विकासाच्या सर्वच निर्देशांकात मराठवाडा

विभाग (औरंगाबाद) महाराष्ट्रातील इतर विभागांच्या तुलनेत मागासलेला राहिलेला आहे. हे पुढील तक्त्यावरून लक्षात येते.

**तक्ता क्र. ४.१**

**महाराष्ट्रातील विविध विभागांचे मानव विकास निर्देशांक**

| अ. क्र. | विभाग | मानव विकास निर्देशांक |
|---|---|---|
| १. | कोकण (मुंबईसह) | ०.७२३ |
| २. | नाशिक | ०.६३८ |
| ३. | पुणे | ०.६९६ |
| ४. | अमरावती | ०.६३६ |
| ५. | नागपूर | ०.६४६ |
| ६. | औरंगाबाद | ०.६१३ |
| ७. | महाराष्ट्र | ०.६७३ |

संदर्भः महाराष्ट्राची आर्थिक पहाणी २००८-०९ पृ.१८६

वरील तक्ता क्र. ४.१ वरून असे निदर्शनास येते की, कोकण विभागाचा मानव विकास निर्देशांक हा सर्वाधिक असून औरंगाबाद विभागाचा मानव विकास निर्देशांक सर्वात कमी म्हणजे ०.६१३ एवढा आहे. भारताच्या तुलनेत महाराष्ट्र सर्वच बाबतीत आघाडीवर आहे. परंतु महाराष्ट्रातील मराठवाडा विभाग मात्र सर्वच बाबतीत सर्वात मागासलेला आहे. या बाबीचा विचार करता शासनाने यावर विशेष प्रयत्न करणे गरजेचे आहे. व मराठवाड्याचा मानव विकास निर्देशांक उंचावून तो किमान कोकण विभागापर्यंत आणणे गरजेचे आहे. त्यामुळे या विभागाची निवड संशोधकाने संशोधन कार्यासाठी केलेली आहे.

## ४.३ संशोधन विषयाची निवड व महत्त्व :

'मराठवाड्यातील मानव विकास निम्न असल्याची कारणमीमांसाः एक अभ्यास' या विषयाच्या निवडीची कारणे व या विषयांच्या संशोधनाचे महत्त्व पुढील प्रमाणे मांडण्यात आले आहे.

अ) मराठवाड्यातील जिल्हानिहाय मानव विकास निर्देशांकाची स्थिती : महाराष्ट्र मानव विकास अहवाल २००२ मध्ये मानव विकास निर्देशांक काढण्यासाठी अर्भक मृत्यूदर, साक्षरता प्रमाण, सरासरी शिक्षणाचा कालावधी, दरडोई उत्पन्न इ. मानकांचा आधार घेण्यात आलेला आहे. (साक्षरतेमध्ये महिलाच्या साक्षरतेचे प्रमाण हा एक महत्त्वाचा घटक आहे.) या अहवालानुसार मराठवाड्यातील मानव विकास निर्देशांकाची स्थिती पुढील तक्त्यात दर्शविलेली आहे.

**तक्ता क्र. ४.२**

**मराठवाड्यातील जिल्हानिहाय मानव विकास निर्देशांकाची स्थिती**

| अ.क्र. | जिल्ह्याचे नांव | निर्देशांकाचे मूल्य | महाराष्ट्राचा सरासरी मानव विकास निर्देशांक मूल्य |
|---|---|---|---|
| १. | औरंगाबाद | ०.५७ | ०.५८ |
| २. | जालना | ०.२७ | |
| ३. | नांदेड | ०.३७ | |
| ४. | उस्मानाबाद | ०.३८ | |
| ५. | हिंगोली | ०.४३ | |
| ६. | परभणी | ०.४३ | |
| ७. | बीड | ०.४७ | |
| ८. | लातूर | ०.४७ | |

संदर्थ : मानव विकास अहवाल महाराष्ट्र २००२

वरील तक्ता क्र. ४.२ मध्ये दर्शविलेली मराठवाड्यातील मानव विकास निर्देशांकांची स्थिती पाहता सदर निर्देशांकांत वाढ होणे अत्यंत आवश्यक आहे. कारण, मराठवाडा विभागातील मानव विकास निर्देशांकांची मानके ही मानवाच्या मुलभूत गरजांशी निगडीत आहेत. मानव विकास निर्देशांक निम्न/कमी आहे म्हणजेच तेथील लोकांच्या मुलभूत गरजा पूर्ण झालेल्या नाहीत. तेव्हा मानवाच्या मुलभूत गरजा पूर्ण करून तेथील मानवाचा विकास साधणे गरजेचे आहे तेव्हाच तेथील मानव विकास निर्देशांक वाढेल.

आ) मराठवाड्यातील जिल्हानिहाय व मानकनिहाय निर्देशांकाची स्थितीः

मराठवाड्यातील मानव विकास निर्देशांक ०.४७ च्या खाली असला तरी तक्ता क्र. ४.३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे मानव विकास निर्देशांक मोजण्याकरीता विचारात घेतलेल्या विविध मानकांची स्थिती ही जिल्हानिहाय वेगवेगळी आहे हे दिसून येते.

**तक्ता क्र. ४.३**

**मराठवाड्यातील जिल्हानिहाय व मानकानिहाय मानव विकास निर्देशांकाची स्थिती**

| अ.क्र. | जिल्ह्याचे नांव | साक्षरता प्रमाण (%) | अर्भक मृत्यूदर (प्रति हजारी) | जिल्ह्याचे दरडोई उत्पन्न (रु.) |
|---|---|---|---|---|
| १. | औरंगाबाद | ६१.२८ | ५६ | १३१८३ |
| २. | जालना | ४९.२५ | ७६ | ८०४९ |
| ३. | नांदेड | ५५.१२ | ६८ | ८७८८ |
| ४. | उस्मानाबाद | ५७.५५ | ७० | ८९६३ |
| ५. | हिंगोली | ५१.९६ | ५० | ९२७२ |
| ६. | परभणी | ५२.९८ | ५० | ९२७२ |
| ७. | बीड | ५५.३८ | ५२ | ९५७० |
| ८. | लातूर | ६०.२८ | ५७ | ९१२९ |

संदर्भ : मानव विकास अहवाल महाराष्ट्र २००२

मानव विकास निर्देशांक मोजण्यासाठी विचारात घेतलेल्या मानकामध्ये जिल्हानिहाय भिन्नता आढळून येते. यामध्ये ज्या मानकांची स्थिती अंत्यत कमी आहे अशा मानकांची स्थिती सुधारण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे. एखाद्या मानकांची स्थिती संबंधित जिल्ह्यात अंत्यत कमी असण्याची कारणमीमांसा करून त्यावर योग्य त्या उपाययोजना सुचविता येतील. जेणे करून कमी वेळामध्ये व अपुऱ्या निधीमध्ये आवश्यक त्या ठिकाणी लक्ष केंद्रीत करून मानव विकास निर्देशांक उंचावण्याच्या दृष्टीने एक महत्त्वाचे पाऊल असेल.

इ) मराठवाड्यातील जिल्हानिहाय दरडोई उत्पन्नाचे प्रमाण : मानव विकास निर्देशांक मोजण्यासाठी एक महत्वाचे मानक म्हणजे दरडोई उत्पन्न होय. मराठवाड्यातील आठ जिल्ह्यातील दरडोई उत्पन्नाची स्थिती पुढील प्रमाणे आहे.

**तक्ता क्र. ४.४**

**मराठवाड्यातील जिल्हानिहाय दरडोई उत्पन्नाची स्थिती**

| **अ.क्र.** | **जिल्ह्याचे नांव** | **जिल्ह्याचे दरडोई उत्पन्न** (रु.) | **महाराष्ट्र राज्याचे सरासरी दरडोई उत्पन्न** (रु.) |
|---|---|---|---|
| १. | औरंगाबाद | १३,१८३ | २०,६४४ |
| २. | **जालना** | ८,०४९ | |
| ३. | नांदेड | ८,७८८ | |
| ४. | उस्मानाबाद | ८,९६३ | |
| ५. | हिंगोली | ९२७२ | |
| ६. | परभणी | ९२७२ | |
| ७. | बीड | ९५७० | |
| ८. | लातूर | ९१२९ | |

संदर्भ : मानव विकास अहवाल महाराष्ट्र २००२

वरील तक्ता क्र. ४.४ मध्ये दर्शविल्याप्रमाणे मराठवाड्याच्या इतर जिल्ह्यांच्या तुलनेत जालना जिल्ह्यात दरडोई उत्पन्न या मानकांचे प्रमाण सर्वात कमी आहे. महाराष्ट्र मानव विकास मिशन, औरंगाबाद यांच्या २००९च्या कार्यपूर्ती अहवालानुसार, जालना जिल्ह्यातील अर्थव्यवस्था ही मुख्यतः शेती या प्राथमिक व्यवसायावर अवलंबून आहे. त्यामुळे या जिल्ह्यात दुय्यम व तृतीय स्वरुपाच्या व्यवसायाचे प्रमाण कमी आहे. तसेच या जिल्ह्यात सिंचन व्यवस्था व पावसाचे प्रमाण कमी आहे. पर्यायाने शेतीची उत्पादकता कमी आहे. त्यामुळे जिल्ह्याचे दरडोई उत्पन्न कमी आहे. त्यामुळे या सर्व बाबीचा सखोल अभ्यास करून कारणांचा शोध घेणे आवश्यक आहे. ज्यामुळे त्यावर योग्य त्या उपाययोजना सुचविता येतील व उत्पन्न वाढीस मदत होईल पर्यायाने मानव विकास निर्देशांक वाढेल.

ई) मराठवाड्यातील जिल्हानिहाय महिला साक्षरतेचे प्रमाणः मानव विकास निर्देशांकाच्या मोजमापासाठी साक्षरता प्रमाण हे मानक विचारात घेण्यात आलेले आहे. या मानकामध्ये साक्षरतेच्या प्रमाणात नेहमीच महिला साक्षरतेचे प्रमाण कमी आढळून येते पर्यायाने एकूण साक्षरता प्रमाणात घट आढळून येते. यामध्ये २००१ च्या जनगणना अहवालानुसार हिंगोली जिल्ह्यात पुरूष साक्षरतेचे प्रमाण हे ८१.११ एवढे आहे व महिला साक्षरतेचे प्रमाण ५१.९६ एवढे आहे. याचा तुलनात्मक विचार करता महिला साक्षरतेचे प्रमाण ५० टक्के आहे. याचा प्रत्यक्ष परिणाम हा जिल्ह्याच्या एकूण साक्षरतेवर होतो. साक्षरता प्रमाण या मानकांचे प्रमाण वाढविण्यासाठी म्हणजेच पर्यायाने मानव विकासाचा निर्देशांक वृध्दीसाठी प्रथमतः महिला साक्षरता प्रमाण कमी असल्याच्या कारणांचा शोध घेणे गरजेचे आहे.

**तक्ता क्र. ४.५**

**मराठवाड्यातील जिल्हानिहाय साक्षरता प्रमाण स्थिती**

| अ.क्र. | जिल्ह्याचे नांव | साक्षरता प्रमाण (%) | महाराष्ट्रातील सरासरी साक्षरता प्रमाण (%) |
|---|---|---|---|
| १. | औरंगाबाद | ६१.२८ | ६७.५१ |
| २. | जालना | ४९.२५ | |
| ३. | नांदेड | ५५.१२ | |
| ४. | उस्मानाबाद | ५७.५५ | |
| ५. | **हिंगोली** | **५१.९६** | |
| ६. | परभणी | ५२.९८ | |
| ७. | बीड | ५५.३८ | |
| ८. | लातूर | ६०.२८ | |

संदर्भ : मानव विकास अहवाल महाराष्ट्र २००२ पृ. २४२.

हिंगोली जिल्ह्यातील साक्षरतेचे प्रमाण मराठवाड्यातील इतर जिल्ह्यांशी तुलना करता फारच कमी म्हणजे ५१.९६ एवढे आहे. हिंगोली जिल्ह्यातील एकूण साक्षरता प्रमाण निम्न आहे म्हणजेच पर्यायाने या जिल्ह्यातील स्त्री साक्षरता प्रमाण सुध्दा निम्नच आहे. मराठवाड्यातील आठ जिल्ह्यातील महिला साक्षरतेचे प्रमाण खालील तक्त्यात दर्शविलेले आहे.

**तक्ता क्र. ४.६**

**मराठवाड्यातील जिल्हानिहाय महिला साक्षरता प्रमाण स्थिती -जनगणना २००१**

| अ. क्र. | जिल्ह्याचे नांव | महिला साक्षरता प्रमाण (%) | महाराष्ट्रातील सरासरी महिला साक्षरता प्रमाण (%) |
|---|---|---|---|
| १. | औरंगाबाद | ६०.०६ | ६७.०३ |
| २. | जालना | ४९.०७ | |
| ३. | नांदेड | ५४.३५ | |
| ४. | उस्मानाबाद | ५६.८९ | |
| ५. | **हिंगोली** | **५१.१७** | |
| ६. | परभणी | ५२.०२ | |
| ७. | बीड | ५४.५२ | |
| ८. | लातूर | ५९.४० | |

संदर्भ : भारताची जनगणना २००१

तक्ता क्र. ४.६ मध्ये मराठवाड्यातील जिल्ह्यांच्या महिला साक्षरतेचे प्रमाण दर्शविण्यात आलेले आहे. हिंगोली जिल्ह्यातील महिला साक्षरतेचे प्रमाण मराठवाड्यातील इतर जिल्ह्यातील महिला साक्षरता प्रमाणाच्या तुलनेत कमी आहे. यासंबंधी महाराष्ट्र मानव विकास अहवाल २००२ नुसार मुलींना शाळा शिकण्यासाठी त्यांच्या जवळपास शाळांची उपलब्धता नाही, मुलींच्या गळतीचे प्रमाण जास्त आहे, अशी मुख्य कारणे नोंदविलेली आहेत. हिंगोली जिल्ह्यातील सामाजिक परिस्थितीचा विचार करता जिल्ह्यातील बहुतांश पालकवर्ग अशिक्षित शेतकरी वर्गातील आहे. त्यामुळे त्यांना शिक्षणाचे महत्त्व पटले नाही, असे वाटते. सबब या जिल्ह्यातील महिलांच्या साक्षरतेचे प्रमाण वाढविणे आवश्यक आहे. जेणे करून मराठवाड्याच्या मानव विकास निर्देशांकात वाढ होईल.

उ) मराठवाड्यातील जिल्हानिहाय अर्भक मृत्यूदर : राज्याचा मानव विकास निर्देशांक मोजण्यासाठी अर्भक मृत्यूदर या मानकांचा विचार करण्यात अलेला आहे. मराठवाड्यातील जिल्हानिहाय अर्भक मृत्यूदर पुढील तक्त्यात दर्शविलेले आहे.

**तक्ता क्र. ४.७**

**मराठवाड्यातील जिल्हानिहाय अर्भक मृत्यूची स्थिती**

| अ.क्र. | जिल्ह्याचे नांव | अर्भक मृत्यूदर (प्रति हजारी) | महाराष्ट्रातील सरासरी अर्भक मृत्यूदर (प्रति हजारी) |
|---|---|---|---|
| १. | औरंगाबाद | ४६ | ७४ |
| २. | जालना | ७६ | |
| ३. | नांदेड | ६८ | |
| ४. | **उस्मानाबाद** | ७० | |
| ५. | हिंगोली | ५० | |
| ६. | परभणी | ५० | |
| ७. | बीड | ५२ | |
| ८. | लातूर | ५७ | |

संदर्भ : मानव विकास अहवाल महाराष्ट्र २००२ पृ. २४२.

मराठवाड्यातील इतर जिल्ह्यांच्या तुलनेत उस्मानाबाद जिल्ह्यात अर्भक मृत्यूदराचे प्रमाण अधिक आहे. महाराष्ट्र मानव विकास मिशन, औरंगाबाद यांच्या २००९ च्या कार्यपूर्ती अहवालानुसार, संस्थात्मक प्रसुतीचे (आरोग्य विभागाच्या निर्देशानुसार प्रसूत महिलेस कमीत कमी ७२ तास दवाखान्यात डॉक्टरच्या देखरेखीखाली ठेवणे) प्रमाण कमी असणे, लग्नाच्या वेळी अंदाजे ४० ते ५० टक्के मुली ॲनेमिक असणे ही याची मुख्य कारणे आहेत. तेव्हा उस्मानाबाद जिल्ह्यातील ही परिस्थिती बदलणे व अर्भकमृत्यूचे प्रमाण कमी करणे आवश्यक आहे.

वरील सर्व बाबींचा विचार करता संशोधकाने या विषयाची निवड केलेली आहे.

## ४.४ **संशोधनाची उद्दिष्ट्ये :**

'मराठवाड्यातील मानव विकास निम्न असल्याची कारणमीमांसा: एक अभ्यास' या संशोधनाची उद्दिष्ट्ये खालील प्रमाणे आहेत.

अ) मानव विकास निर्देशांक मोजण्यासाठी विचारात घेतलेल्या दरडोई उत्पन्न, अर्भक मृत्यू प्रमाण व साक्षरता प्रमाण (महिला साक्षरता प्रमाण) या मानकातील सन २०००-०१ ते २००९-१० या कालावधीत झालेल्या बदलांचे विश्लेषण करणे.

आ) मानव विकास निर्देशांक काढण्यासाठी विचारात घेतलेल्या साक्षरता प्रमाण या घटकातील महिला साक्षरता प्रमाण हे मानक मराठवाड्यातील इतर जिल्ह्यांच्या तुलनेत हिंगोली जिल्ह्यात याचे प्रमाण कमी असल्याच्या कारणांचा शोध घेणे व त्यावर उपाययोजना सुचविणे.

इ) मानव विकास निर्देशांक काढण्यासाठी विचारात घेतलेल्या अर्भक मृत्यू प्रमाण हे मानक मराठवाड्यातील इतर जिल्ह्यांच्या तुलनेत उस्मानाबाद जिल्ह्यात याचे प्रमाण जास्त असल्याच्या कारणांचा शोध घेणे व त्यावर उपाययोजना सुचविणे.

ई) मानव विकास निर्देशांक काढण्यासाठी विचारात घेतलेल्या दरडोई उत्पन्न हे मानक मराठवाड्यातील इतर जिल्ह्यांच्या तुलनेत जालना जिल्ह्यात याचे प्रमाण कमी असल्याच्या कारणांचा शोध घेणे व त्यावर उपाययोजना सुचविणे.

## ४.५ गृहितकृत्ये :

हे संशोधन करताना संशोधकाने खालील गृहितकृत्ये विचारात घेतलेली आहेत.

अ) हिंगोली जिल्ह्यात महिला साक्षरता प्रमाण कमी आहे कारण, मुलींना शाळेत जाण्यासाठी घराच्या जवळ शाळा उपलब्ध नाही.

आ) उस्मानाबाद जिल्ह्यात अर्भक मृत्यूचे प्रमाण जास्त आहे कारण, येथे संस्थात्मक प्रसुतीचे प्रमाण कमी आहे.

इ) जालना जिल्ह्यात दरडोई उत्पन्नाचे प्रमाण कमी आहे कारण, या जिल्ह्यात दुय्यम व तृतीय व्यवसायाचे प्रमाण प्राथमिक व्यवसायाच्या तुलनेत कमी आहे.

## ४.६ कार्यात्मक व्याख्या :

प्रस्तुत संशोधनातील विविध कार्यात्मक व्याख्या खालील प्रमाणे आहेत.

i) मानव विकास निर्देशांक : 'मानव विकास अहवाल महाराष्ट्र २००२' मध्ये काढण्यात आलेले एचडीआय मूल्य.

ii) निम्न मानव विकास निर्देशांकः मानव विकास अहवाल महाराष्ट्र २००२ नुसार ०.४७ पेक्षा कमी एचडीआय मूल्य.

iii) मराठवाडा विभागः औरंगाबाद, जालना, परभणी, हिंगोली, बीड, नांदेड, लातूर, उस्मानाबाद या आठ जिल्ह्यांचा समावेश असलेला प्रशासकीय विभाग.

iv) साक्षर महिला/स्त्रियांः १५ ते २५ वयोगटातील मराठी भाषा लिहिता, वाचता व समजून घेणाऱ्या महिला/स्त्रिया होय.

v) निरक्षर महिला/स्त्रियाः १५ ते २५ वयोगटातील मराठी भाषा बोलणाऱ्या परंतु, लिहता व वाचता न येणाऱ्या महिला/स्त्रिया होय.

vi) अर्भकमृत्यू दरः एक वर्ष वयापर्यंतच्या बालकांमधील एक हजार अर्भकांमागे असलेला सरासरी मृत्यू पावलेल्या बालकांची संख्या म्हणजे अर्भक मृत्यूदर (प्रमाण) होय.

vii) संस्थात्मक प्रसुतीः दवाखान्यात झालेली प्रसुती.

viii) घरी प्रसुतीः कोणत्याही प्रकारच्या दवाखान्यात प्रसुत न होणे.

ix) ॲनेमियक महिला/स्त्रियाः महिलेच्या रक्तातील हिमोग्लोबिनचे प्रमाण १० ग्रॅम पेक्षा कमी असणे.

x) जिल्हा दरडोई उत्पन्नः जिल्ह्याच्या एकूण किंवा स्थूल उत्पन्नास जिल्ह्याच्या एकूण लोकसंख्येने भागले असता येणारे उत्पन्न होय.

xi) प्राथमिक व्यवसायः शेती, जंगलव्यवसाय, मत्सव्यवसाय, पशुपालन, खाणी व खनिज उत्पादने व नैसर्गिक साधन संपत्तीवर आधारित इतर पुरक व्यवसाय इ. व्यवसाय.

xii) द्वितिय व्यवसायः कारखाने, बांधकाम, वीजनिर्मिती व नैसर्गिक वायू, पाणी पुरवठा, खाण व्यवसाय आधारित उद्योग इ. तसेच प्राथमिक व्यवसायातील साधन सामुग्रीवरील प्रक्रिया उद्योग म्हणजे द्वितीय व्यवसाय होय.

xiii) तृतीय व्यवसायः बँक व वित्त व्यवहार, विमा, व्यापार, वाहतूक, दळणवळण, प्रशासकीय सेवा, संरक्षण सेवा, शिक्षण, आरोग्य इ. तसेच सामुदायिक व वैयक्तिक सर्व प्रकारच्या सेवा म्हणजे तृतीय व्यवसाय होय.

xiv) दारिद्र्य रेषेखालील कुटुंबे (BPL): पिवळ्या रंगाचे रेशनकार्ड धारक कुटुंब.

xv) दारिद्र्य रेषेवरील कुटुंबे (APL): केशरी व लाल रंगाचे रेशनकार्ड धारक कुटुंब.

xvi) घराच्या जवळ शाळा उपलब्ध नसणे: बालकाच्या घरापासून साधारणतः २ किमी अंतरापर्यंत शाळा नसणे.

## ४.७ संशोधन कालावधी :

प्रस्तुत संशोधनासाठी सन २०००-०१ ते २००९-१० हा कालावधी संशोधकाने निवडलेला आहे. हा कालावधी संशोधन विषयाचा अभ्यास करण्यासाठी संशोधकाच्या दृष्टीने अनुकूल आहे.

## ४.८ संशोधनाची व्याप्ती व मर्यादा :

प्रस्तुत संशोधनाची व्याप्ती व मर्यादा खालील प्रमाणे आहेत.

अ) या संशोधनाचा अभ्यास हा मानव विकास निर्देशांकांच्या दरडोई उत्पन्न, अर्भक मृत्यू प्रमाण व महिला साक्षरता प्रमाण या मानकांपुरता मर्यादित आहे.

आ) महिला साक्षरता प्रमाण हे प्रत्यक्ष मानक म्हणून विचारात घेतले नसले तरी एकूण साक्षरतेच्या प्रमाणावर परिणाम करणारे महत्त्वाचे मानक आहे.

इ) या संशोधनासाठी वापरण्यात आलेल्या दुय्यम स्वरुपातील माहितीची विश्वसनीयता ही ज्यांनी प्राथमिक स्वरुपाची माहिती संकलित केलेली आहे त्यांच्यावर अवलंबून आहे.

ई) या संशोधनातील अभ्यास हा मराठवाड्यातील एकूण आठ (०८) जिल्ह्यांपैकी हिंगोली, उस्मानाबाद व जालना या तीन (०३) जिल्ह्यापुरता मर्यादित असून संबंधित जिल्ह्यातील विशिष्ट मानव विकास निर्देशांकाच्या मानकांच्या स्थिती निम्न असल्याच्या कारणांचा शोध घेण्यापर्यंत मर्यादित आहे.

उ) या संशोधनातून निघालेले निष्कर्ष सर्वच भौगोलिक क्षेत्रास लागू असतीलच, असे म्हणता येत नाही.

### ४.९ संशोधन पध्दती व सामग्री संग्रहण :

संशोधन समस्येची उकल करण्यासाठी योग्य संशोधन पध्दती निवडणे आवश्यक असते. संशोधन पध्दतीची निवड ही समस्येचे स्वरुप, उद्दिष्ट्ये, अंतर्भूत असलेली मूल्ये, माहितीचे स्वरुप, व्याप्ती इ. गोष्टीवर आधारित असते. प्रस्तुत संशोधनात विश्लेषणात्मक पध्दतीचा अवलंब करण्यात आलेला आहे. प्रस्तुत संशोधनात अनुसूची व निरीक्षण अनुसूची सहाय्याने प्राथमिक स्वरुपाच्या तसेच दुय्यम स्त्रोताकडील माहितीचे संकलन करुन तिचे वर्गीकरण व अर्थनिर्वचन करण्यात आलेला आहे. विश्लेषणात्मक संशोधन पध्दतीमध्ये माहितीचे विविध अंगानी विश्लेषण केलेले असते. हे विश्लेषण सर्वेक्षणातून संकलित केलेल्या व दुय्यम स्वरुपात उपलब्ध असलेल्या सांख्यिकीय माहितीच्या आधारे केले जाते. व त्याआधारे निष्कर्ष काढले जातात. प्रस्तुत संशोधनात संशोधनासाठी आवश्यक प्राथमिक माहितीच्या संकलनासाठी सर्वेक्षण या पध्दतीचा वापर करण्यात आला आहे. सर्वेक्षण पध्दतीबाबत जॉन ड्ब्लू. बेस्ट यांचे मत मार्गदर्शक ठरते, ते म्हणतात, “The survey method gathers data from a relatively large number of cases at a particular time, it is not concerned with characteristic of individuals. It is concerned with the generalized statistics that result when data are abstracted from a number of individual cases. It is essential corss sectional”[4] – John W. Best.

यावरुन सर्वेक्षण पध्दतीचे संशोधन हे एका विशिष्ट वेळेच्या परिस्थितीशी निगडीत असून मोठ्या जनसंख्येकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे केलेले असते. संशोधकाला वस्तुनिष्ठ संशोधन करून समस्येची उकल करण्याकरीता लागणाऱ्या आवश्यक साधन सामुग्रीशी संबंधित घटक म्हणून सर्वेक्षणाचा उपयोग केला जातो. सर्वेक्षण पध्दतीची उपयुक्तता ही खालील मुद्दयांच्या सहाय्याने स्पष्ट करता येईल.

१. सविस्तर व तथ्यावर आधारित महिती गोळा करून त्या माहितीच्या आधारे सद्य स्थितीतील घटनाबाबत वर्णन करण्यासाठी या पध्दतीचा उपयोग होतो.

२. समस्या, सद्यस्थिती व उपयोगात येणाऱ्या पध्दती यांना योग्य न्याय देण्यासाठी उपयुक्त पध्दती आहे.

३. मूल्यांकन किंवा तुलना करण्यासाठी आवश्यक आहे.

४. भविष्यकालीन योजना व निर्णय यांसाठी इतरांनी हाताळलेली समान समस्या व अनुभव यांचा लाभ घेण्यासाठीही या पध्दतीचा उपयोग होतो.

प्रस्तुत संशोधन अभ्यास हा गाव सर्वेक्षण पध्दतीमध्ये मोडतो. यामध्ये सर्वेक्षण पध्दतीची सर्व वैशिष्टये स्पष्ट व ठळक स्वरुपात आढळतात. यात भौगोलिक क्षेत्राशी संबंधित गांव, तालुका, जिल्हा, प्रादेशिक विभाग, राज्य इ. घटक आहेत. मानव विकास या घटकांशी संबंधित शिक्षण, आरोग्य, राहणीमान दर्जा इ. घटकांचा यात समावेश आहे. प्रस्तुत संशोधनात महाराष्ट्र मानव विकास अहवाल २००२ नुसार मराठवाड्यातील मानव विकास निर्देशांक काढण्यासाठी विचारात घेण्यात आलेल्या विविध मानकांची स्थिती निम्न का आहे? पर्यायाने मराठवाड्याचा मानव विकास निर्देशांक निम्न का आहे? याच्या कारणाचा शोध घेण्यात आलेला आहे. प्रस्तुत संशोधनाची उद्दिष्ट्ये, संशोधनाची व्याप्ती, समाविष्ट घटक या सर्वांचा सांगोपांग विचार करून संशोधकाने प्रस्तुत संशोधनासाठीच्या माहिती संकलनासाठी सर्वेक्षण पध्दतीचा वापर केलेला आहे.

मानव विकाससंबंधित एखाद्या मानकाची स्थिती एखाद्या जिल्ह्यात, प्रदेशात कमी किंवा जास्त असण्यास कोणती कारणे कारणीभूत आहेत? त्यास प्रामुख्याने कोणती स्थिती जबाबदार आहे? यासारख्या प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी सर्वेक्षण पध्दतीच योग्य आहे. ज्यामध्ये दोन स्थितीची तुलना करून योग्य कारण शोधणे व त्यावर योग्य

त्या उपाययोजना सुचविणे आवश्यक आहे. या दृष्टीने संशोधकाने संशोधनाची उद्दिष्ट्ये ठरविली व त्यानुसार संशोधकाने संशोधन कार्यासाठी सर्वेक्षण ही पध्दती निवडली. प्रस्तुत संशोधनातील अभ्यासासाठी मराठवाड्यातील हिंगोली, जालना व उस्मानाबाद या तीन जिल्ह्यातील ६ तालुके, ११० गांवे, ११०० प्रतिसादक इ. पर्यंत पोहचून कारणांची सविस्तर माहिती संकलित करणे आवश्यक होते. व या सर्व घटकांपर्यंत पोहचण्याची योग्य पध्दती म्हणजे सर्वेक्षण पध्दती होय. प्रस्तुत संशोधनाच्या उद्दिष्टांचा विचार केल्यास प्रत्यक्ष प्रतिसादक/लाभार्थींची भेट घेऊनच त्यांचा प्रतिसाद घेणे आवश्यक होते. कारण लाभार्थींच्या प्रतिसादाशिवाय योग्य तथ्य संकलित करणे अडचणीचे होते. तात्पर्य प्रस्तुत संशोधनाचे स्वरुप, व्याप्ती, उद्दिष्ट्ये, गृहितकृत्ये इ. बाबीं विचारात घेता संशोधकाने सर्वेक्षण पध्दतीची निवड केली.

### ४.९.१ **नमुना निवड व जनसंख्या** (Simple & Population) :

तथ्य संकलनासाठी संशोधक बरेचदा स्वतः संशोधन क्षेत्रात जाऊन संशोधन विषयाशी तसेच घटनांशी संपर्क प्रस्थापित करून माहिती संकलन करतो. कोणत्याही समस्या विषयाच्या समूहाशी संबंधित असणारी तथ्ये संकलित करण्यासाठी जनगणना किंवा नमुना पध्दतीचा वापर करण्यात येतो. जनगणना पध्दती म्हणजे ज्यावेळी समूहाच्या सर्व सदस्यांशी संपर्क प्रस्थापित करुन संशोधक तथ्ये संकलित करतो. तर नमुना निवड पध्दती म्हणजे ज्यावेळी संशोधक विश्वातील किंवा समग्रातील एककांची संख्या जास्त असते त्यावेळी त्या समग्रातील एककांचा एक छोटासा नमुना गट निवडला जातो आणि त्या नमुना गटातील समस्येशी संबंधित निष्कर्ष काढले जातात.

निरनिराळ्या अभ्यासकांनी नमुना निवड पध्दतीच्या व्याख्या केल्या आहेत. या नमुना निवडीच्या पध्दतीसंबंधी श्रीमती यंग असे म्हणतात की, ‘‘एक सांख्यिकीय नमुना त्या संपूर्ण समूह किंवा समग्राचे एक लघु चित्र आहे, ज्यामधून नमुना घेतला आहे.’’[५]

बोगार्डस यांच्या मते, "एका पुर्वनिर्धारित योजनेनुसार एककांच्या एका समूहामधून एक निश्चित प्रतिशत निवडणे म्हणजे नमुना निवड होय." [६]

नमुना निवडीचे संभाव्यता नमुना निवड पध्दती व गैरसंभाव्यता नमुना निवड पध्दती हे प्रमुख दोन प्रकार आहेत. संभाव्यता नमुना निवड पध्दती म्हणजे समग्रातून किंवा विश्वातून प्रत्येक एककाला नमुन्यात समाविष्ट होण्याची संधी किती प्रमाणात मिळणार आहे हे सांख्यिकीय पध्दतीने मांडण्याच्या पध्दती होय. या पध्दतीत समग्रातील प्रत्येक एककाच्या नमुन्यात समावेश होण्याची संभाव्यता किती असते हे समजते. गैरसंभाव्यता नमुना निवड पध्दती म्हणजे जेव्हा समग्रातून किंवा विश्वातून प्रत्येक एककाचा नमुन्यात समावेश होण्याची संभाव्यता सांगता येत नाही. या दोन्ही पध्दतीचे विविध उपप्रकार पडतात.

प्रस्तुत संशोधनात संभाव्यता नमुना निवड पध्दती मधील साधा यादृच्छिक नमुना निवड पध्दती तर गैरसंभाव्यता नमुना निवड पध्दती मधील सहेतुक नमुना निवड पध्दतीचा वापर करण्यात आलेला आहे. साधा यादृच्छिक नमुना निवड पध्दतीमध्ये समग्रातील एककांची नमुन्यासाठी निवड करणे हे संशोधकाच्या हाती नसते. संशोधक स्वतः आपल्या इच्छेनुसार कोणत्याही एककाचा नमुन्यात समावेश करू शकत नाही. त्यामुळे समग्रातील प्रत्येक एककाला नमुन्यात समाविष्ठ होण्याची संधी असते. नमुना निवड करताना पक्षपात होण्याची संभावना मुळीच नसते. प्रत्येक एककाला नमुन्यात समाविष्ट होण्याची संधी किती प्रमाणात आहे? हे संख्याशास्त्रीय पध्दतीच्या आधारे स्पष्ट करता येते. या पध्दतीत समग्रातील एककाचा नमुन्यात समावेश होणे हे प्रत्येक एककाच्या दैवावर किंवा नशीबावर अवलंबून असते. म्हणूनच या पध्दतीला यादृच्छिक नमुना निवड पध्दती असे म्हणतात. ही अतिशय शास्त्रशुध्द पध्दती आहे. यामध्ये एककाची निवड करण्यासाठी लॉटरी, कार्ड किंवा तिकिट, ग्रीड, नियमित अंकन, अनियमित अंकन, कोटा निवड इ. मधील एका पध्दतीचा वापर केला जातो. तर सहेतूक

किंवा उद्देशपूर्ण नमुना निवड पध्दती यात ज्यावेळी संशोधक एखादा विशिष्ट हेतू किंवा उद्देश समोर ठेवून काही एककांची निवड करतो त्यावेळी त्या नमुना निवड पध्दतीला सहेतूक किंवा उद्देशपूर्ण नमुना निवड पध्दती म्हणतात. या प्रकारच्या नमुना निवडीत संशोधक समस्यांची सर्व लक्षणे माहित करुन घेतो व नंतर एककांची निवड विस्तारपूर्वक करीत असतो. हे नमुने उद्देशानुकुल व प्रातिनिधिक असतात. उद्देश हे मार्गदर्शक ठरतात व त्याच उद्देशपूर्तीसाठी संशोधन कार्य केले जाते.

संशोधकाने संशोधनासाठीचा नमुना ज्यातून निवडला आहे असा संपूर्ण भाग म्हणजे जनसंख्या (Population) होय, नमुन्याची गुणवैशिष्ट्ये ज्याच्याशी समान आहेत अशा व्यक्ती किंवा वस्तू म्हणजे जनसंख्या मानली जाते. या संदर्भात बेस्ट यांनी केलेली व्याख्या अत्यंत वस्तुनिष्ठ आहे. “A population is any group of individuals that have one or more characteristics in common that are of interest to the researcher. The population may be all the individuals of a particular type or a more restricted part of that group.” [७]

प्रस्तुत संशोधनात हिंगोली, उस्मानाबाद व जालना या जिल्ह्यातील निवडलेल्या तालुक्यांची, गांवाची व जनसंख्येची माहिती खालील प्रमाणे आहे. नमुना निवडीच्या सहेतुक नमुना निवड पध्दतीनुसार हिंगोली जिल्ह्यातील महिला साक्षरता कमी असण्याच्या, उस्मानाबाद जिल्ह्यातील अर्भक मृत्यूदर जास्त असण्याच्या व जालना जिल्ह्यात दरडोई उत्पन्न कमी असल्याच्या इ. संबंधित कारणांचा शोध घेण्यासाठी या तीन जिल्ह्यातील तालुक्याची निवड खालील प्रमाणे केलेली आहे.

**अ) हिंगोली जिल्ह्यातील नमुना निवड :**

२००१ च्या जनगणनेनुसार सहेतूकपणे सर्वात अधिक महिला साक्षरतेचे प्रमाण असलेल्या व सर्वात कमी महिला साक्षरतेचे प्रमाण असलेल्या तालुक्यांची निवड करण्यात आली. यामध्ये कारणांचा शोध घेणे महत्त्वाचे आहे याचा विचार करता तुलना

करण्याच्या दृष्टिकोनातून ही निवड खालील तक्त्यात दर्शविलेल्या आकडेवारीच्या आधारे करण्यात आली.

**तक्ता क्र. ४.८**

**तालुकानिहाय महिला साक्षरतेचे प्रमाण**

| **अ. क्र.** | **तालुका** | **महिला साक्षरता प्रमाण** |
|---|---|---|
| १. | सेनगाव | ४९.२ |
| २. | हिंगोली | ५३.३ |
| ३. | वसमत | ५१.० |
| ४. | औढा नागनाथ | ४६.४ |
| ५. | कळमनुरी | ५४.४ |

संदर्भ : भारतीय जनगणना २००१, हिंगोली जिल्ह्यासंबंधीत ऑनालिटिकल नोट तक्ता क्र. २१

वरील तक्ता क्र. ४.८ मध्ये २००१ च्या जनगणनेनुसार हिंगोली जिल्ह्यातील तालुकानिहाय महिला साक्षरतेचे प्रमाण दर्शिविण्यात आलेले आहे. या तक्त्याच्या निरिक्षणावरुन असे लक्षात येते की, सर्वात कमी महिला साक्षरतेचे प्रमाण औढा नागनाथ या तालुका आहे. तर सर्वाधिक महिला साक्षरतेचे प्रमाण कळमनुरी तालुक्यात आहे. महिला साक्षरतेच्या प्रमाणाची ही स्थिती लक्षात घेता हिंगोली जिल्ह्यातील औढा नागनाथ व कळमनुरी या तालुक्यांची माहिती संकलनासाठी निवड करण्यात आली.

या दोन्ही तालुक्यातील गांवाची निवड यादृच्छिक पध्दतीने करण्यात आली. यामध्ये प्रथमतः जनगणना कार्यालयाकडील तालुक्यातील गांवांची यादी प्राप्त केली. तद्‌नंतर प्रत्येक गावास १ पासून क्रमांक देण्यात आले व त्यानंतर साध्या यादृच्छिक पध्दतीनुसार एकूण गांवाच्या तुलनेत जवळपास १५ टक्के गावांची निवड करण्यात आली. याचा तपशील तक्ता क्र. ४.११ मध्ये दिलेला आहे. संशोधनाचा विस्तार व उद्देश विचारात घेता निवडलेल्या प्रत्येक गांवातील साक्षर ०५ व निरक्षर ०५ अशा

एकूण १० प्रतिसादकांची प्रत्यक्ष शोध घेऊन निवड करण्यात आली. या प्रतिसादकांच्या आकडेवारीचा तालुकानिहाय तपशिल पुढील तक्ता क्र. ४.११ मध्ये दिलेला आहे.

**आ) उस्मानाबाद जिल्ह्यातील नमुना निवड :**

उस्मानाबाद जिल्ह्यातील मानव विकास मिशनच्या कार्यक्षेत्रात समाविष्ठ उस्मानाबाद, कळंब, वाशी, भूम, तुळजापूर इ. तालुके व अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई यांच्या "जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, २०१०- उस्मानाबाद" नुसार अर्भकमृत्यूची संख्या सर्वात अधिक असलेला व अर्भकमृत्यूची संख्या सर्वात कमी असलेल्या तालुक्यांची सहेतूकपणे निवड करण्यात आली. यामध्ये कारणांचा शोध घेणे महत्त्वाचे आहे याचा विचार करता तुलना करण्याच्या दृष्टिकोनातून ही निवड खालील तक्त्यात दर्शविलेल्या आकडेवारीच्या व मानव विकास मिशन कार्यक्षेत्रातील तालुके यांच्या आधारे करण्यात आली.

**तक्ता क्र. ४.९**

**तालुकानिहाय अर्भक मृत्यूदर संख्या**

| अ.क्र. | तालुका | अर्भक मृत्यूदर संख्या |
|---|---|---|
| १. | परंडा | २१ |
| २. | भूम | ४१ |
| ३. | वाशी | १९ |
| ४. | कळंब | ३० |
| ५. | उस्मानाबाद | ११९ |
| ६. | तुळजापूर | ७६ |
| ७. | लोहारा | १२ |
| ८. | उमरगा | ७९ |

संदर्भ : जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन २०१०, जिल्हा उस्मानाबाद

वरील तक्ता क्र. ४.९ मध्ये उस्मानाबाद जिल्ह्यातील तालुकानिहाय अर्भकमृत्यूचे प्रमाण दर्शविण्यात आलेले आहे. वरील तक्त्यात दर्शविलेले प्रमाण व मानव विकास मिशन कार्यक्षेत्रातील तालुके यांच्या विचार करता सर्वाधिक अर्भकमृत्यूचे प्रमाण असलेला उस्मानाबाद तालुक्यात व सर्वात कमी अर्भकमृत्यू संख्या असलेला वाशी (वरील तक्त्यातील अर्भमृत्यू संख्या कमी असलेला दुसऱ्या क्रमांकाचा) या दोन तालुक्याची निवड करण्यात आली. या दोन तालुक्यातील गांवाची निवड ही साध्या यादृच्छिक पध्दतीने करण्यात आली. यामध्ये प्रथमतः जनगणना कार्यालयाकडील तालुक्यातील गावांची यादी प्राप्त केली. तद्नंतर प्रत्येक गांवास १ पासून क्रमांक देण्यात आले व त्यानंतर साध्या यादृच्छिक पध्दतीनुसार एकूण गांवाच्या तुलनेत जवळपास १५ टक्के गांवाची निवड करण्यात आली. याचा तपशील तक्ता क्र. ४.११ मध्ये दिलेला आहे. संशोधनाचा विस्तार व उद्देश विचारात घेता निवडलेल्या प्रत्येक गांवातील संस्थात्मक प्रसुती झालेल्या ०५ व घरी प्रसुती झालेल्या ०५ अशा एकूण १० प्रतिसादक यांची निवड स्थानिक ए.एन.एम. यांच्या नोंदवहीतील यादीनुसार साध्या यादृच्छिक पद्धतीने करण्यात आली. या प्रतिसादकांच्या आकडेवारीचा तालुकानिहाय तपशील पुढील तक्ता क्र. ४.११ मध्ये दिलेला आहे.

**इ) जालना जिल्ह्यातील नमुना निवड :**

अर्थ व सांख्यिकी संचालनालयातर्फे दरडोई उत्पन्न संबंधित आकडेवारी जिल्हा पातळीपर्यंतच उपलब्ध आहे. मात्र, दरडोई उत्पन्न संबंधित तालुकानिहाय आकडेवारी उपलब्ध नाही. त्यामुळे दरडोई उत्पन्न सर्वाधिक व जास्त असणाऱ्या तालुक्यांची निवड करणे अडचणीचे होते. ही बाब लक्षात घेता यासाठी निश्चित अशी कार्यपध्दती ठरवणे आवश्यक होते. दरडोई उत्पन्नाची स्थिती लक्षात घेण्यासाठी ग्रामीण दारिद्र्यरेषेखालील कुटुंबाचे प्रमाण विचारात घेणे संयुक्तिक ठरते. या बाबीच्या अनुषंगाने दारिद्र्यरेषेखालील सर्वाधिक कुटुंबाचे प्रमाण असलेला तालुका व सर्वात कमी प्रमाण

असलेल्या तालुक्यांची निवड ही तुलना करण्याच्या दृष्टिकोनातून खालील तक्त्याच्या आधारे करण्यात आली.

**तक्ता क्र. ४.१०**

**तालुकानिहाय ग्रामीण दारिद्र्यरेषेखालील कुटुंबे**

| अ. क्र. | तालुका | दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांची संख्या |
|---|---|---|
| १. | भोकरदन | १८,५९६ |
| २. | जाफराबाद | १०,८८२ |
| ३. | जालना | १५,४६१ |
| ४. | बदनापूर | १०,०२४ |
| ५. | अंबड | १४,०६५ |
| ६. | घनसांगवी | १४,११८ |
| ७. | परतूर | १०,२६७ |
| ८. | मंठा | ११,७७५ |

संदर्भ : जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन २०१०, जिल्हा जालना

वरील तक्ता क्र. ४.१० मध्ये अर्थ व सांख्यिकी संचालनालय यांच्या "जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन २०१०- जालना" नुसार जिल्ह्यातील तालुकानिहाय ग्रामीण दारिद्र्यरेषेखालील कुटुंबाची संख्या दर्शविण्यात आलेली आहे. यामध्ये सर्वाधिक ग्रामीण दारिद्र्यरेषेखाली कुटुंबांची संख्या भोकरदन तालुक्यात असून सर्वात कमी बदनापूर तालुक्यात आहे. ग्रामीण दारिद्र्यरेषेखालील कुटुंबाच्या संख्येसंबंधित या आकडेवारीचा विचार करता भोकरदन व बदनापूर या तालुक्यांची निवड करण्यात आली. या दोन तालुक्यातील गावांची निवड ही साध्या यादृच्छिक पध्दतीने करण्यात आली. यामध्ये प्रथमतः जनगणना कार्यालयाकडील तालुक्यातील गावांची यादी प्राप्त केली. तद्नंतर प्रत्येक गावास १ पासून क्रमांक देण्यात आले व त्यानंतर साध्या यादृच्छिक पध्दतीनुसार एकूण गांवाच्या तुलनेत जवळपास १५ टक्के गांवाची निवड

करण्यात आली. याचा तपशील तक्ता क्र. ४.११ मध्ये दिलेला आहे. संशोधनाचा विस्तार व उद्देश विचारात घेता निवडलेल्या प्रत्येक गांवातील दारिद्र्यरेषेखालील (BPL) ०५ व दारिद्र्यरेषेवरील (APL) ०५ अशा एकूण १० प्रतिसादक यांची निवड सदर गावाच्या ग्रामपंचायत कार्यालयाकडून उपलब्ध यादीनुसार यादृच्छिक पध्दतीने करण्यात आली. या प्रतिसादकांच्या आकडेवारीचा तालुकानिहाय तपशिल पुढील तक्ता क्र. ४.११ मध्ये दिलेला आहे.

**तक्ता क्र. ४.११**
**जिल्हानिहाय निवडलेल्या जनसंख्येची माहिती**

<table>
<tr><th>अ. क्र.</th><th>तपशील</th><th>जिल्हा</th><th>तालुका</th><th>तालुक्यातील एकूण गांवाची संख्या</th><th>तालुक्यातील निवडलेल्या गांवाची संख्या</th><th>प्रत्येक गांवातून ०५ प्रमाणे प्रतिसादकांची संख्या</th><th>तालुक्यातील प्रतिसादकांची एकूण संख्या</th><th>जिल्ह्यातील प्रतिसादकांची एकूण संख्या</th></tr>
<tr><td rowspan="2">१.</td><td rowspan="2">साक्षर महिला</td><td rowspan="4">हिंगोली</td><td>औंढा नागनाथ</td><td>१२२</td><td>१८</td><td>९०</td><td rowspan="2">१८०</td><td rowspan="4">३६०</td></tr>
<tr><td>कळमनुरी</td><td>१५१</td><td>१८</td><td>९०</td></tr>
<tr><td rowspan="2">२.</td><td rowspan="2">निरक्षर महिला</td><td>औंढा नागनाथ</td><td>वरील प्रमाणे</td><td>वरील प्रमाणे</td><td>९०</td><td rowspan="2">१८०</td></tr>
<tr><td>कळमनुरी</td><td>वरील प्रमाणे</td><td>वरील प्रमाणे</td><td>९०</td></tr>
<tr><td rowspan="2">३.</td><td rowspan="2">संस्थात्मक प्रसुती झालेल्या महिला</td><td rowspan="4">उस्मानाबाद</td><td>उस्मानाबाद</td><td>१२६</td><td>१८</td><td>९०</td><td rowspan="2">१८०</td><td rowspan="4">३६०</td></tr>
<tr><td>वाशी</td><td>६२</td><td>१८</td><td>९०</td></tr>
<tr><td rowspan="2">४.</td><td rowspan="2">घरी प्रसुती झालेल्या महिला</td><td>उस्मानाबाद</td><td>वरील प्रमाणे</td><td>वरील प्रमाणे</td><td>९०</td><td rowspan="2">१८०</td></tr>
<tr><td>वाशी</td><td>वरील प्रमाणे</td><td>वरील प्रमाणे</td><td>९०</td></tr>
<tr><td rowspan="2">५.</td><td rowspan="2">दारिद्र्य-रेषे खालील</td><td rowspan="4">जालना</td><td>भोकरदन</td><td>१६०</td><td>१९</td><td>९५</td><td rowspan="2">१९०</td><td rowspan="4">३८०</td></tr>
<tr><td>बदनापूर</td><td>९२</td><td>१९</td><td>९५</td></tr>
<tr><td rowspan="2">६.</td><td rowspan="2">दारिद्र्य-रेषे वरील</td><td>भोकरदन</td><td>वरील प्रमाणे</td><td>वरील प्रमाणे</td><td>९५</td><td rowspan="2">१९०</td></tr>
<tr><td>बदनापूर</td><td>वरील प्रमाणे</td><td>वरील प्रमाणे</td><td>९५</td></tr>
<tr><td colspan="4">एकूण</td><td>७१३</td><td>११०</td><td>११००</td><td>११००</td><td>११००</td></tr>
</table>

वरील तक्ता क्र.४.११ नुसार एकूण ११०० प्रतिसादकांकडून अनुसूचीच्या सहाय्याने माहितीचे संकलन करण्यात आले.

४.९.२ **माहिती संकलन साधने :**

प्रस्तुत संशोधनात ज्या उद्दिष्टांचा विचार केलेला आहे व संशोधनाविषयी जी परिकल्पना मांडली आहे त्या उदिष्टांची पूर्तता होण्यासाठी वा परिकल्पनेचे मूल्यमापन करून अंतिम निष्कर्ष काढण्यासाठी विविध प्रकारची माहिती व आकडेवारी आवश्यक असते. सदर आकडेवारी ही संशोधकाची प्रमुख आधार सामुग्री असते. ती आधार सामुग्री वस्तुनिष्ठ व विश्वसनीय असावयास हवी, कारण त्याद्वारे मिळविलेल्या माहितीचे विश्लेषण करूनच संशोधक संशोधनाचे निष्कर्ष मांडत असतो. संशोधन पध्दती, उद्दिष्टे, माहितीचे स्वरुप (संख्यात्मक व गुणात्मक) व संख्याशास्त्रीय तंत्रे या सर्व घटकांचा विचार करून माहिती संकलन हाती घ्यावे लागते. माहिती संकलन करण्यासाठी वापरण्यात येणारी विविध साधने खालील प्रमाणे आहेत.

१. प्रश्नावली (Questionary)

२. अनुसूची (Schedule)

३. मुलाखत सूची (Interview)

४. निरिक्षण सूची (Observation)

५. पडताळा सूची (Check List)

६. पदनिश्चयन श्रेणी (Rating Scale)

७. मनोवृत्तीमापन (Attitude Scale)

८. समाजमिती तंत्र (Sociometric Technique)

वरील सर्व साधनामधून योग्य साधन निवडणे हे कौशल्याचे कार्य आहे. संशोधकाने माहिती संकलन साधनांची अचूक निवड करण्यासाठी योग्य संशोधन पध्दतीचा विचार करणे आवश्यक आहे. प्रस्तुत संशोधनात संशोधकाने सर्वेक्षण पध्दतीचा

वापर केल्यामुळे व प्रतिसादक हे साक्षर व निरक्षर अशा दोन्ही स्वरुपातील असल्यामुळे संशोधकांने अनुसूची (Schedule) व निरिक्षण सूची (Observation Schedule) या दोन साधनांची निवड केली.

### ४.९.३ सांख्यिकी विश्लेषण पध्दती :

विश्लेषण पध्दती व साधनांची निवड यामध्ये समन्वय असणे गरजेचे असते. अनुषंगाने प्रस्तुत संशोधनाच्या संशोधनाच्या संख्यात्मक विश्लेषणात गणितीय माध्य, शेकडेवारी, आलेख पध्दती, काय वर्ग चाचणी पध्दती, मुख्य घटक विश्लेषण पध्दती तंत्राचा वापर केलेला आहे. प्रस्तुत संशोधनासाठी वापरलेली अनुसूची व निरीक्षण सूची या साधनांची माहिती, त्यांचे विकसन व कार्यवाही याविषयी सविस्तर विवेचन पुढील प्रमाणे केलेले आहे.

### अ) अनुसूची व निरीक्षण अनुसूची :

अनुसुची हे एक संशोधन प्रक्रियेतील माहिती संकलनासंबंधित महत्त्वाचे साधन आहे. गुड आणि हॅट यांनी सांगितल्याप्रमाणे "अनुसूची अशा प्रश्नांच्या समूहाचे नाव आहे की, जे मुलाखतकर्त्याद्वारा कोणत्या दुसऱ्या व्यक्तीला प्रत्यक्ष विचारुन भरतो."[८] यावरुन असे स्पष्ट होते की, अनुसूची ही सुध्दा एक प्रकारची प्रश्नावलीच आहे. यामध्ये संशोधक स्वतः त्या प्रतिसादकांकडे घेऊन जातो व ती स्वतः भरतो. त्यामध्ये संशोधक प्रतिसादकास प्रश्न विचारतो व प्रतिसादकांने दिलेली माहीती हि अनुसूचीत नोंदवतो. अनुसूचीच्या मदतीने अशिक्षित व्यक्तीकडूनही माहिती संकलित करता येते. कारण, एखादा प्रश्न प्रतिसादकास समजला नाही तर, संशोधक सदरचा प्रश्न स्पष्ट करून प्रतिसादकास सांगतो व त्यानंतर प्रतिसादकाचा प्रतिसाद नोंदवतो. अनुसूचीचे विविध वैशिष्ट्ये आहेत ती खालील प्रमाणे.

१. अनुसूची ही औपचारिक स्वरुपाच्या प्रश्नांची लेखी यादी असते.

२. तथ्य संकलनासाठी अनुसूचीचा उपयोग करताना संशोधक प्रतिसादकाशी स्वतः संपर्क साधतो.

३. केवळ आवश्यक तथ्य संकलनासाठीच अनुसूचीचा उपयोग केला जातो. प्रश्नावली, मुलाखत आणि निरीक्षण या सर्व संशोधन तंत्रांची वैशिष्ट्ये यात दिसून येतात.

४. अनुसूची आकर्षक स्वरुपात असण्याची आवश्यकता नसते.

अनुसूचीचे विविध प्रकार आहेत. त्यामध्ये वर्गीकरण अनुसूची, दस्तऐवजांच्या आधारे केलेली अनुसूची, मूल्यांकन अनुसूची, निरीक्षण अनुसूची, मुलाखत अनुसूची व संस्था सर्वेक्षण अनुसूची इ. यासोबतच माहिती संकलनासाठी निरीक्षणसूची हे एक संशोधनातील प्राथमिक माहिती संकलनाचे उपयुक्त साधन आहे. अध्ययन क्षेत्रातील व्यक्तीं, वस्तू, व्यवहार इ. बाबत प्रत्यक्ष निरीक्षण करण्यासाठी संशोधक या अनुसूचीचा उपयोग करतो. संकलीत तथ्यांचे व माहितीचे परिक्षण करण्यासाठी ही अनुसूची उपयुक्त ठरते.

अनुसूची व निरिक्षण सूची हे संशोधनात प्राथमिक स्वरुपाची तथ्ये संकलनासाठी आवश्यक साधने आहेत. या बाबी लक्षात येता संशोधकाने संशोधनासाठी खालील प्रमाणे अनुसूची व निरीक्षणसूची तयार केल्या.

- साक्षर व निरक्षर महिला कडून माहिती संकलनासाठी ⟹ अनुसूची
- संस्थात्मक प्रसुती झालेल्या व घरी प्रसुती झालेल्या महिलाकडून माहिती संकलनासाठी ⟹ अनुसूची
- दारिद्र्य रेषेखालील (BPL) व दारिद्र्य रेषेवरील (APL) कुटुंबाकडून माहिती संकलनासाठी ⟹ अनुसूची
- जालना जिल्ह्यातील इतर सेवा सुविधा संबंधित माहिती संकलनासाठी ⟹ निरिक्षण सूची

### आ) अनुसूची व निरीक्षण अनुसूची विकसन :

तथ्याचे संकलन करणे ही एक संशोधनातील अत्यंत महत्त्वाची पायरी आहे. त्या अनुषंगाने तथ्य संकलन करण्यासाठी अनुसूची ही संशोधनाच्या दृष्टीने आधारभूत साधन आहे. त्यामुळे अनुसूची योग्य व उपयुक्त तयार झाली तरच संशोधन कार्य योग्य दिशेने वाटचाल करत असते. त्यामुळे अनुसूची तयार करताना अत्यंत काळजीपूर्वक ती तयार करावी लागते. अनुसुची निर्मितीची प्रक्रिया ही विविध टप्प्यातून पूर्ण करावी लागते. प्रस्तुत संशोधनासाठीच्या अनुसूची तयार करताना संशोधकाने खालील टप्प्यांच्या आधारे अनुसूची विकसन केलेली आहे.

i) **संशोधन विषयाच्या विविध पैलूचे अध्ययन** : या संशोधनात मराठवाड्यातील मानव विकास निर्देशांक निम्न असल्याची कारणमीमांसा करताना प्रामुख्याने मराठवाडा या भौगोलिक क्षेत्राचा अभ्यास संशोधकाने प्रस्तुत संशोधनात केलेला आहे. या विभागातील जिल्हे, तालुके, लोकसंख्या तसेच सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक व आर्थिक पार्श्वभूमीचा अभ्यास संशोधकाने केला आहे. यासोबतच मानव विकास संकल्पना, मानव विकास अहवाल २००२ नुसार मराठवाडा विभागाची स्थिती, मानव विकास निर्देशांक काढण्याची पध्दती, यासंबंधीत उपलब्ध सांख्यिकी माहिती अशा विविध संशोधन विषयाचे अध्ययन संशोधकाने केले.

ii) **आवश्यक तथ्यांचे संकलन व प्रश्नांची निर्मिती**: प्रस्तुत संशोधनात मानव विकास निर्देशांक निम्न असल्याची कारणमीमांसा करताना संशोधकाने महिला साक्षरता कमी असण्याची संभाव्य कारणे, यासंदर्भात जगभरात झालेले विविध संशोधने, शासनाने प्रकाशित केलेले विविध अहवाल यांचा अभ्यास करुन संभाव्य कारणांचा शोध घेतला. यासोबतच संस्थात्मक प्रसुतीचे प्रमाण कमी असल्याच्या व दरडोई उत्पन्न कमी असल्याच्या कारणांचा शोध याच

पध्दतीने घेण्यात आला. त्यानंतर संशोधनाची उद्दिष्ट्ये व गृहितके विचारात घेता संशोधकाने अनुसूची व निरिक्षण सूची तयार केली. सदर अनुसूची व निरीक्षण सूची या क्षेत्रातील कार्यरत तज्ज्ञांना दाखविण्यात आल्या. त्यांनी दिलेल्या सूचनांप्रमाणे त्यात आवश्यक ते बदल करून अंतिमतः अनुसूची मार्गदर्शकांना दाखविण्यात आली. त्यावर चर्चा करुन व त्यातील प्रश्नांना योग्य क्रम देऊन अनुसूची व निरीक्षण सूची अंतिम केली.

iii) **अनुसूची व निरीक्षण अनुसूची यासंबंधीत पथदर्शक अभ्यास**ः अनुसूची व निरीक्षण सूचीच्या विकसनातील ही शेवटची पायरी आहे. यात अनुसूचीच्या वस्तुनिष्ठतेची आणि उपयुक्ततेची पडताळणी करण्यात येते. त्यासाठी पथदर्शक स्वरुपात अंतिम करण्यात आलेल्या अनुसूची व निरीक्षण सूचीचा वापर करणे आवश्यक आहे. यामुळे अनुसूचीतील प्रश्नांची इष्टानिष्टता व उपयुक्तता तपासता येते. या बाबीचा प्रस्तुत संशोधनात विचार करता या अनुसूची व निरक्षण सूची यांचा पथदर्शक अभ्यास खालील ठिकाणी करण्यात आला.

**तक्ता क्र. ४.१२**

**पर्थदर्शक अभ्यास केलेल्या गावांची व प्रतिसादकांची संख्या**

| अ.क्र. | जिल्ह्याचे नांव | तालुक्याचे नांव | गांवाची संख्या | प्रतिसादकांची संख्या |
|---|---|---|---|---|
| १. | वाशिम | रिसोड | १५ | ४० |
| २. | हिंगोली | हिंगोली | १५ | ४० |
| ३. | बुलढाणा | लोणार | १५ | ४० |
| ४. | लातूर | चाकूर | १० | ३० |
| ५. | नांदेड | देगलूर | १० | ३० |
| **एकूण** | | | ६५ | १८० |

प्रस्तुत संशोधनकार्यातील या पथदर्शक अभ्यासातून संशोधकाने ज्या भूमिकेतून व ज्या उत्तरांच्या अपेक्षेतून प्रश्नांची रचना केली आहे ती अपेक्षा कितपत साध्य झाली? याचा अंदाज संशोधकास घेता आला. तसेच काही प्रश्नांमध्ये योग्य त्या दुरुस्त्या करण्याचे, काही प्रश्न वगळण्याचे लक्षात आले तर, काही प्रश्न नव्याने अनुसूचीत व निरिक्षण सूचीत समाविष्ठ करण्याचे लक्षात आले. या पथदर्शक कार्यानंतर प्रत्यक्ष प्रतिसादकांची स्थिती व मते लक्षात घेता, प्रत्यक्ष अनुसूची व निरीक्षण सूची भरताना येणाऱ्या अडचणी व संशोधनाची उद्दिष्टे लक्षात घेऊन मार्गदर्शकांशी चर्चा करुन वस्तुनिष्ठ व बहुपर्यायी प्रश्नांचा समावेश असलेली अनुसूची व निरीक्षण सूची अंतिम स्वरुपात तयार करण्यात आली. यामध्ये प्रामुख्याने पुढील प्रमाणे प्रश्नांचा समावेश करण्यात आला.

साक्षर व निरक्षर महिलांकडून माहिती संकलनासाठीच्या अनुसूचीमध्ये १८ प्रमुख प्रश्न व २२ कारणासंबंधीत उपप्रश्नांचा समावेश करण्यात आला. संस्थात्मक प्रसुती व घरी प्रसुती झालेल्या महिलांकडून माहिती संकलनासाठीच्या अनुसूचीमध्ये १८ प्रमुख प्रश्न व २३ कारणासंबंधी उपप्रश्नांचा समावेश करण्यात आला. दारिद्र्य रेषेखालील (BPL) व दारिद्र्य रेषेवरील (APL) कुटुंबाकडून माहिती संकलनासाठीच्या अनुसूचीमध्ये १६ प्रमुख प्रश्न व २४ कारणासंबंधित उपप्रश्नांचा समावेश करण्यात आला तर निरिक्षण सूचीत १६ प्रश्नांचा समावेश करण्यात आला.

४.९.४ **माहिती संकलनाचे नियोजन व माहिती संकलन** :

संशोधक हा पुरुष तर बहुतांश (हिंगोली व उस्मानाबाद जिल्ह्यातील) प्रतिसादक या महिला असल्यामुळे संशोधकांच्या दृष्टीने तथ्यांचे संकलन हा खूपच अडचणीचा विषय ठरला. संशोधनाच्या दृष्टीने आवश्यक प्रश्नांमध्ये विवाह, प्रसुती, आर्थिक स्थिती यासंबंधी प्रश्न होते तसेच या प्रश्नांच्या अनुषंगाने माहिती एक त्रयस्थ पुरूषास द्यावयाची होती. व हे सर्व ग्रामीण महिलांच्या दृष्टीकोनातून त्यांना थोडे लाज आणणारे

होते. या सर्व बाबींचा विचार करता संशोधकांने संबंधित गांवातील अंगणवाडी कार्यकर्त्या, नर्स, समाजसेविका, शिक्षिका, स्वंयसेवी संस्थेच्या महिला कार्यकर्त्या यांच्या मदतीने गांव निहाय माहिती संकलनाचे नियोजन करून पुढील प्रमाणे कार्यवाही केली.

प्रथमतः गांवातील सरपंच यांच्याशी चर्चा करुन त्यांना विषय समजावून सांगण्यात आला. व यासाठी योग्य ते सहकार्य करण्याची विनंती केली. त्यानंतर गांवातील अंगणवाडी कार्यकर्त्या, नर्स, समाजसेविका, शिक्षिका, स्वंयसेवी संस्थेच्या महिला कार्यकर्त्या यांना संशोधनाचा विषय व त्यांचे महत्त्व पटवून दिले व त्यांच्याकडून अपेक्षित सहकार्याची विनंती केली. त्यांच्या सहकार्यातून प्रत्यक्ष ११२० प्रतिसादकांपर्यंत पोहचून माहिती संकलन करण्यात आले. सर्वांच्या सहकार्याबद्दल त्यांना मनापासून धन्यवाद दिले.

### ४.९.५ **माहितीचे दुय्यम स्त्रोत :**

मानव विकास, मानव विकास निर्देशांक, मानव विकास निर्देशांक काढण्यासाठी विचारात घेण्यात येणारे मानके, पध्दती इ. च्या अभ्यासासाठी तसेच हिंगोली जिल्ह्यातील महिला साक्षरता प्रमाण, उस्मानाबाद जिल्ह्यातील अर्भक मृत्यूदर प्रमाण व जालना जिल्ह्यातील दरडोई उत्पन्न या मानकातील व यांच्यावर प्रत्यक्ष प्रभाव पाडणाऱ्या विविध घटकात मागील दहा वर्षात कशा पध्दतीने बदल होत गेलेला आहे याचा अभ्यास करण्यासाठी विविध दुय्यम स्त्रोतांचा अवलंब केलेला आहे. यामध्ये विविध संदर्भ पुस्तके, संदर्भ ग्रंथ, नियतकालिके, वर्तमानपत्रे, मासिके, युएनडीपी यांनी प्रकाशित केलेले जागतिक स्तरावरील मानव विकास अहवाल, भारताने प्रकाशित केलेले राष्ट्रीय स्तरावरील मानव विकास अहवाल व भारतातील विविध राज्यांनी प्रकाशित केलेले राज्य व जिल्हा मानव विकास अहवाल. तसेच अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई यांनी प्रकाशित केलेले विविध पुस्तके उदा. महाराष्ट्राची आर्थिक पाहणी, काही निवडक निर्देशांकाची माहिती, जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन इ. यासोबत नियोजन

विभाग, आरोग्य विभाग, शिक्षण विभाग यांनी प्रकाशित केलेले विविध अहवाल यासोबतच विविध विभागाच्या व युएनडीपी ची वेबसाईट इ. स्त्रोताचा आधार दुय्यम माहिती संकलनासाठी घेण्यात आला.

४.९.६ **माहिती संकलनातील अडचणी :**

प्रस्तुत संशोधनासाठी प्राथमिक माहिती संकलन करताना संशोधकास विविध अडचणींना सामोरे जावे लागले. या अडचणींचा थोडक्यात उहापोह पुढीलप्रमाणे करण्यात आलेला आहे.

हिंगोली जिल्ह्यात १५ ते २५ या वयोगटातील साक्षर व निरक्षर महिलांकडून माहिती संकलित करावयाची होती. औढा नागनाथ व कळमनुरी तालुक्यातील शिक्षण विभाग, पंचायत समिती व संबंधित गांवातील ग्रामपंचायत यांच्याकडे गांवातील अशा प्रकारच्या महिलांची स्वतंत्र यादी उपलब्ध नव्हती. त्यामुळे अशा महिला शोधणे कठीण काम होते. तसेच एखाद्या अनोळखी पुरूषास गावातील १५ ते २५ या वयोगटातील स्त्रियां माहिती देतील, याबद्दल शंका होती. त्यामुळे अशा स्त्रियांकडून माहिती संकलन करणे हे एक खूपच कठीण कार्य होते. या अडचणी लक्षात घेता संबंधित गांवातील अंगणवाडी कार्यकर्त्या, नर्स, समाजसेविका, शिक्षिका, स्वंयसेवी संस्थेच्या महिला कार्यकर्त्या यांच्याशी चर्चा करुन त्यांना विषय व विषयाच्या संशोधनाची आवश्यकता समजावून दिली व त्यांना गावांतील साक्षर व निरक्षर महिलांचा शोध घेण्यास व विषय समजावून सांगण्यात मदतीस घेतले. व त्यानंतर प्रत्यक्ष माहितीचे संकलन केले. प्रथमतः प्रश्न विचारल्यानंतर स्त्रिया उत्तरे देण्यास तयार होत नसत पण, त्यांना बोलते करण्यासाठी प्रथम त्यांची मानसिक तयारी करुन घ्यावी लागत असे. तसेच बहुतांश स्त्रियां या शेतीवर कामाला जात असल्यामुळे संशोधक शेतीवर गेला तरी त्या स्त्रिया त्याच्या हातातील काम सोडून माहिती देण्यास उत्सुक नसत. त्यामुळे त्यांचे कामकाज संपेपर्यत वाट पाहण्याशिवाय दुसरा पर्याय संशोधकाकडे नव्हता.

उस्मानाबाद जिल्ह्यातील घरी प्रसुती झालेल्या व दवाखान्यात प्रसुती झालेल्या अशा महिलांकडून माहिती संकलित करावयाची होती. ग्रामीण भागातील महिला अनोळखी पुरुषास प्रसुती बाबतीत काहीच माहिती देत नाहीत, किंबहुना त्या बोलत पण नाहीत. अशा महिलांकडून माहिती मिळवणे खूपच तारेवरची कसरत होती. पण त्यासाठी गावांतील अंगणवाडी कार्यकर्त्या व नर्स यांची मदत घेण्यात आली. ज्या महिला माहिती देण्यास तयार होत्या त्यातील बहुतांश महिला शेतीवर कामाला जात असल्यामुळे त्यांना माहिती देण्यासाठी वेळ उपलब्ध होत नव्हता. त्यातल्या त्यात महिलांना वेळ तेव्हा अंगणवाडी कार्यकर्त्या किंवा नर्स यांना वेळ उपलब्ध होत नसे. त्यामुळे प्रतिसादक माहिती देत नव्हते. अशा प्रकारच्या विविध अडचणी संशोधकास माहिती संकलनात उद्‌भवल्या आहेत.

जालना जिल्ह्यात दारिद्र्य रेषेखालील व दारिद्र्यरेषेखाली नसलेल्या, अशा कुटुंबातील कर्त्या व्यक्तीकडून माहिती संकलित करण्यात आली. संशोधकाने या व्यक्तीस प्रश्न विचारण्याच्या अगोदरच सदर व्यक्ती कोणती योजना घेऊन आलात? असा प्रश्न विचारत असत. प्रतिसादक हा कुटुंबप्रमुख असल्यामुळे बहुतांश वेळा तो शेतावरच भेटत असे. त्यातून त्यांचे शेतीवरील काम पूर्ण होईपर्यत संशोधकास थांबावे लागत असे. प्रतिसादकास उत्त्पन्नासंबंधी प्रश्न केल्यानंतर ते खरी माहिती देण्यास टाळाटाळ करत व अंदाजे एखादा आकडा सांगत. त्यामुळे खरी माहिती मिळत नव्हती तेव्हा संशोधक शेतकऱ्यांना अधिक विश्वासात घेऊन प्रत्यक्ष पावत्या किंवा डायरीत लिहिलेली माहिती असेल तर त्यावरुन माहिती देण्याची विनंती करत असे व शेतकऱ्याचा वेळ घेऊन सदर दिवशी परत त्यांची भेट घेण्यासाठी जात असे. यामुळे संशोधकास एका माहितीसाठी दोन दोन वेळा संबंधितांची भेट घ्यावी लागे. संशोधक हा पुरुष असल्यामुळे हिंगोली व उस्मानाबाद जिल्ह्यातील स्त्री प्रतिसादकांकडून माहिती संकलित करण्यास अधिक अडचणी उद्‌भवल्या तर जालना जिल्ह्यात त्याप्रमाणात कमी अडचणी उद्‌भवल्या.

## ४.१० प्रबंधाचा प्रकरणनिहाय आकृतीबंध :

या संशोधन प्रबंधाचा प्रकरणनिहाय आकृतीबंध पुढील प्रमाणे आहे.

### ४.१०.१ मानव विकास संकल्पना :-

या प्रकरणामध्ये मानव विकास एक स्वतंत्र दृष्टिकोन, मानव विकास संकल्पनेची काही वैशिष्ट्ये, मानव विकास संकल्पना व त्यांच्या विविध व्याख्या, मानव विकासाची आवश्यकता, मानव विकास निर्देशांक संकल्पना, मानव विकास निर्देशाकांचे घटक व गणन पध्दती, आंतरराष्ट्रीय स्तरावर वापरण्यात येणारे विविध इतर निर्देशांकांचा थोडक्यात आढावा, संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रम व त्यांची भूमिका व सहस्त्रावधी विकास लक्ष्ये इ. घटकांसंबंधित ऊहापोह केलेला आहे.

### ४.१०.२ मराठवाडा विभागाची रुपरेखा :-

या प्रकरणामध्ये मराठवाडा विभागाची ऐतिहासिक पार्श्वभूमी, हैद्राबाद राज्याची स्थापना, हैद्राबाद संस्थानाचे स्वरुप व रचना, हैद्राबाद संस्थानाचे संघराज्यात विलिनीकरण, मराठवाड्याचे महाराष्ट्राच्या नकाशातील स्थान, स्थान विस्तार व सीमा, आर्थिक विकास, शिक्षण, दळणवळण, लोकसंख्या, प्रमुख शहरे, प्रसिध्द व्यक्ती याचा उहापोह केलेला आहे तसेच संशोधनासाठी निवडण्यात आलेल्या हिंगोली, जालना व उस्मानाबाद जिल्ह्याचे सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, सांस्कृतिक घटकावर प्रकाश टाकण्यात आलेला आहे.

### ४.१०.३ मानव विकासाची सद्यस्थिती : भारत व महाराष्ट्र :-

प्रस्तुत प्रकरणात संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रम यांच्यातर्फे १९९० पासून आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रकाशित करण्यात आलेल्या जागतिक मानव विकास अहवालाचा थोडक्यात आढावा, भारताच्या मानव विकास निर्देशांकाची स्थिती व वार्षिक वाढ, राष्ट्रीय मानव विकास अहवालात महाराष्ट्र राज्याचे स्थान, भारतातील विविध राज्याचे

व जिल्ह्यांचे मानव विकास अहवाल, महाराष्ट्र राज्याच्या मानव विकास अहवालात मराठवाडा विभागाचे स्थान, मानव विकास अहवाल व पारितोषिके इ. घटकांचा समावेश केलेला आहे.

**४.१०.४ संशोधन पध्दती व संदर्भ साहित्याचा आढावा :-**

या प्रकरणात मराठवाडा विभाग निवडीची कारणे, संशोधन विषयाची निवड व त्याचे महत्त्व, संशोधनाची उद्दिष्टये, संशोधनातील गृहितकृत्ये, संशोधनातील कार्यात्मक व्याख्या, संशोधन कालावधी, संशोधनाची व्याप्ती व मर्यादा, संशोधन पध्दती, विश्लेषण पध्दती, माहिती संकलनातील अडचणी, प्रबंधाचा आकृतिबंध, संदर्भ साहित्याचा आढावा, संशोधनाची कार्यवाही इ. घटकांचा समावेश आहे.

**४.१०.५ हिंगोली जिल्ह्यातील महिला साक्षरतेच्या माहितीचे विश्लेषण :-**

या प्रकरणामध्ये प्रकरणाची रुपरेखा, हिंगोली जिल्ह्यातील महिला साक्षरते संबंधी दुय्यम स्त्रोताकडे उपलब्ध व प्राथमिक स्वरुपात संकलित केलेल्या सांख्यिकी माहितीचे विश्लेषण करण्यात आलेले आहे. तसेच महिला साक्षरतेचे प्रमाण कमी असल्याच्या कारणांची मीमांसा करण्यात आलेली आहे.

**४.१०.६ उस्मानाबाद जिल्ह्यातील अर्भकमृत्यूच्या माहितीचे विश्लेषण :-**

या प्रकरणामध्ये प्रकरणाची रुपरेषा, उस्मानाबाद जिल्ह्यातील अर्भकमृत्यू संबंधी दुय्यम स्त्रोताकडे उपलब्ध व प्राथमिक स्वरुपात संकलित केलेल्या सांख्यिकी माहितीचे विश्लेषण करण्यात आलेले आहे. तसेच अर्भकमृत्यूचे प्रमाण अधिक असल्याच्या कारणांची मीमांसा करण्यात आलेली आहे.

**४.१०.७ जालना जिल्ह्यातील दरडोई उत्पन्नासंबंधीच्या माहितीचे विश्लेषण :-**

या प्रकरणामध्ये प्रकरणाची रुपरेखा, जालना जिल्ह्यातील दरडोई उत्पन्न संबंधी दुय्यम स्त्रोताकडे उपलब्ध व प्राथमिक स्वरुपात संकलित केलेल्या सांख्यिकी माहितीचे

विश्लेषण करण्यात आलेले आहे. तसेच दरडोई उत्पन्न कमी असल्याच्या कारणांची मीमांसा करण्यात आलेली आहे.

### ४.१०.८ सारांश, निष्कर्ष व शिफारशी :-

या प्रकरणात, या संशोधन अभ्यासातील एक ते आठ प्रकरणांचा थोडक्यात सारांश मांडण्यात आलेला आहे. तसेच संशोधनातील गृहित्यकृत्याची पडताळणी, प्राथमिक स्त्रोताद्वारे व दुय्यम स्त्रोताद्वारे संकलित माहितीवरुन काढलेले निष्कर्ष व त्या अनुषंगाने केलेल्या शिफारशी यांचा समावेश आहे.

### ४.११ संदर्भ साहित्याचा आढावा :

संशोधकांने संशोधन विषयाच्या अनुषंगाने विविध संदर्भ साहित्याचा अभ्यास केला. प्रस्तुत विषय हा नवीन असल्यामुळे या विषयाच्या अनुषंगाने विद्यापीठ स्तरावर खूपच दुर्मिळ संशोधन कार्य झालेले आहेत. मात्र आंतरराष्ट्रीय स्तरापासून जिल्ह्यस्तरापर्यंत मानव विकास अहवाल मात्र तयार करण्यात आलेले आहेत. हे अहवाल म्हणजेच प्रमुख संदर्भ साहित्य म्हणावे लागेल. तेव्हा संशोधकाने या विषयासंबंधित पुस्तके, लेख, अहवाल, शासनाचे उपक्रम, संशोधने यांचा काळजीपूर्वक अभ्यास केलेला आहे. अशा विविध संदर्भ साहित्याचा आढावा खालील प्रमाणे घेण्यात आलेला आहे.

१. **म्हॉपरे विद्या रा.** (२०१०)[१]: “महाराष्ट्राची लोकसंख्याः बदलते स्वरुप” हा (पृ १८-४०) शोधनिबंध ‘सुर्वणमहोत्सवी महाराष्ट्राची बदलती अर्थव्यवस्था’ या पुस्तकात लिहलेला आहे. या शोधनिबंधामध्ये महाराष्ट्राच्या वाढत्या लोकसंख्येचा अभ्यास मानव विकास निर्देशांकाच्या अनुषंगाने करण्यात आलेला आहे. यामध्ये असे दिसून येते की, महाराष्ट्रातील लोकसंख्यावाढीचा वेग अधिक असल्याने शहरीकरण वाढत आहे; परंतु त्याबरोबरच मुंबईसारख्या शहराचा मानव विकास निर्देशांक चांगला आहे. मात्र संपूर्ण महाराष्ट्राचा सर्वांगीण

विकास करण्याच्या दृष्टीने ठराविक शहरातील लोकसंख्या केंद्रीकरण कमी करणे आवश्यक आहे.

२. **वाईगडे राजकुमार** (२०१०)[१०]: “महाराष्ट्राचे उत्पन्न” हा (पृ. ४१-५७) शोधनिबंध ‘सुर्वणमहोत्सवी महाराष्ट्राची बदलती अर्थव्यवस्था’ या पुस्तकात लिहिलेला आहे. या शोधनिबंधामध्ये निव्वळ राज्यांतर्गत उत्पादन, प्राथमिक, द्वितीयक व तृतीय क्षेत्राचे योगदान व दरडोई उत्पन्न यावर प्रकाश टाकण्यात आलेला आहे. यामध्ये असे दिसून येते की, महाराष्ट्र राज्याच्या सुरूवातीच्या काळात म्हणजे १९६० मध्ये महाराष्ट्राची प्रगती संथ गतीने झाली. राज्याचे एकूण उत्पन्न, दरडोई उत्पन्न यातील वार्षिक वाढीचा वेग फारच कमी असल्यामुळे खऱ्या अर्थाने आर्थिक विकास घडून आलेला नाही. मात्र २००२-०३ ते २००७-०८ या कालावधीत महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेने आर्थिक विकासाचा वार्षिक सरासरी दर हा ८ टक्क्यापेक्षा अधिक साध्य केला आहे. यापुर्वी ती सलग सहा वर्ष ७ किंवा ८ टक्क्यावर राहिलेली दिसत नाही. या सहा वर्षाच्या कालावधीत महाराष्ट्राच्या ध्येयधोरणांमध्ये अमूलाग्र बदल झालेला नसताना आर्थिक विकासाचा दर ८ टक्क्यापेक्षा अधिक राहिला आहे.

३. **मुडेकर तेजस्विनी बी.** (२०१०)[११] : “महाराष्ट्रातील सामाजिक पायाभूत सुविधा (शिक्षण व आरोग्य)” हा (पृ. ८८-१०७) शोधनिबंध ‘सुर्वणमहोत्सवी महाराष्ट्राची बदलती अर्थव्यवस्था’ या पुस्तकात लिहलेला आहे. या शोधनिबंधामध्ये महाराष्ट्रातील शिक्षण व आरोग्य या पायाभूत सुविधांच्या स्थितीवर प्रकाश टाकण्यात आलेला आहे. यामध्ये शिक्षणासंबंधी असे दिसून येते की, महाराष्ट्राच्या काही भागात शैक्षणिक सुविधा मोठ्या प्रमाणात उपलब्ध आहेत, तर काही भागात प्रयत्न करूनही अजूनही मागासलेलेच राहिलेले आहेत. समाजातील प्रत्येक स्तरातील विद्यार्थी जेव्हा शाळेत जाईल व

शिक्षण घेईल, समाजाच्या खालच्या स्तरातील प्रौढ निरक्षर व्यक्ती जेव्हा साक्षर होईल आणि विकासाच्या मुख्य प्रवाहात येईल, तेव्हाच खऱ्या अर्थाने हे अभियान यशस्वी होईल. आरोग्यासंबंधी असे लक्षात येते की, महाराष्ट्र स्थापनेच्या वेळी असणाऱ्या परिस्थितीपेक्षा आज सुधारणा झालेली असली, तरी आरोग्यसेवा क्षेत्रात शहरी-ग्रामीण तफावत दिसून येते. बहुसंख्य लोकसंख्येचा पोषण दर्जा खालावला आहे. लसीकरण प्रकल्पावरील भर कायम राखणे आवश्यक आहे. गरीब जनतेला खाजगी क्षेत्र परवडण्यासारखे नाही, तेव्हा सरकारने सार्वजनिक आरोग्य क्षेत्रावरील गुंतवणूक वाढविणे आवश्यक आहे. जागतिक आरोग्य संघटनेच्या तत्त्वानुसार राज्याच्या ढोबळ उत्पन्नापैकी ५ टक्के हिस्सा आरोग्यावर खर्च होणे गरजेचे आहे. त्या निकषानुसार आपले प्रमाण आजही १ टक्क्याने कमी आहे.

४. **भिडे मनोज बी.** (२००७)[१२] : "अ स्टॅटिस्टिकल् स्ट्डी ऑफ ह्यूमन् डिव्हेलपमण्ट् इण्डेक्स् ऑफ महाराष्ट्रा स्टेइट् फॉर् दि पिअरिअड् ऑफ् १९९१-२००१" हा शोधप्रबंध स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड या विद्यापीठास मार्च २००७ मध्ये पीएच.डी. या पदवीसाठी सादर केलेला आहे. या शोधप्रबंधामध्ये मानव विकास मोजण्याच्या अनुषंगाने विविध पध्दतीचा उहापोह करण्यात आलेला आहे. यामध्ये क्रमवाचक व संख्यावाचक पध्दतीमध्ये सूचक ठरविणे योग्य राहील. यामध्ये निर्देशांक काढताना त्यासाठी देण्यात आलेली आदाने (Input) व त्यापासून मिळणारे प्रदाने (Output) महत्वाची आहेत. यामध्ये असे सूचित करण्यात आलेले आहे की, अशा पध्दतीची सक्षम संशोधन पध्दती विकसित करणे गरजेचे आहे. ज्यामुळे संसाधने वाटप, नियोजन, अमंलबजावणी व मूल्यमापन इ. साठी उपयुक्त ठरु शकेल. निर्देशकांच्या आधारे क्रमवारी करणे आवश्यक आहे कारण, त्यामुळे

विकासाच्या स्थितीचा आढावा घेता येतो. निर्देशक व संयुक्त निर्देशक यांच्यातील विविधता निवडीच्या वेळी सविस्तरपणे स्पष्ट करणे गरजेचे आहे. या अभ्यासावरुन असे सूचित होते की, निर्देशांक मोजण्यासाठी विविध पर्यायी पध्दतीचा वापर करणे आवश्यक असून कोणतीही एक पध्दती परिपूर्ण असते असे नाही. प्रत्येक पध्दतीची स्वतःची काही सकारात्मक तर काही नकारात्मक बाजू असतात. त्यामुळे निवडलेली विशिष्ट पध्दती कोणत्या कारणास्तव निवडली आहे हे महत्त्वाचे आहे.

५. **महाराष्ट्र शासन** (२००२)[१३] : “मानव विकास अहवाल महाराष्ट्र २००२”. हा महाराष्ट्र राज्याचा पहिला मानव विकास अहवाल आहे. हा अहवाल सन २००२ मध्ये प्रकाशित झाला. या अहवालात दारिद्र्य निर्मूलन, शिक्षण आरोग्य, रोजगार आणि प्रशासनामधील जनतेचा सहभाग इत्यादीच्या अनुषंगाने खेद वाटण्यासारख्या बाबींवर प्रकाश टाकण्यात आलेला आहे. राष्ट्रीय नियोजन उद्दिष्टांनुसार शिक्षणाच्या संधी आणि आरोग्य या अधिक व्यापक झालेल्या आहेत. तसेच सार्वजनिक जीवनामध्ये महिलांचा सहभाग वाढलेला आहे. हे या अहवालावरुन दिसून येते. या अहवालानुसार मुंबई (उपनगर) जिल्ह्याचा प्रथम क्रमांक लागत असून पहिल्या पाच क्रमांक पटकाविलेल्या जिल्ह्यामध्ये मुंबई, ठाणे, पुणे व नागपूर या जिल्ह्यांचा क्रमांक लागतो. तर शेवटचा क्रमांक पटकाविलेल्या जिल्ह्यात गडचिरोली, यवतमाळ, जालना, नंदूरबार व वाशिम या जिल्ह्यांचा समावेश होतो. या अहवालानुसार पश्चिम महाराष्ट्र प्रगत असून विदर्भ व महाराठवाडा हे प्रादेशिक विभाग मागसलेले आहेत.

६. **सिंग परमानंद, कुमार सुरेन्द्र आणि शर्मा अरूण कुमार** (२०११)[१४] : “अण्डर्लिंग् ड्राइव्हर्स ऑफ् इन्क्लूसिव्ह् ह्यूमन् डिव्हेलपमण्ट् इन् अ कॅपिट्ल

फ्रेण्ड्ली स्टेइट् ॲन् एक्स्प्लरेटिव्ह् अनॅलिसिस्'', इंण्डिअन ईकनॉअमिक्स् जर्नल्, एआययु-एसआयः२५-३९. हा शोधनिबंध मानव विकासाच्या सत्य परिस्थितीवर आधारित बाबीं, भारत देशाच्या आजपर्यंतच्या अनुभवावर आधारित व जागतिक स्थितीच्या संदर्भातील विश्लेषणावर प्रकाश टाकतो. सर्वसमावेशक मानव विकास हे लक्ष्य साधणे भारतासारख्या देशासाठी एक दूरवरचे साध्य आहे. साक्षरता, शिक्षण, शिक्षणाच्या दर्जातील सुधारणा यामध्ये अनेक घटक महत्त्वाची भूमिका बजावतात. यासोबतच यामध्ये सामाजिक व आर्थिक स्थिती, शाळांची उपलब्धता, मुलभूत सुविधा, शिक्षकांची कौशल्ये आणि अध्ययन-अध्यापन प्रक्रिया, शिक्षकांमध्ये असलेल्या प्रेरणा व जबाबदारीची जाणीव या बाबींचा ही समावेश होतो. या बाबी साध्य करण्याच्या अनुषंगाने भारत खूपच मागे आहे. देशात पायाभूत सुविधांची वानवा आहे. सर्वसमावेशक शिक्षणाचा पुरस्कार करण्याची भाषा करणाऱ्या व्यवस्थेमध्ये विशिष्ट वर्गाचेच हित पाहिले जाऊन सामान्यांच्या तोंडाला पाने पुसली जात आहेत, अशीच स्थिती भारतात दिसून येते आहे.

७. **शर्मा निधी, कुमार प्रविण, यादव सरिया आणि वर्मा प्रिती** (२०११)[१५] : ''ह्यूमन् डिव्हेलपमण्टः अ मॅटर् ऑफ् कन्सर्न्'', इंण्डिअन ईकनॉअमिक्स् जर्नल्, एआययु-एसआयः५९-६८. या शोधनिबंधात आर्थिक तरतुदी, कामगिरी किंवा साध्य केलेली लक्ष्ये इत्यादीचा एकंदरच समाज विकासारील थेट परिणामाचा अभ्यास केला आहे. विकास साधण्यासाठी आर्थिक तरतूदी निश्चित करण्याच्या पध्दतीमध्ये अमूलाग्र बदल करण्याची तातडीची निकड निर्माण झालेली आहे. सामाजिक विकासाला सर्वेच प्राधान्य दिले जाऊन त्यासाठी स्वतंत्र आर्थिक तरतूद निर्माण करणे गरजेचे आहे.

८. **बर्मन प्रणय कुमार रॉय (२०११)**[१६] : "बेइसिक् एज्युकेइशन् ऑन् इन्पूट् फॉर् ह्यूमन् डिव्हेलपमण्ट इन् इंण्डिया", इंण्डिअन ईकनॉअमिक्स् जर्नल्, एआययु-एसआयः२३२-२४४. या शोधनिबंधात भारतातील मानव संसाधन विकास करण्याच्या अनुषंगाने व सामाजिक व आर्थिक विकास साध्य करण्याच्या दृष्टीने शिक्षण हा एक महत्त्वाचा मार्ग आहे यावर प्रकाश टाकलेला आहे. भारतीय राज्यघटनेच्या ८६ व्या घटनादुरुस्तीतील कलम २१-अ मधील भाग तीन अन्वये देशातील ६ ते १४ वर्षे वयोगटातील सर्व बालकांना मोफत व सक्तीचे शिक्षण उपलब्ध झाले असून तो त्यांचा मुलभूत अधिकार आहे. देशातील दर्जेदार शिक्षणाच्या सहाय्यानेच सर्वांगीण प्रगतीचा मार्ग सुकर होऊ शकेल त्यामुळे शिक्षणाकडे खूप गांभीर्याने पाहण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे. प्राथमिक शाळांतील विद्यार्थ्यांच्या गळतीचे प्रमाण खूप मोठे आहे, हे सर्वांनाच मान्य करावे लागेल. शाळेतील गळतीचे प्रमाण कमी करण्यासाठी व शिक्षणाच्या अनुषंगाने २०१५ पर्यत साध्य करावयाच्या सहस्त्रावधी विकास लक्ष्ये यांचा विचार करता केंद्रीय व राज्य या दोन्ही स्तरावर संयुक्तरित्या जाणीवपूवर्क प्रयत्न होण्याची आवश्यकता आहे.

९. **माया आर.** (२०११)[१७] : "फाइनॅन्सिंग् हेल्थ् केअर् इन् इंण्डिया", इंण्डिअन ईकनॉअमिक्स् जर्नल्, एआययु-एसआयः६०९-६१६. या शोध निबंधामध्ये जगातील काही निवडक देश, भारतातील निवडक शहरे यातील आरोग्याच्या बाबतीतील खर्चावर प्रकाश टाकण्यात आलेला आहे. विकसित राष्ट्रामध्ये प्रति व्यक्ती दरडोई उत्पन्नाच्या तुलनेत आरोग्यावरील खर्च वाढला आहे. पण विकसनशील देशांमध्ये हे प्रमाण खूपच कमी आढळून येते. भारतात २००९

मध्ये एकूण खर्चाच्या प्रमाणात आरोग्यावर केवळ १.१ टक्के खर्च करण्यात आला. यासोबत देशातील विविध राज्यातील आरोग्यावरील खर्चात घट झालेली दिसून येते. भारत देशाने काही प्रमाणात मृत्यूदर, माता मृत्यूदर, अर्भक मृत्यूदर यांचे प्रमाण कमी करण्याचा प्रयत्न केलेला आहे. देशातील बहुतांश राज्यांना आरोग्यासंबंधी निश्चित ध्येय साध्य करता आलेले नाही. देशातील सार्वजनिक खर्चासाठीची गुंतवणूक वाढविणे आवश्यक असून अत्यंत गंभीर प्रश्न असलेल्या ठिकाणी लक्ष केंद्रीत करणे गरजेचे आहे. पिण्याचे शुध्द पाणी व सांडपाणी विल्हेवाट लावण्याची व्यवस्था वाढविली गेली पाहिजेत. तसेच आरोग्य, शिक्षण, स्वच्छ पर्यावरण निर्मितीसाठी जनतेचे प्रबोधन करणे आवश्यक आहे.

१०. **भारी सिओजी आणि धिंडसा परमजीत कौर (२०११)**[१८] : "हेल्थ् इण्डेक्स् ऑफ् इंण्डियाः ऑन् इण्ट्र् स्टेइट् अनॅलिसिस्", इंण्डिअन् ईकनॉअमिक्स् जर्नल्, एआययु-एसआयः६१७-६२३. आरोग्य सुविधा पुरविण्याच्या बाबतीत देशातील १५ राज्यांमधील संबंधित खात्यांच्या कामगिरीचे विश्लेषण करण्याच प्रयत्न या शोध निबंधामध्ये करण्यात आलेला आहे. केवळ सद्यस्थितीचा विचार न करता हे राज्य भविष्यकाळात काय करु शकतात? या क्षमतेचाही विचार या अभ्यासात करण्यात आलेला आहे. सर्वच राज्यांमध्ये उत्तम आरोग्य सुविधा नसल्याचे या अभ्यासांती लक्षात आले आहे. केवळ आरोग्यासंबंधी गुंतवणूक कमी आहे असे नसून यासंबंधी योजना प्रभावीपणे राबविण्याचा मुद्दाही अभ्यासन्यात आलेला आहे. आरोग्य सेवांचे खाजगीकरण करुन त्यातील सरकारचा हस्तक्षेप कमी करतानाच या सेवांचा दर्जाही वाढवला पाहिजे. जनतेच्या आरोग्य रक्षणात शिक्षण महत्त्वाची भूमिका बजावते. त्यामुळे आईला मिळणाऱ्या आरोग्य शिक्षणासोबतच बालकाचेही आरोग्य शिक्षण आपोआपच

घडत जाईल असे वाटते.

११. **शुक्ला ओ. पी. (२०११)**[१९] : ‘‘इन्हन्सिंग् ह्यूमन् रिसॉर्स् ॲण्ड् इक्स्टेण्ट् ऑफ् मॅलन्यूट्रिशन् इन् इंण्डिया’’, इंण्डिअन ईकनॉअमिक्स् जर्नल्, एआययु-एसआयः६४२-६४७. भारतातील कुपोषणाच्या प्रश्नावर या अभ्यासात लक्ष केंद्रीत करण्यात आले आहे. बालक आणि कुमारांमध्ये लोह आणि फॉलिक ॲसिडच्या कमतरतेमुळे मोठ्या प्रमाणात कुपोषण आढळून येते. ५ वर्षाखालील ६७.५टक्के मुले आणि ६९ टक्के मुलींमध्ये ॲनिमिया आढळून येतो (एनएनएमबी २००३). १९८१ ते १९९६ या कालावधीत झालेल्या विविध संशोधन अभ्यासातून असे लक्षात येते की, ६ ते १४ वयोगटातील शालेय विद्यार्थ्यांमध्ये ॲनिमियाचे प्रमाण जवळपास ९६ टक्के इतके आढळून येते. पौष्टिक आहारासाठी खर्च करण्याची क्षमता नसलेल्या गरीब कुटुंबामध्ये ही समस्या आढळते. बदलत्या काळानुसार या गटातील लोकांच्या आहारामध्ये शीतपेय, फास्ट-फूड यांचा समावेश झालेला असला तरी पौष्टिक आहाराचा समावेश त्यांच्या भोजनात आढळत नाही.

१२. **कुमार अभिषेक आणि भारद्वार अपर्णा** (२०११)[२०] : हेल्थ् : अ की इश्यू ऑफ् इन्क्लूसिव्ह् ग्रोथ्’’, इंण्डिअन ईकनॉअमिक्स् जर्नल्, एआययु-एसआयः६४८-६५८. मानव विकास व जनतेच्या कार्यक्षमतेच्या विकासावर, आरोग्याच्या सेवा हा प्रभाव टाकणारा अत्यंत महत्त्वाचा घटक आहे, यावर हा शोधनिबंध प्रकाश टाकतो. देशाच्या राष्ट्रीय उत्पन्नावर आरोग्यासेवांच्या दर्जाचा परिणाम झाल्याचे दिसून येते. परतु, भारताच्या लोकसंख्येचा मोठा भाग आरोग्यसेवेच्या कक्षेत येतच नसल्याचे दिसून येते. भारतामध्ये कुपोषित माता व बालक यांचे प्रमाण मोठे आहे. देशातील लाखो लोकांना आरोग्यसेवांपासून वंचित ठेवण्यास,

एन.आर.एच.एम. योजनेची प्रभावी अंमलबजावणी नसणे, मुले व मातांची काळजी घेण्याऱ्या प्राथमिक आरोग्य केंद्रांची दुरावस्था, सार्वजनिक आरोग्य विभागातील अवाजवी भ्रष्टाचार, अनागोंदी कारभार व उपलब्ध अपुरा निधी इ. घटक कारणीभूत आहेत.

१३. **सिंह अवतार व निधी** (२०११)[२१] : "मनरेगा इन् उत्तर प्रदेश : ऑन एम्पिरिकल् स्ट्डी", इंण्डिअन ईकनॉअमिक्स् जर्नल्, एआययु-एसआयः२१-३०. हा शोधनिबंध एकूणच देशासाठी व विकासाच्या नव्या योजना बनविणाऱ्या आणि त्यादृष्टीने प्रयत्न करणाऱ्या लोकांसाठी एक प्रकारचे दुःस्वप्न असलेल्या, बेरोजगारी आणि गरीबी या दोन समस्या भारताच्या ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात आढळतात यावर प्रकाश टाकतो. उत्तर प्रदेशमधील मीरुत आणि वाराणसी या शहरामधील मनरेगा या योजनेच्या अंमलबजावणी व यशापयशाचा तुलनात्मक आढावा या अभ्यासात घेण्यात आलेला आहे. या अभ्यासातून असे स्पष्ट होते की, मनरेगा ही एक क्रांतीकारी योजना असून ज्याद्वारे भारतात तळागाळापर्यंत लोकशाही रुजविण्यास मदत होऊ शकते. यापूर्वी तिथे ठेकेदारांचे राज्य चालत असे तेथे सध्या या योजनेंतर्गत ग्रामपंचायत कामे ठरवणे, योजनेची अमंलबजावणी, कामावर देखरेख व सामाजिक लेखाजोखा इ. कामे करण्यात येतात. यामुळे ग्रामीण रोजगारात वाढ होऊन लोकांच्या उत्पन्न वाढीस हातभार लागलेला दिसतो. यातून निर्माण होणाऱ्या संपत्तीतून जनतेचाच विकास केला जाऊ शकतो. मनरेगा योजनेच्या अंतर्गत प्रत्येक कुटुंबास १०० दिवस काम मिळेल, याची हमी दिली जाते. हे अनेक कुटुंबाना नीट माहितच नाही, असेही दिसून येते. यासाठी या योजनेचा प्रचार आणि प्रसार अधिक प्रमाणात करणे अत्यावश्यक आहे, असे वाटते.

१४. **मल्होत्रा नीना आणि रामपाल कनिका** (२०११)[२२] : "जेण्डर् गॅप् इन् एलिमेण्टरि एज्युकेइशन् इन् इंण्डिया", ईकनॉअमिक्स् जर्नल्, एआययु-एसआयः१६१-१७६. या शोधनिबंधाचे मुख्य निष्कर्ष पुढील प्रमाणे आहेत.

अ) मुले आणि मुली यांच्यातील साक्षरतेच्या प्रमाणात खूप फरक पडलेला दिसतो. तसेच हा फरक दिवसोंदिवस वाढत चालेला आढळतो. मुलींमधील साक्षरतेचे कमी प्रमाण हे एकंदरच बालकांच्या शिक्षणावर वाईट परिणाम करणारे ठरते. यासाठी मुलींना मोफत शिक्षणाच्या सोई उपलब्ध करुन दिल्या पाहिजेत आणि महिला शिक्षणाकडे अधिक लक्ष दिले गेले पाहिजेत.

ब) बदलत्या काळानुसार शाळामध्ये मुलींसाठी स्वतंत्र स्वच्छतागृहाच्या सोयीमध्ये वाढ होत चालेली आहे. परंतु अजूनही अशी अनेक राज्ये आहेत की, ज्यामध्ये मुलींसाठी या सोयी सुविधांचे प्रमाण अत्यंत कमी आहे. ही समस्या दूर करण्यासाठी मुली शिक्षण घेत असलेल्या सर्वच शाळेमध्ये मुलींसाठी स्वतंत्र स्वच्छतागृहांची व्यवस्था करणे बंधनकारक केले पाहिजेत.

क) शाळांमधील मुलींच्या प्रमाणात महिला शिक्षकांचे प्रमाण तमिळनाडू, केरळ, दिल्ली इ. काही राज्यामध्ये चांगले आहे. परंतु सर्वच राज्यामध्ये हे प्रमाण योग्य नाही.

ड) वेगवेगळ्या कारणामुळे मुलींचे शाळेतील गळतीचे प्रमाण खूप मोठे आहे. सध्या ही गळती रोखण्यात विविध उपायांमुळे यश मिळते आहे, पण यामध्ये आणखी सुधारणा करण्याची आवश्यकता आहे. शाळांपर्यंत पोहोचण्यासाठी योग्य दळणवळणाची साधणे उपलब्ध नसणे, हे मुलींच्या गळतीचचे एक प्रमुख कारण आहे.

इ) उच्च प्राथमिक स्तरावरील मुलींच्या गळतीचे मुख्य कारण म्हणजे त्यांच्या

पालकांकडून या मुलींना घरातील कामे लावणे अथवा अर्थाजनासाठी कामावर पाठविणे ही आहेत. मुलींच्या एकूण पटनोंदणीमध्ये वाढ झालेली दिसून येते. पण काही राज्यांमध्ये मुलींनी शाळेत जाण्याचे प्रमाण अजूनही कमीच आहे. त्यामुळे मोफत शिक्षणासोबतच त्यांना मोफत गणवेश व पुस्तके देण्यात यावीत.

ई) प्राथमिक स्तराच्या तुलनेत उच्च प्राथमिक स्तरावर मुले व मुलीं यांच्या गळतीचे प्रमाण जवळ जवळ दुप्पट आहे. या स्तरावर विद्यार्थ्यांच्या गळतीचे प्रमाण कमी करण्यास सरकारी योजना अपयशी झालेल्या दिसून येतात.

१५. **प्लॉनिंग् कमिशन्, गव्हर्न्मण्ट् ऑफ् इण्डिया** (२००१)[२३] : "नॅशनल् ह्यूमन् डिव्हेलपमण्ट रिपॉर्ट २००१", हा भारत देशाचा पहिला मानव विकास अहवाल आहे. लिंगभेद आणि गरिबी या दोन पातळ्यावर मानव विकासाचा आढावा घेण्याचा प्रयत्न या अहवालात करण्यात आलेला आहे. सर्वसाधारणतः मानव विकासामध्ये सुधारणा दिसून आल्याचे परंतु काही पातळ्यांवर दोष असल्याचे या अहवालात नमूद करण्यात आलेले आहे. या अहवालानुसार प्रथम क्रमांक केरळ, द्वितीय क्रमांक पंजाव तर तृतीय क्रमांक तामिळनाडू या राज्यांनी पटकावला आहे. या राज्यांचा मानव विकास निर्देशांक अनुक्रमे ०.६३८, ०.५३७ व ०.५३१ इतका आहे. तर १५ व्या क्रमांकांवर बिहार राज्य असून त्याच मानव विकास निर्देशांक०.३६७ इतका आहे.

१६. **प्लानिंग् कमिशन्, गव्हर्न्मण्ट् ऑफ् इण्डिया** (२०११)[२४] : "इण्डिया ह्यूमन् डिव्हेलपमण्ट रिपॉर्ट २०११", २१ ऑक्टोबर २०११ मध्ये नियोजन आयोगाने भारताचा दुसरा मानव विकास अहवाल प्रकाशित केला. या अहवालामध्ये लोकांचे उत्पन्न, शिक्षण, आरोग्य, साक्षरता आणि सांडपाणी व्यवस्थापन याबाबतीत वादग्रस्त दावे केलेले आहेत. भारताचा यापूर्वीचा अहवाल २००० मध्ये प्रकाशित झालेला होता. या अहवालानुसार भारतातील

दारिद्र्य, बेरोजगारी आणि बालकामगार यामध्ये घट होत आहे. आंतरराज्य पातळीवर योजनांमधील त्रूटी कमी होत आहेत अणि शिक्षणातील प्रगतीमुळे मानवी विकासात मोठ्या गतीने वाढ होत आहे. परंतु या अहवालात असेही नमूद करण्यात आलेले आहे की, गरीबीची टक्केवारी (अहवालानुसार २७ टक्के) १९७३ च्या तुलनेत जी ३२० लक्ष होती, ती ३०२ लक्षापर्यंत आली आहे. या गरीबांपैकी ६० टक्के गरीब हे बिहार राज्यात राहतात, या बाबी अहवालात नमूद करण्यात आल्या आहेत. हा अहवाल इन्स्टिटयूट अप्लाईड मॅनपॉवर रिसर्च यांनी तयार केला आहे. यानुसार २००० ते २००७ या कालावधीत विकासाचा आलेख २१ टक्क्यांनी वाढला की, जो याच कालावधीत चीन पेक्षा १७ टक्क्यांनी जास्त आहे. जागतिक मानव विकास अहवाल २०१० यांनी वर्तविलेल्या अंदाजापेक्षा तो १८ टक्क्यांनी जास्त आहे. या अहवालामध्ये पहिले पाच क्रमांक केरळ, दिल्ली, हिमाचल प्रदेश, गोवा व पंजाब या राज्यांनी पटकाविला आहे. हरियाणा राज्य ७ व्या क्रमांकावरुन ९ व्या क्रमांकावर तर जम्मू काश्मिर आणि उत्तराखंड यांनी प्रगती साधत अनुक्रमे ९ वा व १४ वा क्रमांक पटकावला आहे. बिहार, आंध्रप्रदेश, मध्य प्रदेश, ओरिसा आणि आसाम हे शेवटच्या क्रमांकावरील सहा राज्ये आहेत. प्राथमिक स्तरावर विद्यार्थ्यांच्या पटनोंदणीमध्ये झालेली ९२ टक्के वाढ ही भारतासाठी जमेची बाजू आहे. १९९९ ते २००८ या कालावधीत शैक्षणिक आलेख २८.५ टक्क्यानी उंचावला आहे. आरोग्याचा आलेख या कालावधीत केवळ १३ टक्क्यांनी वाढलेला आहे.

१७. **म्युनसिपल् कार्पोरेशन् ऑफ् ग्रेटर् मुंबई** (२००९)[२५] : "मुंबई ह्यूमन् डिव्हेलपमण्ट रिपॉर्ट २००९", बहुतांश जनतेला अजूनही प्राप्त न झालेल्या विकास सुविधांवर या अहवालात प्रकाश टाकण्याचा प्रयत्न करण्यात आलेला

आहे. दारिद्र्य निर्मूलन, शाश्वत जीवनावश्यक वस्तू, आणि सर्वांगीण सामाजिक विकास साधण्यातील विविध अडथळे आणि त्यात होणारी सुधारणा या अहवालात नमूद करण्यात आलेली आहेत.

१८. **इंण्डिअन् इस्टिट्यूट् ऑफ् एज्यूकेइशन्, पुणे** (२००६)[२६] : "अ स्ट्डी ऑफ् दि इक्स्टेण्ट् ऑण्ड् कॉझ्स् ऑफ् ड्रॉपाऊट् इन् प्राइमरि स्कूल् इन् रुअरल् महाराष्ट्रा विथ् स्पेशल् रेफरन्स् टू गर्ल् ड्रॉपाऊट्", पुणे, आयआयई, पृ. १५५. हा शोधनिंबध भारतीय शिक्षण व्यवस्थेला सतत भेडसवणारा मुख्य प्रश्न म्हणजे विद्यार्थ्यांची गळती यावर प्रकाश टाकतो. महाराष्ट्रातील अकोला, बीड आणि भंडारा या जिल्ह्यांमधल्या विद्यार्थ्यांच्या गळतीस कारणीभूत घटकांचा अभ्यास या शोधनिबंधात करण्यात आलेला आहे. या अभ्यासातून असे स्पष्ट होते की, या ठिकाणाच्या शाळांमधील महिला शिक्षकांची कमतरता हा मुलींचा शाळेतील सहभाग कमी होण्यास व विद्यार्थीनींच्या गळतीचे एक गंभीर कारण आहे. शिवाय पालकांकडून मुलींच्या शिक्षणाला आवश्यक तेवढे प्रोत्साहन मिळत नाही. म्हणजेच मुलींच्या गळतीवर प्रभाव पाडणारे घरातील वातावरण हे सुध्दा कारणीभूत घटक आहे. बऱ्यांच कुटुंबाना वीज आणि पिण्याच्या शुध्द पाण्याची उपलब्धता नाही. बहुतांश विद्यार्थ्यांना विशेषतः मुलींना पाणी व लाकूडफाटा आणण्याच्या कामास लावले जाते. हा अभ्यास असे सूचित करतो की, स्थानिक शिक्षकांना नेमणूकीत प्राधान्य दिले पाहिजे. जेणेकरुन शिक्षक अनुपस्थितीचा प्रश्न कमी होईल. तसेच महिलांना नेमणूकीत प्राधान्य आणि प्रोत्साहन देण्यात यावे.

१९. **सक्सेना आर. आर.** (२०००)[२७] : "स्टेइट् पॉलिसी ऑन् इन्सेण्टिव्ह् स्कीम् इन् प्राइमरि स्कूल् ॲण्ड् देअर् कॉण्ट्रिब्यूशन् टू गर्ल् पार्टिसिपेशन्", न्यू दिल्ली, एनसीईआरटी/युनेस्को, पृ. १६९. हा अभ्यास शाळेतील मुलींचे प्रमाण

वाढविण्यासाठीच्या योजना व त्यांच्या अमंलबजावणी यावर प्रकाश टाकतो. यामध्ये प्राथमिक शिक्षणात मुलीचा सहभाग वाढविण्यासाठी काही घटक गृहित धरुन त्यासंबंधीत ग्रामप्रमुख व पालकांची मते घेण्यात आलेली आहेत. या अभ्यासानुसार तमिळनाडू, उत्तरप्रदेश या राज्यातील ग्रामीण भागातील शिक्षणासंबंधी सोई सुविधामध्ये वाढ झालेली आसून शाळेतील महिला शिक्षकांचे प्रमाण व पुरक आहार यामुळे उपस्थिती वाढलेली दिसून येते. शाळेत देण्यात येणारी मोफत पाठ्यपुस्तके, गणवेश आणि उपस्थिती भत्ता यामुळे विशेष सुधारणा दिसून येते. उत्तर प्रदेशातील ग्रामप्रमुख व पालकांच्या मते, शाळेत पाठ्यपुस्तके वेळेत उपलब्ध करुन द्यावीत व पुरक आहार हा शिजवून देण्यात यावा, अशा सूचना सूचविण्यात आलेल्या आहेत.

२०. **सरोजा के.** (१९९९)[२८] : “स्कूल् रिलइटेड् फॅक्टर्स् अफेक्टिंग् दि फीमेइल् स्कूल् ड्रॉपाऊट् फिनॉमिनन् इन् रुअरल् एअरिअस् : अ केस् स्ट्डी”, या शोधनिबंधामध्ये कर्नाटकातील गदग जिल्ह्यातील रॉन तालुक्यातील शाळेतील शिक्षणाची रचना आणि विद्यार्थीनीची गळती यावर प्ररिणाम करणाऱ्या घटकांचे विश्लेषण केलेले आहे. या अभ्यासावरुन असे दिसून येते की, तालुक्यातील एकूण लोकसंख्येच्या ५० टक्के महिलांमध्ये साक्षरतेचे प्रमाण २० टक्के होते. मुले-मुली एकत्र शिकत असणे हे एक मुलींच्या गळतीचे कारण आहे. शाळेत जवळपास ७३ टक्के शिक्षक हे पुरुष असणे व शाळा गावापासून दूर अंतरावर असणे ही गळतीची कारणे आहेत. विद्यार्थिनींचे गळतीचे प्रमाण कमी करण्यासाठी मुलीसांठी स्वतंत्र शाळा काढणे, वातावरण आकर्षक ठेवणे व शिक्षणासाठीच्या अत्यावश्यक सेवा सुविधा व खेळाचे साहित्य पुरविणे इ. उपाययोजना सुचविलेल्या आहेत.

२१. **सुधाकर सी, उमामोहन आणि सुगुणकुमारी आर.** (१९९९)[२९] : “यूनिव्हर्सलाइझेशन् ऑफ् गर्ल् एज्यूकेइशन् : कम्यूनिटि पार्टिसिपेशन्”, जर्नल् ऑफ् एज्यूकेइशन् ऑण्ड् सोशल् चेइन्ज्, १२(४)१४-२७. या शोधनिबंधामध्ये मुलांची शाळेतील पटनोंदणी व गळतीचे प्रमाण, पालकांच्या पाल्याच्या शिक्षणाबाबतचा दृष्टिकोन, एकूणच शिक्षण यासंबंधीत दृष्टिकोन व पालकांच्या त्यांच्या मुलांकडून उत्पन्नासंबंधी अपेक्षा इ. बाबत प्रकाश टाकलेला आहे. या अभ्यासावरुन असे दिसते की, शाळेतील गळतीचे प्रमाण अनुसूचित जमातीच्या संवर्गातील विद्यार्थ्यांमध्ये सर्वाधिक असून त्याखालोखाल अनुसुचित जाती व इतर मागासवर्गीय या संवर्गातील विद्यार्थ्यांचा क्रमांक लागतो. तसेच इतर मागासवर्गीयांतील मुलींच्या गळतीचे प्रमाण सर्वाधिक आहे. इयत्ता ४ व ५ या वर्गामध्ये गळतीचे प्रमाण सर्वाधिक आहे.

२२. **बॅनर्जी रुक्मिणी** (२०००)[३०] : “पॉव्हर्टि ऑण्ड् प्राइमरी स्कुलिंग्ः फील्ड् स्टडीज् फॉर् मुंबई ऑण्ड् दिल्ली”, बहुतांश मुले शाळेत न जाण्याचे कारण पालकांची गंभीर आर्थिक परिस्थिती नसून तेथील शाळा व्यवस्थापनांच्या त्रूटी हे आहे. शाळा मुलांना आकर्षित करुन घेण्यास अपयशी ठरतात, हे याचे मुख्य कारण आहे. शहरांमध्ये मुलांचे शाळेत जाण्याचे प्रमाण वाढलेले असूनही शाळांमध्ये विद्यार्थ्यांना आकर्षित करुन घेण्यासारखे फारसे काही आढळत नाही. तसेच हा शोधनिबंध असे सांगतो की, तिसरी आणि चौथी या वर्गातील कामगिरी एवढीच अभ्यासातील प्रगती प्राथमिक स्तरावरही दिसून येते. यामध्ये उपाययोजना सुचविताना असे सुचिवण्यात आलेले आहे की, शाळांनी लवचिक धोरणे स्विकारावीत, शाळांची समाजाप्रती जबाबदारी असावी, नवनवीन कल्पना राबवाव्यात. समाजाप्रती बांधिलकी दाखविणाऱ्या शाळांना सार्वजनिकरित्या गौरविण्यात यावे.

२३. **गव्हर्न्मण्ट् ऑफ् उत्तर प्रदेश** (२००८)[३१] : "उत्तर प्रदेश ह्यूमन् डिव्हेलपमण्ट रिपॉर्ट २००८", हा उत्तर प्रदेशाचा दुसरा मानव विकास अहवाल आहे. या अहवालात विकासाचे मुख्य घटक शिक्षण, आरोग्य, दरडोई उत्पन्न आणि इतर बाबींच्या आधारे उत्तर प्रदेशातील मानव विकासाचा आढावा घेण्यात आलेला आहे. मागील काही वर्षामध्ये उत्तर प्रदेशातील मानव विकासाचा आलेख सातत्यपूर्ण उंचावत आलेला आहे. सामान्य माणसांना विविध संधी निर्माण करुन दिल्यामुळे हे शक्य झाले आहे, असे यात नमूद करण्यात आले आहे.

२४. **गव्हर्न्मण्ट् ऑफ् छत्तीसगड** (२००५)[३२] : " छत्तीसगड ह्यूमन् डिव्हेलपमण्ट रिपॉर्ट २००५", हा अहवाल छत्तीसगडच्या मानव विकासाची ध्येय धोरणे निश्चित करताना आधारभूत ठरु शकेल एवढेच नसून राज्यांच्या भविष्यातील विकासासाठी एक प्रमाणिक किंवा मनमोकळ्या चर्चेस वाव निर्माण करतो. या अहवालासंबंधी एक अत्यंत महत्त्वाची बाब म्हणजे यातील सामान्य लोकांचा सहभाग होय. हा एक वेगळा अहवाल आहे कारण, यामध्ये मानवास केंद्रस्थानी मानून त्याच्या मतास प्राधान्य दिलेले आहे. हा अहवाल म्हणजे लोकांचा आवाज आहे असे म्हणता येईल.

२५. **मिश्रा मनोज कुमार, उद्देश राम व सिंग उपेद्र** (२०११)[३३] : "फाइनॅन्सिअल् इन्क्लूसिव्ह् ऑण्ड ईकनॉमिकल् ग्रोथ् : ऑन् ईकनॉमिट्रिक्स् अनॅलिसिस्", इंण्डिअन ईकनॉअमिक्स् जर्नल्, एआययू-एसआयः ७९-८६. या अभ्यासावरुन असे लक्षात येते की, मानव विकासाची स्थिती व आर्थिक तदतूद या बाबी परस्परांशी खूपच निगडीत आहेत. मात्र यास काही मोजके अपवाद देखील आहेत. या अभ्यासावरुन असे निश्चितपणे सांगता येते की, देशातील आर्थिक तरतूद स्पष्ट करताना देशातील लोकांचे उत्पन्न दरडोई उत्पन्न या एककात

मोजणे आवश्यक आहे. दरडोई उत्पन्नाच्या पुढे जाऊन असे म्हणता येईल की, उत्पन्नातील विषमता, प्रौढ शिक्षण आणि शहरीकरण याही बाबी महत्त्वाच्या आहेत. फोन, इंटरनेट, रस्ते इ.चा आर्थिक विकासात मोठा सहभाग असतो. अभ्यासातील निष्कर्षातून असे दिसून येते की, आर्थिक विचार हा आर्थिक विकासाचाच आरसा असतो. कारण कमी दरडोई उत्पन्न, आर्थिक विषमता, निरक्षरता, कमी शहरीकरण व दळणवळणाच्या अपुऱ्या सोयी यांचाही प्रभाव आर्थिक विकासावर होत असतो.

२६. **बंडोपाध्याय धिरज** (२०११)[३४] : "इश्यू ऑन् राइट् टू इम्प्लॉइमण्ट् इन् अर्बन् इंण्डियाः इम्प्लिकेइशन् इन् चेइजिंग् नेइचर् ऑफ् अर्बन् पॉव्हर्टि ऑण्ड क्वालिटी ऑफ् इम्प्लॉइमण्ट् इन् अर्बन् अन्ऑर्गनाइझ् लेइबर् मार्किट्", इंण्डिअन ईकनॉअमिक्स् जर्नल्, एआययू-एसआयः ३१-४७. हा शोधनिबंध रोजगार हमी योजनेमधून शहरांना वगळण्याच्या नियमांचे मूल्यमापन करतो. मुख्यतः छोट्या आणि मध्यम शहरांमधील रोजगारीच्या प्रश्नावर हे संशोधन आधारलेले आहे. ग्रामीण भागामध्ये झपाट्याने होत असलेले शहरीकरण हे आर्थिक विकासास चालना देणारे आहे, असा प्रचार केला जातो व त्याच वेळेस शहरातील बेरोजगारीकडे कानाडोळा केला जातो. भारतीय अर्थव्यवस्थेची क्षमता मोजणे त्यासोबतच विविध राज्यातील निव्वळ देशांतर्गत उत्पन्न व राज्यांचे दरडोई उत्पन्न यांची वाढ सुध्दा अभ्यासण्यात आलेली आहे. गेल्या काही दशकांमध्ये शहरांमध्ये स्वंयरोजगाराचे प्रमाणही वाढलेले दिसते. देशातील आर्थिक विकास हा दरडोई उत्पन्नात मोजला जातो. पण एका बाजूला दोन वेळच्या अन्नाची भ्रांत असणाऱ्या मजुरांची संख्या सुध्दा मोठी आहे, त्यामुळे याकडे दुर्लक्ष करुन चालणार नाही. यामुळे निव्वळ दरडोई उत्पन्न हाच विकासाचा एकच निकष मानणे चुकीचे आहे.

२७. **गव्हर्न्मण्ट् ऑफ् पंजाब** (२००४)[३५] : " पंजाब ह्यूमन् डिव्हेलपमण्ट रिपॉर्ट २००४", भारतातील अन्य राज्यांच्या तुलनेच पंजाब हे राज्य प्रगतीच्या बाबतीत पुढे आहे. पण या राज्यातील कामगिरीचे मूल्यमापन योग्य रितीने झालेले दिसत नाही. आर्थिक सुबत्तेसोबतच काही घटकांच्या दुर्बल आर्थिक स्थितीकडे लक्ष दिले गेलेले नाही यावर हा अहवाल प्रकाश टाकतो. हा अहवाल म्हणजे एक उत्तम संशोधन असून राज्यासाठींच्या धोरणासंबंधी एक उत्तम दस्तऐवज असून जो पंजाबमधील साध्य केलेल्या विकासाच्या सद्यस्थितीवर प्रकाश टाकतो. तसेच विकासाचे क्षेत्र व भविष्यात प्रगती साधण्यासाठीचे मार्ग यावरही हा अहवाल प्रकाश टाकतो.

२८. **गव्हर्न्मण्ट् ऑफ् ओरिसा** (२००४)[३६] : "ओरिसा ह्यूमन् डिव्हेलपमण्ट रिपॉर्ट २००४", अन्न, आरोग्य, आणि शिक्षण या मानव विकासातील मुख्य घटकावर आधारित हा अहवाल आहे. अन्नसुरक्षा आणि राज्याला सतत सामोरे जाव्या लागणाऱ्या नैसर्गिक संकटांमुळे होणारा आर्थिक विकासावरील परिणाम या अहवालात मांडण्यात आलेला आहे.

२९. **गव्हर्न्मण्ट् ऑफ् वेस्ट् बंगाल्** (२००४)[३७] : "पश्चिम बंगाल ह्यूमन् डिव्हेलपमण्ट रिपॉर्ट २००४", या राज्यातील मानव विकासाच्या दृष्टिकोनातून चांगली व वाईट स्थिती एकत्रितरित्या या अहवालात मांडण्यात आलेली आहे. मानव विकासाच्या अनुषंगाने काही क्षेत्रामध्ये साध्य केलेले मोठे यश तर काही क्षेत्रामधील त्रूटी आणि नव्याने उदभवणाऱ्या समस्या यात नमूद केल्या गेलेल्या आहेत. राज्यातील मागील २६ वर्षापासूनचे वैशिष्ट्य ठरलेल्या भूमी सुधार व विकेंद्रीकरणाच्या योजना यांचा मानव विकासावर झालेला परिणाम या अहवालात दर्शविण्यात आलेला आहे.

३०. **गव्हर्न्मण्ट् ऑफ् अरुणाचल प्रदेश** (२००५)[३८] : "अरुणाचल प्रदेश ह्यूमन् डिव्हेलपमण्ट रिपॉर्ट २००५", या अहवालात अरुणाचल प्रदेशातील मानव विकासाच्या दृष्टीने निश्चित उद्दिष्टांचे विश्लेषण तसेच धोरणकर्ते आणि प्रशासक यांच्यासाठी हा अहवाल एक आदर्श मार्गदर्शक आहे. आरोग्य सुधारणा, जनकल्याण, शिक्षण आणि साक्षरता, लिंगभेद दूर करणे आणि पायाभूत सुविधा याबाबतीत नव्या कल्पना या अहवालात सूचविण्यात आलेल्या आहेत.

३१. **गव्हर्न्मण्ट् ऑफ् केरल** (२००५)[३९] : "केरल ह्यूमन् डिव्हेलपमण्ट रिपॉर्ट २००५", हा केरळ राज्याचा पहिलाच मानव विकास अहवाल आहे. या अहवालात यणाऱ्या नवीन पिढ्यांसांठी आरोग्य सुविधा, रोजगारभिमुख शिक्षण, उच्च दर्जाची सामाजिक सुरक्षितता, अन्नसुरक्षा आणि पौष्टिक आहार या संबंधी तरतूदीचा आहवालात उहापोह केलेला आहे.

३२. **गव्हर्न्मण्ट् ऑफ् मध्य प्रदेश** (१९९५)[४०] : "मध्य प्रदेश ह्यूमन् डिव्हेलपमण्ट रिपॉर्ट १९९५", मध्य प्रदेशातील विविध जिल्ह्यांच्या मानव विकासाची स्थिती या अहवालात दर्शविलेली आहे. ज्यामध्ये जिल्हास्तरीय मानव विकास निर्देशांकाची गणना केलेली असून त्यामध्ये फलनिष्पती संबंधी आकडेवारीचा आधार घेतला आहे. यामध्ये मानव विकासाची काही उद्दिष्टे सुध्दा निश्चित करण्यात आलेली आहेत. राज्यशासनाने पुढाकार घेऊन मानव विकासासाठीच्या सामाजिक रुपरेखेचा यात उल्लेख केलेला आहे.

३३. **गव्हर्न्मण्ट् ऑफ् कर्नाटक** (१९९९)[४१] : "कर्नाटक ह्यूमन् डिव्हेलपमण्ट रिपॉर्ट १९९९", राज्यातील मानव विकासाचा एकत्रित आलेख मांडण्याचा प्रयत्न या अहवालात केलेला दिसतो. मुख्यतः आरोग्य, शिक्षण, उत्पन्न, रोजगार, पौष्टिक

आहार योजना, कुटुंबकल्याणकारी योजना, गरिबी, घरांची उपलब्धता, पाणी पुरवठा, सांडपाण्याची व्यवस्था, मुलांची सामाजिक स्थिती व विकेंद्रीकरण अशा बहुविध बाबींवर या अहवालात चर्चा केली गेली आहे. बालकांच्या प्रश्नावर भर देणारा हा देशातील एकमेव राज्य मानव विकास अहवाल आहे.

३४. **गव्हर्न्मण्ट् ऑफ् हिमाचल प्रदेश** (२००२)[४२] : ‘‘हिमाचल प्रदेश ह्यूमन् डिव्हेलपमण्ट रिपॉर्ट २००२’’, हा अहवाल राज्यातील विविध क्षेत्राच्या विकासासाठीचा एक प्रतिमान असून गरिबीचे प्रमाण कमी करण्यासाठी या अहवालात चर्चा करण्यात आलेली आहे. राज्यातील विविध भागांचा विकास घडवून आणण्यासाठी केवळ ग्रामीण अर्थव्यवस्था व शासनाचा सार्वजनिक खर्च वाढवून चालणार नसून लोकांमधील गुंतवणूक, महिलांचा मोठ्या प्रमाणावरील सहभाग व सक्षम स्थानिक संस्थांची निर्मिती करणे आवश्यक आहे.

३५. **गव्हर्न्मण्ट् ऑफ् आसाम** (२००३)[४३] : ‘‘आसाम ह्यूमन् डिव्हेलपमण्ट रिपॉर्ट २००३’’, या अहवालात राज्यातील जिल्ह्यांच्या मानव विकासाच्या स्थितीचा लेखाजोखा मांडण्यात आलेला असून भविष्यकाळात उद्‌भवणारे संघर्ष व त्यावरील उपाययोजना याचा विचार या अहवालात दिसतो. मानव विकासाची स्थिती स्पष्ट करताना या अहवालात आसाममधील विशिष्ट भौगोलिक रचना आणि तेथील दहशतवाद, फुटीरतावाद इ. धोक्याचा उहापोह केला आहे. हा अहवाल राज्यातील शिक्षण व आरोग्य यामधील सुविधांमध्ये होत असलेल्या सुधारणा याचा एक दस्तऐवज आहे.

३६. **गव्हर्न्मण्ट् ऑफ् तामिळनाडू** (२००३)[४४] : ‘‘तामिळनाडू ह्यूमन् डिव्हेलपमण्ट रिपॉर्ट २००३’’, हा अहवाल मानव विकासाच्या दृष्टीने होत असलेल्या मोठ्या प्रमाणावरील औद्योगीकरण, शहरीकण आणि उत्तम विकासदर यावर प्रकाश

टाकतो. राज्याला भेडसावणाऱ्या विविध प्रकारच्या समस्याचा उहापोह यात करण्यात आलेला आहे. सामाजिक क्षेत्र व स्त्रियांचे सक्षमीकरण व त्यांचे विकासातील योगदान याचाही उल्लेख यात आढळून येतो. सामान्य मानवाला केंद्रस्थानी ठेवून राज्याची आर्थिक धोरणे निश्चित करणे आवश्यक आहे असे अहवाल नमूद केले आहे.

३७. **गव्हर्नमण्ट् ऑफ् दिल्ली** (२००६)[४५] : "दिल्ली ह्यूमन् डिव्हेलपमण्ट रिपॉर्ट २००६", दिल्लीचा पहिला मानव विकास अहवाल असे सांगतो की, आर्थिक सुबत्ता असूनही दिल्लीमध्ये जीवनमान अपेक्षेनुसार नाही. बाहेरुन येणारे लोक देशात इतरत्र कुठेही राहण्यापेक्षा देशाची राजधानी म्हणून दिल्लीस प्राधान्य देतात. या अहवालानुसार दिल्लीत खूप आर्थिक सुबत्ता व निकृष्ट जीवनमान आढळते. हा अहवाल २४ ऑगस्ट २००६ रोजी प्रकाशित झालेला असून असे सांगतो की, ४७ हजार दरडोई उत्पन्न आणि ८ टक्के लोक दारिद्र्य रेषेखाली असून हे प्रमाण देशातील प्रमाणापेक्षा (२६ टक्के) खूपच कमी आहे. यात दिल्लीतील महिला व मुले यांच्याकरीता सुरक्षित वातावरण, स्त्री-पुरुष जननदरातील मोठी तफावत आणि शिक्षणाचा घसरत चालेला दर्जा या प्रश्नांना सामोरे जावे लागत आहे. अशा अडचणी असल्या तरी एका सर्वेक्षणानुसार दिल्लीतील ८२ टक्के नागरिक दिल्ली सोडून इतरत्र जावयास पसंती दर्शवित नाहीत. संयुक्तराष्ट्र विकास कार्यक्रम यांच्या सहकार्याने दिल्ली सरकार व स्थानिक संस्था यांनी आपल्या अहवालात शहरातील रस्त्यावरील मुले, जेष्ठ नागरिक, अपंग या दुर्लक्षित समाज घटकांचा अभ्यास केला आहे. भारतातील एखाद्या शहराचा हा पहिलाच मानव विकास अहवाल आहे. राज्यातील आर्थिक विकास व वाढती गुन्हेगारी, विशेषतः स्त्रियावरील अत्याचार याला १४ लाख लोकसंख्येला तोंड द्यावे लागत आहे. हा अहवाल

असेही सांगतो की, राज्यात वाढत्या संधीची उपलब्धता असूनही शहरामध्ये वाढती बालमजुरी, बेघरपणा, बेवारस व महिलांना भेडसावणाऱ्या समस्या मोठ्या प्रमाणावर आहेत. मुलांवरील अत्याचारांच्या बाबतीत जगातील ३५ प्रमुख शहरांमध्ये दिल्लीचा जगात पहिला क्रमांक आहे. दिल्लीतील लिंगगुणोत्तर प्रमाण ८६५ असून हे देशातील प्रमुख मोठ्या शहराच्या तुलनेत सर्वात कमी प्रमाण आहे. १४ हजार लोकांच्या सर्वेक्षणात असे दिसून येते की, कामाच्या ठिकाणी केवळ ६ टक्के लोकांना सुरक्षित वाटते. सर्वेक्षणातील ९० टक्के महिलांना असे वाटते, दिल्लीतील सार्वजिक वाहतूक व्यवस्था सुरक्षित नाही. आरोग्य सेवेचे कौतुक करताना शहरातील लोकांचे आयुर्मान ६९.९ टक्के इतके असून हे प्रमाण राष्ट्रीय प्रमाणापेक्षा तब्बत ६ पट अधिक आहे. तर शहरातील मृत्यूदर केवळ ५ इतका असून तो देशातील इतर राज्यांच्या तुलनेत खूपच कमी आहे. पण, बालमृत्यूदर मात्र हजारामागे २८ एवढा आहे. गेल्या २० वर्षात लोकसंख्येच्या प्रमाणात दवाखान्यातील खाटांच्या संख्येचे प्रमाण २.२ एवढेच राहिलेले आहे. राष्ट्रीय प्रमाणापेक्षा दिल्लीतील शिक्षणावर केला जाणारा खर्च २८ टक्के आहे. परंतु 'प्रथम' या संस्थेने केलेल्या सर्वेक्षणानुसार ७ ते १० वयोगटातील सरकारी शाळेतील ३७ टक्के व खाजगी शाळेतील १६ टक्के मुलांना लिहिता वाचता येत नाही. ११ ते १४ वयोगटातील सरकारी शाळेतील ४० टक्के व खाजगी शाळेतील २० टक्के मुलांना इयत्ता ३ रीचे गणित सोडवता येत नाही.  १० वर्षाखालील जवळपास १ लक्ष मुले शाळेत उपस्थित राहत नाहीत. दिल्लीमध्ये सर्वाधिक म्हणजे २५५ लिटर्स पाणीपुरवठा दररोज उपलब्ध आहे. पण, या पाण्याच्या वितरणात समानता नाही. दिल्लीतील २५ टक्के लोक टँकर्स किंवा कुपनलिकांचे पाणी पितात. १९९१ मध्ये १.१८ लक्ष लोकांना शौचालयाची व्यवस्था नसून या

दशकात हे प्रमाण २ लक्षापर्यंत पोहचले आहे. दिल्लीतील लोकांच्या दरडोई उत्पन्नामध्ये १९८१-९० मध्ये ३२ टक्के तर १९९१-२००० मध्ये ६० टक्के अशी दुप्पट वाढ झालेली आहे. तरीसुध्दा ८ टक्के लोक दारिद्र्यरेषेखाली जीवन व्यतीत करतात.

३८. **गव्हर्न्मण्ट् ऑफ् गुजरात** (२००४)[४६] : " गुजरात ह्यूमन् डिव्हेलपमण्ट रिपॉर्ट २००४", हा गुजरात राज्याचा पहिला मानव विकास अहवाल आहे. मानव विकास साधने याकडे हा अहवाल एक ध्येय म्हणून पाहतोच यासोबतच विकासाचा नमुना म्हणून देखील पाहिले जाते. हा अहवाल राज्यातील विकासाच्या मार्गाचे सूक्ष्म निरीक्षण करतोच तसेच विकासाच्या दृष्टीने शिक्षण, आरोग्य, साक्षरता, पोषण इ. घटकांतील प्रयत्नावर व सूक्ष्मस्तर सज्जता व समुदाय सक्षमीकरणाच्या दृष्टिकोनातून सुध्दा या अहवालात प्रकाश टाकण्यात आलेला आहे.

३९. **गव्हर्न्मण्ट् ऑफ् नागालँड** (२००५)[४७] : "नागालँड ह्यूमन् डिव्हेलपमण्ट रिपॉर्ट २००५", हा अहवाल मानव विकास निर्देशकांच्या पुढील घटकांकडे लक्ष वेधून घेतो. उत्पन्न, जीवनमान, शिक्षण, आरोग्य, महिलांचे सक्षमीकरण इ. जे घटक साध्य करणे राज्याच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक आहे. हा अहवाल अशा त्रूटींवर लक्ष केंद्रीत करतो की, ज्यावर धोरण निश्चितीमध्ये लक्ष देणे आवश्यक आहे. अशा पध्दतीने अहवाल राज्यातील बलस्थाने व कमतरता यावर प्रकाश टाकतो.

४०. **युनायटेड नेशन डेव्हलपमेंट प्रोग्राम** (१९९०)[४८] : "ह्यूमन् डिव्हेलपमण्ट रिपॉर्ट १९९९" या अहवलात खालील बाबींवर प्रकाश टाकण्यात आलेला आहे.

अ) अहवालाचा मुख्य विषय (Theme)- मानवी विकासाचा मापदंड आणि

परिकल्पना (Concept and Measurement of Human Development)

ब) थोडक्यात अहवालाचा दृष्टिक्षेप- आर्थिक वृध्दीचे मानवी विकासात पर्यवसन होते किंवा कसे? या प्रश्नाचा उहापोह या अहवालात प्रामुख्याने करण्यात आलेला आहे. यात मानव केंद्रस्थानी असून जनतेच्या आवडी-निवडीच्या कक्षा विस्तारण्यामध्ये विकासाची भूमिका यावर भर देण्यात अलेला आहे. मानवी विकासाचे मापदंड यावर या अहवालात चर्चा करण्यात आली असून, नवीन सर्व समावेशक सूची सुचविण्यात आलेली आहे. परंतु याचा एकूणच दृष्टिकोन व्यावहारिक आहे. या अहवालात मानवी विकासाचा गेल्या तीन दशकांचा आढावा घेण्यात आलेला असून जास्तीत जास्त लोकांच्या कल्याणाच्या दृष्टिकोनातून आर्थिक वृध्दीचे नियोजन करण्याऱ्या जगातील १४ देशांच्या अनुभवाच्या विश्लेषणाचा समावेश आहे.

वरील बाबी केंद्रस्थानी असलेल्या या अहवालात १९९० मधील मानवी विकासाच्या पध्दतीचा, अर्थसंकल्पाच्या पुनर्रचना करण्यावर भर, खर्च (लष्करी खर्चाच्या समावेशासह) व मानवी विकासासाठी सहाय्यभूत ठरू शकणाऱ्या अशा आंतरराष्ट्रीय आर्थिक वातावरण निर्मिती इ. विचाराचा समावेश करण्यात आलेला आहे.

क) भारत व निवडक देशाची स्थिती- या अहवालात एकूण १३० देशातील मानव विकास निर्देशांकाची गणना करण्यात आलेली आहे. यामध्ये भारत देशांचा मानव विकास निर्देशांक ०.४३९ इतका आहे. यावरून भारत देश हा मानव विकास निर्देशांक कमी निर्देशांक असलेल्या देशांच्या यादीमध्ये समाविष्ट होतो. भारत देशाचा एकूण देशांच्या यादीमध्ये खालून ३७ वा क्रमांक लागतो. या अहवालानुसार उच्च मानव विकास निर्देशांक (विकसित देश) असलेले पहिले पाच देश जपान, स्वीडन, स्वित्झर्लंड, नेदरलँड व कॅनडा इ. असून निम्न

मानव निर्देशांक (अल्प विकसित) असलेले शेवटचे पाच देश चाड, सिअरा लेऑने, बुरकिना फॅसो, मालि व निगेर इ. आहेत.

४१. **युनायटेड नेशन डेव्हलपमेंट प्रोग्राम** (२०११)[४९] : "ह्यूमन् डिव्हेलपमण्ट रिपॉर्ट २०११" या अहवलात खालील बाबींवर प्रकाश टाकण्यात आलेला आहे.

अ) अहवालाचा मुख्य विषय (Theme)- शाश्वतता आणि समानता : सर्वांसाठी उत्तम भविष्य (Sustainability and Equity: A Better Future for All)

ब) थोडक्यात अहवालाचा दृष्टिक्षेप- जगातील सर्वाधिक गरीब, वंचित जनतेवर पर्यावरणाच्या ऱ्हासाचा कसा थेट परिणाम होत आहे, या लोकांकडे पुरेशी राजकीय शक्ती नाही की, जी राजकीय शक्तींना सकारात्मक निर्णय घेण्यास भाग पाडू शकेल. विशेषतः राष्ट्रीय पातळीवर मानव विकासासाठी, शाश्वतता आणि समानतेसाठी आवश्यक शक्ती एकत्रित होण्याच्या शक्यतेचाही उच्चार हा अहवाल करतो. आरोग्यपूर्ण पर्यावरण हा मानवाचा मूलभूत अधिकार आहे असे हा अहवाल आग्रहाने नमूद करतो. हा अहवाल वैश्विक विकास, आर्थिक आणि पर्यावरण नियंत्रण यासाठी साहसी उपाययोजनांचा की, ज्या आवश्यक आणि परवडणाऱ्या आहेत, त्यांचा पुरस्कार करतो.

क) भारत व निवडक देशांची स्थिती- या अहवालात एकूण १८७ देशातील मानव विकास निर्देशांकाची गणना करण्यात आलेली आहे. यामध्ये भारत देशांचा मानव विकास निर्देशांक ०.५४७ इतका आहे. यावरून भारत देश हा मानव विकास निर्देशांक मध्यम असलेल्या देशांच्या यादीमध्ये समाविष्ठ होतो. भारत देशाचा एकूण देशांच्या यादीमध्ये १३४ वा क्रमांक लागतो. या अहवालानुसार उच्च मानव विकास निर्देशांक (विकसित देश) असलेले पहिले पाच देश नॉर्वे, ऑस्टेलिया, नेदरलॅड, युएसए व न्यूझिलंड इ. असून निम्न मानव निर्देशांक (अल्प विकसित) असलेले शेवटचे पाच देश चाड, मोझांम्बिया,

बुरुनंडी, निगेर व कान्गो-डेमॉक्रेटिक इ. आहेत.

४२. **पाटील सुषमा** (२००९)[५०] : "नंदूरबार आदिवासी जिल्ह्यातील शासकीय पोष्ट बेसिक आश्रमशाळेतील कुमारावस्थेतील विद्यार्थीनींच्या गळतीची कारणे शोधणे व त्यावर शिफारशी सुचविणे" पुणे विद्यापीठास पीएच.डी. पदवीसाठीचा प्रबंध, पुणे विद्यापीठ, पुणे. या अभ्यासात नंदूरबार जिल्ह्यातील अदिवासीच्या सामाजिक दर्जा, आर्थिक व शैक्षणिक स्थिती यावर प्रकाश टाकला आहे. आदिवासी समाजातील लोकांची सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक स्थिती अंत्यत चिंताजनक असून याचा विपरीत परिणाम या लोकांच्या सर्वांगीण जीवनावर दिसून येतो. आदिवासी समाजात मुलींच्या शिक्षणाचा विकास झाला तर ही स्थिती बदलू शकते. या अभ्यासानुसार आदिवासी समाजातील शिक्षणासंबंधीत मराठी भाषा, रुढी परंपरा, सोई देऊनही संख्या कमी, शिक्षणाचा अभाव इ. समस्या आहेत. यामध्ये जनजागरण करुन शिक्षणाचे महत्त्व पटवून देण्यासंबंधीत शिफारस करण्यात आलेली आहे.

४३. **युनायटेड नेशन डेव्हलपमेंट प्रोग्राम** (२०१३)[५१] : "ह्यूमन् डिव्हेलपमण्ट रिपॉर्ट २०१३" – 'दक्षिणेचा उदय : एक वैविध्यपूर्ण जगातील मानवी प्रगती' या अहवलात जगात वेगाने वाढत जाणाऱ्या नवीन शक्ती आणि मानव विकासावरील दीर्घकालीन परिणाम यांचे विश्लेषण करण्यात आलेले आहे. हा अहवाल जगातील जवळपास ४० पेक्षा अधिक अशा देशांची ओळख करुन देतो, ज्या देशांनी मानव विकासाच्या दृष्टीने मागील दशकात चांगली प्रगती केलेली आहे. त्या देशांनी साधलेली ध्येय तसेच पुढील दशकातील त्यांच्यासमोरील आव्हाने यांचे विश्लेषण करतो. यातील प्रत्येक देशाला स्वतःचा अद्वितीय असा इतिहास आहे. या देशानी स्वतःची विकासाची विविध मार्ग निवडलेली असले तरीही यांची वैशिष्ट्ये व यांच्यासमोरील आव्हाने समान

प्रकारातील आहेत. हे देश एकमेकांशी संलग्न व स्वतंत्र आहेत. या अहवालातील कौशल्यपूर्ण विश्लेषणांच्या आधारे हा अहवाल जगातील देशांनी एकत्रितपणे, प्रमाणिकपणे व प्रभावीपणे मानव विकासातील आव्हानांना सामोरे जाणे गरजेचे आहे. या अहवालानुसार उच्च विकास गटातील पहिले पाच देशामध्ये नॉर्वे, ऑस्ट्रेलिया, युनायटेड स्टेट्स, नेदरलॅड व जर्मनी यांचा तर निम्न विकास गटातील पाच देशामध्ये कांगो, सोलोमन बेट, झाअटोम आणि प्रिंसिपे, केनिया व बांग्लादेश  या देशांचा क्रमांक लागतो.

संशोधकांने संशोधन विषयाच्या अनुषंगाने वरील विविध संदर्भ साहित्याचा आढावा घेतला असून उपरोक्त संदर्भीय साहित्यामध्ये मराठवाड्यातील हिंगोली, उस्मानाबाद व जालना, जिल्ह्यातील अनुक्रमे महिला साक्षरता प्रमाण कमी असणे, अर्भकमृत्यू प्रमाण अधिक असणे व दरडोई उत्पन्न कमी असणे या अनुषंगाने कारण मीमांसा करण्यात आलेली नाही त्यामुळे त्या अनुषंगाने संशोधन करणे आवश्यक आहे त्यामुळे सदरचे संशोधन हाती घेण्यात आलेले आहे.

थोडक्यात प्रस्तुत संशोधनासाठीची संशोधन पध्दती व संशोधनाच्या अनुषंगाने विचारात घेतलेल्या संदर्भ साहित्याचा आढावा या प्रकरणात घेण्यात आलेला आहे.

**संदर्भ :**

१. आगलावे प्रदिप (२०१०), 'सामाजिक संशोधन पध्दतीशास्त्र व तंत्रे', श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर, पृ. १०

२. Wilkinsin & Bhandarkar (1990), 'Methodology and Techniques of Social Research', Himalaya Publishing House, Bombay p. 16

३. आगलावे प्रदिप (२०१०), 'सामाजिक संशोधन पध्दतीशास्त्र व तंत्रे', श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर, पृ. १८

४. Thakur, Bevendra (1997), 'Research Methodology in Social Sciences', Deep and Deep Publishing House, New Delhi. p. 86

५. आगलावे प्रदिप (२०१०), 'सामाजिक संशोधन पध्दतीशास्त्र व तंत्रे', श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर, पृ. १८१

६. तत्रैव पृ. १८१

७. Wilkinsin & Bhandarkar (1990), 'Methodology and Techniques of Social Research', Himalaya Publishing House, Bombay p. 257

८. आगलावे प्रदिप (२०१०), 'सामाजिक संशोधन पध्दतीशास्त्र व तंत्रे', श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर, पृ. २९५

९. पाटील जे. एफ. (२०१०), 'सुर्वणमहोत्सवी महाराष्ट्राची बदलती अर्थव्यवस्था', सकाळ प्रकाशन, पुणे. पृ १८-४०

१०. तत्रैव पृ. ४१-५७

११. तत्रैव पृ. ८८-१०७

१२. Bhide Manoj B. (2007) **:** 'A Statistical study of Human Development Index of Maharashtra state for the period of 1991 to 2001', Ph.D. Theses, S.R.T.M. University, Nanded.

१३. महाराष्ट्र शासन (२००२), 'मानव विकास अहवाल महाराष्ट्र २००२', नियोजन विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई.

१४. Thakur Anil Kumar (2011), Challenges of Inclusive Growth, Issues on 'Enhancing Human Resources for Inclusive Growth, Employment and Welfare', The Indian Economic Journal, The Indian Economics Association Publication, Pathna, Bihar. P 25-39

१५. Ibid. p. 59-68

१६. Ibid. p. 232-244

१७. Ibid. p. 609-616

१८. Ibid. p. 617-623

१९. Ibid. p. 642-647

२०. Ibid. p. 648-658

२१. Thakur Anil Kumar (2011), Challenges of Inclusive Growth, Issues on 'Market Reforms for Efficiency and Inclusiveness', The Indian Economic Journal, The Indian Economics Association Publication, Pathna, Bihar. P 21-30

२२. Thakur Anil Kumar (2011), Challenges of Inclusive Growth, Issues on 'Enhancing Human Resources for Inclusive Growth, Employment and Welfare', The Indian Economic Journal, The Indian Economics Association Publication, Pathna, Bihar. P 161-176

२३. Government of India (2002), 'National Human Development Report 2001', Planning Commission, Government of India, New Delhi.

२४. Government of India (2011), 'India Human Development Report 2011', Institute of Applied Manpower Research, Planning Commission, Government of India, Oxford University Press, New Delhi.

२५. Municipal Corporation of Greater Mumbai (2009), 'Mumbai Human Development Report 2009', Oxford University Press, New Delhi.

२६. Center for Women and Children (2010), 'Research Abstracts on Education 1998-2009', Center for Women and Children, National Institute of Public Cooperation and Child Development, New Delhi. P. 15

२७. Ibid. p. 17

२८. Ibid. p. 18

२९. Ibid. p. 34

३०. Ibid. p. 36

३१. Government of Uttar Pradesh (2008), 'Uttar Pradesh Human Development Report 2008', Government of Uttar Pradesh.

३२. Government of Chhattisgarh (2005), 'Chhattisgarh Human Development Report 2005'. Government of Chhattisgarh, Chhattisgarh.

३३. Thakur Anil Kumar (2011), Challenges of Inclusive Growth, Issues on 'Enhancing Human Resources for Inclusive Growth, Employment and Welfare', The Indian Economic Journal, The Indian Economics Association Publication, Pathna, Bihar. P 79-86

३४. Thakur Anil Kumar (2011), Challenges of Inclusive Growth, Issues on 'Market Reforms for Efficiency and Inclusiveness', The Indian Economic Journal, The Indian Economics Association Publication, Pathna, Bihar. P 31-74

३५. Government of Punjab (2004), 'Human Development Report 2004 Punjab', Government of Punjab, Chandigarh.

३६. Government of Orissa (2004), 'Human Development Report 2004 Orissa', Planning and Coordination Department, Government of Orissa, Bhubaneswar

३७. Government of West Bengal (2004), 'West Bengal Human Development Report 2004', Government of West Bengal, Kolkata.

३८. Government of Arunachal Pradesh (2005), 'Arunachal Pradesh Human Development Report 2005', Department of Planning, Government of Arunachal Pradesh, Itanagar

३९. Government of Kerala (2005), 'Human Development Report 2005 Kerala', Centre for Development Studies, Thiruvananthapuram.

४०. Government of Madhya Pradesh (1995), 'Madhya Pradesh Human Development Report 1995', Government of Madhya Pradesh, Bhopal

४१. Government of Karnataka (1999), 'Karnataka Human Development Report 1999', Planning department, Government of Karnataka, Bangalore

४२. Government of Himachal Pradesh (2002), 'Himachal Pradesh Human Development Report 2002', Government of Himachal Pradesh, Himachal Pradesh.

४३. Government of Assam (2003), 'Assam Human Development Report 2003', Planning & Development Department, Government of Assam, Guwahati.

४४. Government of Tamil Nadu (2003), 'Tamil Nadu Human Development Report 2003', Government of Tamil Nadu, Madras

४५. Government of NCT of Delhi (2006), 'Delhi Human Development Report 2006', Government of National Capital Territory of Delhi, Oxford University Press, New Delhi

४६. Government of Gujarat (2004), 'Gujarat Human Development Report 2004', Mahatma Gandhi Labour Institute, Ahmedabad

४७. Government of Nagaland (2005), 'Nagaland State Human Development Report 2004', Department of Planning & Coordination, Government of Nagaland.

४८. United Nations Development Programme (1990), 'Human Development Report 1990', UNDP, New York, USA.

५९ United Nations Development Programme (2011), 'Human Development Report 2011', Sustainability and Equity: A Better Future for all, UNDP, New York, USA.

५० पाटील सुषमा (२००९), 'नंदूरबार आदिवासी जिल्ह्यातील शासकीय पोष्ट बेसिक आश्रमशाळेतील कुमारावस्थेतील विद्यार्थ्योनींच्या गळतीची कारणे शोधणे व त्यावर शिफारशी सुचविणे', पीएच.डी. प्रबंध, पुणे विद्यापीठ, पुणे.

५१ United Nations Development Programme (2013), 'Human Development Report 2013, The Rise of the South: Human Progress in a diverse world', UNDP, New York, USA.

***

# प्रकरण -५

# हिंगोली जिल्ह्यातील महिला साक्षरतेसंबंधी माहितीचे विश्लेषण

## ५.१ प्रस्तावना :

मानव विकासाच्या गणनेतील एक महत्वाचा घटक म्हणजे ज्ञानप्राप्ती होय. मानवाच्या ज्ञान प्राप्तीची स्थिती मापनासाठीच्या मानकामध्ये साक्षरता व संयुक्त पटनोंदणी प्रमाण/सरासरी शिक्षणाचा कालावधी या निर्देशकांचा समावेश आहे. हिंगोली जिल्ह्याच्या साक्षरता दराचा विचार करता असे निदर्शनास येते की, एकूण साक्षरतेच्या प्रमाणात नेहमीच महिला साक्षरतेचे प्रमाण कमी आढळून येते. पर्यायाने जिल्ह्यांच्या एकूण साक्षरतेच्या प्रमाणावर त्याचा परिणाम होतो. ही बाब विचारात घेता महिला साक्षरतेचे प्रमाण वाढविणे आवश्यक आहे. जेणेकरुन महिला साक्षरतेच्या प्रमाणासोबतच एकूण साक्षरतेच्या प्रमाणात देखील वाढ दिसून येईल. पर्यायाने मानव विकास निर्देशांक वाढण्यास मदत होईल. त्यामुळे हिंगोली जिल्ह्यातील महिला साक्षरतेचे प्रमाण कमी असल्याचा कारणांचा शोध घेणे अगत्याचे ठरते.

हिंगोली जिल्ह्यातील महिला साक्षरतेचे प्रमाण कमी असल्याच्या कारणांचा शोध घेण्यासाठी या जिल्ह्यातील महिला साक्षरतेसंबंधित दुय्यम स्त्रोताकडे उपलब्ध माहितीचा व प्राथमिक माहितीचा वापर करण्यात आला आहे. प्राथमिक माहिती संकलनासाठी सन २००१ च्या जनगणनेनुसार जिल्ह्यातील सर्वाधिक महिला साक्षरतेचे प्रमाण असलेला व सर्वात कमी महिला साक्षरतेचे प्रमाण असलेला तालुक्याची निवड करण्यात आली. यामध्ये अनुक्रमे कळमनुरी व औंढा नागनाथ या तालुक्यांचा समावेश होतो. अभ्यास कालावधी हा सन २०००-०१ ते २००९-१० असल्यामुळे या दोन तालुक्यातील १५ ते २९ वयोगटातील १८० साक्षर व १८० निरक्षर अशा दोन्ही

प्रकारची शैक्षणिक स्थिती असलेल्या एकूण ३६० महिलांकडून प्राथमिक स्वरुपाच्या माहितीचे संकलन करण्यात आले.

या ३६० प्रतिसादकांपैकी दोन्ही तालुक्यातून १६० प्रतिसादक हे अविवाहित असून २०० प्रतिसादक हे विवाहित आहेत. या ३६० प्रतिसादकामध्ये अनुसूचित जमात ४६, अनुसूचित जाती १३९, इतर मागासवर्ग ९, भटक्या जमाती ३७, विमुक्त जाती ३१, विशेष मागास प्रवर्ग ०१, अल्पसंख्याक ०१ व सर्वसाधारण ९६ अशा संवर्गातील प्रतिसादकांचा समावेश आहे. तसेच १३५ प्रतिसादक हे दारिद्र्यरेषेच्या खालील असून २२५ प्रतिसादक दारिद्र्यरेषेच्या वर आहेत.

## ५.२ प्रकरणाची रुपरेषा :

हिंगोली जिल्ह्यातील महिला साक्षरतेच्या संदर्भातील माहितीचे विशेषण या प्रकरणात करण्यात आले आहे. या प्रकरणाची रचना प्रामुख्याने तीन टप्प्यांत करण्यात आलेली आहे. यामधील पहिल्या टप्प्यामध्ये हिंगोली जिल्ह्यातील महिला साक्षरतेसंबंधी उपलब्ध दुय्यम माहितीचे विश्लेषण करण्यात आलेले आहे. दुसऱ्या टप्प्यामध्ये औंढा नागनाथ व कळमनुरी तालुक्यातील ३६० प्रतिसादकांच्या सामाजिक पार्श्वभूमी संबंधित माहितीचे विश्लेषण केले आहे. तिसऱ्या व प्रकरणाच्या अंतिम टप्यात हिंगोली जिल्ह्यातील महिलाच्या साक्षरतेचे प्रमाण कमी असण्याच्या कारणांची मीमांसा मुख्य घटक विश्लेषण पध्दती (Principal Componant Analysis) या चाचणीद्वारे केले आहे.

## ५.३ दुय्यम स्त्रोतांमार्फत संकलित माहितीचे विश्लेषण :

हिंगोली जिल्ह्यातील महिला साक्षरतेच्या कारणांची मीमांसा करताना जिल्ह्यातील विविध शासकीय यंत्रणा यांच्याकडे उपलब्ध माहितीचे विश्लेषण करणे महत्वाचे ठरते. महिला साक्षरतेच्या अनुषंगाने विविध प्रकारच्या दुय्यम माहितीचे विश्लेषण खालील प्रमाणे केले आहे.

**५.३.१ शिक्षणातील महिलांचा सहभाग :**

महाराष्ट्रातील प्राथमिक व माध्यमिक शिक्षणातील सन १९६० ते २०१० या कालावधीतील महिलांचा सहभाग खालील तक्ता क्र. ५.१ मध्ये दर्शविण्यात आलेला आहे.

**तक्ता क्र. ५.१**
**महाराष्ट्रातील शिक्षणातील महिलांचा सहभाग**

| जनगणना वर्ष | एकूण प्राथमिक विद्यार्थ्यांमध्ये मुलींचे प्रमाण | एकूण माध्यमिक विद्यार्थ्यांमध्ये मुलींचे प्रमाण |
|---|---|---|
| १९६० | ३५.८ | २६.८ |
| १९६५ | ३७.८ | २८.७ |
| १९७० | ३९.३ | ३०.६ |
| १९७५ | ४१.३ | ३४.१ |
| १९८० | ४३ | ३६ |
| १९८५ | ४४.७ | ३७.३ |
| १९९० | ४६ | ४०.६ |
| १९९५ | ४७.५ | ४३.७ |
| २००८ | ४७.४ | ४८.१ |
| २०१० | ४७ | ------ |

संदर्भ : शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

वरील तक्ता क्र. ५.१ वरुन असे दिसते की, सन १९६० पासून २०१० पर्यंत प्राथमिक व माध्यमिक शिक्षणातील मुलींचे प्रमाण वाढत गेलेले आहे. प्राथमिक शिक्षणातील हे प्रमाण ३५.८ वरुन ४७ पर्यंत व माध्यमिक शिक्षणामध्ये २६.८ वरुन ४८.१ पर्यंत पोहचले असले तरी, मागील ६० वर्षांच्या दीर्घ कालखंडात मुलींचा शिक्षणातील सहभाग ५० टक्के पर्यंत प्राप्त करु शकलो नाही.

### ५.३.२ हिंगोली जिल्ह्यातील साक्षरता प्रमाण :

हिंगोली जिल्ह्यातील सन १९५१ ते २०११ पर्यतची हिंगोली जिल्ह्यातील एकूण साक्षरता तसेच १९९१ ते २०११ पर्यतच्या महिलासाक्षरतेचे प्रमाण खालील तक्ता क्र. ५.२ मध्ये दर्शविण्यात आलेले आहे.

**तक्ता क्र. ५.२**

**हिंगोली जिल्ह्यातील महिला साक्षरतेचे प्रमाण**

| जनगणना वर्ष | साक्षरता प्रमाण | महिला साक्षरता प्रमाण |
|---|---|---|
| १९५१ | ७.४०* | --- |
| १९६१ | १७.३७* | --- |
| १९७० | २४.३१* | --- |
| १९८१ | ३०.३३* | --- |
| १९९१ | ४७.५८* | २९.४१* |
| २००१ | ६६.८६ | ५१.१७ |
| २०११ | ७६.०४ | ६४.७३ |

संदर्भ : जनगणना सन १९५१-२०११

(*परभणी व हिंगोली हे दोन्ही जिल्हे मिळून)

वरील तक्ता क्र. ५.२ वरुन असे दिसते की, सन १९५१ पासून ते २०११ पर्यंत हिंगोली जिल्ह्यातील एकूण साक्षरतेचे प्रमाण वाढत गेलेले आहे. सन १९९१ नंतर मात्र हे प्रमाण अधिक मोठ्या प्रमाणात वाढत गेलेले आहे. १९८१ ते १९९१ या कालावधीत हे प्रमाण १७.२५ नी वाढलेले आहे. ११९१ ते २००१ या दशकामध्ये हे प्रमाण १९.२८ इतकेच वाढलेले आहे. तर २००१ ते २०११ या दशकात केवळ ९.१८ इतकी वाढ झालेली आहे.

वरील तक्ता क्र. ५.२ वरुन असे स्पष्ट होते की, हिंगोली जिल्ह्यातील महिला साक्षरता प्रमाणामध्ये सन १९९१ ते २०११ मध्ये सकारात्मक वाढ झालेली आहे. त्यामध्ये १९९१ ते २००१ या दशकामध्ये महिला साक्षरता प्रमाणात २१.७६ इतकी वाढ झालेली असून २००१ ते २०११ या दशकामध्ये केवळ १३.५६ इतकी वाढ झालेली आहे. यामध्ये सन २००१ च्या जनगणने नुसार हिंगोली जिल्ह्यातील पुरुष व महिला साक्षरता प्रमाणामधील फरक हा २९.५४ होता तर २०११ मध्ये तो २२.०० वर पोहचलेला आहे.

थोडक्यात असे म्हणता येईल की, हिंगोली जिल्ह्यातील एकूण व महिला साक्षरता प्रमाणामध्ये वाढ झालेली असून स्त्री व पुरुष साक्षरता प्रमाण यातील दरी कमी होत आहे.

### ५.३.३ हिंगोली जिल्ह्यातील तालुकानिहाय शाळांची स्थिती :

हिंगोली जिह्यातील सन २००३ ते २००९-१० या कालावधीतील प्राथमिक व माध्यमिक शाळांची आकडेवारी खालील तक्ता क्र. ५.३ मध्ये दर्शविलेली आहे.


**तक्ता क्र. ५.३**
**हिंगोली जिल्ह्यातील तालुकानिहाय शाळेची स्थिती**

| तालुक्याचे नांव | २००३-०४ | २००४-०५ | २००५-०६ | २००६-०७ | २००७-०८ | २००८-०९ | २००९-१० |
|---|---|---|---|---|---|---|---|
| हिंगोली | १९९ | १९९ | २०६ | १७५ | २०४ | २१४ | २२३ |
| सेनगांव | १७६ | १७६ | १७८ | १७८ | १९० | २०३ | १९९ |
| वसमत | २०९ | २०९ | २१२ | २१२ | २१५ | २२४ | २३० |
| कळमनुरी | २१५ | २१५ | २१२ | २१२ | २२१ | २३२ | २४५ |
| औंढा नागनाथ | १७० | १७० | १६४ | १६४ | १६८ | १७८ | १८२ |
| **एकूण** | ९६९ | ९६९ | ९७२ | ९४१ | ९९८ | १०५१ | १०७९ |

संदर्भ : DIES 2010-11 & SEMI 2008-9

वरील तक्ता क्र. ५.३ वरुन असे दिसते की, हिंगोली जिल्ह्यातील प्राथमिक व माध्यमिक शाळांमध्ये सन २००३-०४ पासून २००९-१० पर्यत वाढ झालेली आहे. यामध्ये सन २००३-०४ व २००४-०५ मध्ये एकूण शाळांची संख्या ९६९ इतकीच होती तर २००५-०६ मध्ये मात्र त्यात केवळ ३ शाळांची भर पडलेली असून एकूण शाळांची संख्या ९७२ इतकी झाली. सन २००५-०६ च्या तुलनेत सन २००६-०७ मध्ये एकूण शाळांच्या संख्येत ३१ शाळांनी घट झालेली आहे. कारण, हिंगोली तालुक्यातील एकूण शाळेच्या संख्येत झालेली घट होय. सन २००७-०८ पासून सन २००९-१० पर्यत मात्र एकूण शाळेच्या संख्येत अनुक्रमे ९९८, १०५१, १०७९ अशी वाढ झालेली आहे. कळनमुरी व औंढा नागनाथ तालुक्यांचा विचार करता असे दिसते की, २००५-०६ व २००६-०७ मध्ये मागील वर्षाच्या तुलनेत अनुक्रमे ३ व ६ इतकी शाळांची संख्या घटलेली आहे. कळमनुरी तालुक्यामध्ये सन २००७-०८ पासून २००९-१० मध्ये अनुक्रमे ९,११,१३ इतक्या शाळांची वाढ झालेली आहे तर औंढा नागनाथ तालुक्यामध्ये ९,१०,४ इतक्या शाळांची वाढ झालेली आहे.

**आकृती क्र. ५.१**
**हिंगोली जिल्ह्यातील तालुकानिहाय शाळेची स्थिती**



वरील आकृती ५.१ वरुन असे दिसते की, हिंगोली जिल्ह्यात सन २००६-०७ मध्ये एकूण शाळांच्या संख्येत घट झालेली असून सन २००७-०८ पासून सन २००९-१० पर्यंत एकूण शाळांच्या संख्येत वाढ झालेली आहे.

### ५.३.४ हिंगोली जिल्ह्यातील तालुकानिहाय शाळेत पटनोंदणी झालेल्या मुलींची स्थितीः

हिंगोली जिह्यातील सन २००३ ते २००९-१० या कालावधीतील प्राथमिक व माध्यमिक शाळेमध्ये पटनोंदणी केलेल्या एकूण मुलींची संख्या खालील तक्ता क्र. ५.४ मध्ये दर्शविलेली आहे.

**तक्ता क्र. ५.४**
**हिंगोली जिल्ह्यातील तालुक्यातील शाळेतील मुलींची पटनोंदणी स्थिती**

| तालुक्याचे नांव | २००३-०४ | २००४-०५ | २००५-०६ | २००६-०७ | २००७-०८ | २००८-०९ | २००९-१० |
|---|---|---|---|---|---|---|---|
| हिंगोली | २००३१ | १५४१५ | २३२९९ | १४८६९ | २०६०० | २१६५३ | २०६७० |
| सेनगांव | १३४९५ | ११०२० | १२९०८ | १२६६८ | १३६९२ | १५१२० | १४६५४ |
| वसमत | २४५२८ | २२८१९ | २३०७९ | २२४४४ | २३२०३ | २३७०३ | २२६४८ |
| कळमनुरी | १७२३९ | १३४१५ | १६६९६ | १५५३७ | १७०९३ | १७५८८ | १७६७५ |
| औंढा नागनाथ | १२७७७ | १०९४९ | १२६०४ | १२४१२ | १३१९३ | १३१५७ | १२३७८ |
| **एकूण** | ८८०७० | ७३६१८ | ८८५८६ | ७७९३० | ८७७८१ | ९१२२१ | ८८०२५ |


संदर्भ : DIES 2010-11 & SEMI 2008-9

वरील तक्ता क्र. ५.४ वरुन असे दिसते की, हिंगोली जिल्ह्यातील प्राथमिक व माध्यमिक शाळांमध्ये सन २००३-०४ पासून २००९-१० पर्यत मुलींच्या पटनोंदणीमध्ये चढ उतार आहे. सन २००३-०४ च्या तुलनेत सन २००४-०५ मध्ये एकूण मुलींच्या पटनोंदणीमध्ये १४४५२ इतकी घट झालेली आहे. या वर्षामध्ये हिंगोली जिल्ह्यातील सर्वच तालुक्यामधील मुलींच्या पटनोंदणीत घट झालेली दिसून येते. सन

२००४-०५ च्या तुलनेत सन २००५-०६ मध्ये मुलींच्या पटनोंदणीत १४९६८ इतकी वाढ झालेली आहे. सन २००४-०५ च्या तुलनेत सन २००६-०७ मध्ये मुलींच्या पटनोंदणीमध्ये १०६३८ इतकी घट झालेली आहे. सन २००७-०८ व २००८-०९ मध्ये अनुक्रमे ९८५१ व ३४४० इतकी वाढ झालेली आहे. सन २००८-०९ च्या तुलनेत सन २००९-१० मध्ये ३१९६ इतकी घट झालेली आहे.

**आकृती क्र. ५.२**

**हिंगोली जिल्ह्यातील तालुक्यातील शाळेतील मुलींची पटनोंदणी स्थिती**




वरील आकृती क्र. ५.२ वरुन असे दिसते की, हिंगोली जिह्यातील प्राथमिक व माध्यमिक शाळेमध्ये सन २००७-०८ व २००८-९ मध्ये मुलींच्या पटनोंदणीमध्ये उल्लेखनीय वाढ झालेली असून सन २००४-०५ व २००६-०७ मध्ये मात्र उल्लेखनीय घट झालेली दिसून येते. सन २००९-१० मध्ये मुलींच्या पटनोंदणीमध्ये सन २००८-०९ च्या तुलनेत घट झालेली दिसून येते.

## ५.४ प्राथमिक स्त्रोतांमार्फत संकलित माहितीचे विश्लेषण : सामाजिक पार्श्वभूमीः

हिंगोली जिल्ह्यातील औंढा नागनाथ व कळमनुरी तालुक्यातील साक्षर व निरक्षर महिलांच्या सर्वेक्षणातून प्राप्त झालेल्या प्राथमिक माहितीच्या आधारे या दोन्ही तालुक्यातील महिलांच्या सामाजिक पार्श्वभूमीचे विश्लेषण खालील प्रमाणे करण्यात आलेले आहे.

### ५.४.१ महिलांची वैवाहिक स्थिती :

औंढा नागनाथ व कळमनुरी तालुक्यातील एकूण ३६० महिलांच्या वैवाहिक स्थितीशी निगडीत आकडेवारी खालील क्र. ५.५ मध्ये देण्यात आलेली आहे.

**तक्ता क्र. ५.५**

**औंढा नागनाथ व कळमनुरी तालुक्यातील महिलांची वैवाहिक स्थिती**

| | औंढा नागनाथ | | | | | | कळमनुरी | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | अविवाहित | | विवाहित | | एकूण | | अविवाहित | | विवाहित | | एकूण | |
| | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी |
| निरक्षर | २० | २२.२ | ७० | ७७.७ | ९० | १००.० | २९ | ३२.२ | ६१ | ६७.७ | ९० | १००.० |
| साक्षर | ५७ | ६३.३ | ३३ | ३६.६ | ९० | १००.० | ५४ | ६०.० | ३६ | ४०.० | ९० | १००.० |

संदर्भ : प्रस्तुत अभ्यासाकरिता केलेले प्राथमिक सर्वेक्षण

वरील तक्ता क्र. ५.५ वरुन असे स्पप्ट होते की, औंढा नागनाथ तालुक्यातील निरक्षर महिलामध्ये अविवाहित महिलाचे प्रमाण २२.२ टक्के आहे, तर विवाहित महिलांचे प्रमाण ७७.७ टक्के आहे. साक्षर महिलांमध्ये अविवाहित महिलांचे प्रमाण ६३.३ टक्के आहे, तर विवाहित महिलांचे प्रमाण ३६.३ टक्के आहे.

कळमनुरी तालुक्यातील निरक्षर महिलांमध्ये अविवाहित महिलाचे प्रमाण ३२.२ टक्के आहे, तर विवाहित महिलांचे प्रमाण ६७.७ टक्के आहे. साक्षर महिलांमध्ये अविवाहित महिलांचे प्रमाण ६० टक्के आहे, तर विवाहित महिलांचे प्रमाण ४० टक्के आहे.

थोडक्यात निरक्षर अविवाहित महिलांचे प्रमाण कळमनुरी तालुक्यात अधिक आहे. तर साक्षर अविवाहित महिलांचे प्रमाण औंढा नागनाथ तालुक्यात अधिक आहे. निरक्षर विवाहित महिलांचे प्रमाण औंढा नागनाथ तालुक्यात अधिक आहे. साक्षर विवाहित महिलांचे प्रमाण कळमनुरी तालुक्यात अधिक आहे.

### ५.४.२ महिलांच्या दारिद्र्य रेषेसंदर्भातील स्थिती :

हिंगोली जिल्ह्यातील औंढा नागनाथ व कळमनुरी तालुक्यातील साक्षर व निरक्षर महिलांच्या दारिद्र्यरेषेसंबधित माहिती पुढील तक्त्यात देण्यात आलेली आहे.

**तक्ता क्र. ५.६**

**औंढा नागनाथ व कळमनुरी तालुक्यातील महिलांच्या दारिद्र्य रेषेसंदर्भातील स्थिती**

| प्रकार | औंढा नागनाथ | | | | | | कळमनुरी | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | होय | | नाही | | एकूण | | होय | | नाही | | एकूण | |
| | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी |
| निरक्षर | २४ | २६.६ | ६६ | ७३.३ | ९० | १००.० | २४ | २६.६ | ६६ | ७३.३ | ९० | १००.० |
| साक्षर | २७ | ३०.० | ६३ | ७०.० | ९० | १००.० | ६० | ६६.६ | ३० | ३३.३ | ९० | १००.० |

संदर्भ : प्रस्तुत अभ्यासाकरिता केलेले प्राथमिक सर्वेक्षण


वरील तक्ता क्र. ५.६ वरुन असे दिसते की, औंढा नागनाथ तालुक्यात निरक्षर महिलांच्या तुलनेत साक्षर महिलांचे दारिद्र्यरेषेखालील प्रमाण अधिक आहे. यामध्ये २६.६ टक्के निरक्षर महिला दारिद्र्यरेषेखाली आहेत. ७३.३ टक्के महिला दारिद्र्यरेषेच्या वर आहेत. साक्षर महिलांमध्ये ३० टक्के महिला दारिद्र्यरेषेखाली आहेत. तर ७० टक्के महिला दारिद्र्यरेषेच्या वर आहेत.

कळमनुरी तालुक्यात निरक्षर महिलांच्या तुलनेत साक्षर महिलांचे दारिद्र्यरेषेखालील प्रमाण अधिक आहे. यामध्ये २६.६ टक्के निरक्षर महिला दारिद्र्यरेषेखाली आहेत. ७३.३ टक्के महिला दारिद्र्यरेषेच्या वर आहेत. साक्षर महिलामध्ये ६६.६ टक्के महिला दारिद्र्यरेषेखाली आहेत. तर ३३.३ टक्के महिला दारिद्र्यरेषेच्या वर आहेत.

थोडक्यात दोन्ही तालुक्यातील निरक्षर महिलांच्या बाबत दारिद्र्यरेषेखाली असलेल्या व दारिद्र्यरेषेच्या वर असलेल्या महिलांचे प्रमाण सारखेच आहे. तर साक्षर महिलांच्याबाबत कळमनुरी तालुक्यातील दारिद्र्यरेषेखालील महिलांचे प्रमाण अधिक आहे.

**आकृती क्र. ५.३**

**औंढा नागनाथ व कळमनुरी तालुक्यातील महिलांच्या दारिद्र्य रेषेसंदर्भातील स्थिती**




वरील आकृती ५.३ वरुन असे स्पष्ट होते की, दोन्ही तालुक्यातील निरक्षर महिलांच्या बाबत दारिद्र्यरेषेखाली असलेल्या व दारिद्र्यरेषेच्या वर असलेल्या महिलांचे प्रमाण सारखेच आहे. तर, साक्षर महिलाच्या बाबत कळमनुरी तालुक्यातील दारिद्र्यरेषेखालील महिलांचे प्रमाण अधिक आहे.

### ५.४.३ महिलांच्या विवाहाच्या वयाची स्थिती :

हिंगोली जिल्ह्यातील औंढा नागनाथ व कळमनुरी तालुक्यातील साक्षर व निरक्षर महिलांच्या वैवाहिक वयाची माहिती पुढील तक्ता क्र. ५.७ व ५.८ मध्ये देण्यात आलेली आहे.

**तक्ता क्र. ५.७**

**औंढा नागनाथ तालुक्यातील महिलांच्या वैवाहिक वयाची स्थिती**

| प्रकार | औंढा नागनाथ | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | लागू नाही | | १८ वर्षापेक्षा कमी | | १८ व्या वर्षी व त्यापेक्षा अधिक | | एकूण | |
| | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी |
| निरक्षर | २० | २२.२ | ५६ | ६२.२ | १४ | १५.५ | ९० | १००.० |
| साक्षर | ५७ | ६३.३ | २९ | ३२.२ | ४ | ४.४ | ९० | १००.० |

संदर्भ : प्रस्तुत अभ्यासाकरिता केलेले प्राथमिक सर्वेक्षण

वरील तक्ता क्र. ५.७ वरुन असे दिसते की, औंढा नागनाथ तालुक्यामध्ये वयवर्षे १८ पेक्षा कमी वयात विवाह झालेल्या निरक्षर महिलांचे प्रमाण ६२.२ टक्के आहे. वयवर्षे १८ व त्यापेक्षा अधिक वयात विवाह झालेल्या निरक्षर महिलांचे प्रमाण १५.५ टक्के आहे. तर लागू नसलेल्या म्हणजेच अविवाहित निरक्षर महिलांचे प्रमाण २२.२ टक्के आहे.

वयवर्षे १८ पेक्षा कमी वयात विवाह झालेल्या साक्षर महिलांचे प्रमाण ३२.२ टक्के आहे. वयवर्ष १८ व त्यापेक्षा अधिक वयात विवाह झालेल्या साक्षर महिलांचे प्रमाण केवळ ४.४ टक्के आहे. तर अविवाहित साक्षर महिलांचे प्रमाण ६३.३ टक्के आहे.

**तक्ता क्र. ५.८**

**कळमनुरी तालुक्यातील महिलांच्या वैवाहिक वयाची स्थिती**

| प्रकार | कळमनुरी | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | लागू नाही | | १८ वर्षापेक्षा कमी | | १८ व्या वर्षी व त्यापेक्षा अधिक | | एकूण | |
| | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी |
| निरक्षर | २९ | ३२.२ | ३ | ३.३ | ५८ | ६४.४ | ९० | १००.० |
| साक्षर | ५४ | ६०.० | ० | ०.० | ३६ | ४०.० | ९० | १००.० |


संदर्भ : प्रस्तुत अभ्यासाकरिता केलेले प्राथमिक सर्वेक्षण

वरील तक्ता क्र. ५.८ वरुन असे दिसते की, कळमनुरी तालुक्यामध्ये वयवर्ष १८ पेक्षा कमी वयात विवाह झालेल्या निरक्षर महिलांचे प्रमाण ३.३ टक्के आहे. वयवर्ष १८ व त्यापेक्षा अधिक वयात विवाह झालेल्या निरक्षर महिलांचे प्रमाण ६४.४ टक्के आहे. तर लागू नसलेल्या म्हणजेच अविवाहित निरक्षर महिलांचे प्रमाण ३२.२ टक्के आहे.

वयवर्ष १८ पेक्षा कमी वयात विवाह झालेल्या साक्षर महिलांचे प्रमाण ०० टक्के आहे. वयवर्ष ४० व त्यापेक्षा अधिक वयात विवाह झालेल्या साक्षर महिलांचे प्रमाण केवळ ४.४ टक्के आहे. तर अविवाहित साक्षर महिलांचे प्रमाण ६० टक्के आहे.

**आकृती क्र. ५.४**

**औंढा नागनाथ व कळमनुरी तालुक्यातील महिलांच्या वैवाहिक वयाची स्थिती**




वरील आकृती क्र. ५.४ वरुन असे दिसते की, औंढा नागनाथ तालुक्याच्या तुलनेत कळमनुरी तालुक्यातील निरक्षर अविवाहित महिलांचे प्रमाण अधिक आहे. तर कळमनुरी तालुक्याच्या तुलनेत औंढा नागनाथ तालुक्यात साक्षर अविवाहित महिलांचे प्रमाण अधिक आहे. वयवर्ष १८ पेक्षा कमी वयात विवाह झालेल्या निरक्षर महिलांचे प्रमाण कळमनुरी तालुक्याच्या तुलनेत औंढा नागनाथ तालुक्यात अधिक आहे. तर साक्षर महिलांमध्ये वयवर्षे १८ पेक्षा कमी वयात विवाह झालेल्या महिलांचे प्रमाण कळमनुरी तालुक्यात ०० टक्के आहे. वयवर्ष १८ व त्यापेक्षा अधिक वयात विवाह

झालेल्या निरक्षर व साक्षर या दोन्ही प्रकारातील महिलांचे प्रमाण औंढा नागनाथ तालुक्याच्या तुलनेत कळमनुरी तालुक्यात अधिक आहे.

### ५.४.४ महिलांच्या आईची शैक्षणिक स्थिती :

हिंगोली जिल्ह्यातील औंढा नागनाथ व कळमनुरी तालुक्यातील साक्षर व निरक्षर महिलांच्या आईच्या शैक्षणिक स्थितीची माहिती पुढील तक्ता क्र. ५.९ मध्ये देण्यात आलेली आहे.

**तक्ता क्र. ५.९**

**औंढा नागनाथ व कळमनुरी तालुक्यातील महिलांच्या आईची शैक्षणिक स्थिती**

| प्रकार | औंढा नागनाथ | | | | | | कळमनुरी | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | होय | | नाही | | एकूण | | होय | | नाही | | एकूण | |
| | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी |
| निरक्षर | ३ | ३.३ | ८७ | ९६.६ | ९० | १००.० | ४३ | ४७.७ | ४७ | ५२.२ | ९० | १००.० |
| साक्षर | ३३ | ३६.६ | ५७ | ६३.३ | ९० | १००.० | ८६ | ९५.५ | ४ | ४.४ | ९० | १००.० |


संदर्भ : प्रस्तुत अभ्यासाकरिता केलेले प्राथमिक सर्वेक्षण

वरील तक्ता क्र. ५.९ वरुन असे स्पष्ट होते की, औंढा नागनाथ तालुक्यामध्ये ३.३ टक्के निरक्षर महिलांची आई साक्षर आहे. तर ९६.६ टक्के महिलांची आई निरक्षर आहे. तर याच तालुक्यातील साक्षर महिलांमध्ये ३६.६ टक्के महिलांची आई साक्षर आहे, तर ६३.३ टक्के महिलांची आई निरक्षर आहे.

कळमनुरी तालुक्यामध्ये ४७.७ टक्के निरक्षर महिलांची आई साक्षर आहे. तर ५२.२ टक्के महिलांची आई निरक्षर आहे. याच तालुक्यातील साक्षर महिलांमध्ये ९५.५ टक्के महिलांची आई साक्षर आहे, तर केवळ ४.४ टक्के महिलांची आई निरक्षर आहे. वरील तक्ता क्र. ५.७ वरुन असे दिसते की, औंढा नागनाथ तालुक्याच्या तुलनेत कळमनुरी तालुक्यामध्ये साक्षर आई असलेल्या महिलांचे प्रमाण अधिक आहे.

**आकृती क्र. ५.५**

**औंढा नागनाथ व कळमनुरी तालुक्यातील महिलांच्या आईची शैक्षणिक स्थिती**




वरील आकृती क्र. ५.५ वरुन असे दिसते की, औंढा नागनाथ तालुक्याच्या तुलनेत कळमनुरी तालुक्यातील साक्षर आई असलेल्या महिलांचे प्रमाण अधिक आहे. कळमनुरी तालुक्यामध्ये ज्या महिला साक्षर आहेत त्यांची आई साक्षर नसल्याचे प्रमाण केवळ ४.४ टक्के आहे. तर हेच प्रमाण औंढा नागनाथ तालुक्यात ६३.३ टक्के आहे. म्हणजेच आई साक्षर असून देखील ३६.७ टक्के महिलांच्या मुलींना साक्षर होण्यापासून वंचित ठेवण्यात येत.

### ५.४.५ महिलांच्या आईची इयत्तानिहाय शैक्षणिक स्थिती :

हिंगोली जिल्ह्यातील औंढा नागनाथ व कळमनुरी तालुक्यातील साक्षर व निरक्षर महिलांच्या आईची इयत्तानिहाय शौक्षणिक स्थिती खालील तक्ता क्र. ५.१० व ५.११ मध्ये दर्शविण्यात आलेली आहे.

**तक्ता क्र. ५.१०**

**औंढा नागनाथ तालुक्यातील महिलांच्या आईची इयत्तानिहाय शैक्षणिक स्थिती**

| प्रकार | औंढा नागनाथ | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | लागू नाही | | प्राथमिक पूर्ण | | माध्यमिक पूर्ण | | उच्च माध्यमिक पूर्ण | | एकूण | |
| | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी |
| **निरक्षर** | ८७ | ९६.६ | ३ | ३.३ | ० | ०.० | ० | ०.० | ९० | १००.० |
| **साक्षर** | ५७ | ६३.३ | १३ | १४.४ | ८ | ८.८ | १२ | १३.३ | ९० | १००.० |

संदर्भ : प्रस्तुत अभ्यासाकरिता केलेले प्राथमिक सर्वेक्षण

वरील तक्ता क्र. ५.१० वरुन असे दिसून येते की, औंढा नागनाथ तालुक्यामध्ये निरक्षर असलेल्या ३.३ टक्के महिलांच्या साक्षर आयांनी केवळ प्राथमिक शिक्षण पूर्ण केलेले आहे. तर साक्षर महिलांच्या १४.८ टक्के साक्षर आयांनी प्राथमिक शिक्षण, ८.८ टक्के आयांनी माध्यमिक तर १३.३ टक्के आयांनी उच्च माध्यमिक शिक्षण पूर्ण केलेले आहे.

**तक्ता क्र. ५.११**

**कळमनुरी तालुक्यातील महिलांच्या आईची इयत्तानिहाय शैक्षणिक स्थिती**

| प्रकार | कळमनुरी | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | लागू नाही | | प्राथमिक पूर्ण | | उच्च माध्यमिक पूर्ण | | एकूण | |
| | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी |
| निरक्षर | ४७ | ५२.२ | ४१ | ४५.५ | २ | २.२ | ९० | १००.० |
| साक्षर | ४ | ४.४ | ७९ | ८७.७ | ७ | ७.७ | ९० | १००.० |

संदर्भ : प्रस्तुत अभ्यासाकरिता केलेले प्राथमिक सर्वेक्षण

वरील तक्ता क्र. ५.११ वरुन असे दिसून येते की, कळमनुरी तालुक्यामध्ये निरक्षर महिलांच्या ४५.५ टक्के साक्षर आयांनी प्राथमिक शिक्षण तर २.२ टक्के

आईनी उच्च माध्यमिक शिक्षण पूर्ण केले आहे. साक्षर महिलांच्या ८७.७ साक्षर आयांनी प्राथमिक व ७.७ टक्के आयांनी उच्च माध्यमिक शिक्षण पूर्ण केले आहे.

वरील तक्ता. ५.१० व ५.११ यांचा विचार करता असे दिसते की, औंढा नागनाथ तालुक्याच्या तुलनेत कळमनुरी तालुक्यात प्राथमिक शिक्षण पूर्ण केलेल्या साक्षर आयांचे प्रमाण अधिक आहे. मात्र, ज्या साक्षर आयां आहेत त्यामध्ये उच्च माध्यमिक शिक्षण पूर्ण केलेल्या आयांचे प्रमाण कळमनुरी तालुक्याच्या तुलनेत औंढा नागनाथ तालुक्यात अधिक आहे.

### ५.४.६ वडिलाची शैक्षणिक स्थिती :

हिंगोली जिल्ह्यातील औंढा नागनाथ व कळमनुरी तालुक्यातील साक्षर व निरक्षर महिलांच्या वडिलांची शैक्षणिक स्थिती पुढील तक्ता क्र. ५.१२ मध्ये दिलेली आहे.

**तक्ता क्र. ५.१२**

**औंढा नागनाथ व कळमनुरी तालुक्यातील महिलांच्या वडिलांची शैक्षणिक स्थिती**

| प्रकार | औंढा नागनाथ | | | | | | कळमनुरी | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | होय | | नाही | | एकूण | | होय | | नाही | | एकूण | |
| | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी |
| निरक्षर | ६ | ६.६ | ८४ | ९३.३ | ९० | १००.० | ४५ | ५०.० | ४५ | ५०.० | ९० | १००.० |
| साक्षर | ४३ | ४७.७ | ४७ | ५२.२ | ९० | १००.० | ८९ | ९८.८ | १ | १.१ | ९० | १००.० |


संदर्भ : प्रस्तुत अभ्यासाकरिता केलेले प्राथमिक सर्वेक्षण

वरील तक्ता क्र. ५.१२ वरुन असे दिसून येते की, औंढा नागनाथ तालुक्यातील ६.६ टक्के निरक्षर महिलांचे वडिल हे साक्षर आहेत. तर ९३.३ टक्के वडिल साक्षर नाहीत. याच तालुक्यातील ४७.७ टक्के साक्षर महिलांचे वडिल साक्षर आहेत तर ५२.२ टक्के साक्षर महिलांचे वडिल साक्षर नाहीत.

कळमनुरी तालुक्यातील ५० टक्के निरक्षर महिलांचे वडिल साक्षर असून ५० टक्के निरक्षर महिलांचे वडिल साक्षर नाहीत. तर याच तालुक्यातील ९८.८ टक्के साक्षर महिलांचे वडिल साक्षर असून केवळ १.१ टक्के साक्षर महिलांचे वडिल साक्षर नाहीत.

**आकृती क्र. ५.६**

**औंढा नागनाथ व कळमनुरी तालुक्यातील महिलांच्या वडिलांची शैक्षणिक स्थिती**




वरील आकृती क्र. ५.६ वरुन असे दिसते की, औंढा नागनाथ तालुक्याच्या तुलनेत कळमनुरी तालुक्यातील साक्षर वडिलांचे महिलांचे प्रमाण अधिक आहे. कळमनुरी तालुक्यामध्ये ज्या महिला साक्षर आहेत यांचे वडिल साक्षर नसल्याचे प्रमाण केवळ १.१ टक्के आहे. तर हेच प्रमाण औंढा नागनाथ तालुक्यात ६३.३ टक्के आहे. म्हणजेच आई साक्षर असून देखील ५२.२ टक्के महिलांच्या मुलींना साक्षर होण्यापासून वंचित ठेवण्यात येते.

**५.४.७ महिलांच्या वडिलांची इयत्तानिहाय शैक्षणिक स्थिती :**

हिंगोली जिल्ह्यातील औंढा नागनाथ व कळमनुरी तालुक्यातील साक्षर वडिलांची इयत्तानिहाय शौक्षणिक स्थिती खालील तक्ता क्र. ५.१३ मध्ये दर्शविलेली आहे.

## तक्ता क्र. ५.१३
## औंढा नागनाथ तालुक्यातील महिलांच्या वडिलांची इयत्तानिहाय शैक्षणिक स्थिती

| प्रकार | औंढा नागनाथ | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | लागू नाही | | प्राथमिक पूर्ण | | माध्यमिक पूर्ण | | उच्च माध्यमिक पूर्ण | | एकूण | |
| | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी |
| निरक्षर | ८४ | ९३.३ | ६ | ६.६ | ० | ०.० | ० | ०.० | ९० | १००.० |
| साक्षर | ४७ | ५२.२ | १६ | १७.७ | १७ | १८.८ | १० | ११.१ | ९० | १००.० |

संदर्भ : प्रस्तुत अभ्यासाकरिता केलेले प्राथमिक सर्वेक्षण

वरील तक्ता क्र. ५.१३ वरुन असे दिसते की, औंढा नागनाथ तालुक्यामध्यील निरक्षर महिलांच्या ६.६ टक्के साक्षर वडिलांनी प्राथमिक शिक्षण पूर्ण केले आहे. तर माध्यमिक व उच्च माधमिक शिक्षण पूर्ण केलेल्या वडिलांचे प्रमाण ०० टक्के आहे. तर, ९३.३ टक्के वडिल निरक्षर असून त्यांनी कोणतीही इयत्ता पूर्ण केलेली नाही.

याच तालुक्यातील साक्षर महिलांच्या १७.७ टक्के साक्षर वडिलांनी प्राथमिक शिक्षण, १८.८ टक्के साक्षर वडिलांनी माधमिक शिक्षण व ११.१ टक्के वडिलांनी उच्च माध्यमिक शिक्षण पूर्ण केलेले आहे. तर साक्षर महिलामध्ये ५२.२ टक्के वडिल निरक्षर असल्यामुळे त्यांनी कोणतीही इयत्ता पूर्ण केलेली नाही.

## तक्ता क्र. ५.१४
## कळमनुरी तालुक्यातील महिलांच्या वडिलांची इयत्तानिहाय शैक्षणिक स्थिती

| प्रकार | कळमनुरी | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | लागू नाही | | प्राथमिक पूर्ण | | उच्च माध्यमिक व पदवी पूर्ण | | एकूण | |
| | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी |
| निरक्षर | ४५ | ५०.० | ४० | ४४.४ | ५ | ५.५ | ९० | १००.० |
| साक्षर | १ | १.१ | ८६ | ९५.५ | ३ | ३.३ | ९० | १००.० |

संदर्भ : प्रस्तुत अभ्यासाकरिता केलेले प्राथमिक सर्वेक्षण

वरील तक्ता क्र. ५.१४ वरुन असे दिसते की, कळमनुरी तालुक्यामधील निरक्षर महिलांच्या ४४.४ टक्के साक्षर वडिलांनी प्राथमिक शिक्षण पूर्ण केले आहे. तर, उच्च माध्यमिक व पदवीपर्यंतचे शिक्षण पूर्ण केलेल्या वडिलांचे प्रमाण ५.५ टक्के आहे. तर, ५० टक्के वडिल निरक्षर असून त्यांनी कोणतीही इयत्ता पूर्ण केलेली नाही.

याच तालुक्यातील साक्षर महिलांच्या ९५.५ टक्के साक्षर वडिलांनी प्राथमिक शिक्षण तर, ३.३ टक्के वडिलांनी उच्च माध्यमिक व पदवी पर्यंतचे शिक्षण पूर्ण केले आहे. साक्षर महिलामध्ये केवळ १.१ टक्के वडिल निरक्षर असल्यामुळे त्यांनी कोणतीही इयत्ता पूर्ण केलेली नाही.

वरील तक्ता क्र. ५.१३ व ५.१४ वरुन असे दिसते की, औंढा नागनाथ तालुक्याच्या तुलनेत साक्षर वडिलांचे प्रमाण कळमनुरी तालुक्यात अधिक आहे. तर, औंढा नागनाथ तालुक्यातील साक्षर वडिलांचे शिक्षण उच्च माध्यमिक पर्यत पूर्ण केलेले असून कळमनुरी तालुक्यातील साक्षर वडिलांनी पदवी पर्यतचे शिक्षण पूर्ण केले आहे.

### ५.४.८ **महिलांच्या वडिलांच्या व्यवसायाची माहिती :**

हिंगोली जिल्ह्यातील औंढा नागनाथ व कळमनुरी तालक्यातील साक्षर व निरक्षर महिलांच्या वडिलांच्या व्यवसायासंबंधित माहिती पुढील तक्ता ५.१५ मध्ये दिलेली आहे.

**तक्ता क्र. ५.१५**

**औंढा नागनाथ तालुक्यातील महिलांच्या वडिलांच्या व्यवसायाची माहिती**

| प्रकार | औंढा नागनाथ | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | शेती व मजुरी | | स्वतः चा व्यवसाय | | नोकरी | | एकूण | |
| | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी |
| निरक्षर | ८८ | ९७.७ | २ | २.२ | ० | ०.० | ९० | १००.० |
| साक्षर | ८६ | ९५.५ | ३ | ३.३ | १ | १.१ | ९० | १००.० |

संदर्भ : प्रस्तुत अभ्यासाकरिता केलेले प्राथमिक सर्वेक्षण

वरील तक्ता क्र. ५.१५ वरुन असे दिसते की, औंढा नागनाथ तालुक्यातील निरक्षर महिलांमध्ये शेती व मजुरी हा व्यवसाय असलेल्या महिलांचे प्रमाण ९७.७ टक्के आहे. २.२ टक्के महिलांचे वडिल स्वतःचा व्यवसाय करतात तर, ०० टक्के महिलांचे वडिल नोकरी करतात.

याच तालुक्यातील साक्षर महिलामध्ये ज्यांचे वडिल शेती व मजुरी हा व्यवसाय करतात अशा महिलांचे प्रमाण ९५.५ टक्के आहे. केवळ ३.३ टक्के महिलांचे वडिल स्वतःचा व्यवसाय करत असून १.१ टक्के महिलांचे वडिल नोकरीत आहेत. म्हणजे साक्षर व निरक्षर अशा दोन्ही प्रकारातील महिलांच्या वडिलांचा प्रमुख्य व्यवसाय हा शेती व मजुरी हाच आहे.

**तक्ता क्र. ५.१६**

**कळमनुरी तालुक्यातील महिलांच्या वडिलांच्या व्यवसायाची माहिती**

| प्रकार | कळमनुरी | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | शेती व मजुरी | | स्वतः चा व्यवसाय | | नोकरी | | एकूण | |
| | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी |
| निरक्षर | ८८ | ९७.७ | १ | १.१ | १ | १.१ | ९० | १००.० |
| साक्षर | ८८ | ९७.७ | ० | ०.० | २ | २.२ | ९० | १००.० |

संदर्भ : प्रस्तुत अभ्यासाकरिता केलेले प्राथमिक सर्वेक्षण

वरील तक्ता क्र. ५.१६ वरुन असे दिसते की, कळमनुरी तालुक्यातील निरक्षर महिलांमध्ये शेती व मजुरी हा व्यवसाय करणारे वडिल असलेल्या महिलांचे प्रमाण ९७.७ टक्के आहे. तर १.१ टक्के निरक्षर महिलांचे वडिल स्वतःचा व्यवसाय करतात तसेच केवळ १.१ टक्के निरक्षर महिलांचे वडिल नोकरीत आहेत. याच तालुक्यातील साक्षर महिलांमध्ये वडिलांचा व्यवसाय शेती व मजुरी असलेल्या महिलांचे प्रमाण ९७.७ टक्के आहे. तर २.२ टक्के महिलांचे वडिल नोकरीत आहेत.

वरील तक्ता क्र. ५.१५ व ५.१६ वरुन असे स्पष्ट होते की, वडिलांचा व्यवसाय शेती व मजुरी असलेल्या साक्षर व निरक्षर महिलांचे प्रमाण औंढा नागनाथ व कळमनुरी या दोन्ही तालुक्यात अधिक आहे. स्वतःच्या व्यवसायात करण्याऱ्यांचे प्रमाण कळमनुरी तालुक्याच्या तुलनेत औंढा नागनाथ तालुक्यात अधिक आहे. नोकरी हा व्यवसाय करण्याऱ्या महिलांचे प्रमाण औंढा नागनाथ तालुक्याच्या तुलनेत कळमनुरीमध्ये अधिक आहे.

### ५.४.९ महिलांच्या आईच्या व्यवसायाची माहिती :

हिंगोली जिल्ह्यातील औंढा नागनाथ व कळमनुरी तालक्यातील साक्षर व निरक्षर महिलांच्या आईच्या व्यवसायासंबंधित माहिती पुढील तक्ता ५.१७ व ५.१८ मध्ये दिलेली आहे.

**तक्ता क्र. ५.१७**

**औंढा नागनाथ तालुक्यातील महिलांच्या आईच्या व्यवसायाची माहिती**

| प्रकार | औंढा नागनाथ | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | शेती व मजुरी | | घरकाम | | एकूण | |
| | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी |
| निरक्षर | ८८ | ९७.७ | २ | २.२ | ९० | १००.० |
| साक्षर | ८८ | ९७.७ | २ | २.२ | ९० | १००.० |

संदर्भ : प्रस्तुत अभ्यासाकरिता केलेले प्राथमिक सर्वेक्षण

वरील तक्ता क्र. ५.१७ वरुन असे दिसते की, औंढा नागनाथ तालुक्यातील निरक्षर महिलांमध्ये ९७.७ टक्के महिलांच्या आईचा व्यवसाय हा शेती व मजुरी आहे. तर, आईचा व्यवसाय हा घरकाम असलेल्या महिलांचे प्रमाण केवळ २.२ टक्के आहे.

याच तालुक्यातील साक्षर महिलांमध्ये ९७.७ टक्के महिलांच्या आईचा व्यवसाय शेती व मजुरी हाच आहे. तर, आईचा व्यवसाय हा घरकाम असलेल्या महिलांचे प्रमाण केवळ २.२ टक्के आहे.

**तक्ता क्र. ५.१८**

**कळमनुरी तालुक्यातील महिलांच्या आईच्या व्यवसायाची माहिती**

| | कळमनुरी | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | शेती व मजुरी | | घरकाम | | नोकरी | | एकूण | |
| प्रकार | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी |
| निरक्षर | ८८ | ९७.७ | २ | २.२ | ० | ०.० | ९० | १००.० |
| साक्षर | ८८ | ९७.७ | १ | १.१ | १ | १.१ | ९० | १००.० |

संदर्भ : प्रस्तुत अभ्यासाकरिता केलेले प्राथमिक सर्वेक्षण

वरील तक्ता क्र. ५.१८ वरुन असे दिसते की, कळमनुरी तालुक्यातील निरक्षर महिलांमध्ये ९७.७ टक्के महिलांच्या आईचा व्यवसाय हा शेती व मजुरी आहे. तर, केवळ २.२ टक्के महिलांच्या आईचा व्यवसाय घरकाम आहे. याच तालुक्यातील साक्षर महिलांमध्ये ९७.७ टक्के महिलांच्या आईचा व्यवसाय हा शेती व मजुरी हाच आहे. तर, १.१ टक्के महिलांच्या आईचा व्यवसाय घरकाम व १.१ टक्के महिलांच्या आईचा व्यवसाय नोकरी हा आहे.

वरील तक्ता क्र. ५.१७ व ५.१८ वरुन असे दिसते की, निरक्षर व साक्षर अशा दोन्ही प्रकारातील महिलांच्या आईचा मुख्य व्यवसाय हा शेती व मजुरी हाच आहे. यामध्ये दोन्ही तालुक्यातील साक्षर व निरक्षर मातांचे शेती व मजुरी या व्यवसायातील प्रमाण समान आहे. केवळ कळमनुरी तालुक्यातील १.१ टक्के महिलांच्या आईचा व्यवसाय नोकरी हा आहे.

### ५.४.१० महिलांचा भावंडातील क्रमांकाची माहिती :

हिंगोली जिल्ह्यातील औंढा नागनाथ व कळमनुरी तालुक्यातील साक्षर व निरक्षर महिलांच्या भांवडाविषयी माहिती खालील तक्ता क्र. ५.१९ व ५.२० मध्ये दर्शविण्यात आलेली आहे.

**तक्ता क्र. ५.१९**

**औंढा नागनाथ तालुक्यातील महिलांचा भावंडातील क्रमांकासंबंधित माहिती**

| प्रकार | औंढा नागनाथ | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | १ | | २ | | ३-६ | | एकूण | |
| | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी |
| निरक्षर | २६ | २८.८ | ३१ | ३४.४ | ३३ | ३६.६ | ९० | १००.० |
| साक्षर | ३२ | ३५.५ | २७ | ३०.० | ३१ | ३४.४ | ९० | १००.० |

संदर्भ : प्रस्तुत अभ्यासाकरिता केलेले प्राथमिक सर्वेक्षण

वरील तक्ता क्र. ५.१९ वरुन असे दिसते की, औंढा नागनाथ तालुक्यामधील निरक्षर महिलांचा कुटुंबात २८.८ टक्के महिलांना केवळ एकच भावंड आहे. ३४.४ टक्के महिलांना दोन भावंडे असून ३६.६ टक्के महिलांना तीन पेक्षा जास्त भावंडे आहेत. तर साक्षर महिलांमध्ये ३५.५ टक्के महिलांना एक, ३० टक्के महिलांना दोन व ३४.४ टक्के महिलांना तीन पेक्षा जास्त भांवडे आहेत.

यामध्ये केवळ एक भांवड असलेल्या महिलांमध्ये साक्षर महिलांचे प्रमाण अधिक आहे. तीनपेक्षा जास्त भांवडे असलेल्या महिलांमध्ये निरक्षर महिलांचे प्रमाण अधिक आहे.

**तक्ता क्र. ५.२०**

**कळमनुरी तालुक्यातील महिलांचा भावंडातील क्रमांकासंबंधित माहिती**

| प्रकार | कळमनुरी | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | १ | | २ | | ३-६ | | एकूण | |
| | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी |
| निरक्षर | ६ | ६.६ | १२ | १३.३ | ७२ | ८०.० | ९० | १००.० |
| साक्षर | ५ | ५.५ | ४९ | ५४.४ | ३६ | ४०.० | ९० | १००.० |

संदर्भ : प्रस्तुत अभ्यासाकरिता केलेले प्राथमिक सर्वेक्षण

वरील तक्ता क्र. ५.२० वरुन असे दिसते की, कळमनुरी तालुक्यामधील निरक्षर महिलांचा कुटुंबात ६.६ टक्के महिलांना केवळ एकच भावंड आहे. १३.३ टक्के महिलांना दोन भावंडे असून ८० टक्के महिलांना तीन पेक्षा जास्त भावंडे आहेत. तर साक्षर महिलांमध्ये ५.५ टक्के महिलांना एक, ५४.४ टक्के महिलांना दोन व ४० टक्के महिलांना तीन पेक्षा जास्त भावंडे आहेत.

वरील तक्ता क्र. ५.१९ व ५.२० वरुन असे दिसते की, केवळ एक भावंड असलेल्या निरक्षर व साक्षर या दोन्ही प्रकारातील महिलांचे प्रमाण औंढा नागनाथ तालुक्याच्या तुलनेत कळमनुरी तालुक्यामध्ये अधिक आहे. तीन ते सहा भावंड असलेल्या निरक्षर व साक्षर या दोन्ही प्रकारातील महिलांचे प्रमाणसुध्दा औंढा नागनाथ तालुक्याच्या तुलनेत कळमनुरी तालुक्यामध्येच अधिक आहे.

### ५.४.११ महिलांच्या लहान भावांच्या संख्येची स्थिती :

हिंगोली जिल्ह्यातील औंढा नागनाथ व कळमनुरी तालुक्यातील साक्षर व निरक्षर महिलांच्या भावंडाविषयी माहिती खालील तक्ता क्र. ५.२१ व ५.२२ मध्ये दर्शविण्यात आलेली आहे.

**तक्ता क्र. ५.२१**

**औंढा नागनाथ तालुक्यातील महिलांच्या लहान भावांच्या संख्येची स्थिती**

| प्रकार | औंढा नागनाथ | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | इतर | | १ | | २ | | ३-६ | | एकूण | |
| | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी |
| निरक्षर | १० | ११.१ | १५ | १६.६ | ३१ | ३४.४ | ३४ | ३७.७ | ९० | १००.० |
| साक्षर | ८ | ८.८ | ४ | ४.४ | ७ | ७.७ | ७१ | ७८.८ | ९० | १००.० |

संदर्भ : प्रस्तुत अभ्यासाकरिता केलेले प्राथमिक सर्वेक्षण

वरील तक्ता क्र. ५.२१ वरुन असे दिसते की, औंढा नागनाथ तालुक्यामधील निरक्षर महिलांध्ये १६.६ टक्के महिलांना त्यांच्यापेक्षा केवळ एकच लहान भावंड आहे.

३४.४ टक्के महिलांना त्यांच्यापेक्षा दोन लहान भांवड आहे. ३७.७ टक्के महिलांना तीनपेक्षा अधिक लहान भावंड आहेत. तर ११.१ टक्के महिलांना त्याच्यापेक्षा लहान भावंड नाही.

याच तालुक्यातील साक्षर महिलामध्ये ४.४ टक्के महिलांना त्यांच्यापेक्षा केवळ एकच लहान भावंड आहे. ७.७ टक्के महिलांना त्यांच्यापेक्षा दोन लहान भावंड आहे. ७८.८ टक्के महिलांना तीन पेक्षा अधिक लहान भावंड आहेत. तर ८.८ टक्के महिलांना त्याच्यापेक्षा लहान भांवड नाही. थोडक्यात तीन ते सहा लहान भावंडे असलेल्या महिलांचे प्रमाण निरक्षर महिलापेक्षा साक्षर महिलांमध्ये अधिक दिसून येते. तर, निरक्षर महिलांच्या लहान भावंडाचे प्रमाण एकंदरीत अधिक आहे.

**तक्ता क्र. ५.२२**

**कळमनुरी तालुक्यातील महिलांच्या लहान भावांच्या संख्येची स्थिती**

| प्रकार | कळमनुरी | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | इतर | | १ | | २ | | ३-६ | | एकूण | |
| | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी |
| निरक्षर | ९ | १०.० | ६ | ६.६ | २४ | २६.६ | ५१ | ५६.६ | ९० | १००.० |
| साक्षर | ० | ०.० | ४ | ४.४ | ५८ | ६४.४ | २८ | ३१.१ | ९० | १००.० |


संदर्भ : प्रस्तुत अभ्यासाकरिता केलेले प्राथमिक सर्वेक्षण

वरील तक्ता क्र. ५.२२ वरुन असे दिसते की, कळमनुरी तालुक्यामधील निरक्षर महिलांमध्ये ६.६ टक्के महिलांना त्यांच्यापेक्षा केवळ एकच लहान भांवड आहे. २६.६ टक्के महिलांना त्यांच्यापेक्षा दोन लहान भांवड आहे. ५६.६ टक्के महिलांना तीनपेक्षा अधिक लहान भावंड आहेत. तर १० टक्के महिलांना त्याच्यापेक्षा लहान भावंड नाही.

याच तालुक्यातील साक्षर महिलांमध्ये ४.४ टक्के महिलांना त्यांच्यापेक्षा केवळ एकच लहान भावंड आहे. ६४.४ टक्के महिलांना त्यांच्यापेक्षा दोन लहान भावंड आहे. ३१.१ टक्के महिलांना तीन पेक्षा अधिक लहान भावंड आहेत.

**आकृती क्र. ५.७**

**औंढा नागनाथ व कळमनुरी तालुक्यातील महिलांच्या लहान भावांच्या संख्येची स्थिती**




वरील आकृती क्र. ५.७ वरुन असे दिसते की, एक लहान भावंड असलेल्या निरक्षर महिलांचे प्रमाण कळमनुरी तालुक्याच्या तुलनेत औंढा नागनाथ तालुक्यात अधिक आहे. तर, एक भावंड असलेल्या साक्षर महिलांचे प्रमाण दोन्ही तालुक्यात समान आहे. दोन भावंडे असलेल्या निरक्षर महिलांचे प्रमाण कळमनुरी तालुक्याच्या तुलनेत औंढा नागनाथ तालुक्यात अधिक आहे. तर, दोन भावंडे असलेल्या साक्षर महिलांचे प्रमाण औंढा नागनाथ तालुक्याच्या तुलनेत कळमनुरी तालुक्यात अधिक आहे. तीन ते सहा भावंडे असलेल्या निरक्षर महिलांचे प्रमाण औंढा नागनाथ तालुक्याच्या तुलनेत कळमनुरी तालुक्यात अधिक आहे. तर, तीन ते सहा भावंडे असलेल्या साक्षर महिलांचे प्रमाण कळमनुरी तालुक्याच्या तुलनेत औंढा नागनाथ तालुक्यात अधिक आहे. इतर महिलामध्ये भावंडे नसलेल्या व त्या स्वतः सर्वात लहान असलेल्या महिलांचा

समावेश असून अशा निरक्षर महिलांचे प्रमाण कळमनुरी तालुक्याच्या तुलनेत औंढा नागनाथ तालुक्यात एक टक्क्यांनी अधिक आहे. तर, अशा साक्षर महिलांचे प्रमाणदेखील औंढा नागनाथ तालुक्यातच अधिक आहे.

### ५.४.१२ महिलांच्या मोठ्या भावाची शैक्षणिक स्थिती :

हिंगोली जिल्ह्यातील औंढा नागनाथ व कळमनुरी तालुक्यातील साक्षर व निरक्षर महिलांच्या भावंडांविषयी माहिती खालील तक्ता क्र. ५.२३ मध्ये दर्शविण्यात आलेली आहे.

**तक्ता क्र. ५.२३**

**औंढा नागनाथ व कळमनुरी तालुक्यातील महिलांच्या मोठ्या भावाची शैक्षणिक स्थिती**

| प्रकार | औंढा नागनाथ | | | | | | | | कळमनुरी | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | लागू नाही | | होय | | नाही | | एकूण | | लागू नाही | | होय | | नाही | | एकूण | |
| | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी |
| निरक्षर | २९ | ३२.२ | ३ | ३.३ | ५८ | ६४.४ | ९० | १००.० | २० | २२.२ | ८ | ८.८ | ६२ | ६८.८ | ९० | १००.० |
| साक्षर | ६२ | ६८.८ | २३ | २५.५ | ५ | ५.५ | ९० | १००.० | ३ | ३.३ | ६३ | ७०.० | २४ | २६.६ | ९० | १००.० |


संदर्भ : प्रस्तुत अभ्यासाकरिता केलेले प्राथमिक सर्वेक्षण

वरील तक्ता क्र. ५.२३ वरुन असे दिसते की, औंढा नागनाथ तालुक्यातील निरक्षर महिलांमध्ये ३.३ टक्के महिलांचा मोठा भाऊ शाळेत जातो. ६४.४ टक्के निरक्षर महिलांचा मोठा भाऊ शाळेत जात नाही. तर, ३२.२ टक्के महिलांना मोठा भाऊ नाही. याच तालुक्यातील साक्षर महिलांमध्ये २५.५ टक्के महिलांचा मोठा भाऊ शाळेत जातो. ५.५ टक्के साक्षर महिलांचा मोठा भाऊ शाळेत जात नाही. तर ६८.८ टक्के महिलांना मोठा भाऊ नाही.

कळमनुरी तालुक्यातील निरक्षर महिलांमध्ये ८.८ टक्के महिलांचा मोठा भाऊ शाळेत जातो. ६८.८ टक्के निरक्षर महिलांचा मोठा भाऊ शाळेत जात नाही. तर २२.२ टक्के महिलांना मोठा भाऊ नाही. याच तालुक्यातील साक्षर महिलांमध्ये ७० टक्के महिलांचा मोठा भाऊ शाळेत जातो. २६.६ टक्के साक्षर महिलांचा मोठा भाऊ शाळेत जात नाही. तर ३.३ टक्के महिलांना मोठा भाऊ नाही.

**आकृती क्र. ५.८**

**औंढा नागनाथ व कळमनुरी तालुक्यातील महिलांच्या मोठ्या भावाची शैक्षणिक स्थिती**




थोडक्यात वरील आकृती क्र. ५.८ वरुन असे सष्ट होते की, निरक्षर व साक्षर अशा दोन्ही महिलांचा मोठा भाऊ शाळेत जाण्याचे प्रमाण औंढा नागनाथ तालुक्याच्या तुलनेत कळमनुरी तालुक्यामध्ये अधिक आहे.

### ५.४.१३ महिलांच्या मोठ्या बहिणीची शैक्षणिक स्थिती :

हिंगोली जिल्ह्यातील औंढा नागनाथ व कळमनुरी तालुक्यातील साक्षर व निरक्षर महिलांच्या भांवडाविषयी माहिती खालील तक्ता क्र. ५.२४ मध्ये दर्शविण्यात आलेली आहे.

**तक्ता क्र. ५.२४**

**औंढा नागनाथ व कळमनुरी तालुक्यातील महिलांच्या मोठ्या बहिणीची शैक्षणिक स्थिती**

| प्रकार | औंढा नागनाथ | | | | | | | | कळमनुरी | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | लागू नाही | | होय | | नाही | | एकूण | | लागू नाही | | होय | | नाही | | एकूण | |
| | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी |
| निरक्षर | १ | १.१ | १ | १.१ | ८८ | ९७.७ | ९० | १००.० | १६ | १७.७ | ४ | ४.४ | ७० | ७७.७ | ९० | १००.० |
| साक्षर | ८० | ८८.८ | ६ | ६.६ | ४ | ४.४ | ९० | १००.० | १ | १.१ | ६४ | ७१.१ | २५ | २७.७ | ९० | १००.० |


संदर्भ : प्रस्तुत अभ्यासाकरिता केलेले प्राथमिक सर्वेक्षण

वरील तक्ता क्र. ५.२४ वरुन असे दिसते की, औंढा नागनाथ तालुक्यातील निरक्षर महिलांमध्ये १.१ टक्के महिलांची मोठी बहिण शाळेत जाते. ९७.७ टक्के निरक्षर महिलांची मोठी बहिण शाळेत जात नाही. तर १.१ टक्के महिलांना मोठी बहिण नाही. याच तालुक्यातील साक्षर महिलांमध्ये ६.६ टक्के महिलांची मोठी बहिण शाळेत जाते. ४.४ टक्के साक्षर महिलांची मोठी बहिण शाळेत जात नाही. तर, ८८.८ टक्के महिलांना मोठी बहिण नाही.

कळमनुरी तालुक्यातील निरक्षर महिलांमध्ये ४.४ टक्के महिलांची मोठी बहिण शाळेत जाते. ७७.७ टक्के निरक्षर महिलांची मोठी बहिण शाळेत जात नाही. तर, १७.७ टक्के महिलांना मोठी बहिण नाही. याच तालुक्यातील साक्षर महिलांमध्ये ७१.१ टक्के महिलांची मोठी बहिण शाळेत जाते. २७.७ टक्के साक्षर महिलांची मोठी बहिण शाळेत जात नाही. तर १.१ टक्के महिलांना मोठा भाऊ नाही.

**तक्ता क्र. ५.९**

**औंढा नागनाथ व कळमनुरी तालुक्यातील महिलांच्या मोठ्या बहिणीची शैक्षणिक स्थिती**




थोडक्यात वरील आकृती क्र. ५.९ वरुन असे सष्ट होते की, निरक्षर व साक्षर अशा दोन्ही महिलांचा मोठा भाऊ शाळेत जाण्याचे प्रमाण औंढा नागनाथ तालुक्याच्या तुलनेत कळमनुरी तालुक्यामध्ये अधिक आहे. कळमनुरी तालुक्यातील साक्षर महिलांची बहिण शाळेत जाण्याचे प्रमाण हे खूप जास्त म्हणजे ७१.१ टक्के आहे.

### ५.४.१४ महिलांच्या शाळेत जाण्याच्या आवडीची स्थिती :

हिंगोली जिल्ह्यातील औंढा नागनाथ व कळमनुरी तालुक्यातील साक्षर व निरक्षर महिलांची शाळेत जाण्याची आवड यासंबंधित आकडेवारी खालील तक्ता क्र. ५.२५ मध्ये दिलेली आहे.

**तक्ता क्र. ५.२५**

**औंढा नागनाथ व कळमनुरी तालुक्यातील महिलांच्या शाळेत जाण्याच्या आवडीसंबंधित माहिती**

| प्रकार | औंढा नागनाथ | | | | | | कळमनुरी | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | होय | | नाही | | एकूण | | होय | | नाही | | एकूण | |
| | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी |
| निरक्षर | ३ | ३.३ | ८७ | ९६.६ | ९० | १००.० | १५ | १६.६ | ७५ | ८३.३ | ९० | १००.० |
| साक्षर | ९० | १००.० | ० | ०.० | ९० | १००.० | ८३ | ९२.२ | ७ | ७.७ | ९० | १००.० |

संदर्भ : प्रस्तुत अभ्यासाकरिता केलेले प्राथमिक सर्वेक्षण

वरील तक्ता क्र. ५.२५ वरुन असे दिसते की, औंढा नागनाथ तालुक्यामधील निरक्षर महिलांमध्ये केवळ ३.३ टक्के महिलांनाच शाळेत जाण्याची आवड होती. तर ९६.६ टक्के महिलांना शाळेत जाण्याची आवडच नव्हती. याच तालुक्यातील साक्षर महिलांमध्ये १०० टक्के महिलांना शाळेत जाण्याची आवड होती.

कळमनुरी तालुक्यातील निरक्षर महिलांमध्ये १६.६ टक्के महिलांनाच शाळेत जाण्याची आवड होती. तर ८३.३ टक्के महिलांना शाळेत जाण्याची आवड नव्हती. याच तालुक्यातील साक्षर महिलामध्ये ९२.२ टक्के महिलांना शाळेत जाण्याची आवड होती. तर ७.७ टक्के महिलांना शाळेत जाण्याची आवड नव्हती.

थोडक्यात दोन्ही तालुक्यातील निरक्षर महिलांना शाळेत जाण्याची आवड नव्हती. तर, साक्षर महिलांमध्ये कळमनुरी तालुक्याच्या तुलनेत औंढा नागनाथ तालुक्यातील महिलांना शाळेत जाण्याची जास्त महिलांना आवड होती. कळमनुरी तालुक्यातील ७.७ टक्के साक्षर महिलांना शाळेत जाण्याची आवड नव्हती.

### ५.४.१५ महिलांच्या शेजारच्या मैत्रिणी/मुलींच्या शाळेत जाण्यासंबंधित माहिती :

हिंगोली जिल्ह्यातील औंढा नागनाथ व कळमनुरी तालुक्यातील साक्षर व निरक्षर महिलांची शाळेत जाण्याची आवड यासंबंधित आकडेवारी खालील तक्ता क्र. ५.२६ मध्ये दिलेली आहे.

## तक्ता क्र. ५.२६
## औंढा नागनाथ व कळमनुरी तालुक्यातील महिलांच्या शेजारच्या मैत्रिणी/मुली यांची शाळेत जाण्यासंबंधित माहिती

| प्रकार | औंढा नागनाथ | | | | | | कळमनुरी | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | होय | | नाही | | एकूण | | होय | | नाही | | एकूण | |
| | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी |
| निरक्षर | २ | २.२ | ८८ | ९७.७ | ९० | १००.० | २३ | २५.५ | ६७ | ७४.४ | ९० | १००.० |
| साक्षर | ८५ | ९४.४ | ५ | ५.५ | ९० | १००.० | ८३ | ९२.२ | ७ | ७.७ | ९० | १००.० |


संदर्भ : प्रस्तुत अभ्यासाकरिता केलेले प्राथमिक सर्वेक्षण

वरील तक्ता क्र. ५.२६ वरुन असे दिसते की, औंढा नागनाथ तालुक्यामधील निरक्षर महिलांच्या शेजारील मुली शाळेत जाण्याचे प्रमाण केवळ २.२ टक्के आहे. तर, ९७.७ टक्के निरक्षर महिलांच्या शेजारील मुली शाळेत जात नाहीत. याच तालुक्यातील साक्षर महिलांच्या शेजारील मुली शाळेत जाण्याचे प्रमाण ९४.४ टक्के आहे. तर, केवळ ५.५ टक्के साक्षर महिलांच्या शेजारील मुली शाळेत जात नाहीत.

कळमनुरी तालुक्यामधील निरक्षर महिलांच्या शेजारील मुली शाळेत जाण्याचे प्रमाण केवळ २५.५ टक्के आहे. तर, ७४.४ टक्के निरक्षर महिलांच्या शेजारील मुली शाळेत जात नाहीत. याच तालुक्यातील साक्षर महिलांच्या शेजारील मुली शाळेत जाण्याचे प्रमाण ९२.२ टक्के आहे. तर, केवळ ७.७ टक्के साक्षर महिलांच्या शेजारील मुली शाळेत जात नाहीत.

**तक्ता क्र. ५.१०**

**औंढा नागनाथ व कळमनुरी तालुक्यातील महिलांच्या शेजारच्या मैत्रिणी/मुली यांची शाळेत जाण्यासंबंधित माहिती**




वरील तक्ता क्र. ५.१० वरुन असे स्पष्ट होते की, निरक्षर व साक्षर या दोन्ही प्रकारातील महिलांच्या शेजारील मुली अथवा महिला शाळेत जाण्याचे प्रमाण औंढा नागनाथ तालुक्याच्या तुलनेत कळमनुरी तालुक्यात अधिक आहे. औंढा नागनाथ तालुक्यातील साक्षर महिलांच्या शेजारील मुली शाळेत जाण्याचे प्रमाण १०० टक्के आहे.

### ५.४.१६ महिलांची इयत्तानिहाय शैक्षणिक स्थिती :

हिंगोली जिल्ह्यातील औंढा नागनाथ व कळमनुरी तालुक्यातील साक्षर व निरक्षर महिलांकडून माहितीचे संकलन करण्यात आले आहे. या महिलांची इयत्तानिहाय शैक्षणिक स्थिती खालील तक्ता क्र. ५.२७ मध्ये दर्शविलेली आहे.

**तक्ता क्र. ५.२७**

**औंढा नागनाथ तालुक्यातील महिलांची इयत्तानिहाय शैक्षणिक स्थिती**

| प्रकार | औंढा नागनाथ | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | लागू नाही | | प्राथमिक पूर्ण | | माध्यमिक पूर्ण | | उच्च माध्यमिक पूर्ण | | एकूण | |
| | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी |
| निरक्षर | ९० | १००.० | ०० | ०.० | ०० | ०.० | ०० | ०.० | ९० | १००.० |
| साक्षर | ५ | ५.५ | १७ | १८.८ | ४६ | ५१.१ | २२ | २४.४ | ९० | १००.० |

संदर्भ : प्रस्तुत अभ्यासाकरिता केलेले प्राथमिक सर्वेक्षण

वरील तक्ता क्र. ५.२७ वरुन असे दिसते की, औंढा नागनाथ तालुक्यातील साक्षर महिलामधील १८.८ टक्के महिलांनी प्राथमिक शिक्षण पूर्ण केले आहे. ५१.१ टक्के महिलांनी माध्यमिक शिक्षण तर २४.४ टक्के महिलांनी उच्च माधमिक शिक्षण पूर्ण केले आहे.

**तक्ता क्र. ५.२८**

**कळमनुरी तालुक्यातील महिलांची इयत्तानिहाय शैक्षणिक स्थिती**

| प्रकार | कळमनुरी | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | लागू नाही | | प्राथमिक पूर्ण | | माध्यमिक पूर्ण | | उच्च माध्यमिक पूर्ण | | एकूण | |
| | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी |
| निरक्षर | ९० | १००.० | ०० | ०.० | ०० | ०.० | ०० | ०.० | ९० | १००.० |
| साक्षर | ०० | ०.० | ३ | ३.३ | ४५ | ५०.० | ४२ | ४६.६ | ९० | १००.० |

संदर्भ : प्रस्तुत अभ्यासाकरिता केलेले प्राथमिक सर्वेक्षण

वरील तक्ता क्र. ५.२८ वरुन असे दिसते की, कळमनुरी तालुक्यातील साक्षर महिलांमधील ३.३ टक्के महिलांनी प्राथमिक शिक्षण पूर्ण केले आहे. ५० टक्के महिलांनी माध्यमिक शिक्षण तर ४६.६ टक्के महिलांनी उच्च माधमिक शिक्षण पूर्ण केले आहे.

### ५.४.१७ महिलांची त्यांच्या घरापासून शाळेच्या अंतराची स्थिती :

हिंगोली जिल्ह्यातील औंढा नागनाथ व कळमनुरी तालुक्यातील साक्षर व निरक्षर महिलांच्या घरापासून त्यांच्या शाळेच्या अंतरासंबंधित आकडेवारी खालील तक्ता क्र. ५.२९ मध्ये दिलेली आहे.

**तक्ता क्र. ५.२९**

**औंढा नागनाथ तालुक्यातील महिलांची त्याच्या घरापासून शाळेच्या अंतरासंबंधित माहिती**

| प्रकार | औंढा नागनाथ | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | शाळा नाही | | १ पेक्षा कमी | | १-२ | | २-३ | | ३-५ | | ५ पेक्षा जास्त | | सांगता येत ना | | एकूण | |
| | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी |
| निरक्षर | ४ | ४.४ | ४ | ४.४ | २२ | २४.४ | ७ | ७.७ | ६ | ६.६ | ४६ | ५१.१ | १ | १.१ | ९० | १००.० |
| साक्षर | ० | ०.० | १० | ११.१ | १ | १.१ | १२ | १३.३ | ४ | ४.४ | ६३ | ७०.० | ० | ०.० | ९० | १००.० |

संदर्भ : प्रस्तुत अभ्यासाकरिता केलेले प्राथमिक सर्वेक्षण

वरील तक्ता क्र. ५.२९ वरुन असे दिसते की, औंढा नागनाथ तालुक्यातील निरक्षर महिलांमध्ये ४.४ टक्के महिलांच्या गावांत शाळा नाही. केवळ एक किमी व त्यापेक्षा कमी अंतरावर शाळा असलेल्या महिलांचे प्रमाण ४.४ टक्के आहे. एक ते दोन किमी अंतरावर शाळा असलेल्या महिलांचे २४.४ टक्के आहे. दोन ते तीन किमी अंतरावर शाळा असलेल्या महिलांचे प्रमाण ७.७ टक्के आहे. तीन ते पाच किमी अंतरावर शाळा असलेल्या महिलांचे प्रमाण ६.६ टक्के आहे. तर, पाच किमी अंतरापेक्षा दूर अंतरावर शाळा असलेल्या महिलांचे प्रमाण ५१.१ टक्के आहे. तर १.१ टक्के महिलांना घरापासूनचे शाळेचे अंतर सांगता येत नाही.

याच तालुक्यातील साक्षर महिलांमध्ये एक किमी व त्यापेक्षा कमी अंतरावर शाळा असलेल्या महिलांचे प्रमाण ११.१ टक्के आहे. एक ते दोन किमी अंतरावर शाळा असलेल्या महिलांचे १.१ टक्के आहे. दोन ते तीन किमी अंतरावर शाळा असलेल्या महिलांचे प्रमाण १३.३ टक्के आहे. तीन ते पाच किमी अंतरावर शाळा असलेल्या

महिलांचे प्रमाण ४.४ टक्के आहे. तर, पाच किमी अंतरापेक्षा दूर अंतरावर शाळा असलेल्या महिलांचे प्रमाण ७० टक्के आहे.

**तक्ता क्र. ५.३०**

**कळमनुरी तालुक्यातील महिलांची त्याच्या घरापासून शाळेच्या अंतरासंबंधित माहिती**

| प्रकार | कळमनुरी | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | शाळा नाही | | १ पेक्षा कमी | | १-२ | | २-३ | | ३-५ | | ५ पेक्षा जास्त | | सांगता येत नाही | | एकूण | |
| | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी |
| निरक्षर | ३१ | ३४.४ | ८ | ८.८ | ४ | ४.४ | १ | १.१ | ११ | १२.२ | ३० | ३३.३ | ५ | ५.५ | ९० | १००.० |
| साक्षर | ० | ०.० | ६० | ६६.६ | १७ | १८.८ | २ | २.२ | ५ | ५.५ | ६ | ६.६ | ० | ०.० | ९० | १००.० |


संदर्भ : प्रस्तुत अभ्यासाकरिता केलेले प्राथमिक सर्वेक्षण

वरील तक्ता क्र. ५.३० वरुन असे दिसते की, कळमनुरी तालुक्यातील निरक्षर महिलांमध्ये ३४.४ टक्के महिलांच्या गावांत शाळा नाही. केवळ एक किमी व त्यापेक्षा कमी अंतरावर शाळा असलेल्या महिलांचे प्रमाण ८.८ टक्के आहे. एक ते दोन किमी अंतरावर शाळा असलेल्या महिलांचे ४.४ टक्के आहे. दोन ते तीन किमी अंतरावर शाळा असलेल्या महिलांचे प्रमाण १.१ टक्के आहे. तीन ते पाच किमी अंतरावर शाळा असलेल्या महिलांचे प्रमाण १२.२ टक्के आहे. तर, पाच किमी अंतरापेक्षा दूर अंतरावर शाळा असलेल्या महिलांचे प्रमाण ३३.३ टक्के आहे. तर ५.५ टक्के महिलांना घरापासूनचे शाळेचे अंतर सांगता येत नाही.

याच तालुक्यातील साक्षर महिलांमध्ये एक किमी व त्यापेक्षा कमी अंतरावर शाळा असलेल्या महिलांचे प्रमाण ६६.६ टक्के आहे. एक ते दोन किमी अंतरावर शाळा असलेल्या महिलांचे १८.८ टक्के आहे. दोन ते तीन किमी अंतरावर शाळा असलेल्या महिलांचे प्रमाण २.२ टक्के आहे. तीन ते पाच किमी अंतरावर शाळा असलेल्या महिलांचे प्रमाण ५.५ टक्के आहे. तर, पाच किमी अंतरापेक्षा दूर अंतरावर शाळा असलेल्या महिलांचे प्रमाण ६.६ टक्के आहे.

**आकृती क्र. ५.११**

**औंढा नागनाथ व कळमनुरी तालुक्यातील महिलांची त्याच्या घरापासून शाळेच्या अंतरासंबंधित माहिती**




वरील आकृती क्र. ५.११ वरुन असे स्पष्ट होते की, साक्षर महिलांच्या मते, एक किमी अंतरापेक्षा कमी अंतरावर असलेल्या शाळांचे प्रमाण औंढा नागनाथ तालुक्याच्या तुलनेत कळमनुरी तालुक्यात अधिक आहे. पाच किमी अंतरापेक्षा अधिक अंतरावर कळमनुरी तालुक्याच्या तुलनेत औंढा नागनाथ तालुक्यामध्ये अधिक शाळा आहेत. गावात शाळा नाही, असे सांगणाऱ्या महिलांचे प्रमाण कळमनुरी तालुक्यात अधिक आहे.

वरीलप्रमाणे हिंगोली जिल्ह्यातील औंढा नागनाथ व कळमनुरी तालुक्यातील साक्षर व निरक्षर महिलांची सामाजिक पार्श्वभूमी वरीलप्रमाणे स्पष्ट करण्यात आलेली आहे.

## ५.५ कारणमीमांसा संबंधित माहितीचे विश्लेषण :

हिंगोली जिल्ह्यातील महिला साक्षरतेचे प्रमाण कमी असल्याच्या कारणांचा शोध संख्याशास्त्रीय साधनांच्या सहाय्याने संशोधकाने घेतलेला असून त्यासंबधीचे स्पष्टीकरण खालील प्रमाणे करण्यात आलेले आहे.

हिंगोली जिल्ह्यातील औंढा नागनाथ व कळमनुरी या दोन्ही तालुक्यातील साक्षर व निरक्षर अशा दोन्ही प्रकारच्या महिलांकडून अनुसूचीच्या सहाय्याने कारणांचा शोध घेण्यात आलेला आहे. संशोधकांने संशोधनाच्या सुरुवातीस केलेल्या विविध संदर्भ साहित्याच्या अभ्यासावरुन अनुसूचीमध्ये समाविष्ट केलेली कारणे व त्यामधील कारणे शोधण्यासाठी SPSS यामध्ये करण्यात आलेले सांकेतिकरण खालील तक्ता क्र. ५.३१ मध्ये नमूद केलेली आहेत.

**तक्ता क्र. ५.३१**

**हिंगोली जिल्ह्यातील महिला साक्षरता कमी असल्यासंबंधित अनुसूचीमध्ये नमूद कारणे**

| अ.क्र. | कारणे | SPSS मध्ये नमूद सांकेतांक |
|---|---|---|
| १. | शाळेत जाण्यासाठी वाहतूकीची सोय नसणे. | VAR00001 |
| २. | शाळेत जाण्याच्या वाटेत डोंगर/नदी/नाला/घाट/जंगल इ. अडथळे असणे. | VAR00002 |
| ३. | शाळा घरापासून दूर अंतरावर असणे. | VAR00003 |
| ४. | गावात शाळा नसणे. | VAR00004 |
| ५. | घरची आर्थिक परिस्थिती गंभीर असणे. | VAR00005 |
| ६. | आईला घरकामात मदत करावी लागणे. | VAR00006 |

| अ.क्र. | कारणे | SPSS मध्ये नमूद सांकेतांक |
|---|---|---|
| ७. | वडिलांना शेतीच्या कामात मदत करण्यासाठी शेतीवर जावे लागणे. | VAR00007 |
| ८. | आर्थिक परिस्थिती चांगली नव्हती, त्यामुळे पैसे कमाविण्यासाठी कामावर जावे लागणे. | VAR00008 |
| ९. | लहान भावंडाना साभाळावे लागणे | VAR00009 |
| १०. | दुरून पाणी भरावे लागणे. | VAR00010 |
| ११. | लाकूडफाटा/सरपण गोळा करण्यासाठी जावे लागणे | VAR00011 |
| १२. | आई हयात नसणे. | VAR00012 |
| १३. | वडिल हयात नसणे. | VAR00013 |
| १४. | सामाजिक सुरक्षितता (छेडछाड, वाट अडवणे इ. सारख्या अडचणी) असणे. | VAR00014 |
| १५. | गावातील खूपच कमी मुली शाळेत जात असणे. | VAR00015 |
| १६. | असे तुम्ही ऐकले की, शाळेत शिक्षक मारत. | VAR00016 |
| १७. | असे तुम्ही ऐकले होते की, शाळेत शिक्षक शिकवत नाहीत. | VAR00017 |
| १८. | शाळेत वर्गखोल्या नाहीत. | VAR00018 |
| १९. | शाळेत पिण्याचे पाणी नाही. | VAR00019 |
| २०. | शाळेत दुपारचे जेवण/खिचडी मिळत नाही. | VAR00020 |
| २१. | शाळेत मुलींसाठी स्वतंत्र स्वच्छतागृह नाही. | VAR00021 |
| २२. | असे वाटत होते जी, शाळेत जाऊन (काहीच) फायदा नाही. | VAR00022 |

संदर्भ : प्रस्तुत अभ्यासाकरिता केलेले प्राथमिक सर्वेक्षण

वरील तक्ता क्र. ५.३१ मध्ये दिलेल्या अनेक कारणांमध्ये दोन्ही तालुक्यातील प्रतिसादकांच्या मते प्रभावी कारणांचा शोध घेण्यासाठी ‘मुख्य घटक विश्लेषण पध्दती’ या संख्याशास्त्रातील तंत्रांचा वापर केला. हे तंत्र कार्यान्वित करण्यासाठी SPSS या

विश्लेषण साधनांचा वापर केला आहे. SPSS या विश्लेषण साधनानुसार मुख्य घटक विश्लेषण करतांना खालील तक्ता. क्र. ५.३२ व ५.३३ मध्ये नमूद बाबी आढळून येतात.

**तक्ता क्र. ५.३२**

**SPSS नुसार सर्वच घटकांचे विश्लेषण**

**Total Variance Explained**

| Component | Initial Eigenvalues | | | Extraction Sums of Squared Loadings | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | Total | % of Variance | Cumulative % | Total | % of Variance | Cumulative % |
| 1 | 5.307 | 24.123 | 24.123 | 5.307 | 24.123 | 24.123 |
| 2 | 2.347 | 10.669 | 34.792 | | | |
| 3 | 1.950 | 8.864 | 43.656 | | | |
| 4 | 1.645 | 7.478 | 51.134 | | | |
| 5 | 1.387 | 6.304 | 57.438 | | | |
| 6 | 1.279 | 5.813 | 63.252 | | | |
| 7 | .959 | 4.357 | 67.608 | | | |
| 8 | .872 | 3.961 | 71.570 | | | |
| 9 | .833 | 3.788 | 75.358 | | | |
| 10 | .729 | 3.314 | 78.672 | | | |
| 11 | .636 | 2.893 | 81.564 | | | |
| 12 | .570 | 2.591 | 84.155 | | | |
| 13 | .539 | 2.452 | 86.607 | | | |
| 14 | .508 | 2.310 | 88.917 | | | |
| 15 | .430 | 1.953 | 90.870 | | | |
| 16 | .419 | 1.904 | 92.774 | | | |
| 17 | .365 | 1.661 | 94.435 | | | |
| 18 | .310 | 1.408 | 95.843 | | | |
| 19 | .291 | 1.321 | 97.164 | | | |
| 20 | .241 | 1.096 | 98.260 | | | |
| 21 | .220 | 1.001 | 99.261 | | | |
| 22 | .163 | .739 | 100.000 | | | |

Extraction Method: Principal Component Analysis.

वरील तक्ता क्र.५.३२ नुसार एकूण २२ कारणांच्या समूहामध्ये ०१ कारणांचा समूह स्पष्ट होतो. या समूहामध्ये असलेली प्रमुख कारणे खालील तक्त्यात दिलेली आहेत.

**तक्ता क्र. ५.३३**

**SPSS नुसार मुख्य घटकांचे विश्लेषण**

**Component Matrix[a]**

| | Component |
|---|---|
| | 1 |
| VAR00001 | -.651 |
| VAR00002 | .269 |
| VAR00003 | .406 |
| VAR00004 | -.493 |
| VAR00005 | .641 |
| VAR00006 | .663 |
| VAR00007 | .443 |
| VAR00008 | .322 |
| VAR00009 | .535 |
| VAR00010 | .719 |
| VAR00011 | .518 |
| VAR00012 | -.169 |
| VAR00013 | -.172 |
| VAR00014 | -.132 |
| VAR00015 | .280 |
| VAR00016 | .303 |
| VAR00017 | -.307 |
| VAR00018 | -.488 |
| VAR00019 | -.691 |
| VAR00020 | -.532 |
| VAR00021 | -.723 |
| VAR00022 | -.565 |

Extraction Method: Principal Component Analysis.

a. 1 components extracted.

वरील तक्ता ५.३२ मध्ये सहसंबंध मूल्य पातळी ०.५ निर्धारित धरुन सहसंबंध पडताळण्यात आलेला आहे. या सहसंबंध पडताळणीवरुन असे दिसून येते की, हिंगोली जिल्ह्यातील महिला साक्षरता प्रमाण कमी असल्याच्या एकूण २२ कारणांपैकी ११ कारणे (धन संख्या) मुख्य कारणीभूत घटक आहेत. यामध्ये शाळेत जाण्याच्या वाटेत डोंगर/नदी/नाला/घाट/जंगल इ. अडथळे असणे, शाळा घरापासून दूर अंतरावर असणे, घरची आर्थिक परिस्थिती गंभीर असणे, आईला घरकामात मदत करावी लागणे,

वडिलांना शेतीच्या कामात मदत करण्यासाठी शेतीवर जावे लागणे, आर्थिक परिस्थिती चांगली नव्हती त्यामुळे पैसे कमाविण्यासाठी कामावर जावे लागणे, लहान भावंडाना सांभाळावे लागणे, दुरून पाणी भरावे लागणे, लाकूडफाटा/सरपण गोळा करण्यासाठी जावे लागणे, गावातील खूपच कमी मुली शाळेत जात असणे, असे तुम्ही ऐकले की, शाळेत शिक्षक मारत इ. मुख्य कारणांचा समावेश होतो.

थोडक्यात हिंगोली जिल्ह्यात महिला साक्षरता कमी असण्याचा कारणांचा शोध घेण्याच्या अनुषंगाने दुय्यम स्त्रोत, प्राथमिक स्त्रोत याद्वारे प्राप्त माहितीचे विश्लेषण वरील प्रमाणे करण्यात आलेले आहे.

***

# प्रकरण – ६
# उस्मानाबाद जिल्ह्यातील अर्भक मृत्यूदरासंबंधी माहितीचे विश्लेषण

## ६.१ प्रस्तावना :

मानव विकासाची गणना करताना मानव जगत असलेले दीर्घ व स्वास्थ्यपूर्ण जीवन या घटकाचा विचार करण्यात येतो. दीर्घ व स्वास्थ्यपूर्ण जीवन या घटकाची मोजदाद करण्यासाठी या निदेशकाचा वापर करण्यात येतो. परंतु, राज्य स्तरावर मानवाचे आयुर्मान काढण्यासाठी पुरेशा सांख्यिकी माहितीचा अभाव असल्यामुळे आयुर्मानासारखा भासणारा मानक म्हणून अर्भकमृत्यू या निदेशकाचा आधार घेण्यात आलेला आहे. उस्मानाबाद जिल्ह्यातील अर्भकमृत्यू दराचा विचार करता असे निदर्शनास येते की, मराठवाड्यातील आठ जिल्ह्यामध्ये उस्मानाबाद जिल्ह्यातील अर्भकमृत्यूचे प्रमाण सर्वाधिक आहे. ही बाब विचारात घेता, या जिल्ह्यातील अर्भक मृत्यूचे प्रमाण कमी करणे आवश्यक आहे. ज्यामुळे मानव विकास निर्देशांक वाढण्यास मदत होईल. त्यामुळे उस्मानाबाद जिल्ह्यातील अर्भक मृत्यूदर अधिक असल्याचा कारणांचा शोध घेणे अगत्याचे ठरते.

उस्मानाबाद जिल्ह्यातील अर्भकमृत्यूचे प्रमाण अधिक असल्याच्या कारणांचा शोध घेण्यासाठी या जिल्ह्यातील अर्भक मृत्यूसंबंधित दुय्यम स्त्रोताकडे उपलब्ध माहितीचा वापर करण्यात आला आहे. तर, प्राथमिक माहिती संकलनासाठी “जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन जिल्हा उस्मानाबाद सन २०१०” नुसार जिल्ह्यातील सर्वाधिक अर्भकमृत्यू प्रमाण असलेला व सर्वात कमी अर्भकमृत्यू प्रमाण असलेल्या तालुक्याची निवड करण्यात आली. यामध्ये अनुक्रमे उस्मानाबाद व वाशी या तालुक्यांचा समावेश होतो. या दोन तालुक्यातील संस्थात्मक प्रसुती झालेल्या १८० व घरी प्रसुती झालेल्या १८० अशा दोन प्रकारच्या एकूण ३६० महिलांकडून प्राथमिक स्वरुपाच्या माहितीचे संकलित करण्यात आले.

या ३६० प्रतिसादकामध्ये अनुसूचित जमात १६, अनुसूचित जाती ११, इतर मागासवर्ग ५५, भटक्या जमाती ४६, भटक्या जाती, ०१, विमुक्त जाती १०, अल्पसंख्याक ०१ व सर्वसाधारण २२० अशा संवर्गातील प्रतिसादकांचा समावेश आहे.

## ६.२ प्रकरणाची रुपरेषा :

उस्मानाबाद जिल्ह्यातील अर्भकमृत्यूदराच्या संबंधित माहितीचे विशेषण या प्रकरणात करण्यात आले आहे. या प्रकरणाची रचना प्रामुख्याने तीन टप्प्यात करण्यात आलेली आहे. यामधील पहिल्या टप्प्यामध्ये उस्मानाबाद जिल्ह्यातील अर्भकमृत्यू संबंधित उपलब्ध दुय्यम माहितीचे विश्लेषण करण्यात आलेले आहे. दुसऱ्या टप्प्यांमध्ये उस्मानाबाद व वाशी तालुक्यातील ३६० प्रतिसादकांनी दिलेल्या माहितीचे विश्लेषण केले आहे. तिसऱ्या व प्रकरणाच्या अंतिम टप्प्यात उस्मानाबाद जिल्ह्यातील अर्भकमृत्यूचे प्रमाण अधिक असण्याच्या कारणांची मीमांसा मुख्य घटक विश्लेषण (Principal Componant Analysis) या चाचणी द्वारे केले आहे.

## ६.३ दुय्यम स्त्रोतामार्फत संकलित माहितीचे विश्लेषण :

उस्मानाबाद जिल्ह्यातील अर्भकमृत्यूदर अधिक असल्याच्या कारणमीमांसा करताना जिल्ह्यातील विविध शासकीय यंत्रणा यांच्याकडे उपलब्ध माहितीचे विश्लेषण करणे महत्वाचे ठरते. अर्भकमृत्यूच्या अनुषंगाने विविध प्रकारच्या दुय्यम माहितीचे विश्लेषण खालील प्रमाणे केले आहे.

### ६.३.१ तालुकानिहाय प्राथमिक आरोग्य केंद्राची स्थिती :

उस्मानाबाद जिल्ह्यातील तालुकानिहाय प्राथमिक आरोग्य केंद्राची सन २००२-०३ ते २००९-१० या कालावधीतील आकडेवारी खालील तक्ता क्र. ६.१ मध्ये दिलेली आहे.

**तक्ता क्र. ६.१**

**उस्मानाबाद जिल्ह्यातील तालुकानिहाय प्राथमिक आरोग्य केंद्राची स्थिती**

| **तालुका** | २००२-०३ | २००३-०४ | २००४-०५ | २००५-०६ | २००६-०७ | २००७-०८ | २००८-०९ | २००९-१० |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| उस्मानाबाद | १० | १० | १० | १० | १० | १० | १० | १० |
| वाशी | २ | २ | २ | २ | २ | २ | २ | २ |
| तुळजापूर | ७ | ७ | ७ | ७ | ७ | ७ | ७ | ७ |
| उमरगा | ४ | ४ | ४ | ४ | ४ | ४ | ४ | ४ |
| लोहारा | ४ | ४ | ४ | ४ | ४ | ४ | ४ | ४ |
| कळंब | ७ | ७ | ७ | ६ | ६ | ६ | ६ | ६ |
| भूम | ४ | ४ | ४ | ५ | ५ | ५ | ५ | ५ |
| परंडा | ४ | ४ | ४ | ४ | ४ | ४ | ४ | ४ |
| **एकूण** | **४२** | **४२** | **४२** | **४२** | **४२** | **४२** | **४२** | **४२** |

संदर्भ : जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन जिल्हा उस्मानाबाद सन २००२-०३ ते २००९-१०, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई.

वरील तक्ता क्र. ६.१ वरुन असे दिसते की, सन २००२-०३ ते सन २००९-१० या आठ वर्षाच्या कालावधीत उस्मानाबाद जिल्ह्यातील एकूण प्राथमिक आरोग्य केंद्रांची संख्या कायम आहे. उस्मानाबाद, वाशी, तुळजापूर उमरगा, लोहारा व परंडा या तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्राची संख्या स्थिर असून कळंब तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रातील संख्या सन २००५-०६ पासून एकने कमी झालेली असून भूम तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रातील संख्या सन २००५-०६ पासून एकने वाढलेली आहे.

### ६.३.२ **तालुकानिहाय आरोग्य उपकेंद्राची स्थिती :**

उस्मानाबाद जिल्ह्यातील तालुकानिहाय आरोग्य उपकेंद्राची सन २००४-०५ ते २००९-१० या कालावधीतील आकडेवारी खालील तक्ता क्र. ६.२ मध्ये दिलेली आहे.

**तक्ता क्र. ६.२**

**उस्मानाबाद जिल्ह्यातील तालुकानिहाय आरोग्य उपकेंद्राची स्थिती**

| **तालुका** | २००४-०५ | २००५-०६ | २००६-०७ | २००७-०८ | २००८-०९ | २००९-१० |
|---|---|---|---|---|---|---|
| उस्मानाबाद | ४२ | ४२ | ४२ | ४२ | ४२ | ४३ |
| वाशी | १६ | १६ | १६ | १६ | १६ | १६ |
| तुळजापूर | ३२ | ३२ | ३२ | ३२ | ३२ | ३२ |
| उमरगा | २९ | २९ | २९ | २९ | २९ | ३० |
| लोहारा | १८ | १८ | १८ | १८ | १८ | १८ |
| कळंब | २७ | २७ | २७ | २७ | २७ | २७ |
| भूम | २१ | २१ | २१ | २१ | २१ | २१ |
| परंडा | १९ | १९ | १९ | १९ | १९ | १९ |
| **एकूण** | **२०४** | **२०४** | **२०४** | **२०४** | **२०४** | **२०६** |

संदर्भ : जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन जिल्हा उस्मानाबाद सन २००४-०५ ते २००९-१०, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई

वरील तक्ता क्र. ६.२ वरुन असे दिसते की, सन २००४-०५ ते सन २००९-१० या सहा वर्षाच्या कालावधीत उस्मानाबाद जिल्ह्यातील एकूण आरोग्य उपकेंद्राची संख्या केवळ २ ने वाढ होऊन २०४ वरुन २०६ पर्यत पोहचली आहे. यात वाशी, तुळजापूर, लोहारा, कळंब, भूम व परंडा या तालुक्यातील आरोग्य उपकेंद्राची संख्या स्थिर असून उस्मानाबाद तालुक्यामध्ये सन २००९-१० मध्ये एका उपकेंद्राने वाढ होऊन ती ४३ झालेली आहे. तर उमरगा तालुक्यामध्ये सन २००९-१० मध्ये एका उपकेंद्राने वाढ होऊन ती ३० झालेली आहे.

### ६.३.३ **तालुकानिहाय प्रसुती गृहाची स्थिती** :

उस्मानाबाद जिल्ह्यातील सन २००२-०३ ते सन २००९-१० या कालावधीतील तालुकानिहाय प्रसुती गृहाची आकडेवारी खालील तक्ता क्र. ६.३ मध्ये दिलेली आहे.

**तक्ता क्र. ६.३**

**उस्मानाबाद जिल्ह्यातील तालुकानिहाय प्रसुती गृहाची स्थिती**

| तालुका | २००२-०३ | २००३-०४ | २००४-०५ | २००५-०६ | २००६-०७ | २००७-०८ | २००८-०९ | २००९-१० |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| उस्मानाबाद | ० | ० | ० | ० | ० | ० | ५१ | ५१ |
| वाशी | ० | ० | ० | ० | ० | ० | १६ | १६ |
| तुळजापूर | १ | १ | १ | १ | १ | १ | ३८ | ३८ |
| उमरगा | ० | ० | ० | ० | ० | ० | ३१ | ३१ |
| लोहारा | ० | ० | ० | ० | ० | ० | २१ | २१ |
| कळंब | ० | ० | ० | ० | ० | ० | ३१ | ३१ |
| भूम | ० | ० | ० | ० | ० | ० | २५ | २५ |
| परंडा | ० | ० | ० | ० | ० | ० | २२ | २२ |
| **एकूण** | **१** | **१** | **१** | **१** | **१** | **१** | **२३५** | **२३५** |

संदर्भ : जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन जिल्हा उस्मानाबाद सन २००२-०३ ते २००९-१०, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई

वरील तक्ता क्र. ६.३ वरुन असे दिसते की, सन २००२-०३ ते २००७-०८ मध्ये केवळ तुळजापूर तालुक्यामध्येच प्रसुती गृहाची सोय होती. तुळजापूर तालुक्यामध्ये या कालावधीत एकच प्रसुतीगृह होते. तर, सन २००८-०९ व २००९-१० या दोन वर्षाच्या कालावधीत उस्मानाबाद जिल्ह्यात एकूण २३५ प्रसुतीगृहाची निर्मिती करण्यात आली. थोडक्यात सन २००८-०९ मध्ये प्रसुतीगृहाच्या संख्येत एकदम वाढ झालेली दिसून येते.

### ६.३.४ तालुकानिहाय अर्भक मृत्यूची स्थिती :

उस्मानाबाद जिल्ह्यातील सन २००२-०३ ते २००९-१० या कालावधीतील अर्भकमृत्यू संबधित आकडेवारी खालील तक्ता क्र. ६.४ मध्ये दिलेली आहे.


**तक्ता. क्र. ६.४**

**उस्मानाबाद जिल्ह्यातील तालुकानिहाय अर्भकमृत्यूसंबंधित स्थिती**

| **तालुका** | २००२-०३ | २००३-०४ | २००४-०५ | २००५-०६ | २००६-०७ | २००७-०८ | २००८-०९ | २००९-१० |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| उस्मानाबाद | ४८ | ८५ | ८५ | १३० | १३० | ५७ | ६६ | ११९ |
| वाशी | ७ | ११ | ११ | १७ | १७ | १९ | ११ | १९ |
| तुळजापूर | २५ | ४७ | ४७ | ४७ | ४७ | १३ | १५ | ७६ |
| उमरगा | २४ | ४६ | ४६ | ३४ | ३४ | १० | २१ | ७९ |
| लोहारा | ७ | १६ | १६ | १६ | १६ | ४ | २ | १२ |
| कळंब | १० | २५ | २५ | २७ | २७ | ५ | ८ | ३० |
| भूम | ९ | १७ | १७ | १९ | १० | ५ | ० | ४१ |
| परंडा | ४ | १० | १० | १५ | १५ | ६ | ५ | २१ |
| **एकूण** | १३४ | २५७ | २५७ | ३०५ | २९६ | ११९ | १२८ | ३३६ |

संदर्भ : जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन जिल्हा उस्मानाबाद सन २००२-०३ ते २००९-१०, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई


**आकृती क्र. ६.१**
**उस्मानाबाद जिल्ह्यातील एकूण अर्भकमृत्यू**




वरील तक्ता क्र. ६.४ व आकृती क्र. ६.१ वरुन असे दिसते की, उस्मानाबाद जिल्ह्यातील एकूण अर्भक मृत्यूंची संख्या सन २००२-०३ पासून २००६-०७ पर्यत वाढलेली आहे. सन २००७-०८ आणि २००८-०९ या दोन वर्षात अर्भक मृत्यूची संख्या कमी झालेली आहे. मात्र, सन २००९-१० मध्ये यात लक्षणीय वाढ होऊन १२८ वरुन ३९७ पर्यत पोहोचली आहे. या वाढीचे तालुकानिहाय चित्र खालील आकृती क्र. ६.२ मध्ये दिलेले आहे

**आकृती क्र. ६.२**

**तालुकानिहाय अर्भकमृत्यू स्थिती**




वरील आकृती क्र. ६.२ वरुन असे दिसते की, सन २००२-०३ मध्ये उस्मानाबाद तालुक्यातील अर्भक मृत्यूची संख्या ४८ होती. मात्र, सन २००३-०४ मध्ये एकदम वाढून ती ८५ वर पोहचून २००४-०५ स्थिर आहे. मात्र, सन २००५-०६ व २००६-०७ मध्ये परत वाढलेली. सन २००७-०८ मध्ये संख्या कमी होऊन १३० वरुन ५७ वर पोहोचली आहे. सन २००८-०९ व २००९-१० मध्ये या संख्येत परत वाढ झालेली दिसून येते. तर त्या खालोखाल तुळजापूर व उमरगा या तालुक्यातील अर्भकमृत्यूचे प्रमाण अधिक आहे. तर सर्वात कमी अर्भकमृत्यू संख्या वाशी, परंडा व लोहारा या तालुक्यात आढळून येते.

**तक्ता क्र. ६.५**

**उस्मानाबाद जिल्ह्यातील अर्भकमृत्यू दर**


| **कालावधी** | **जानेवारी २००७ ते डिसेंबर २००७** | **जानेवारी २००८ ते डिसेंबर २००८** | **जानेवारी २००९ ते डिसेंबर २००९** |
|---|---|---|---|
| अर्भक मृत्यू दर | २५.२९ | ३४.२२ | २९.५१ |

संदर्भ : कार्यपूर्ती अहवाल १ जुलै २००६-३० जून २००९, महाराष्ट्र मानव विकास मिशन औरंगाबाद, पृ.क्र. १८८ ते १९२,

वरील तक्ता क्र. ६.५ वरुन असे दिसते की, सन २००७ मध्ये उस्मानाबाद जिल्ह्यातील अर्भक मृत्यूदर हा २५.२९ टक्के होता तो २००८ मध्ये वाढून ३४.२२ पर्यत पोहोचली. तर, २००९ मध्ये त्यात २९.५१ इतकी लक्षणीय घट झालेली दिसून येते. हे खालील आकृती क्र. ६.३ वरुन अधिक स्पष्ट होते.

आकृती क्र. ६.३

उस्मानाबाद जिल्ह्यातील अर्भकमृत्यूदर




वरील आकृती ६.३ वरुन असे दिसते की, अर्भकमृत्यूचे प्रमाण सन २००७ व २००९ च्या तुलनेत २००८ मध्ये अधिक आहे.

### ६.३.५ उस्मानाबाद जिल्ह्यातील संस्थात्मक प्रसुती संबंधित माहिती :

उस्मानाबाद जिल्ह्यात सन २००६ ते २००९ या कालावधीत झालेल्या संस्थात्मक प्रसुती संबंधी आकडेवारी खालील तक्ता क्र. ६.६ मध्ये दिलेली आहे.

**तक्ता क्र. ६.६**

**उस्मानाबाद जिल्ह्यातील संस्थात्मक प्रसुती संबंधित माहिती**

| **ऑक्टोबर २००६** | | **जानेवारी २००७** | | **जानेवारी २००८** | | **जानेवारी २००९** | | **जून २००९** | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| एकूण प्रसुती | संस्थात्मक प्रसुती | एकूण प्रसुती | संस्थात्मक प्रसुती | एकूण प्रसुती | संस्थात्मक प्रसुती | एकूण प्रसुती | संस्थात्मक प्रसुती | एकूण प्रसुती | संस्थात्मक प्रसुती |
| २३९ | १३३ (५५.६५%)* | १७१ | ९८ (५७.३१%)* | २६९ | २०० (७४.३५%)* | ५७६ | ४८८ (८४.७२%)* | ३९९ | ३४५ (८६.४७%)* |


संदर्भ : कार्यपुर्ती अहवाल १ जुलै २००६-३० जून २००९, महाराष्ट्र मानव विकास मिशन औरंगाबाद, पृ.क्र. १८८ ते १९२,

टिप : *एकूण प्रसुतीशी टक्केवारी

वरील तक्ता क्र. ६.६ वरुन असे दिसते की, ऑक्टोबर २००६ मध्ये एकूण प्रसुती २३९ पैकी १३३ या संस्थात्मक प्रसुती झालेल्या आहेत. जानेवारी २००७ मध्ये १७१ पैकी ९८, जानेवारी २००८ मध्ये २६९ पैकी २००, जानेवारी २००९ मध्ये ५७६ पैकी ४८८ व जून २००९ मध्ये ३४५ इतक्या संस्थात्मक प्रसुती झालेल्या आहेत.

**आकृती क्र. ६.४**

**उस्मानाबाद जिल्ह्यातील संस्थात्मक प्रसुतीचे प्रमाण**



वरील आकृती क्र. ६.४ वरुन असे दिसते की, ऑक्टोबर २००६ मध्ये संस्थात्मक प्रसुतीचे प्रमाण ५५.६५ टक्के आहे, जानेवारी २००७ हे प्रमाण ५७.३१ टक्के झाले आहे. तर एक वर्षाने म्हणजे जानेवारी २००८ मध्ये हे प्रमाण ७४.३५ टक्के इतक्या प्रमाणात वाढ झालेली आहे. जानेवारी २००९ मध्ये हे प्रमाण ८४.७२ तर जून २००९ मध्ये हे प्रमाण ८६.७४ टक्क्यापर्यत पोहचले आहे. थोडक्यात उस्मानाबाद जिल्ह्यात संस्थात्मक प्रसुतीमध्ये २००६ च्या तुलनेत २००९ मध्ये लक्षणीय वाढ झालेली आहे.

### ६.३.६ तालुकानिहाय हिमोग्लोबिन तपासलेल्या किशोरवयीन मुलींची स्थिती :

उस्मानाबाद जिल्ह्यातील अर्भक मृत्यू घडून येण्यास विविध कारणे कारणीभूत आहेत. ॲनिमिया हे एक त्यातील महत्वाचे कारण आहे. तेव्हा उस्मानाबाद जिल्ह्यातील किशोरवयीन मुलींच्या हिमोग्लोबिनचे प्रमाण यासंबंधित आकडेवारी खालील तक्ता क्र. ६.७ मध्ये दिलेली आहे.

**तक्ता क्र. ६.७**


**तालुकानिहाय हिमोग्लोबिन तपासलेल्या मुलींची माहिती**

| **तालुक्याचे नाव** | **हिमोग्लोबिन तपासलेल्या मुलींची संख्या** | | | **७ गॅम पेक्षा कमी हिमोग्लोबिन असलेल्या मुलींची संख्या** | | | **७ ते १० गॅम हिमोग्लोबिन असलेल्या मुलींची संख्या** | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | १ एप्रिल २००८ ते ३१ मार्च २००९ | १ एप्रिल २००९ ते ३१ मार्च २०१० | १ एप्रिल २०१० ते ३१ मार्च २०११ | १ एप्रिल २००८ ते ३१ मार्च २००९ | १ एप्रिल २००९ ते ३१ मार्च २०१० | १ एप्रिल २०१० ते ३१ मार्च २०११ | १ एप्रिल २००८ ते ३१ मार्च २००९ | एप्रिल २००९ ते ३१ मार्च २०१० | एप्रिल २०१० ते ३१ मार्च २०११ |
| उस्मानाबाद | १०१२२ | १३२८८ | १३२३३ | ४६७ | ७६६ | ७०६ | ४८७२ | ३८८ | ३९९ |
| वाशी | ४२९८ | ४१५८ | ४२१३ | ३ | ८ | ३ | २८५१ | ९४८ | ८५१ |
| तुळजापूर | ११८९६ | १०१४४ | ११८७५ | १२१ | ३२७ | १२१ | ११७५४ | १९८ | १७५४ |
| उमरगा | ११७७८ | १०७१८ | ११७१८ | ५८ | ७६ | ५४ | ३५२५ | ८९८ | ५२३ |
| लोहारा | ५८८५ | ६४१५ | ५३८५ | ३२७ | ४१३ | ३२७ | ३७३२ | ३१७ | ७३२ |
| कळंब | ९०९९ | ९७९१ | ९०१९ | ६३ | ८७ | ६३ | ८१६४ | ४१५ | १६४ |
| भूम | ४९३९ | ५३०२ | ४९२४ | १०२ | १२३ | १०२ | १९८३ | ३३३ | ९८३ |
| परंडा | १३६९७ | १३६०५ | १३५९७ | २२ | २७ | १८ | ७६५९ | ०७९ | ६४९ |
| **एकूण** | **७१७१४** | **७३४२१** | **७३९६४** | **११६३** | **१८२७** | **१३९४** | **४४५४०** | **१५७६** | **७०५५** |

संदर्भ : मानव विकास मिशन शिबिर अहवाल, २००९ ते २०११, जिल्हा आरोग्य विभाग, जिल्हा उस्मानाबाद पृ.४-६

वरील तक्ता क्र. ६.७ वरुन असे स्पष्ट होते की, उस्मानाबाद जिल्ह्यातील गंभीर ॲनिमिया असलेल्या मुलींचे प्रमाण या जिल्ह्यातील इतर तालुक्याच्या तुलनेत उस्मानाबाद तालुक्यामध्ये अधिक आहे. त्याखालोखाल लोहारा व तुलळजापूर या तालुक्याचा क्रमांक लागतो. तर, गंभीर ॲनिमिया असलेल्या मुलींचे सर्वात कमी प्रमाण वाशी तालुक्यामध्ये आहे. त्यावर अनुक्रमे परंडा, उमरगा व कळंब या तालुक्यांचा क्रमांक लागतो.

**आकृती क्र. ६.५**
**उस्मानाबाद जिल्ह्यातील हिमोग्लोबिन तपासलेल्या एकूण मुलींची स्थिती**




वरील तक्ता क्र. ६.५ वरुन असे स्पष्ट होते की, १ एप्रिल २००८ ते ३१ मार्च २००९ या कालावधीत केलेल्या मुलींच्या हिमोग्लोबिन तपासणीमध्ये ॲनिमिक मुलींचे प्रमाण हे १ एप्रिल २००९ ते ३१ मार्च २०१० या कालावधीत केलेल्या तपासणीतील मुलींच्या प्रमाणापेक्षा अधिक आहे. तर १ एप्रिल २००९ ते ३१ मार्च २०१० या कालावधीतील तपासणी केलेल्या मुलींच्या तुलनेत १ एप्रिल २०१० ते ३१ मार्च

२०११ या कालावधीतील तपासणी केलेल्या मुलींमध्ये ॲनिमिक मुलींचे प्रमाण अधिक आहे.

## ६.४ प्राथमिक स्त्रोतांमार्फत संकलित माहितीचे विश्लेषण :

उस्मानाबाद जिल्ह्यातील उस्मानाबाद व वाशी तालुक्यातील संस्थात्मक प्रसुती झालेल्या व घरी प्रसुती झालेल्या या दोन प्रकारतील महिलांच्या सर्वेक्षणातून प्राप्त झालेल्या प्राथमिक माहितीचे विश्लेषण खालील प्रमाणे करण्यात आलेले आहे.

### ६.४.१ महिलांची शैक्षणिक स्थिती :

उस्मानाबाद जिल्ह्यातील उस्मानाबाद व वाशी तालुक्यातील संस्थात्मक प्रसुती झालेल्या व घरी प्रसुती झालेल्या महिलांच्या शैक्षणिक स्थितीची माहिती खालील तक्ता क्र. ६.८ मध्ये दिलेली आहे.

**तक्ता क्र. ६.८**

**वाशी उस्मानाबाद व तालुक्यातील महिलांची शैक्षणिक स्थिती**

| | वाशी | | | | | | .उस्मानाबाद | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | निरक्षर | | साक्षर | | एकूण | | निरक्षर | | साक्षर | | एकूण | |
| | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी |
| संस्थात्मक प्रसुती | २ | २.२२ | ८८ | ९७.७८ | ९० | १०० | १ | १.११ | ८९ | ९८.८९ | ९० | १०० |
| घरी प्रसुती | १० | ११.११ | ८० | ८८.८९ | ९० | १०० | १५ | १६.६७ | ७५ | ८३.३३ | ९० | १०० |


संदर्भ : प्रस्तुत अभ्यासाकरिता केलेले प्राथमिक सर्वेक्षण

वरील तक्ता क्र. ६.८ वरुन असे दिसते की, वाशी तालुक्यातील संस्थात्मक प्रसुती झालेल्या महिलांमध्ये २.२२ टक्के महिला निरक्षर तर ९७.७८ टक्के महिला साक्षर आहेत. याच तालुक्यातील घरी प्रसुती झालेल्या महिलांमध्ये ११.११ टक्के महिला निरक्षर तर ८८.८९ टक्के महिला साक्षर आहेत.

उस्मानाबाद तालुक्यातील संस्थात्मक प्रसुती झालेल्या महिलांमध्ये १.१ टक्के महिला निरक्षर तर ९८.८९ टक्के महिला साक्षर आहेत. याच तालुक्यातील घरी

प्रसुती झालेल्या महिलांमध्ये १६.६७ टक्के महिला निरक्षर तर ८३.३३ टक्के महिला साक्षर आहेत.

**आकृती क्र. ६.६**
**वाशी उस्मानाबाद व तालुक्यातील महिलांची शैक्षणिक स्थिती**




वरील आकृती क्र. ६.६ वरुन असे स्पष्ट होते की, संस्थात्मक प्रसुती झालेल्या महिलांमध्ये साक्षर महिलांचे प्रमाण वाशी तालुक्याच्या तुलनेत उस्मानाबाद तालुक्यात अधिक आहे. तर घरी प्रसुती झालेल्या महिलांमध्ये निरक्षर महिलांचे प्रमाण वाशी तालुक्याच्या तुलनेत उस्मानाबाद तालुक्यात अधिक आहे.

६.४.२ **महिलांच्या पतीची शैक्षणिक स्थिती :**

उस्मानाबाद जिल्ह्यातील उस्मानाबाद व वाशी तालुक्यातील संस्थात्मक प्रसुती झालेल्या व घरी प्रसुती झालेल्या महिलांच्या पतीची शैक्षणिक स्थिती खालील तक्ता क्र. ६.९ मध्ये दिलेली आहे.

**तक्ता क्र. ६.९**

**उस्मानाबाद व वाशी तालुक्यातील महिलांच्या पतीची शैक्षणिक स्थिती**

| | वाशी | | | | | | उस्मानाबाद | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | निरक्षर | | साक्षर | | एकूण | | निरक्षर | | साक्षर | | एकूण | |
| | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी |
| संस्थात्मक प्रसुती | ० | ०.० | ९० | १०० | ९० | १०० | १ | १.११ | ८९ | ९८.८९ | ९० | १०० |
| घरी प्रसुती | ७ | ७.७८ | ८३ | ९२.२२ | ९० | १०० | १३ | १४.४४ | ७७ | ८५.५६ | ९० | १०० |


संदर्भ : प्रस्तुत अभ्यासाकरिता केलेले प्राथमिक सर्वेक्षण

वरील तक्ता क्र. ६.९ वरुन असे दिसते की, वाशी तालुक्यातील संस्थात्मक प्रसुती झालेल्या महिलांमध्ये साक्षर पतीचे प्रमाण १०० टक्के आहे. याच तालुक्यातील घरी प्रसुती झालेल्या महिलांमध्ये ७.७८ टक्के महिलाचे पती निरक्षर तर ९२.२२ टक्के महिलांचे पती साक्षर आहेत.

उस्मानाबाद तालुक्यातील संस्थात्मक प्रसुती झालेल्या महिलांमध्ये १.१ टक्के महिलांचे पती निरक्षर तर ९८.८९ टक्के महिलांचे पती साक्षर आहेत. याच तालुक्यातील घरी प्रसुती झालेल्या महिलांमध्ये १४.४४ टक्के महिलांचे पती निरक्षर तर ८५.५६ टक्के महिलांचे पती साक्षर आहेत.

**आकृती क्र. ६.७**

**उस्मानाबाद व वाशी तालुक्यातील महिलांच्या पतीची शैक्षणिक स्थिती**




वरील आकृती क्र. ६.७ वरुन असे स्पष्ट होते की, संस्थात्मक प्रसुती झालेल्या महिलांमध्ये साक्षर पती असलेल्या महिलांचे प्रमाण उस्मानाबाद तालुक्याच्या तुलनेत वाशी तालुक्यामध्ये अधिक आहे. तर घरी प्रसुती झालेल्या महिलांमध्ये निरक्षर पती असलेल्या महिलांचे प्रमाण वाशी तालुक्याच्या तुलनेत उस्मानाबाद तालुक्यात अधिक आहे

### ६.४.३ महिलांच्या सासू व सासरे यांची शैक्षणिक स्थिती :

उस्मानाबाद जिल्ह्यातील उस्मानाबाद व वाशी तालुक्यातील संस्थात्मक प्रसुती झालेल्या व घरी प्रसुती झालेल्या महिलांच्या सासू व सासरे यांच्या शौक्षणिक स्थितीची माहिती खालील तक्ता क्र. ६.१० व ६.११ मध्ये दिलेली आहे.

**तक्ता क्र. ६.१०**

**उस्मानाबाद व वाशी तालुक्यातील महिलांच्या सासरे यांची शैक्षणिक स्थिती**

| | वाशी | | | | | | उस्मानाबाद | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | निरक्षर | | साक्षर | | एकूण | | निरक्षर | | साक्षर | | एकूण | |
| | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी |
| संस्थात्मक प्रसुती | ६२ | ६८.८९ | २८ | ३१.११ | ९० | १०० | ७२ | ८० | १८ | २० | ९० | १०० |
| घरी प्रसुती | ६१ | ६७.७८ | २९ | ३२.२२ | ९० | १०० | ८० | ८८.८९ | १० | ११.११ | ९० | १०० |

संदर्भ : प्रस्तुत अभ्यासाकरिता केलेले प्राथमिक सर्वेक्षण

वरील तक्ता क्र. ६.१० वरुन असे दिसते की, वाशी तालुक्यातील संस्थात्मक प्रसुती झालेल्या महिलांमध्ये निरक्षर सासरे असलेल्या महिलांचे प्रमाण ६८.८९ असून साक्षर सासरे असलेल्या महिलांचे प्रमाण ३१.११ टक्के आहे. याच तालुक्यातील घरी प्रसुती झालेल्या महिलांमध्ये साक्षर निरक्षर सासरे असलेल्या महिलांचे प्रमाण ६७.७८ टक्के असून साक्षर सासरे असलेल्या महिलांचे प्रमाण ३२.२२ टक्के आहेत.

उस्मानाबाद तालुक्यातील संस्थात्मक प्रसुती झालेल्या महिलांमध्ये निरक्षर सासरे असलेल्या महिलांचे प्रमाण ८० असून साक्षर सासरे असलेल्या महिलांचे प्रमाण २० टक्के आहे. याच तालुक्यातील घरी प्रसुती झालेल्या महिलांमध्ये साक्षर निरक्षर सासरे असलेल्या महिलांचे प्रमाण ८८.८९ टक्के असून साक्षर सासरे असलेल्या महिलांचे प्रमाण ११.११ टक्के आहेत.

**तक्ता क्र. ६.११**

**उस्मानाबाद व वाशी तालुक्यातील महिलांच्या सासूची शैक्षणिक स्थिती**


| | वाशी | | | | | | उस्मानाबाद | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | निरक्षर | | साक्षर | | एकूण | | निरक्षर | | साक्षर | | एकूण | |
| | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी |
| संस्थात्मक प्रसुती | ७७ | ८५.५६ | १३ | १४.४४ | ९० | १०० | ७६ | ८४.४४ | १४ | १५.५६ | ९० | १०० |
| घरी प्रसुती | ७० | ७७.७८ | २० | २२.२२ | ९० | १०० | ८४ | ९३.३३ | ६ | ६.६७ | ९० | १०० |

संदर्भ : प्रस्तुत अभ्यासाकरिता केलेले प्राथमिक सर्वेक्षण


वरील तक्ता क्र. ६.११ वरुन असे दिसते की, वाशी तालुक्यातील संस्थात्मक प्रसुती झालेल्या महिलांमध्ये निरक्षर सासू असलेल्या महिलांचे प्रमाण ८५.५६ असून साक्षर सासू असलेल्या महिलांचे प्रमाण १४.४४ टक्के आहे. याच तालुक्यातील घरी प्रसुती झालेल्या महिलांमध्ये साक्षर निरक्षर सासू असलेल्या महिलांचे प्रमाण ७७.७८ टक्के असून साक्षर सासू असलेल्या महिलांचे प्रमाण २२.२२ टक्के आहेत.

उस्मानाबाद तालुक्यातील संस्थात्मक प्रसुती झालेल्या महिलांमध्ये निरक्षर सासू असलेल्या महिलांचे प्रमाण ८४.४४ असून साक्षर सासू असलेल्या महिलांचे प्रमाण १५.५६ टक्के आहे. याच तालुक्यातील घरी प्रसुती झालेल्या महिलांमध्ये साक्षर निरक्षर सासू असलेल्या महिलांचे प्रमाण ९३.३३ टक्के असून साक्षर सासू असलेल्या महिलांचे प्रमाण ६.६७ टक्के आहेत.

## आकृती क्र. ६.८
## उस्मानाबाद व वाशी तालुक्यातील महिलांच्या सासरे यांची शैक्षणिक स्थिती




## आकृती क्र. ६.९
## उस्मानाबाद व वाशी तालुक्यातील महिलांच्या सासूची शैक्षणिक स्थिती



वरील आकृती क्र. ६.८ व ६.९ वरुन असे स्पष्ट होते की, संस्थात्मक प्रसुती झालेल्या महिलांमध्ये साक्षर सासरे असलेल्या महिलांचे प्रमाण उस्मानाबाद तालुक्याच्या तुलनेत वाशी तालुक्यामध्ये अधिक आहे. तर निरक्षर सासूचे प्रमाण वाशी तालुक्याच्या तुलनेत उस्मानाबाद तालुक्यात अधिक आहे.

### ६.४.४ महिलांच्या दारिद्र्यरेषेखालील कुटुंबाची माहिती :

उस्मानाबाद जिल्ह्यातील उस्मानाबाद व वाशी तालुक्यातील संस्थात्मक प्रसुती झालेल्या व घरी प्रसुती झालेल्या महिलांच्या कुटुंबाच्या आर्थिक स्थितीसंबंधित माहिती खालील तक्ता क्र. ६.१२ मध्ये दिलेली आहे.

**तक्ता. ६.१२**

**उस्मानाबाद व वाशी तालुक्यातील दारिद्र्यरेषेखालील कुटुंबासंबंधित स्थिती**

| | वाशी | | | | | | उस्मानाबाद | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | होय | | नाही | | एकूण | | होय | | नाही | | एकूण | |
| | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी |
| संस्थात्मक प्रसुती | २७ | ३० | ६३ | ७० | ९० | १०० | ३० | ३३.३३ | ६० | ६६.६७ | ९० | १०० |
| घरी प्रसुती | २८ | ३१.११ | ६२ | ६८.८९ | ९० | १०० | ३७ | ४१.११ | ५३ | ५८.८९ | ९० | १०० |

संदर्भ : प्रस्तुत अभ्यासाकरिता केलेले प्राथमिक सर्वेक्षण


वरील तक्ता क्र. ६.१२ वरुन असे दिसते की, वाशी तालुक्यातील संस्थात्मक प्रसुती झालेल्या महिलांमध्ये दारिद्र्यरेषेखालील असलेल्या महिलांचे प्रमाण ३० टक्के असून दारिद्र्यरेषेवरील महिलांचे प्रमाण ७० टक्के आहे. याच तालुक्यातील घरी प्रसुती झालेल्या महिलांमध्ये दारिद्र्यरेषेखाली असलेल्या महिलांचे प्रमाण ३१.११ टक्के असून दारिद्र्यरेषेवरील महिलांचे प्रमाण ६८.८९ टक्के आहे.

उस्मानाबाद तालुक्यातील संस्थात्मक प्रसुती झालेल्या महिलांमध्ये दारिद्र्यरेषेखालील असलेल्या महिलांचे प्रमाण ३३.३३ टक्के असून दारिद्र्यरेषेवरील महिलांचे प्रमाण ६६.६७ टक्के आहे. याच तालुक्यातील घरी प्रसुती झालेल्या

महिलांमध्ये दारिद्र्यरेषेखाली असलेल्या महिलांचे प्रमाण ४१.११ टक्के असून दारिद्र्यरेषेवरील महिलांचे प्रमाण ५८.८९ टक्के आहे.

**आकृती क्र. ६.१०**

**उस्मानाबाद व वाशी तालुक्यातील दारिद्र्यरेषेखालील कुटुंबासंबंधित स्थिती**




वरील आकृती क्र. ६.१० वरुन असे स्पष्ट होते की, संस्थात्मक प्रसुती झालेल्या व घरी प्रसुती झालेल्या महिलांमध्ये दारिद्र्यरेषेखाली महिलांचे प्रमाण वाशी तालुक्याच्या तुलनेत उस्मानाबाद तालुक्यात आधिक आहे.

### ६.४.५ **महिलांच्या विवाहाच्या वयासंबंधित माहिती :**

उस्मानाबाद जिल्ह्यातील उस्मानाबाद व वाशी तालुक्यातील संस्थात्मक प्रसुती झालेल्या व घरी प्रसुती झालेल्या महिलांच्या विवाहाच्या वयासंबंधित महिती खालील तक्ता क्र. ६.१३ मध्ये दिलेली आहे.

## तक्ता क्र. ६.१३

## उस्मानाबाद व वाशी तालुक्यातील महिलांच्या विवाहाच्या वयासंबंधित महिती


| | वाशी | | | | | | उस्मानाबाद | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | १८ वर्षापेक्षा कमी | | १८ वर्ष व त्यापेक्षा अधिक | | एकूण | | १८ वर्षापेक्षा कमी | | १८ वर्ष व त्यापेक्षा अधिक | | एकूण | |
| | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी |
| संस्थात्मक प्रसुती | १३ | १४.४४ | ७७ | ८५.५६ | ९० | १०० | ८ | ८.८९ | ८२ | ९१.११ | ९० | १०० |
| घरी प्रसुती | १५ | १६.६७ | ७५ | ८३.३३ | ९० | १०० | ११ | १२.२२ | ७९ | ८७.७८ | ९० | १०० |

संदर्भ : प्रस्तुत अभ्यासाकरिता केलेले प्राथमिक सर्वेक्षण

वरील तक्ता क्र. ६.१३ वरुन असे दिसते की, वाशी तालुक्यातील संस्थात्मक प्रसुती झालेल्या महिलांमध्ये १८ वर्षापेक्षा कमी वयात विवाह झालेल्या महिलांचे प्रमाण १४.४४ टक्के असून १८ वर्ष व त्यापेक्षा अधिक वयात विवाह झालेल्या महिलांचे प्रमाण ८५.५६ टक्के आहे. याच तालुक्यातील घरी प्रसुती झालेल्या झालेल्या महिलांमध्ये १८ वर्षापेक्षा कमी वयात विवाह झालेल्या महिलांचे प्रमाण १६.६७ टक्के असून १८ वर्ष व त्यापेक्षा अधिक वयात विवाह झालेल्या महिलांचे प्रमाण ८३.३३ टक्के आह

उस्मानाबाद तालुक्यातील संस्थात्मक प्रसुती झालेल्या महिलांमध्ये १८ वर्षापेक्षा कमी वयात विवाह झालेल्या महिलांचे प्रमाण ८.८९ टक्के असून १८ वर्ष व त्यापेक्षा अधिक वयात विवाह झालेल्या महिलांचे प्रमाण ९१.११ टक्के आहे. याच तालुक्यातील घरी प्रसुती झालेल्या झालेल्या महिलांमध्ये १८ वर्षापेक्षा कमी वयात विवाह झालेल्या महिलांचे प्रमाण १२.२२ टक्के असून १८ वर्ष व त्यापेक्षा अधिक वयात विवाह झालेल्या महिलांचे प्रमाण ८७.७८ टक्के आहे.

## आकृती क्र. ६.११
## उस्मानाबाद व वाशी तालुक्यातील महिलांच्या विवाहाच्या वयासंबंधित महिती




वरील आकृती क्र. ६.११ वरुन असे दिसते की, संस्थात्मक प्रसुती झालेल्या व घरी प्रसुती झालेल्या महिलांमध्ये १८ वर्षापेक्षा कमी वयात विवाह झालेल्या महिलांचे प्रमाण उस्मानाबाद तालुक्याच्या तुलनेत वाशी तालुक्यामध्ये अधिक आहे.

### ६.४.६ गावांतील शासकीय आरोग्य सोईच्या उपलब्धतेसंबंधित माहिती :

उस्मानाबाद जिल्ह्यातील उस्मानाबाद व वाशी तालुक्यातील संस्थात्मक प्रसुती झालेल्या व घरी प्रसुती झालेल्या महिलांच्या गावांतील खालील तक्ता क्र. ६.१४ मध्ये दिलेला आहे.

**तक्ता क्र. ६.१४**

**उस्मानाबाद व वाशी तालुक्यातील गावांतील शासकीय आरोग्य सेवा सुविधांच्या उपलब्धतेसंबंधित माहिती**

| | वाशी | | | | | | | | उस्मानाबाद | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | आरोग्य उपकेंद्र | | प्राथमिक आरोग्य केंद्र | | नाही | | एकूण | | आरोग्य उपकेंद्र | | प्राथमिक आरोग्य केंद्र | | नाही | | एकूण | |
| | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी |
| संस्थात्मक प्रसुती | ३० | ३३.३३ | ९ | १० | ५१ | ५६.६७ | ९० | १०० | २५ | २७.७८ | ९ | १० | ५६ | ६२.२२ | ९० | १०० |
| घरी प्रसुती | ३२ | ३५.५६ | ५ | ५.५५ | ५३ | ५८.८९ | ९० | १०० | १५ | १६.६७ | ८ | ८.८९ | ६७ | ७४.४४ | ९० | १०० |

संदर्भ : प्रस्तुत अभ्यासाकरिता केलेले प्राथमिक सर्वेक्षण


वरील तक्ता क्र. ६.७ वरुन असे दिसते की, वाशी तालुक्यातील संस्थात्मक प्रसुती झालेल्या महिलांमध्ये ३३.३३ टक्के महिलांच्या गावांत आरोग्य उपकेंद्राची सुविधा आहे, १० टक्के महिलांच्या गावांत प्राथमिक आरोग्य केंद्राची सुविधा आहे तर ५६.६७ टक्के महिलांच्या गावांत आरोग्यासंबंधित शासकीय सोई सुविधा नाहीत. याच तालुक्यातील घरी प्रसुती झालेल्या झालेल्या महिलांमध्ये ३५.५६ टक्के महिलांच्या गावांत आरोग्य उपकेंद्राची सुविधा आहे, ५.५५ टक्के महिलांच्या गावांत प्राथमिक आरोग्य केंद्राची सुविधा आहे तर ५८.८९ टक्के महिलांच्या गावांत आरोग्यासंबंधित शासकीय सोई सुविधा नाहीत.

उस्मानाबाद तालुक्यातील संस्थात्मक प्रसुती झालेल्या महिलांमध्ये २७.७८ टक्के महिलांच्या गावांत आरोग्य उपकेंद्राची सुविधा आहे, १० टक्के महिलांच्या गावांत प्राथमिक आरोग्य केंद्राची सुविधा आहे तर ६२.२२ टक्के महिलांच्या गावांत आरोग्यासंबंधित शासकीय सोई सुविधा नाहीत. याच तालुक्यातील घरी प्रसुती झालेल्या झालेल्या महिलांमध्ये १६.६७ टक्के महिलांच्या गावांत आरोग्य उपकेंद्राची सुविधा

आहे, ८.८९ टक्के महिलांच्या गावांत प्राथमिक आरोग्य केंद्राची सुविधा आहे तर, ७४.४४ टक्के महिलांच्या गावांत आरोग्यासंबंधित शासकीय सोई सुविधा नाहीत.

**आकृती क्र. ६.१२**

**उस्मानाबाद व वाशी तालुक्यातील गावांतील शासकीय आरोग्य सेवा सुविधांच्या उपलब्धतेसंबंधित माहिती**




वरील आकृती क्र. ६.१२ वरुन असे स्पष्ट होते की, संस्थात्मक प्रसुती झालेल्या व घरी प्रसुती झालेल्या महिलांच्या गावांत शासकीय सोई सुविधा नसलेल्या महिलाचे प्रमाण वाशी तालुक्याच्या तुलनेत उस्मानाबाद तालुक्यात अधिक आहे.

### ६.४.७ शासकीय आरोग्य सुविधांचे घरापासूनचे अंतर :

उस्मानाबाद जिल्ह्यातील उस्मानाबाद व वाशी तालुक्यातील संस्थात्मक प्रसुती झालेल्या व घरी प्रसुती झालेल्या महिलांच्या घरापासूनचे शासकीय आरोग्य सेवा सुविधाचे अंतर खालील तक्ता क्र. ६.१५ मध्ये दिलेले आहे.

**तक्ता क्र. ६.१५**

**उस्मानाबाद व वाशी तालुक्यातील घरापासूनचे शासकीय आरोग्य सेवा सुविधांचे अंतर**

| | वाशी | | | | | | | | उस्मानाबाद | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | २ किमी पेक्षा कमी | | २ ते ५ किमी | | ५ किमी पेक्षा जास्त | | एकूण | | २ किमी पेक्षा कमी | | २ ते ५ किमी | | ५ किमी पेक्षा जास्त | | एकूण | |
| | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी |
| संस्थात्मक प्रसुती | ३१ | ३४.४४ | ० | ०.० | ५९ | ६५.५६ | ९० | १०० | १७ | १८.८९ | ४ | ४.४४ | ६९ | ७६.६७ | ९० | १०० |
| घरी प्रसुती | २८ | ३१.११ | २ | २.२२ | ६० | ६६.६७ | ९० | १०० | १५ | १६.६७ | ० | ०.० | ७५ | ८३.३३ | ९० | १०० |

संदर्भ : प्रस्तुत अभ्यासाकरिता केलेले प्राथमिक सर्वेक्षण

वरील तक्ता क्र. ६.१५ वरुन असे दिसते की, वाशी तालुक्यातील संस्थात्मक प्रसुती झालेल्या महिलांमध्ये २ किमी पेक्षा कमी अंतरावर घरापासून शासकीय आरोग्य सुविधा असलेल्या महिलांचे प्रमाण ३४.४४ टक्के आहे. तर ५ किमी पेक्षा जास्त अंतरावर शासकीय आरोग्य सुविधा असलेल्या महिलांचे प्रमाण ६५.५६ टक्के आहे. याच तालुक्यातील घरी प्रसुती झालेल्या महिलांमध्ये २ किमी पेक्षा कमी अंतरावर घरापासून शासकीय आरोग्य सुविधा असलेल्या महिलांचे प्रमाण ३१.११ टक्के आहे, २ ते ५ किमी अंतरावर आरोग्य सुविधा असलेल्या महिलांचे प्रमाण २.२२ टक्के आहे. तर, ५ किमी पेक्षा जास्त अंतरावर शासकीय आरोग्य सुविधा असलेल्या महिलांचे प्रमाण ६६.६७ टक्के आहे.

उस्मानाबाद तालुक्यातील संस्थात्मक प्रसुती झालेल्या महिलांमध्ये २ किमी पेक्षा कमी अंतरावर घरापासून शासकीय आरोग्य सुविधा असलेल्या महिलांचे प्रमाण १८.८९ टक्के आहे. २ ते ५ किमी अंतरावर आरोग्य सुविधा असलेल्या महिलांचे प्रमाण ४.४ टक्के आहे. तर ५ किमी पेक्षा जास्त अंतरावर शासकीय आरोग्य सुविधा असलेल्या महिलांचे प्रमाण ७६.६७ टक्के आहे. याच तालुक्यातील घरी प्रसुती झालेल्या महिलांमध्ये २ किमी पेक्षा कमी अंतरावर घरापासून शासकीय आरोग्य सुविधा

असलेल्या महिलांचे प्रमाण १६.६७ टक्के आहे. तर, ५ किमी पेक्षा जास्त अंतरावर शासकीय आरोग्य सुविधा असलेल्या महिलांचे प्रमाण ८३.३३ टक्के आहे.

थोडक्यात असे दिसते की, घरापासून २ किमी पेक्षा कमी अंतरावर शासकीय आरोग्य सुविधा उपलब्ध असलेल्या महिलांचे प्रमाण उस्मानाबाद तालुक्याच्या तुलनेत वाशी तालुक्यात अधिक आहे. तर ५ किमी पेक्षा जास्त अंतरावर शासकीय आरोग्य सुविधा उपलब्ध असलेल्या महिलांचे प्रमाण वाशी तालुक्याच्या तुलनेत उस्मानाबाद तालुक्यात अधिक आहे.

६.४.८ **गावातील खाजगी दवाखाना व त्याचे घरापासूनचे अंतर यासंबंधित माहिती :**

उस्मानाबाद जिल्ह्यातील उस्मानाबाद व वाशी तालुक्यातील संस्थात्मक प्रसुती झालेल्या व घरी प्रसुती झालेल्या महिलांच्या गावातील खाजगी दवाखाना व त्यांचे घरापासूनचे अंतर याविषयीची माहिती खालील तक्ता क्र. ६.१६ व ६.१७ मध्ये दिलेली आहे.

**तक्ता क्र. ६.१६**

**उस्मानाबाद व वाशी तालुक्यातील खाजगी दवाखान्याविषयी माहिती**

| | वाशी | | | | | | उस्मानाबाद | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | होय | | नाही | | एकूण | | होय | | नाही | | एकूण | |
| | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी |
| संस्थात्मक प्रसुती | ५ | ५.५६ | ८५ | ९४.४४ | ९० | १०० | ५ | ५.५६ | ८५ | ९४.४४ | ९० | १०० |
| घरी प्रसुती | ५ | ५.५६ | ८५ | ९४.४४ | ९० | १०० | ४ | ४.४४ | ८६ | ९५.५६ | ९० | १०० |

संदर्भ : प्रस्तुत अभ्यासाकरिता केलेले प्राथमिक सर्वेक्षण

वरील तक्ता क्र. ६.१६ वरुन असे दिसते की, वाशी तालुक्यातील संस्थात्मक प्रसुती व घरी प्रसुती झालेल्या महिलांमध्ये ५.५६ टक्के महिलांच्या गांवात खाजगी दवाखाना आहे. तर ९४.४४ टक्के महिलांच्या गावांत खाजगी दवाखान्याची सोय नाही.

उस्मानाबाद तालुक्यातील संस्थात्मक प्रसुती झालेल्या महिलांमध्ये ५.५६ टक्के महिलांच्या गावांत खाजगी दवाखाना आहे. तर ९४.४४ टक्के महिलांच्या गावांत खाजगी दवाखान्याची सॊय नाही. याच तालुक्यातील घरी प्रसुती झालेल्या ४.४४ टक्के महिलांच्या गावांत खाजगी दवाखान्याची सॊय असून ९५.५६ टक्के महिलांच्या गावांत याची सॊय नाही.

**तक्ता क्र. ६.१७**

**उस्मानाबाद व वाशी तालुक्यातील खाजगी दवाखान्याविषयी माहिती**

| | वाशी | | | | | | उस्मानाबाद | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | लागु नाही | | १ किमी | | एकूण | | लागु नाही | | १किमी | | एकूण | |
| | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी |
| संस्थात्मक प्रसुती | ८५ | ९४.४४ | ५ | ५.५६ | ९० | १०० | ८५ | ९४.४४ | ५ | ५.५६ | ९० | १०० |
| घरी प्रसुती | ८५ | ९४.४४ | ५ | ५.५६ | ९० | १०० | ८६ | ९५.५६ | ४ | ४.४४ | ९० | १०० |

संदर्भ : प्रस्तुत अभ्यासाकरिता केलेले प्राथमिक सर्वेक्षण

वरील तक्ता क्र. ६.१७ वरुन असे दिसते की, वाशी तालुक्यातील संस्थात्मक प्रसुती झालेल्या व घरी प्रसुती झालेल्या ५.५६ टक्के महिलांच्या घरापासून १ किमी अंतरावर खाजगी दवाखाना उपलब्ध आहे. तर, उस्मानाबाद तालुक्यात संस्थात्मक प्रसुती झालेल्या महिलांच्या ५.५६ टक्के महिलांच्या घरापासून १ किमी अंतरावर खाजगी दवाखाना आहे तर घरी प्रसुती झालेल्या ४.४४ टक्के महिलांच्या घरापासून १ किमी अंतरावर खाजगी दवाखाना आहे.

थॊडक्यात असे दिसते की, वाशी व उस्मानाबाद या दॊन्ही तालुक्यांत गावांत खाजगी दवाखाना असलेल्या संस्थात्मक प्रसुती झालेल्या महिलाचे प्रमाण सारखेच आहे. गावांत खाजगी दवाखाना असलेल्या घरी प्रसुती झालेल्या महिलांचे प्रमाण उस्मानाबाद तालुक्याच्या तुलनेत वाशी तालुक्यात अधिक आहे.

६.४.९ **महिलांच्या बाळंतपणासंबंधित माहिती :**

उस्मानाबाद जिल्ह्यातील उस्मानाबाद व वाशी तालुक्यातील संस्थात्मक प्रसुती झालेल्या व घरी प्रसुती झालेल्या महिलांची माहिती खालील तक्ता क्र. ६.१८ मध्ये दिलेली आहे.

**तक्ता क्र. ६.१८**

**उस्मानाबाद व वाशी तालुक्यातील महिलांच्या बाळंतपणाची संख्या यासंबंधित माहिती**

| | वाशी | | | | | | उस्मानाबाद | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | १-२ बाळंतपण | | ३-५ बाळंतपण | | एकूण | | १-२ बाळंतपण | | ३-५ बाळंतपण | | एकूण | |
| | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी |
| संस्थात्मक प्रसुती | ७२ | ८० | १८ | २० | ९० | १०० | ७१ | ७८.८९ | १९ | २१.११ | ९० | १०० |
| घरी प्रसुती | ६६ | ७३.३३ | २४ | २६.६७ | ९० | १०० | ६१ | ६७.७८ | २९ | ३२.२२ | ९० | १०० |

संदर्भ : प्रस्तुत अभ्यासाकरिता केलेले प्राथमिक सर्वेक्षण

वरील तक्ता क्र. ६.१८ वरुन असे दिसते की, वाशी तालुक्यातील संस्थात्मक प्रसुती झालेल्या महिलांमध्ये १ किंवा २ वेळी बाळंतपण झालेल्या महिलांचे प्रमाण ८० टक्के आहे. तर ३ ते ५ वेळी बाळंतपण झालेल्या महिलांचे प्रमाण २० टक्के आहे. याच तालुक्यातील घरी प्रसुती झालेल्या महिलांमध्ये १ किंवा २ वेळी बाळंतपण झालेल्या महिलांचे प्रमाण ७३.३३ टक्के आहे. तर ३ ते ५ वेळी बाळंतपण झालेल्या महिलांचे प्रमाण २६.६७ टक्के आहे.

उस्मानाबाद तालुक्यातील संस्थात्मक प्रसुती झालेल्या महिलांमध्ये १ किंवा २ वेळी बाळंतपण झालेल्या महिलांचे प्रमाण ७८.८९ टक्के आहे. तर ३ ते ५ वेळी बाळंतपण झालेल्या महिलांचे प्रमाण २१.११ टक्के आहे. याच तालुक्यातील घरी प्रसुती झालेल्या महिलांमध्ये १ किंवा २ वेळी बाळंतपण झालेल्या महिलांचे प्रमाण

६७.७८ टक्के आहे. तर ३ ते ५ वेळी बाळंतपण झालेल्या महिलांचे प्रमाण ३२.२२ टक्के आहे.

थोडक्यात असे दिसते की, ३ ते ५ वेळी बाळंतपण झालेल्या महिलांचे प्रमाण वाशी तालुक्याच्या तुलनेत उस्मानाबाद तालुक्यात अधिक आहे.

### ६.४.१० **महिलांच्या यापूर्वीच्या प्रसुतीसंबंधित माहिती :**

उस्मानाबाद जिल्ह्यातील उस्मानाबाद व वाशी तालुक्यातील संस्थात्मक प्रसुती झालेल्या व घरी प्रसुती झालेल्या महिलांची यापूर्वीची प्रसुती कोठे झाली या संबंधित माहिती खालील तक्ता क्र. ६.१९ मध्ये दिलेली आहे.

**तक्ता क्र. ६.१९**

**उस्मानाबाद व वाशी तालुक्यातील यापूर्वीच्या प्रसुतीसंबंधीत माहिती**

| | वाशी | | | | | | उस्मानाबाद | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | दवाखान्यात | | घरी | | एकूण | | दवाखान्यात | | घरी | | एकूण | |
| | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी |
| संस्थात्मक प्रसुती | ८६ | ९५.५६ | ४ | ४.४४ | ९० | १०० | ८७ | ९६.६७ | ३ | ३.३३ | ९० | १०० |
| घरी प्रसुती | २० | २२.२२ | ७० | ७७.७८ | ९० | १०० | १३ | १४.४४ | ७७ | ८५.५६ | ९० | १०० |

संदर्भ : प्रस्तुत अभ्यासाकरिता केलेले प्राथमिक सर्वेक्षण


वरील तक्ता क्र. ६.१९ वरुन असे दिसते की, वाशी तालुक्यातील संस्थात्मक प्रसुती झालेल्या महिलांमध्ये ९५.५६ टक्के महिलांची यापूर्वीची प्रसुती दवाखान्यात झालेली आहे तर केवळ ४.४४ टक्के महिलांची प्रसुती घरी झालेली आहे. तर, याच तालुक्यातील घरी प्रसुती झालेल्या २२.२२ टक्के महिलांची यापूर्वीची प्रसुती दवाखान्यात झालेली असून ७७.७८ टक्के महिलांची प्रसुती घरीच झालेली आहे.

उस्मानाबाद तालुक्यातील संस्थात्मक प्रसुती झालेल्या महिलांमध्ये ९६.६७ टक्के महिलांची यापूर्वीची प्रसुती दवाखान्यात झालेली आहे तर, केवळ ३.३३ टक्के महिलांची प्रसुती घरी झालेली आहे. तर, याच तालुक्यातील घरी प्रसुती झालेल्या

१४.४४ टक्के महिलांची यापूर्वीची प्रसुती दवाखान्यात झालेली असून ८५.५६ टक्के महिलांची प्रसुती घरीच झालेली आहे.

**आकृती क्र. ६.१३**

**उस्मानाबाद व वाशी तालुक्यातील यापूर्वीच्या प्रसुतीसंबंधित माहिती**




वरील आकृती क्र. ६.१३ वरुन असे दिसते की, संस्थात्मक प्रसुती झालेल्या महिलांची यापूर्वीची प्रसुती घरी होण्याचे प्रमाण उस्मानाबाद तालुक्याच्या तुलनेत वाशी तालुक्यात अधिक आहे. घरी प्रसुती झालेल्या महिलांची यापूर्वीची प्रसुती घरी होण्याचे प्रमाण वाशी तालुक्याच्या तुलनेत उस्मानाबाद तालुक्यात अधिक आहे.

## ६.४.११ घरी झालेल्या प्रसुतीसंबंधित माहिती :

उस्मानाबाद जिल्ह्यातील उस्मानाबाद व वाशी तालुक्यातील संस्थात्मक प्रसुती झालेल्या व घरी प्रसुती झालेल्या महिलाची यापूर्वीची घरी झालेली प्रसुती कोणी केली यासंबंधित माहिती खालील तक्ता क्र. ६.२० मध्ये दिलेली आहे.

**तक्ता क्र.६.२०**

**उस्मानाबाद व वाशी तालुक्यातील महिलांची घरी केलेल्या प्रसुतीसंबंधित माहिती**

| | वाशी | | | | | | | | उस्मानाबाद | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | लागु नाही | | घरातील अनुभवी महिला | | गावांतील प्रशिक्षित दाई | | एकूण | | लागु नाही | | गावांतील अप्रशिक्षित दाई | | घरातील अनुभवी महिला | | गावांतील प्रशिक्षित दाई | | एकूण | |
| | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी |
| संस्थात्मक प्रसुती | ८६ | ९५.५६ | ४ | ४.४४ | ० | ०.० | ९० | १०० | ८७ | ९६.६७ | ० | ०.० | २ | २.२२ | १ | १.११ | ९० | १०० |
| घरी प्रसुती | २० | २२.२२ | ३७ | ४१.११ | ३३ | ३६.६७ | ९० | १०० | १३ | १४.४४ | ६ | ६.६७ | ६८ | ७५.५६ | ३ | ३.३३ | ९० | १०० |


संदर्भ : प्रस्तुत अभ्यासाकरिता केलेले प्राथमिक सर्वेक्षण

वरील तक्ता क्र. ६.२० वरुन असे दिसते की, वाशी तालुक्यातील संस्थात्मक प्रसुती झालेल्या महिलाची यापूर्वीची प्रसुती घरी केली. यामध्ये ४.४४ टक्के महिलांची प्रसुती घरातील अनुभवी महिलांनी केली तर, याच तालुक्यातील घरी प्रसुती झालेल्या महिलांची यापूर्वीची ४१.११ टक्के महिलांची घरी झालेली प्रसुती घरातील अनुभवी महिला तर ३६.६७ टक्के प्रसुती गावांतील प्रशिक्षित दाईने केले.

उस्मानाबाद तालुक्यातील संस्थात्मक प्रसुती झालेल्या २.२२ टक्के महिलांची यापूर्वीची घरी झालेली प्रसुती घरातील अनुभवी महिला तर, १.११ टक्के प्रसुती गावातील प्रशिक्षित दाईने केली आहे. याच तालुक्यातील घरी प्रसुती झालेल्या ६.६७ टक्के महिलांची यापूर्वीची घरी झालेली प्रसुती गांवातील अप्रशिक्षित दाईने केली तर, ७५.५६ टक्के घरातील अनुभवी महिला व ३.३३ टक्के प्रसुती गावांतील प्रशिक्षित दाईने केली आहे.

**आकृती क्र. ६.१४**

**उस्मानाबाद व वाशी तालुक्यातील महिलांची घरी केलेल्या प्रसुतीसंबंधित माहिती**




वरील आकृती क्र. ६.१४ असे दिसते की, यापूर्वीच्या घरी झालेल्या प्रसुती घरातील अनुभवी महिलेने व गावातील अप्रशिक्षित दाईने करण्याचे प्रमाण वाशी तालुक्यापेक्षा उस्मानाबाद तालुक्यामध्ये अधिक आहे.

### ६.४.१२ प्रसुतीपूर्व तपासणीसंबंधित माहिती :

उस्मानाबाद जिल्ह्यातील उस्मानाबाद व वाशी तालुक्यातील संस्थात्मक प्रसुती झालेल्या व घरी प्रसुती झालेल्या महिलांनी केलेल्या प्रसुतीपूर्व तपासणीची माहिती खालील तक्ता क्र. ६.२१ व ६.२२ मध्ये दिलेली आहे.

**तक्ता क्र. ६.२१**

**उस्मानाबाद व वाशी तालुक्यातील महिलांच्या प्रसुतीपूर्व तपासणी संबंधित माहिती**


| | वाशी | | | | | | उस्मानाबाद | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | होय | | नाही | | एकूण | | होय | | नाही | | एकूण | |
| | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी |
| संस्थात्मक प्रसुती | ८७ | ९६.६७ | ३ | ३.३३ | ९० | १०० | ८९ | ९८.८९ | १ | १.११ | ९० | १०० |
| घरी प्रसुती | ७४ | ८२.२२ | १६ | १७.७८ | ९० | १०० | ५७ | ६३.३३ | ३३ | ३६.६७ | ९० | १०० |

संदर्भ : प्रस्तुत अभ्यासाकरिता केलेले प्राथमिक सर्वेक्षण

वरील तक्ता क्र. ६.२१ वरुन असे दिसते की, वाशी तालुक्यातील संस्थात्मक प्रसुती झालेल्या महिलापैकी ९६.६७ टक्के महिला प्रसुतीपूर्व तपासण्या केल्या आहेत तर केवळ ३.३३ टक्के महिला प्रसुतीपूर्व तपासण्या केल्या नाहीत. याच तालुक्यातील घरी प्रसुती झालेल्या महिलापैकी ८२.२२ महिलांनी प्रसुतीपूर्व तपासणी केली आहे तर १७.७८ टक्के महिलांनी प्रसुतीपूर्व तपासण्या केलेल्या नाहीत.

उस्मानाबाद तालुक्यातील संस्थात्मक प्रसुती झालेल्या महिलापैकी ९८.८९ टक्के महिला प्रसुतीपूर्व तपासण्या केल्या आहेत तर, केवळ १.११ टक्के महिला प्रसुतीपूर्व तपासण्या केल्या नाहीत. याच तालुक्यातील घरी प्रसुती झालेल्या महिलापैकी ६३.३३ महिलांनी प्रसुतीपूर्व तपासणी केली आहे तर ३६.६७ टक्के महिलांनी प्रसुतीपूर्व तपासण्या केलेल्या नाहीत.

## आकृती क्र. ६.१५
## उस्मानाबाद व वाशी तालुक्यातील महिलांच्या प्रसुतीपूर्व तपासणी संबंधित माहिती




वरील आकृती क्र. ६.१५ वरुन असे दिसते की, वाशी तालुक्याच्या तुलनेत उस्मानाबाद तालुक्यामध्ये घरी प्रसुती झालेल्या महिलांनी प्रसुतीपूर्व तपासण्या न केल्याचे प्रमाण अधिक आहे.

## तक्ता क्र. ६.२२
## उस्मानाबाद व वाशी तालुक्यातील महिलांच्या प्रसुतीपूर्व केलेल्या तपासणी संबंधित माहिती

| | वाशी | | | | | | | | उस्मानाबाद | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | लागू नाही | | १-३ | | ४-७ | | एकूण | | लागू नाही | | १-३ | | ४-७ | | एकूण | |
| | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी |
| संस्थात्मक प्रसुती | ३ | ३.३३ | ३६ | ४० | ५१ | ५६.६७ | ९० | १०० | १ | १.११ | १९ | २१.११ | ७० | ७७.७८ | ९० | १०० |
| घरी प्रसुती | १७ | १८.८९ | २१ | २३.३३ | ५२ | ५७.७८ | ९० | १०० | ३३ | ३६.६६ | ४२ | ४६.६७ | १५ | १६.६७ | ९० | १०० |

संदर्भ : प्रस्तुत अभ्यासाकरिता केलेले प्राथमिक सर्वेक्षण

वरील तक्ता क्र. ६.२२ वरुन असे दिसते की, वाशी तालुक्यातील संस्थात्मक प्रसुती झालेल्या महिलांमध्ये १ ते ३ वेळ प्रसुतीपूर्व तपासण्या केल्या आहेत, अशा महिलांचे प्रमाण ४० टक्के आहे तर ४ ते ७ वेळ प्रसुतीपूर्व तपासण्या केल्या आहेत अशा महिलांचे प्रमाण ५६.६७ टक्के आहे. याच तालुक्यातील घरी प्रसुती झालेल्या महिलांमध्ये १ ते ३ वेळ प्रसुतीपूर्व तपासण्या केल्या आहेत, अशा महिलांचे प्रमाण २३.३३ टक्के आहे तर ४ ते ७ वेळ प्रसुतीपूर्व तपासण्या केल्या आहेत, अशा महिलांचे प्रमाण ५७.७८ टक्के आहे.

उस्मानाबाद तालुक्यातील संस्थात्मक प्रसुती झालेल्या महिलांमध्ये १ ते ३ वेळ प्रसुतीपूर्व तपासण्या केल्या आहेत, अशा महिलांचे प्रमाण २१.११ टक्के आहे तर ४ ते ७ वेळ प्रसुतीपूर्व तपासण्या केल्या आहेत, अशा महिलांचे प्रमाण ७७.७८ टक्के आहे. याच तालुक्यातील घरी प्रसुती झालेल्या महिलांमध्ये १ ते ३ वेळ प्रसुतीपूर्व तपासण्या केल्या आहेत, अशा महिलांचे प्रमाण ४६.६७ टक्के आहे तर ४ ते ७ वेळ प्रसुतीपूर्व तपासण्या केल्या आहेत, अशा महिलांचे प्रमाण १६.६७ टक्के आहे.

थोडक्यात दोन्ही संस्थात्मक प्रसुती झालेल्या महिलांमध्ये ४ ते ७ वेळ प्रसुतीपूर्व तपासण्या करण्याचे प्रमाण वाशी तालुक्याच्या तुलनेत उस्मानाबाद तालुक्यात अधिक आहे. तर घरी प्रसुती झालेल्या महिलांमध्ये ४ ते ७ वेळ प्रसुतीपूर्व तपासण्या करण्याचे प्रमाण उस्मानाबाद तालुक्याच्या तुलनेत वाशी तालुक्यात अधिक आहे.

### ६.४.१३ **प्रसुतीनंतर बाळाच्या आरोग्यासंबंधित माहिती :**

उस्मानाबाद जिल्ह्यातील उस्मानाबाद व वाशी तालुक्यातील संस्थात्मक प्रसुती झालेल्या व घरी प्रसुती झालेल्या महिलांच्या बाळाच्या आरोग्यासंबंधित माहिती खालील तक्ता क्र. ६.२३ मध्ये दिलेली आहे.

## तक्ता क्र. ६.२३
## उस्मानाबाद व वाशी तालुक्यातील महिलांच्या बाळाच्या आरोग्या संदर्भात माहिती


| | वाशी | | | | | | | | उस्मानाबाद | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | व्यवस्थित | | उपजत मृत्यू | | कमी वजनाचे | | एकूण | | व्यवस्थित | | उपजत मृत्यू | | कमी वजनाचे | | एकूण | |
| | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी |
| संस्थात्मक प्रसुती | ८२ | ९१.११ | २ | २.२२ | ६ | ६.६७ | ९० | १०० | ८७ | ९६.६७ | ३ | ३.३३ | ० | ०.० | ९० | १०० |
| घरी प्रसुती | ८२ | ९१.११ | २ | २.२२ | ६ | ६.६७ | ९० | १०० | ६९ | ७६.६७ | २ | २.२२ | १९ | २१.११ | ९० | १०० |

संदर्भ : प्रस्तुत अभ्यासाकरिता केलेले प्राथमिक सर्वेक्षण

वरील तक्ता क्र. ६.२३ वरुन असे दिसते की, वाशी तालुक्यातील संस्थात्मक प्रसुती झालेल्या महिलांमध्ये ९१.११ टक्के महिलांच्या बाळाची प्रकृती व्यवस्थित/उत्तम आहे तर ६.६७ टक्के महिलांचे बाळ हे कमी वजनाचे आहे. २.२२ टक्के महिलांच्या बाळाचा उपजत मृत्यू झालेला आहे. याच तालुक्यातील घरी प्रसुती झालेल्या महिलांमध्ये ९१.११ टक्के महिलांच्या बाळाची प्रकृती व्यवस्थित/उत्तम आहे तर ६.६७ टक्के महिलांचे बाळ हे कमी वजनाचे आहे. २.२२ टक्के महिलांच्या बाळाचा उपजत मृत्यू झालेला आहे.

उस्मानाबाद तालुक्यातील संस्थात्मक प्रसुती झालेल्या महिलांमध्ये ९६.६७ टक्के महिलांच्या बाळाची प्रकृती व्यवस्थित/उत्तम आहे ३.३३ टक्के महिलांच्या बाळाचा उपजत मृत्यू झालेला आहे. याच तालुक्यातील घरी प्रसुती झालेल्या महिलांमध्ये ७६.६७ टक्के महिलांच्या बाळाची प्रकृती व्यवस्थित/उत्तम आहे तर २१.११ टक्के महिलांचे बाळ हे कमी वजनाचे आहे. २.२२ टक्के महिलांच्या बाळाचा उपजत मृत्यू झालेला आहे.

## आकृती क्र. ६.१६
## उस्मानाबाद व वाशी तालुक्यातील महिलांच्या बाळाच्या आरोग्यासंदर्भात माहिती




वरील आकृती ६.१६ वरुन असे दिसते की, संस्थात्मक प्रसुतीमध्ये उपजत मृत्यूचे प्रमाण वाशी तालुक्याच्या तुलनेत उस्मानाबाद तालुक्यात अधिक आहे. तर कमी वजनाचे बाळ असलेल्या महिलांचे प्रमाण उस्मानाबाद तालुक्याच्या तुलनेत वाशी तालुक्यात अधिक आहे. घरी प्रसुती झालेल्या महिलाच्या बाबत दोन्ही तालुक्यात उपजत मृत्यूचे प्रमाण समान असून कमी वजनाचे बाळ असलेल्या महिलांचे प्रमाण वाशी तालुक्याच्या तुलनेत उस्मानाबाद मध्ये खूपच जास्त आहे.

### ६.४.१४ **अर्भकमृत्यू संबंधित माहिती :**

उस्मानाबाद जिल्ह्यातील संस्थात्मक प्रसुती झालेल्या व घरी प्रसुती झालेल्या महिलांच्या अर्भकाच्यामृत्यूसंबंधित माहिती खालील तक्ता क्र. ६.२४ मध्ये दिलेली आहे.


## तक्ता क्र. ६.२४
## उस्मानाबाद व वाशी तालुक्यातील अर्भकमृत्यूसंबंधित माहिती

| | वाशी | | | | | | उस्मानाबाद | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | होय | | नाही | | एकूण | | होय | | नाही | | एकूण | |
| | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी |
| संस्थात्मक प्रसुती | ० | ०.० | ९० | १०० | ९० | १०० | २ | २.२२ | ८८ | ९७.७८ | ९० | १०० |
| घरी प्रसुती | ५ | ५.५६ | ८५ | ९४.४४ | ९० | १०० | २ | २.२२ | ८८ | ९७.७८ | ९० | १०० |

संदर्भ : प्रस्तुत अभ्यासाकरिता केलेले प्राथमिक सर्वेक्षण

वरील तक्ता क्र. ६.२४ वरुन असे दिसते की, वाशी तालुक्यातील संस्थात्मक प्रसुती झालेल्या महिलांमध्ये एकही अर्भकमृत्यू झालेला नाही तर, याच तालुक्यात घरी प्रसुती झालेल्यामध्ये ५.५६ टक्के महिलांचे अर्भकमृत्यू झालेले आहेत. उस्मानाबाद तालुक्यामध्ये संस्थात्मक प्रसुती व घरी प्रसुती झालेल्या महिलांमध्ये २.२२ टक्के महिलांचे बालमृत्यू झालेले आहेत.

## आकृती क्र. ६.१७
## उस्मानाबाद व वाशी तालुक्यातील अर्भकमृत्यूसंबंधित माहिती



वरील आकृती क्र. ६.१७ वरुन असे दिसते की, वाशी तालुक्याच्या तुलनेत उस्मानाबाद तालुक्यामध्ये अर्भकमृत्यूचे प्रमाण अधिक झालेले आहेत.

## ६.५ कारणमीमांसा संदर्भात विश्लेषण :

उस्मानाबाद जिल्ह्यातील अर्भकमृत्यूचे प्रमाण अधिक असल्याच्या कारणांचा शोध संख्याशास्त्रीय साधनांच्या सहाय्याने संशोधकाने घेतलेला असून त्यासंबंधीचे स्पष्टीकरण खालील प्रमाणे करण्यात आलेले आहे.

उस्मानाबाद जिल्ह्यातील वाशी व उस्मानाबाद या दोन्ही तालुक्यातील दवाखान्यात व घरी प्रसुती झालेल्या अशा दोन्ही प्रकारच्या महिलांकडून अनुसूचीच्या सहाय्याने कारणांचा शोध घेण्यात आलेला आहे. संशोधकांने संशोधनाच्या सुरुवातीस केलेल्या विविध संदर्भ साहित्याच्या अभ्यासावरुन अनुसूचीमध्ये समाविष्ट केलेली कारणे व त्यामधील कारणे शोधण्यासाठी SPSS यामध्ये करण्यात आलेले सांकेतिकरण खालील तक्ता क्र. ५.३० मध्ये नमूद केलेली आहेत.

**तक्ता क्र. ६.२५**

**उस्मानाबाद जिल्ह्यातील अर्भक मृत्यूदरासंबंधित अनुसूचीमध्ये नमूद कारणे**

| अ.क्र. | कारणे | SPSS मध्ये नमूद सांकेतांक |
|---|---|---|
| १. | कुटुंबाची आर्थिक परिस्थिती वाईट असणे | VAR00001 |
| २. | प्रसुतीसाठीचा (सिझर) खर्च जास्त असणे | VAR00002 |
| ३. | वाहतुकीचा खर्च (रात्री/मध्यरात्री दवाखान्यात घेऊन जाण्यासाठीचा) परवडत नाही. | VAR00003 |
| ४. | कुटुंब प्रमुखाची अनास्था व निर्णयास विलंब करणे. | VAR00004 |
| ५. | प्रसुतीचे ठिकाण घरातील कर्ता स्त्री/पुरूष यांनीच निश्चित करणे. | VAR00005 |
| ६. | प्रसुतीची भीती वाटणे. | VAR00006 |

| अ.क्र. | कारणे | SPSS मध्ये नमूद सांकेतांक |
|---|---|---|
| ७. | प्रसतीपूर्व तपासण्या नीट न होणे. | VAR00007 |
| ८. | स्थलांतर होणे. | VAR00008 |
| ९. | महिला पोट दुखण्याबाबत तत्काळ सांगत नसणे. | VAR00009 |
| १०. | वाहतूकीच्या साधनांचा अभाव असणे. | VAR00010 |
| ११. | रस्त्याची वाईट आवस्था असणे. | VAR00011 |
| १२. | आरोग्य केंद्रापासून अंतर जास्त असणे. | VAR00012 |
| १३. | पारंपारिक पध्दतीवर विश्वास असणे. | VAR00013 |
| १४. | निरक्षर महिला असणे. | VAR00014 |
| १५. | महिलांच्या निर्णय क्षमतेचा अभाव असणे. | VAR00015 |
| १६. | संस्थात्मक प्रसुतीच्या विविध सोई/सुविधांच्या फायद्यापासून अज्ञान असणे | VAR00016 |
| १७. | निकृष्ट दर्जाच्या सेवा/सुविधा असणे. | VAR00017 |
| १८. | स्त्री डॉक्टर्स उपलब्ध नसणे. | VAR00018 |
| १९. | आरोग्य केंद्रात प्रसुतीची व्यवस्था नसणे. | VAR00019 |
| २०. | आरोग्य केंद्रात आवश्यक त्या वेळेत डॉक्टर्स व नर्स उपलब्ध नसणे. | VAR00020 |
| २१. | आरोग्य केंद्रात डॉक्टर्स व नर्स यांच्याकडून मिळणारी वागणूक व असहकार्याची भावना असणे. | VAR00021 |
| २२. | दवाखान्यात गेल्यास डॉक्टर्स सिजरच करावयास सांगणे. | VAR00022 |
| २३. | आरोग्य केंद्रातील डॉक्टर्स व नर्स यांच्यावर कमी विश्वास असणे. | VAR00023 |

संदर्भ : प्रस्तुत अभ्यासाकरिता केलेले प्राथमिक सर्वेक्षण

वरील तक्ता क्र. ६.२५ मध्ये दिलेल्या अनेक कारणांमध्ये दोन्ही तालुक्यातील प्रतिसादकांच्या मते प्रभावी कारणांचा शोध घेण्यासाठी 'मुख्य घटक विश्लेषण पध्दती' या संख्याशास्त्रातील तंत्रांचा वापर केला. हे तंत्र कार्यान्वित करण्यासाठी SPSS या विश्लेषण साधनांचा वापर केला आहे. SPSS या विश्लेषण साधनानुसार मुख्य घटक विश्लेषण करतांना खालील तक्ता. क्र. ६.२६ व ६.२७ मध्ये नमुद बाबी आढळून येतात.

**तक्ता क्र. ६.२६**

**SPSS नुसार सर्व घटकांचे विश्लेषण**

**Total Variance Explained**

| Component | Initial Eigenvalues | | | Extraction Sums of Squared Loadings | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | Total | % of Variance | Cumulative % | Total | % of Variance | Cumulative % |
| 1 | 7.075 | 30.762 | 30.762 | 7.075 | 30.762 | 30.762 |
| 2 | 2.920 | 12.694 | 43.456 | | | |
| 3 | 1.653 | 7.188 | 50.644 | | | |
| 4 | 1.368 | 5.948 | 56.592 | | | |
| 5 | 1.104 | 4.802 | 61.394 | | | |
| 6 | 1.076 | 4.678 | 66.072 | | | |
| 7 | .985 | 4.282 | 70.353 | | | |
| 8 | .903 | 3.925 | 74.278 | | | |
| 9 | .864 | 3.759 | 78.037 | | | |
| 10 | .747 | 3.249 | 81.286 | | | |
| 11 | .608 | 2.642 | 83.927 | | | |
| 12 | .551 | 2.397 | 86.324 | | | |
| 13 | .472 | 2.052 | 88.377 | | | |
| 14 | .436 | 1.896 | 90.273 | | | |
| 15 | .388 | 1.687 | 91.960 | | | |
| 16 | .334 | 1.453 | 93.413 | | | |
| 17 | .295 | 1.281 | 94.694 | | | |
| 18 | .292 | 1.270 | 95.964 | | | |
| 19 | .278 | 1.209 | 97.173 | | | |
| 20 | .231 | 1.004 | 98.177 | | | |
| 21 | .157 | .683 | 98.860 | | | |
| 22 | .142 | .619 | 99.478 | | | |
| 23 | .120 | .522 | 100.000 | | | |

Extraction Method: Principal Component Analysis.

वरील तक्ता क्र. ६.२६ नुसार एकूण २३ कारणांच्या समूहांमध्ये ०१ कारणांचा समूह स्पष्ट होतो. या समूहामध्ये असलेली प्रमुख कारणे खालील तक्त्यात दिलेली आहेत.

**तक्ता क्र. ६.२७**

**SPSS नुसार मुख्य घटकांचे विश्लेषण**

**Component Matrix[a]**

| | Component |
|---|---|
| | 1 |
| VAR00001 | -.769 |
| VAR00002 | **.570** |
| VAR00003 | -.009 |
| VAR00004 | .427 |
| VAR00005 | -.057 |
| VAR00006 | -.031 |
| VAR00007 | -.070 |
| VAR00008 | -.611 |
| VAR00009 | -.086 |
| VAR00010 | -.846 |
| VAR00011 | -.086 |
| VAR00012 | -.032 |
| VAR00013 | -.770 |
| VAR00014 | -.616 |
| VAR00015 | **.559** |
| VAR00016 | -.275 |
| VAR00017 | -.222 |
| VAR00018 | **.652** |
| VAR00019 | **.680** |
| VAR00020 | **.656** |
| VAR00021 | **.732** |
| VAR00022 | -.453 |
| VAR00023 | **.641** |

Extraction Method: Principal Component Analysis.

a. 1 components extracted.

वरील तक्ता क्र. ६.२७ मध्ये सहसंबंध मूल्य पातळी ०.५ निर्धारित धरुन सहसंबंध पडताळण्यात आलेला आहे. या सहसंबंध पडताळणीवरुन असे दिसून येते की, उस्मानाबाद जिल्ह्यातील अर्भक मृत्यूदर अधिक असल्याच्या एकूण २३ कारणांपैकी ७ कारणे (धन संख्या) मुख्य कारणीभूत घटक आहेत. यामध्ये प्रसुतीसाठीचा (सिझर) खर्च जास्त असणे, महिलांच्या निर्णय क्षमतेचा अभाव असणे, स्त्री डॉक्टर्स उपलब्ध नसणे, आरोग्य केंद्रात प्रसुतीची व्यवस्था नसणे, आरोग्य केंद्रात आवश्यक त्या वेळेत डॉक्टर्स व नर्स उपलब्ध नसणे, आरोग्य केंद्रात डॉक्टर्स व नर्स यांच्याकडून मिळणारी वागणूक व असहकार्याची भावना असणे, आरोग्य केंद्रातील डॉक्टर्स व नर्स यांच्यावर कमी विश्वास असणे इ. मुख्य कारणांचा समावेश होतो.

थोडक्यात उस्मानाबाद जिल्ह्यातील अर्भक मृत्यूदराचे प्रमाण अधिक असण्याचा कारणांचा शोध घेण्याच्या अनुषंगाने दुय्यम स्त्रोत, प्राथमिक स्त्रोत याद्वारे प्राप्त माहितीचे विश्लेषण वरील प्रमाणे करण्यात आलेले आहे.

***

# प्रकरण – ७
# जालना जिल्ह्यातील दरडोई उत्पन्नासंबंधी माहितीचे विश्लेषण

## ७.१ प्रस्तावना :

मानव विकासाच्या गणनेत 'दरडोई उत्पन्न' या घटकास अन्यन्यसाधारण महत्त्व आहे. मानवाचा राहणीमानाचा दर्जा मापनासाठी दरडोई उत्पन्न या मानकाचा समावेश होते. जालना जिल्ह्याच्या दरडोई उत्पन्नाबाबत विचार करता असे लक्षात येते की, सन २००२ च्या महाराष्ट्र मानव विकास अहवालानुसार मराठवाड्यातील आठ जिल्ह्यांच्या तुलनेत जालना जिल्ह्यातील दरडोई उत्पन्नाचे प्रमाण खूपच कमी आहे. या अनुषंगाने जालना जिल्ह्याचे दरडोई उत्पन्नात वाढ करणे आवश्यक आहे. पर्यायाने मानव विकास निर्देशांक वाढण्यास मदत होईल. त्यामुळे जालना जिल्ह्यातील दरडोई उत्पन्न कमी असल्याचा कारणांचा शोध घेणे आवश्यक आहे.

जालना जिल्ह्यातील दरडोई उत्पन्न कमी असल्याच्या कारणांचा शोध घेण्यासाठी या जिल्ह्यातील दरडोई उत्पन्न संबंधित दुय्यम स्त्रोतांकडे उपलब्ध माहितीचा व प्राथमिक माहितीचा वापर करण्यात आला आहे. या संबंधित प्राथमिक माहिती संकलनासाठी जालना जिल्ह्याचा सन २०१० मधील जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन यामधील दारिद्र्यरेषेखालील व दारिद्र्यरेषेवरील कुटुंबाची संख्या विचारात घेऊन तालुक्याची निवड करण्यात आली. यामध्ये भोकरदन व बदनापूर या तालुक्यांचा समावेश होतो. यामध्ये भोकरदन तालुक्यामध्ये जिल्ह्यातील सर्वाधिक तर बदनापूर तालुक्यामध्ये सर्वात कमी दारिद्र्यरेषेखालील लोकसंख्या आढळून येते. या दोन्ही तालुक्यातील दारिद्र्यरेखालील १९० व दारिद्र्यरेषेवरील १९० कुटुंब अशा एकूण ३८० कुटुंबाकडून माहितीचे संकलन करण्यात आले.

या ३८० प्रतिसादकांपैकी दोन्ही तालुक्यातून केवळ ७ प्रतिसादक हे अविवाहित असून ३७३ प्रतिसादक हे विवाहित आहेत. या ३८० प्रतिसादकामध्ये अनुसूचित जाती

७०, इतर मागासवर्ग ४४, भटक्या जमाती २१, विमुक्त जाती २, अल्पसंख्याक २२ व सर्वसाधारण २२१ अशा संवर्गातील प्रतिसादकांचा समावेश आहे.

## ७.२ प्रकरणाची रुपरेषा :

जालना जिल्ह्यातील दरडोई उत्पन्नाच्या संबंधित माहितीचे विशेषण या प्रकरणात करण्यात आले आहे. या प्रकरणाची रचना प्रामुख्याने तीन टप्प्यात करण्यात आलेली आहे. यामधील पहिल्या टप्प्यामध्ये जालना जिल्ह्यातील दरडोई उत्पन्नाच्या अनुषंगाने उपलब्ध दुय्यम स्त्रोताच्या सहाय्याने प्राप्त माहितीचे विश्लेषण करण्यात आलेले आहे. दुसऱ्या टप्प्यामध्ये भोकरदन व बदनापूर या तालुक्यातील ३८० कुटुंबाकाडील व्यवसाय, उत्पन्न अशा प्रकारच्या माहितीचे विश्लेषण केले आहे. तिसऱ्या व प्रकरणाच्या अंतिम टप्प्यात जालना जिल्ह्यातील दरडोई उत्पन्न कमी असण्याच्या कारणांची मीमांसा मुख्य घटक विश्लेषण (Principal Component Analysis) या चाचणी द्वारे केले आहे.

## ७.३ दुय्यम स्त्रोतांमार्फत संकलित माहितीचे विश्लेषण :

जालना जिल्ह्यातील दरडोई उत्पन्न कमी असल्याची कारणमीमांसा करताना जिल्ह्यातील विविध शासकीय यंत्रणा यांच्याकडे उपलब्ध माहितीचे विश्लेषण करणे महत्वाचे असते. दरडोई उत्पन्नाच्या अनुषंगाने विविध स्वरुपाच्या दुय्यम माहितीचे विश्लेषण खालील प्रमाणे केले आहे.

### ७.३.१ जालना जिल्ह्याचे क्षेत्रवार निव्वळ दरडोई उत्पन्नः

जालना जिल्ह्यातील प्राथमिक द्वितीय व तृतीय क्षेत्रवार स्थूल व निव्वळ दरडोई उत्पन्न तक्ता क्र. ७.१ मध्ये दर्शविण्यात आलेले आहे.

**तक्ता.क्र. ७.१**

**जालना जिल्ह्यातील निव्वळ दरडोई उत्पन्न**

| **वर्ष** | २००५-०६ | २००६-०७ | २००७-०८ | २००८-०९ | २००९-१० | २०१०-११ |
|---|---|---|---|---|---|---|
| निव्वळ दरडोई उत्पन्न स्थिर (२००४-०५) किंमतीनुसार | ३२९६११ | ३७७९४१ | ४६१५६८ | ४८८९२३ | ५४४९९५ | ५८४८२६ |

संदर्भ : जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन जिल्हा जालना सन २०११

वरील तक्ता क्र. ७.१ वरुन असे स्पष्ट होते की, जालना जिल्ह्यातील एकूण निव्वळ दरडोई उत्पन्नात सन २००५-०६ पासून २०१०-११ पर्यत वाढत गेलेले आहे. २००९-१० मध्ये ४८८९२३ वरुन ५४४९९५ इतकी लक्षणीय वाढ झालेली दिसते.

### ७.३.२ जालना जिल्ह्यातील चालू कारखाने व त्यातील कामगारांची दैनिक सरासरी संख्या :

जालना जिल्ह्यातील चालू कारखाने व त्यातील कामगारांची दैनंदिन सरासरी खालील तक्ता क्र. ७.२ मध्ये दर्शविलेली आहे.

**तक्ता. क्र. ७.२**

**जालना जिल्ह्यातील चालू कारखाने व त्यातील कामगारांची दैनिक सरासरी संख्या**

| **तपशील** | २००५- ०६ | २००६ - ०७ | २००७- ०८ |
|---|---|---|---|
| चालू कारखाने | १२९ | २३२ | २३२ |
| एकूण कामगार | ५८५९ | १०६३० | १०६३० |

संदर्भ : महाराष्ट्राची संक्षिप्त सांखिकी सन २००४ ते २०१०

वरील तक्ता क्र. ७.२ वरुन असे दिसते की, जालना जिल्ह्यात सन २००५-०६ मध्ये चालू कारखाने हे १२९ असून त्यामध्ये ५८५९ इतके कामगार काम करत होते, हे प्रमाण वाढून जालना जिल्ह्यात सन २००६-०७ मध्ये २३२ कारखाने व १०६३०

इतकी कामगार संख्या झालेली आहे. मात्र सन २००६-०७ मधील संख्या सन २००७-०८ मध्ये स्थिर आहे.

### ७.३.३ जालना जिल्ह्यातील दारिद्र्यरेषेखालील ग्रामीण कुटुंबांची संख्या :

जालना जिल्ह्यातील दारिद्र्य रेषेखालील ग्रामीण कुटुंबांसंबंधित आकडेवारी खालील तक्ता क्र. ७.३ मध्ये दर्शविलेली आहे.

**तक्ता क्र. ७.३**

**जालना जिल्ह्यातील दारिद्र्य रेषेखालील ग्रामीण कुटुंबांसंबंधित आकडेवारी**

| अ.क्र. | तालुक्याचे नांव | २००५- ०६ | २००६ – ०७ | २००७- ०८ | २००८- ०९ | २००९- १० |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | भोकरदन | ९९४४ | ९९४४ | ९९४४ | १८५९६ | १८५९६ |
| २. | जाफ्राबाद | ६५३३ | ६५३३ | ६५३३ | १०८८२ | १०८८२ |
| ३. | जालना | १०३३८ | १०३३८ | १०३३८ | १५४६१ | १५४६१ |
| ४. | बदनापूर | ५४०७ | ५४०७ | ५४०७ | १००२४ | १००२४ |
| ५. | अंबड | ९९०१ | ९९०१ | ९९०१ | १४०६५ | १४०६५ |
| ६. | घनसांगवी | १२१६४ | १२१६४ | १२१६४ | १४११८ | १४११८ |
| ७. | परतूर | ९३५४ | ९३५४ | ९३५४ | १०२६७ | १०२६७ |
| ८. | मंठा | ६१५६ | ६१५६ | ६१५६ | ११७७५ | ११७७५ |

संदर्भ : जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन जिल्हा जालना सन २००६ ते २०१०

वरील तक्ता क्र. ७.३ वरुन असे दिसते की, सन २००५-०६ ते २००७-०८ या कालावधीत दारिद्र्यरेषेखालील कुटुंबाची संख्या स्थिर असून यामध्ये घनसांगवी तालुक्यामध्ये सदर कुटुंबाची संख्या सर्वात अधिक असून बदनापूर तालुक्यात सर्वात कमी कुटुंबे आहेत. सन २००८-०९ मध्ये सदर दारिद्र्यरेषेखालील कुटुंबाच्या संख्येत बदल झालेला असून यामध्ये भोकरदन तालुक्यामध्ये सर्वाधिक व बदनापूर तालुक्यामध्ये

सर्वात कमी दारिद्र्यरेषेखालील कुटुंबाची संख्या आहे. सन २००८-०९ मधील स्थिती सन २००९-१० मध्ये स्थिर आहे.

थोडक्यात सन २००५-०६ च्या तुलनेत २००८-०९ मध्ये जालना जिल्ह्यातील दारिद्र्यरेषेखालील कुटुंबसंख्येत एकूण ३५३९१ इतकी वाढ झालेली आहे.

### ७.३.४ जालना जिल्ह्यातील मुख्य व सीमांत कामगारांचे उद्योगनिहाय वर्गीकरण :

जालना जिल्ह्यातील क्षेत्रवार मुख्य व सीमांत कामगारांचे वर्गीकरण खालील तक्ता क्र. ७.४ मध्ये दर्शविलेली आहे.

**तक्ता क्र. ७.४**

**जालना जिल्ह्यातील क्षेत्रवार मुख्य व सीमांत कामगारांचे उद्योगनिहाय वर्गीकरण**

| **तालुक्याचे नांव** | २००५- ०६ | २००६ - ०७ | २००७- ०८ | २००८- ०९ |
|---|---|---|---|---|
| शेतकरी व शेतमजूर काम करणारे | ५५७०९० | ५५७०९० | ५५७०९० | ५५७०९० |
| इतर काम करणारे (वस्तुनिर्माण प्रक्रिया, सेवा, दुरुत्या, घरगुती व इतर इ.) | १५९८१० | १५९८१० | १५९८१० | १५९८१० |

संदर्भ : जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, जिल्हा जालना, सन २००५-०६ ते २००८-०९

वरील तक्ता क्र. ७.४ वरुन असे दिसते की, जालना जिल्ह्यातील क्षेत्रनिहाय मुख्य व सीमांत कामगारांच्या संख्येत सन २००५-०६ पासून २००८-०९ पर्यत बदल झालेला नसून दोन्ही क्षेत्रातील कामगारांची संख्या स्थिर आहे.

### ७.३.५ जालना जिल्ह्यातील तालुकानिहाय सरासरीच्या तुलनेत वर्षातील पर्जन्याची टक्केवारी :

जालना जिल्ह्यातील तालुकानिहाय सरासरीच्या तुलनेत वर्षातील पर्जन्याची टक्केवारी खालील तक्ता क्र. ७.५ मध्ये दर्शविलेली आहे.

**तक्ता क्र. ७.५**

**जालना जिल्ह्यातील तालुकानिहाय सरासरीच्या तुलनेत वर्षातील पर्जन्याची टक्केवारी**

| अ.क्र. | तालुक्याचे नांव | २००९- १० |
|---|---|---|
| १. | भोकरदन | ७२.११ |
| २. | जाफ्राबाद | ७६.०४ |
| ३. | जालना | ८८.०२ |
| ४. | बदनापूर | ७४.७० |
| ५. | अंबड | ८३.९२ |
| ६. | घनसांगवी | ७६.७१ |
| ७. | परतूर | ८१.२६ |
| ८. | मंठा | ७७.०१ |

संदर्भ : जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, जिल्हा जालना, सन २०१०

वरील तक्ता क्र. ७.५ वरुन असे दिसते की, जालना जिल्ह्यामध्ये सन २००९-१० मध्ये जालना जिल्ह्यामध्ये सरासरीच्या तुलनेत सर्वाधिक म्हणजे ८८.०२ टक्के पर्जन्य असून त्याखालोखाल अंबड, परतूर, मंठा, घनसांगवी व जाफ्राबाद या तालुक्यांचा क्रमांक लागतो. सरासरीपेक्षा सर्वात कमी पर्जन्य हे बदनापूर व भोकरदन या तालुक्यामध्येच दिसून येते. थोडक्यात बदनापूर व भोकरदन या दोन्ही तालुक्यामध्ये वर्षातील पर्जन्याचे सरासरी प्रमाण कमी आहे.

**७.३.६ जालना जिल्ह्यातील तालुकानिहाय दुकाने व व्यापारी संस्था** :

जालना जिल्ह्यातील तालुकानिहाय दुकाने व व्यापारी संस्था यांची आकडेवारी खालील तक्ता क्र. ७.६ मध्ये दर्शविलेली आहे.

**तक्ता क्र. ७.६**

**जालना जिल्ह्यातील तालुकानिहाय दुकाने व व्यापारी संस्था यातील कामगारांची आकडेवारी**

| अ.क्र. | तालुक्याचे नांव | २००९- १० |
|---|---|---|
| १. | भोकरदन | ---- |
| २. | जाफ्राबाद | १७५ |
| ३. | जालना | १३१३७ |
| ४. | बदनापूर | --- |
| ५. | अंबड | ८७१ |
| ६. | घनसांगवी | -- |
| ७. | परतूर | ८७० |
| ८. | मंठा | -- |

संदर्भ : जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, जिल्हा जालना, सन २०१०

वरील तक्ता क्र. ७.६ वरुन असे दिसते की, सन २००९-१० मध्ये जालना जिल्ह्यातील जालना, जाफ्राबाद, अंबड व परतूर या चार तालुक्यामध्येच दुकाने व व्यापारी संस्थांमधील कामगारांच्या संख्येचे प्रमाण जास्त दिसून येते. तर उर्वरित चार तालुके भोकरदन, बदनापूर, घनसांगवी व मंठा यात दुकाने व व्यापारी संस्था यात गुंतलेल्या कामगारांची संख्या शून्य आहे.

**७.३.७ जालना जिल्ह्यातील तालुकानिहाय औद्योगिक प्रकल्पांची संख्या** :

जालना जिल्ह्यातील तालुकानिहाय औद्योगिक प्रकल्पांची संख्या खालील तक्ता क्र. ७.७ मध्ये दर्शविलेली आहे.

**तक्ता क्र. ७.७**

**जालना जिल्ह्यातील तालुकानिहाय औद्योगिक गुंतवणूक**

| अ.क्र. | तालक्याचे नांव | २००९- १० |
|---|---|---|
| १. | भोकरदन | ३४ |
| २. | जाफ्राबाद | २२ |
| ३. | जालना | ४४९ |
| ४. | बदनापूर | २८ |
| ५. | अंबड | ४१ |
| ६. | घनसांगवी | १९ |
| ७. | परतूर | ३७ |
| ८. | मंठा | १६ |

संदर्भ : जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन जिल्हा जालना २०१०

वरील तक्ता क्र. ७.७ वरुन असे दिसते की, सन २००९-१० मध्ये जालना जिल्ह्यातील जालना तालुक्यामध्ये सर्वाधिक औद्योगिक प्रकल्पांची संख्या दिसते. तर इतर सर्वच तालुक्यामध्ये ४१ पेक्षा कमी प्रकल्पांची गुंतवणूक केलेली आहे. मंठा तालुक्यामध्ये केवळ १६, घनसांगवी १९, जाफ्राबाद २२, बदनापूर मध्ये २८, भोकरदन ३४ व परतूर ३७ प्रकल्पांची गुंतवणूक करण्यात आलेली आहे. थोडक्यात औद्योगिक प्रकल्प उभारण्याचे प्रमाण ग्रामिण भागाच्या तुलनेत शहरी भागात अधिक आहे.

### ७.३.८ जालना जिल्ह्यातील रोजगार हमी योजनेंतर्गत रोजगार उपलब्ध कुटुंबाची आकडेवारी :

जालना जिल्ह्यातील तालुकानिहाय रोजगार हमी योजनेंतर्गत मागणी केलेल्या व रोजगार उपलब्ध करुन दिलेल्या कुटुंबासंबंधित आकडेवारी खालील तक्ता क्र. ७.८ मध्ये दिलेली आहे.

**तक्ता. क्र. ७.८**

## जालना जिल्ह्यातील तालुकानिहाय रोजगार मागणी केलेल्या व रोजगार उपलब्ध करुन दिलेल्या कुटुंबांची संख्या

| अ.क्र. | तालुक्याचे नांव | २००९-१० | | २०१०-११ | |
|---|---|---|---|---|---|
| | | रोजगार मागणी करणाऱ्या कुटुंबाची संख्या | रोजगार उपलब्ध करुन देलेल्या कुटुंबाची संख्या | रोजगार मागणी करणाऱ्या कुटुंबाची संख्या | रोजगार उपलब्ध करुन देलेल्या कुटुंबाची संख्या |
| १. | भोकरदन | १६८४ | १४९१ | १२१२ | ११२४ |
| २. | जाफ्राबाद | १४२६ | १३२२ | २२३४ | २०६८ |
| ३. | जालना | ७७१ | ७६० | ३०५ | २८७ |
| ४. | बदनापूर | ५२७ | ४८५ | १२९६ | ११३६ |
| ५. | अंबड | २०३ | १९३ | ९३ | ८ |
| ६. | घनसांगवी | ९७६ | ९०६ | ५७५ | ४४३ |
| ७. | परतूर | १२५ | १२४ | २१५ | १५५ |
| ८. | मंठा | ४७९ | ४३१ | १८८८ | १६७२ |
| | **एकूण** | **६१९१** | **५७१२** | **७८१८** | **६८९३** |

संदर्भ : www.narega.inc.in/hp.css

वरील तक्ता क्र. ७.८ मध्ये सन २००९-१० व २०१०-११ मध्ये जालना जिल्ह्यातील रोजगार हमी योजनेंतर्गत रोजगार मागणी केलेल्या व प्रत्यक्ष रोजगार प्राप्त झालेल्या कुटुंबाची तालुकानिहाय संख्या दर्शविलेली आहे. सन २००९-१० मध्ये जालना जिल्ह्यातील इतर तालुक्याच्या तुलनेत भोकरदन तालुक्यातील सर्वाधिक कुटुंबांनी रोजगाराची मागणी केलेली आहे तर सन २०१०-११ मध्ये मंठा तालुक्यातील कुटुंबानी मागणी केलेली आहे. जालना जिल्ह्यातील एकूण रोजगार मागणीचा विचार करता असे दिसते की, सन २००९-१० मध्ये मागणी केलेल्या कुटुंबांपैकी ९२.२६ टक्के कुटुंबास रोजगार उपलब्ध करुन देण्यात आलेला असून सन २०१०-११ मध्ये ८८.१६ कुटुंबांना रोजगार उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे.

म्हणजेच २००९-१० च्या तुलनेत २०१०-११ मध्ये मागणी केलेल्या कुटुंबांना रोजगार उपलब्ध करुन देण्याचे प्रमाण ४.०९ इतक्या टक्यानी कमी झालेले आहे.

### ७.३.९ जालना जिल्ह्यातील ओलिताखालील स्थूल क्षेत्राची लागवडीखालील स्थूल क्षेत्राशी टक्केवारी :

जालना जिल्ह्यातील ऑलिताखालील स्थूल क्षेत्राची लागवडीखालील स्थूल क्षेत्राशी काढलेली टक्केवारी खालील तक्ता क्र. ७.९ मध्ये दर्शविलेली आहे.

**तक्ता क्र. ७.९**

**जालना जिल्ह्यातील ऑलिताखालील स्थूल क्षेत्राची लागवडीखालील स्थूल क्षेत्राशी टक्केवारी**

| अ.क्र. | तालुक्याचे नांव | २००५-०६ | २००६-०७ | २००७-०८ | २००८-०९ |
|---|---|---|---|---|---|
| १. | भोकरदन | ९.७८ | ९.०४ | ९.०४ | ९.०४ |
| २. | जाफ्राबाद | १७.३१ | ११.४३ | ११.४३ | ११.४३ |
| ३. | जालना | २०.४४ | १२.२१ | १२.२१ | १२.२१ |
| ४. | बदनापूर | १०२.२१ | १२.८० | १२.८० | १२.८० |
| ५. | अंबड | १६.३४ | १६.०९ | १६.०९ | १६.०९ |
| ६. | घनसांगवी | १४.०९ | ११.८४ | ११.८४ | ११.८४ |
| ७. | परतूर | १३.९६ | १८.०४ | १८.०४ | १८.०४ |
| ८. | मंठा | १०.४२ | ९.९२ | ९.९२ | ९.९२ |
| | एकूण | २२.६६ | १२.५५ | १२.५५ | १२.५५ |

संदर्भ : जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, जिल्हा जालना, सन २००६ ते २००९

वरील तक्ता क्र. ७.९ वरुन असे दिसते की, २००५-०६ ते २००८-०९ मध्ये ओलिताखालील क्षेत्राची टक्केवारी २००५-०६ मधील बदनापूरची टक्केवारी वगळता इतर सर्व टक्केवारी स्थिर आहे. यातील एकूण टक्केवारीचा विचार करता असे दिसते की, २००५-०६ च्या तुलनेत २००६-०७ पासून सदरची टक्केवारी कमी झालेली आहे. थोडक्यात जालना जिल्ह्यातील ओलिताखालील क्षेत्राचे प्रमाण २२.६६ वरुन १२.५५ टक्यावर आलेले असून हे प्रमाण २००८-०९ पर्यत स्थिर आहे.

### ७.३.१० जालना जिल्ह्यातील निरनिराळ्या उद्योगातील रोजगार :

जालना जिल्ह्यातील निरनिराळे उद्योग व त्यामध्ये कार्यरत कामगारांची संख्या खालील तक्ता क्र. ७.१० मध्ये दर्शविण्यात आलेली आहे.

**तक्ता क्र. ७.१०**

**जालना जिल्ह्यातील निरनिराळे उद्योग व त्यामध्ये कार्यरत कामगारांची संख्या**

| तपशील | २००५-०६ | २००६ - ०७ | २००७-०८ | २००८-०९ | २००९-१० |
|---|---|---|---|---|---|
| एकूण आस्थापनांची संख्या | ४७३ | ४७३ | ४७६ | ४७६ | ४७६ |
| माहिती देणाऱ्या आस्थापनांची संख्या | ४७३ | १७२ | १३७ | १९७ | १३३ |
| एकूण कर्मचारी संख्या | ३५८३२ | ३५०२६ | ३१८९८ | ३१९३१ | ३२८४० |

संदर्भ : जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, जिल्हा जालना, सन २००५-०६ ते २००८-०९

वरील तक्ता क्र. ७.१० वरुन असे दिसते की, २००५-०६ मध्ये एकूण आस्थापना ४७३ असून त्यामध्ये ३५८३२ इतके कामगार काम करत होते. २००६-०७ मध्ये एकूण आस्थापना स्थिर असून माहिती देणाऱ्या आस्थापनामध्ये ३५०२६ कामगार काम करत होते. २००६-०७ च्या तुलनेत २००७-०८ मध्ये ३ आस्थापनात वाढ झालेली असून माहिती देणाऱ्या १३७ आस्थापनेत ३१८९८ कामगार काम करत आहेत. त्यापुढील कालावधीत म्हणजे २००८-९० व २००९-१० मध्ये एकूण आस्थापनेची संख्या कायम असून २००७-०८ व २००८-०९ च्या तुलनेत २००९-१० मध्ये काम करणाऱ्या कामगारांच्या संख्येत वाढ झालेली आहे. मात्र २००५-०६ च्या तुलनेत २००९-१० मध्ये कामगारांच्या संख्येत २९९२ कामगारांची घट झालेली आहे.

### ७.४ प्राथमिक स्त्रोतांमार्फत संकलित माहितीचे विश्लेषण :

जालना जिल्ह्यातील भोकरदन व बदनापूर तालुक्यातील दारिद्र्यरेषेखालील व दारिद्र्यरेषेवरील कुटुंबाच्या सर्वेक्षणातून प्राप्त झालेल्या प्राथमिक माहितीचे विश्लेषण खालील प्रमाणे करण्यात आलेले आहे.

**७.४.१ कुटुंबाच्या साक्षरतेसंबंधित माहिती :**

जालना जिल्ह्यातील भोकरदन व बदनापूर या तालुक्यातील दारिद्र्यरेषेखालील व दारिद्र्यरेषेवरील कुटुंबाच्या साक्षरते विषयीची माहिती खालील तक्ता क्र. ७.११ मध्ये दिलेली आहे.

**तक्ता. क्र. ७.११**

**भोकरदन व बदनापूर या तालुक्यातील कुटुंबप्रमुखाच्या साक्षरतेसंबंधित माहिती**

| | भोकरदन | | | | | | बदनापूर | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | निरक्षर | | साक्षर | | एकूण | | निरक्षर | | साक्षर | | एकूण | |
| | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी |
| बीपीएल | ३४ | ३५.७९ | ६१ | ६४.२१ | ९५ | १०० | ३१ | ३२.६३ | ६४ | ६७.३७ | ९५ | १०० |
| एपीएल | ३० | ३१.५८ | ६५ | ६८.४२ | ९५ | १०० | १६ | १६.८४ | ७९ | ८३.१६ | ९५ | १०० |


संदर्भ : प्रस्तुत अभ्यासाकरिता केलेले प्राथमिक सर्वेक्षण

वरील तक्ता क्र. ७.११ वरुन असे दिसून येते की, भोकरदन तालुक्यातील दारिद्र्यरेषेखालील कुटुंबामध्ये ३५.७९ टक्के कुटुंबप्रमुख हे निरक्षर तर ६४.२१ टक्के कुटुंबप्रमुख साक्षर आहेत. याच तालुक्यातील दारिद्र्यरेषेवरील कुटुंबामध्ये ३१.५८ टक्के कुटुंबप्रमुख हे निरक्षर तर ६८.४२ टक्के कुटुंबप्रमुख साक्षर आहेत.

बदनापूर तालुक्यातील तालुक्यातील दारिद्र्यरेषेखालील कुटुंबामध्ये ३२.६३ टक्के कुटुंबप्रमुख हे निरक्षर तर ६७.३७ टक्के कुटुंबप्रमुख साक्षर आहेत. याच तालुक्यातील दारिद्र्यरेषेवरील कुटुंबामध्ये १६.८४ टक्के कुटुंबप्रमुख हे निरक्षर तर ८३.१६ टक्के कुटुंबप्रमुख साक्षर आहेत.

**आकृती क्र. ७.१**

**भोकरदन व बदनापूर या तालुक्यातील कुटुंबप्रमुखाच्या साक्षरतेसंबंधित माहिती**




थोडक्यात वरील आकृती क्र. ७.१ वरुन असे स्पष्ट होते की, दोन्ही तालुक्यातील दारिद्र्यरेषेखालील व दारिद्र्यरेषेवरील अशा दोन्ही कुटुंबातील कुटुंबप्रमुखामध्ये निरक्षर कुटुंबप्रमुखापेक्षा साक्षर कुटुंबप्रमुखाचे प्रमाण अधिक आहे. तर, दोन्ही तालुक्यामध्ये दारिद्र्यरेषेखालील कुटुंबप्रमुखापेक्षा दारिद्र्यरेषेवरील कुटुंबप्रमुखाच्या साक्षरतेचे प्रमाण अधिक आहे.

### ७.४.२ कुटुंबातील कमावत्या सदस्यांची माहिती :

जालना जिल्ह्यातील भोकरदन व बदनापूर तालुक्यातील दारिद्र्यरेषेखालील व दारिद्र्यरेषेवरील कुटुंबातील कमावत्या सदस्यासंबंधित माहिती खालील तक्ता क्र. ७.१२ मध्ये दिलेली आहे.

**तक्ता क्र. ७.१२**

**भोकरदन व बदनापूर तालुक्यातील कुटुंबातील कमावत्या सदस्यासंबंधित माहिती**

| | भोकरदन | | बदनापूर | |
|---|---|---|---|---|
| | कुटुंबातील एकुण सदस्य संख्या | कुटुंबातील कमावती सदस्य संख्या | कुटुंबातील एकुण सदस्य संख्या | कुटुंबातील कमावती सदस्य संख्या |
| बीपीएल | ५३२ | १८४ | ५९३ | १९२ |
| एपीएल | ४८३ | १७० | ४९७ | १९४ |


संदर्भ : प्रस्तुत अभ्यासाकरिता केलेले प्राथमिक सर्वेक्षण

वरील तक्ता क्र. ७.१२ वरुन असे दिसते की, दोन्ही तालुक्यातील दारिद्र्यरेषेखालील कुटुंबातील सदस्यांची संख्या ही दारिद्र्यरेषेवरील कुटुंबातील सदस्यसंख्येपेक्षा जास्त आहे. भोकदरन तालुक्यातील दारिद्र्यरेषेखालील ९५ कुटुंबातील एकूण सदस्यसंख्या ५३२ असून त्यापैकी केवळ १८४ (३४.५९ टक्के) सदस्य कमावते आहेत. याच तालुक्यातील दारिद्र्यरेषेवरील ९५ कुटुंबातील एकूण सदस्यसंख्या ४८३ असून त्यापैकी केवळ १७० (३५.२० टक्के) सदस्य कमावते आहेत.

बदनापूर तालुक्यातील दारिद्र्यरेषेखालील ९५ कुटुंबातील एकूण सदस्यसंख्या ५९३ असून त्यापैकी केवळ १९२ (३२.३८ टक्के) सदस्य कमावते आहेत. याच तालुक्यातील दारिद्र्यरेषेवरील ९५ कुटुंबातील एकूण सदस्यसंख्या ४९८ असून त्यापैकी केवळ १९४ (३९.२७ टक्के) सदस्य कमावते आहेत.

**आकृती क्र. ७.२**

**भोकरदन व बदनापूर तालुक्यातील कुटुंबातील कमावत्या सदस्यासंबंधित माहिती**




थोडक्यात वरील आकृती क्र. ७.२ वरुन असे स्पष्ट होते की, दोन्ही तालुक्यात दारिद्र्यरेषेखालील कुटुंबातील कमावत्या सदस्यांची संख्या दारिद्र्यरेषेवरील कमावत्या सदस्यापैक्षा कमी आहे. भोकरदन तालुक्यातील दारिद्र्यरेषेवरील कुटुंबातील कमावत्या सदस्याच्या तुलनेत बदनापूर तालुक्यातील दारिद्र्यरेषेवरील कुटुंबातील कमावत्या सदस्याची संख्या अधिक आहे. तसेच दोन्ही प्रकारच्या कुटुंबांतील एकूण २१०५ सदस्यापैकी केवळ ७४० (३५.१५ टक्के) कमावते सदस्य आहेत. म्हणजेच कुटुंबातील ६४.८५ टक्के सदस्य हे ३५.१५ टक्के सदस्यांच्या उत्पन्नावर अवलंबून आहेत. थोडक्यात बहुतांश उत्पन्न हे उदर्निर्वाहावर खर्च होते असे दिसते.

### ७.४.३ **कुटुंबाच्या व्यवसायासंबंधित माहिती** :

जालना जिल्ह्यातील भोकरदन व बदनापूर तालुक्यातील दारिद्र्यरेषेखालील व दारिद्र्यरेषेवरील कुटुंबांच्या व्यवसायासंबंधित माहिती खालील तक्ता क्र. ७.१३ मध्ये दिलेली आहे.

**तक्ता. क्र. ७.१३**

**भोकरदन तालुक्यातील कुटुंबांच्या व्यवसायासंबंधित माहिती**

| | भोकरदन | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | प्राथमिक व्यवसाय | | द्वितीय व्यवसाय | | तृतीय व्यवसाय | | एकूण | |
| | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी |
| बीपीएल | ९५ | १०० | ०० | ०.० | ०० | ०.० | ९५ | १०० |
| एपीएल | ९५ | १०० | ०० | ०.० | ०० | ०.० | ९५ | १०० |

संदर्भ : प्रस्तुत अभ्यासाकरिता केलेले प्राथमिक सर्वेक्षण

वरील तक्ता क्र. ७.१३ वरुन असे दिसते की, भोकरदन तालुक्यातील दारिद्र्यरेषेखालील व दारिद्र्यरेषेवरील कुटुंबे ही प्राथमिक स्वरुपाच्या व्यवसायात गुंतलेले आहेत.

**तक्ता. क्र. ७.१४**

**बदनापूर तालुक्यातील कुटुंबांच्या व्यवसायासंबंधित माहिती**

| | बदनापूर | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | प्राथमिक व्यवसाय | | द्वितीय व्यवसाय | | तृतीय व्यवसाय | | एकूण | |
| | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी |
| बीपीएल | ६९ | ७२.६३ | १२ | १२.६३ | १४ | १४.७४ | ९५ | १०० |
| एपीएल | ६६ | ६९.४७ | ०९ | ९.४७ | २० | २१.०६ | ९५ | १०० |


संदर्भ : प्रस्तुत अभ्यासाकरिता केलेले प्राथमिक सर्वेक्षण

वरील तक्ता क्र. ७.१४ वरुन असे दिसते की, बदनापूर तालुक्यातील दारिद्र्यरेषेखालील व दारिद्र्यरेषेवरील कुटुंबे ही प्राथमिक स्वरुपाच्या व्यवसायात इतर व्यवसायाच्या प्रकाराच्या तुलनेत अधिक प्रमाणात गुंतलेले आहेत. प्राथमिक व्यवसायात गुंतलेल्या कुटुंबांमध्ये प्रमाण हे  प्रमाणापेक्षा अधिक आहे. द्वितीय प्रकारच्या व्यवसायात गुंतलेल्या कुटुंबामध्ये दारिद्र्यरेषेवरील कुटुंबांच्या तुलनेत (९.४७ टक्के)

दारिद्र्यरेषेखालील कुटुंबाचे प्रमाण (१२.६३ टक्के) अधिक आहे. तर तृतीयक व्यसायात गुंतलेल्या कुटुंबामध्ये दारिद्र्यरेषेवरील कुटुंबांच्या तुलनेत (२१.६ टक्के) दारिद्र्यरेषेखालील कुटुंबाचे प्रमाण (१४.७४ टक्के) कमी आहे.

**आकृती क्र. ७.३**

**भोकरदन व बदनापूर तालुक्यातील कुटुंबांच्या व्यवसायासंबंधी माहिती**




थोडक्यात वरील आकृती क्र. ७.३ वरुन असे स्पष्ट होते की, दोन्ही तालुक्यात प्राथमिक स्वरुपाच्या व्यवसायात गुंतलेल्या कुंटुंबाचे प्रमाण अधिक आहे मात्र, भोकरदन तालुक्याच्या तुलनेत बदनापूर तालुक्यातील कुटुंबे प्राथमिक स्वरुपाच्या व्यवसायाच्या तुलनेत द्वितीय व तृतीय स्वरुपाच्या व्यवसायात गुंतलेल्या कुटुंबाचे प्रमाण अधिक आहे.

### ७.४.४ कुटुंबांच्या सर्वसाधारण वार्षिक उत्पन्नासंबंधित माहिती :

जालना जिल्ह्यातील भोकरदन व बदनापूर तालुक्यातील दारिद्र्यरेषेखालील व दारिद्र्यरेषेवरील कुटुंबांच्या सर्वसाधारण वार्षिक उत्पन्नासंबंधी माहिती खालील तक्ता क्र. ७.१५ व तक्ता क्र. ७.१६ मध्ये दिलेली आहे.

## तक्ता क्र. ७.१५
## भोकरदन तालुक्यातील कुटुंबांचे सर्वसाधारण वार्षिक उत्पन्न

| | भोकरदन | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | ०-२५ | | २६-५० | | ५१-७५ | | एकूण | |
| | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी |
| बीपीएल | ७० | ७३.६८ | २५ | २६.३२ | ० | ०.० | ९५ | १०० |
| एपीएल | ४८ | ५०.५३ | ४३ | ४५.२५ | ४ | ४.२२ | ९५ | १०० |

संदर्भ : प्रस्तुत अभ्यासाकरिता केलेले प्राथमिक सर्वेक्षण

वरील तक्ता क्र. ७.१५ वरुन असे दिसते की, भोकरदन तालुक्यातील दारिद्र्यरेषेखालील कुटुंबामध्ये ० ते २५ हजार रुपये या दरम्यान कुटुंबाचे सर्वसाधारण वार्षिक उत्पन्न असलेल्या कुटुंबाचे प्रमाण ७३.६८ टक्के असून २६ ते ५० हजार रुपये दरम्यान २६.३२ टक्के कुटुंबाचे प्रमाण आहे. ५१-७५ हजार रुपये दरम्यान वार्षिक उत्पन्न असलेल्यामध्ये एकाही कुटुंबाचा समावेश होत नाही. याच तालुक्यातील दारिद्र्यरेषेवरील कुटुंबामध्ये ० ते २५ हजार रुपये या दरम्यान कुटुंबाचे सर्वसाधारण वार्षिक उत्पन्न असलेल्या कुटुंबाचे प्रमाण ५०.५३ टक्के असून २६ ते ५० हजार रुपये दरम्यान ४५.२५ टक्के कुटुंबाचे प्रमाण आहे. ५१-७५ हजार रुपये दरम्यान वार्षिक उत्पन्न असलेल्यामध्ये केवळ ४.२२ टक्के कुटुंबाचा समावेश आहे.

## तक्ता क्र. ७.१६
## बदनापूर तालुक्यातील कुटुंबांचे सर्वसाधारण वार्षिक उत्पन्न


| | बदनापूर | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | ०-२५ | | २६-५० | | ५१-७५ | | ७६-१ लाख | | १ लाखा पेक्षा जास्त | | एकूण | |
| | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी |
| बीपीएल | ५७ | ६० | २८ | २९.४७ | ६ | ६.३१ | ४ | ४.२२ | ० | ०.० | ९५ | १०० |
| एपीएल | ३० | ३१.५८ | ३८ | ४० | १४ | १४.७४ | ९ | ९.४६ | ४ | ४.२२ | ९५ | १०० |

संदर्भ : प्रस्तुत अभ्यासाकरिता केलेले प्राथमिक सर्वेक्षण

वरील तक्ता क्र. ५.१६ वरुन असे दिसते की, बदनापूर तालुक्यातील दारिद्र्यरेषेखालील कुटुंबामध्ये ० ते २५ हजार रुपये या दरम्यान कुटुंबाचे सर्वसाधारण वार्षिक उत्पन्न असलेल्या कुटुंबाचे प्रमाण ६० टक्के असून २६ ते ५० हजार रुपया दरम्यान २९.४७ टक्के कुटुंबाचे, ५१-७५ हजार रुपया दरम्यान ६.३१ टक्के कुटुंबाचे, ७६-१ लक्ष रुपया दरम्यान ४.२२ टक्के कुटुंबाचे प्रमाण आहे. १ लक्षापेक्षा अधिक वार्षिक उत्पन्न असलेल्या कुटुंबाचे प्रमाण ०.० टक्के आहे. याच तालुक्यातील दारिद्र्यरेषेवरील कुटुंबामध्ये ० ते २५ हजार रुपये या दरम्यान कुटुंबाचे सर्वसाधारण वार्षिक उत्पन्न असलेल्या कुटुंबाचे प्रमाण ३१.५८ टक्के असून २६ ते ५० हजार रुपये दरम्यान ४० टक्के कुटुंबाचे, ५१-७५ हजार रुपया दरम्यान १४.७४ टक्के कुटुंबाचे, ७६-१ लक्ष रुपये दरम्यान ९.४६ टक्के कुटुंबाचे प्रमाण आहे. १ लक्षापेक्षा अधिक वार्षिक उत्पन्न असलेल्या कुटुंबाचे प्रमाण ४.२२ टक्के आहे.

**आकृती क्र. ७.४**

**भोकरदन व बदनापूर तालुक्यातील कुटुंबांचे सर्वसाधारण वार्षिक उत्पन्न**




थोडक्यात वरील आकृती क्र. ७.४ वरुन असे स्पष्ट होते की, भोकरदन तालुक्याच्या तुलनेत बदनापूर तालुक्यातील दारिद्ररेषेखालील कुटुंबाच्या वार्षिक उत्पन्नाचे प्रमाण ५१-१ लक्ष इतके रुपये असलेल्या कुटुंबाचे प्रमाण अधिक आहे. तसेच भोकरदन

तालुक्याच्या तुलनेत बदनापूर तालुक्यातील दारिद्ररेषेवरील कुटुंबाच्या वार्षिक उत्पन्नाचे प्रमाण ७६-१ लक्ष व १ लक्ष रुपयापेक्षा अधिक असलेल्या कुटुंबाचे प्रमाण अधिक आहे. म्हणजेच बदनापूर तालुक्यातील लोकांचे वार्षिक सर्वसाधारण उत्पन्न भोकरदन तालुक्याच्या तुलनेत अधिक आहे.

### ७.४.५ कुटुबाकडील शेतीसंबंधित माहिती :

जालना जिल्ह्यातील भोकरदन व बदनापूर तालुक्यातील दारिद्र्यरेषेखालील व दारिद्र्यरेषेवरील कुटुंबांकडील शेतीसंबंधी माहिती खालील तक्ता क्र. ७.१७ मध्ये दिलेली आहे.

**तक्ता. क्र. ७.१७**

**भोकरदन तालुक्यातील कुटुंबांकडील शेती संबंधित माहिती**

| | भोकरदन | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | लागू नाही | | बागायती | | कोरडवाहू | | जिरायत | | एकूण | |
| | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी |
| बीपीएल | १ | १.०५ | २ | २.११ | ९२ | ९६.८४ | ० | ०.० | ९५ | १०० |
| एपीएल | ० | ०.० | ५ | ५.२६ | ८९ | ९३.६८ | १ | १.०५ | ९५ | १०० |

संदर्भ : प्रस्तुत अभ्यासाकरिता केलेले प्राथमिक सर्वेक्षण

वरील तक्ता क्र. ७.१७ वरुन असे स्पष्ट होते की, भोकरदन तालुक्यातील दारिद्र्यरेषेखालील १.०५ टक्के कुटुंबे हे भूमीहीन आहेत. तर २.११ टक्के कुटुंबांकडे बागायती शेती, ९६.८४ टक्के कुटुंबाकडे कोरडवाहू शेती आहे. याच तालुक्यातील दारिद्ररेषेवरील ५.२६ टक्के कुटुंबाकडे बागायती, ८९.६८ टक्के कुटुंबाकडे कोरडवाहू तर १.०५ टक्के कुटुंबाकडे जिरायती शेती आहे.

**तक्ता. क्र. ७.१८**

**बदनापूर तालुक्यातील कुटुंबांकडील शेतीसंबंधी माहिती**


| | बदनापूर | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | लागू नाही | | बागायती | | कोरडवाहू | | जिरायत | | एकूण | |
| | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी |
| बीपीएल | ३५ | ३६.८४ | १४ | १४.७४ | ४५ | ४७.३७ | १ | १.०५ | ९५ | १०० |
| एपीएल | ६ | ६.३२ | ३६ | ३७.८९ | ५० | ५२.६३ | ३ | ३.१६ | ९५ | १०० |

संदर्भ : प्रस्तुत अभ्यासाकरिता केलेले प्राथमिक सर्वेक्षण

वरील तक्ता क्र. ७.१८ वरुन असे स्पष्ट होते की, बदनापूर तालुक्यातील दारिद्र्यरेषेखालील ३६.८४ टक्के कुटुंबे हे भूमीहीन आहेत. तर १४.७४ टक्के कुटुंबांकडे बागायती शेती, ४७.३७ टक्के कुटुंबाकडे कोरडवाहू, तर १.०५ टक्के कुटुंबाकडे जिरायती शेती आहे. याच तालुक्यातील दारिद्रेषेवरील ६.३२ टक्के कुटुंबे हे भूमीहीन असून ३७.८९ टक्के कुटुंबाकडे बागायती, ५२.६३ टक्के कुटुंबाकडे कोरडवाहु तर ३.१६ टक्के कुटुंबाकडे जिरायती शेती आहे.

**आकृती क्र. ७.५**

**भोकरदन व बदनापूर तालुक्यातील कुटुंबांकडील शेती संबंधी माहिती**




थोडक्यात वरील आकृती क्र. ७.५ वरुन असे स्पष्ट होते की, भूमीहीन कुटुंबाचे प्रमाण भोकरदन तालुक्याच्या तुलनेत बदनापूर तालुक्यात अधिक आहे. भोकरदन

तालुक्याच्या तुलनेत बदनापूर तालुक्यामध्ये बागायती व जिरायती शेती असलेल्या कुटुंबाचे प्रमाण आधिक आहे. तर, कोरडवाहू जमीन असलेल्या कुटुंबाचे प्रमाण बदनापूर तालुक्याच्या तुलनेत भोकरदन तालुक्यात अधिक आहे.

### ७.४.६ **शेतीतील पिकासंबंधित माहिती :**

जालना जिल्ह्यातील भोकरदन व बदनापूर तालुक्यातील दारिद्र्यरेषेखालील व दारिद्र्यरेषेवरील कुटुंबांकडील बागायती शेतीमध्ये घेत असलेल्या पिकांसंबंधी माहिती खालील तक्ता क्र. ७.१९ मध्ये दिलेली आहे.

**तक्ता. क्र. ७.१९**

**भोकरदन व बदनापूर तालुक्यातील कुटुंबांकडील बागायती शेतीमध्ये घेत असलेल्या पिकांसंबंधी माहिती**

| | भोकरदन | | | | | | बदनापूर | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | लागू नाही | | नगदी पिके | | एकूण | | लागू नाही | | अन्यधान्यपिके | | फळबाग | | नगदी पिके | | एकूण | |
| | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी |
| बीपीएल | ९३ | ९७.८९ | २ | २.११ | ९५ | १०० | ८१ | ८५.२६ | ११ | ११.५८ | १ | १.०५ | २ | २.११ | ९५ | १०० |
| एपीएल | ९० | ९४.७४ | ५ | ५.२६ | ९५ | १०० | ५९ | ६२.११ | १५ | १५.७९ | १६ | १६.८४ | ५ | ५.२६ | ९५ | १०० |

संदर्भ : प्रस्तुत अभ्यासाकरिता केलेले प्राथमिक सर्वेक्षण

वरील तक्ता क्र. ७.१९ वरुन असे स्पष्ट होते की, भोकरदन तालुक्यातील बागयत जमीन असलेल्या दारिद्र्यरेषेखालील व दारिद्ररेषेखालील कुटुंबे केवळ नगदी पिके घेतात.

बदनापूर तालुक्यातील बागायत शेतजमीन असलेल्या दारिद्र्यरेषेखालील कुटुंबापैकी ११.५८ टक्के कुटुंब अन्नधान्यपिके, केवळ १.०५ टक्के कुटुंब फळबाग तर, २.११ टक्के कुटुंबे नगदी पिके घेतात. याच तालुक्यातील बागायत शेतजमीन असलेल्या दारिद्र्यरेषेवरील कुटुंबापैकी १५.७९ टक्के कुटुंब अन्नधान्यपिके, १६.८४ टक्के कुटुंब फळबाग तर ५.२६ टक्के कुटुंबे नगदी पिके घेतात.

थोडक्यात असे दिसते की, बागायती शेतीमध्ये फळबाग व अन्नधान्यपिके घेणाऱ्या कुटुंबाचे प्रमाण भोकरदन तालुक्याच्या तुलनेत बदनापूर तालुक्यामध्ये अधिक आहे. नगदी पिके घेण्याऱ्या कुटुंबाचे प्रमाण दोन्ही तालुक्यास समान आहे.

### ७.४.७ शेतीमालाच्या बाजारपेठेतील भावासंबंधित माहिती :

जालना जिल्ह्यातील भोकरदन व बदनापूर तालुक्यातील दारिद्र्यरेषेखालील व दारिद्र्यरेषेवरील कुटुंबांकडील शेतीमधील शेतमालास बाजारपेठेत योग्य भाव मिळतो किंवा नाही? यासंबंधित माहिती खालील तक्ता क्र. ७.२० व ७.२१ मध्ये दिलेली आहे.

**तक्ता. क्र. ७.२०**

**भोकरदन तालुक्यातील कुटुंबांकडील शेतमालास योग्य भावासंबंधी माहिती**

| | भोकरदन | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | लागू नाही | | होय | | कधीकधी | | नाही | | एकूण | |
| | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी |
| बीपीएल | २ | २.११ | ५ | ५.२६ | ३३ | ३४.७४ | ५५ | ५७.८९ | ९५ | १०० |
| एपीएल | ० | ०.० | ० | ०.० | २३ | २४.२१ | ७२ | ७५.७९ | ९५ | १०० |

संदर्भ : प्रस्तुत अभ्यासाकरिता केलेले प्राथमिक सर्वेक्षण

वरील तक्ता क्र. ७.२० वरुन असे दिसते की, भोकरदन तालुक्यातील दारिद्र्यरेषेखालील ५.२६ टक्के कुटुंबांना त्यांच्या शेतमालास बाजारपेठेत योग्य भाव मिळतो, ५७.८९ कुटुंबाच्या त्यांच्या शेतमालास बाजारपेठेत योग्य भाव मिळत नाही. तर ३४.७४ कुटुंबाच्या त्यांच्या शेतमालास बाजारपेठेत कधीकधी योग्य भाव मिळतो. याच तालुक्यातील दारिद्र्यरेषेवरील ७२.७९ कुटुंबाच्या त्यांच्या शेतमालास बाजारपेठेत योग्य भाव मिळत नाही. तर, २४.२१ कुटुंबाच्या त्यांच्या शेतमालास बाजारपेठेत कधीकधी योग्य भाव मिळतो.

## तक्ता. क्र. ७.२१

### बदनापूर तालुक्यातील कुटुंबांकडील शेतमालास योग्य भावासंबंधी माहिती


| | बदनापूर | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | लागू नाही | | होय | | कधीकधी | | नाही | | एकुण | |
| | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी |
| बीपीएल | ३६ | ३७.८९ | १ | १.०५ | ३ | ३.१६ | ५५ | ५७.८९ | ९५ | १०० |
| एपीएल | ६ | ६.३२ | ३ | ३.१६ | १५ | १५.७९ | ७१ | ७४.७३ | ९५ | १०० |

संदर्भ : प्रस्तुत अभ्यासाकरिता केलेले प्राथमिक सर्वेक्षण

वरील तक्ता क्र. ७.२१ वरुन असे दिसते की, बदनापूर तालुक्यातील दारिद्र्यरेषेखालील १.०५ टक्के कुटुंबांना त्यांच्या शेतमालास बाजारपेठेत योग्य भाव मिळतो, ५५.८९ कुटुंबाच्या त्यांच्या शेतमालास बाजारपेठेत योग्य भाव मिळत नाही. तर ३.१६ कुटुंबाच्या त्यांच्या शेतमालास बाजारपेठेत कधीकधी योग्य भाव मिळतो. याच तालुक्यातील दारिद्र्यरेषेवरील ३.१६ टक्के कुटुंबांना त्यांच्या शेतमालास बाजारपेठेत योग्य भाव मिळतो, ७४.७३ कुटुंबाच्या त्यांच्या शेतमालास बाजारपेठेत योग्य भाव मिळत नाही. तर १५.७९ कुटुंबाच्या त्यांच्या शेतमालास बाजारपेठेत कधीकधी योग्य भाव मिळतो.

## आकृती क्र. ७.६

### भोकरदन व बदनापूर तालुक्यातील कुटुंबांकडील शेतमालास योग्य भावासंबंधी माहिती



थोडक्यात वरील आकृती क्र. ७.६ वरुन असे स्पष्ट होते की, शेतमालास बाजारपेठेत योग्य भाव मिळत नाही असे सांगणाऱ्या कुटुंबाचे प्रमाण दोन्ही तालुक्यात सारखेच आहे. तर शेतमालास बाजारपेठेत योग्य भाव कधीकधी मिळतो असे सांगणाऱ्या कुटुंबाचे प्रमाण बदनापूर तालुक्यापेक्षा भोकरदन तालुक्यात अधिक आहे.

### ७.४.८ उदरनिर्वाहासाठी खर्च होऊन मिळणाऱ्या जास्तीच्या उत्पन्नाविषयी :

जालना जिल्ह्यातील भोकरदन व बदनापूर तालुक्यातील दारिद्र्यरेषेखालील व दारिद्र्यरेषेवरील कुटुंबांकडील उत्पन्नाचा उदरनिर्वाहासाठी खर्च होऊन उर्वरित जास्तीचे उत्पन्न यासंबंधी माहिती खालील तक्ता क्र. ७.२२ व ७.२३ मध्ये दिलेली आहे.

**तक्ता. क्र. ७.२२**
**भोकरदन तालुक्यातील कुटुंबांकडील जास्तीच्या उत्पन्नासंबंधी माहिती**

| | भोकरदन | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | लागू नाही | | सांगता येत नाही | | नाही | | एकूण | |
| | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी |
| बीपीएल | १ | १.०५ | ११ | ११.५८ | ८३ | ८७.३७ | ९५ | १०० |
| एपीएल | ० | ०.० | १३ | १३.६८ | ८२ | ८६.३२ | ९५ | १०० |

संदर्भ : प्रस्तुत अभ्यासाकरिता केलेले प्राथमिक सर्वेक्षण

वरील तक्ता क्र. ७.२२ वरुन असे दिसते की, भोकरदन तालुक्यातील दारिद्र्यरेषेखालील ११.५८ टक्के कुटुंबांना व्यवसायातून मिळणाऱ्या उत्पन्नातून उदरनिर्वाहसाठीचा खर्च वजा जाता अधिकचे उत्पन्न मिळते किंवा नाही हे सांगता येत नाही तर ८७.३७ टक्के कुटुंबाना अधिकचे उत्पन्न मिळत नाही. याच तालुक्यातील दारिद्र्यरेषेवरील १३.६८ टक्के कुटुंबांना व्यवसायातून मिळणाऱ्या उत्पन्नातून उदर्निवाहासाठीचा खर्च वजा जाता अधिकचे उत्पन्न मिळते किंवा नाही हे सांगता येत नाही तर ८६.३२ टक्के कुटुंबाना अधिकचे उत्पन्न मिळत नाही.

**तक्ता. क्र. ७.२३**

**बदनापूर तालुक्यातील कुटुंबांकडील जास्तीच्या उत्पन्नासंबंधी माहिती**

| | बदनापूर | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | लागू नाही | | होय | | सांगता येत नाही | | नाही | | एकूण | |
| | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी |
| बीपीएल | ० | ०.० | २४ | २५.२६ | २ | २.११ | ६९ | ७२.६३ | ९५ | १०० |
| एपीएल | १ | १.०५ | ४१ | ४३.१६ | २ | २.११ | ५१ | ५३.६८ | ९५ | १०० |

संदर्भ : प्रस्तुत अभ्यासाकरिता केलेले प्राथमिक सर्वेक्षण

वरील तक्ता क्र. ७.२३ वरुन असे दिसते की, बदनापूर तालुक्यातील दारिद्र्यरेषेखालील २५.२६ टक्के कुटुंबांना व्यवसायातून मिळणाऱ्या उत्पन्नातून उदरनिर्वाहासाठीचा खर्च वजा जाता अधिकचे उत्पन्न मिळते. ७२.६३ टक्के कुटुंबाना अधिकचे उत्पन्न मिळत नाही. तर २.११ टक्के कुटुंबांना व्यवसायातून मिळणाऱ्या उत्पन्नातून उदरनिर्वाहासाठीचा खर्च वजा जाता अधिकचे उत्पन्न मिळते किंवा नाही हे सांगता येत नाही. याच तालुक्यातील दारिद्र्यरेषेवरील ४३.१६ टक्के कुटुंबांना व्यवसायातून मिळणाऱ्या उत्पन्नातून उदरनिर्वाहासाठीचा खर्च वजा जाता अधिकचे उत्पन्न मिळते. ५३.६८ टक्के कुटुंबाना अधिकचे उत्पन्न मिळत नाही. तर २.११ टक्के कुटुंबांना व्यवसायातून मिळणाऱ्या उत्पन्नातून उदरनिर्वाहासाठीचा खर्च वजा जाता अधिकचे उत्पन्न मिळते किंवा नाही हे सांगता येत नाही.

थोडक्यात भोकरदन तालुक्याच्या तुलनेत बदनापूर तालुक्यातील कुटुंबाना उदरनिर्वाहावरील खर्च वजा जाता त्यांच्या व्यवसायातून अधिकचे उत्पन मिळते. या जास्तीच्या उत्पन्नाचे प्रमाण खालील तक्ता क्र. ७.१४ मध्ये दिलेले आहे.

**तक्ता. क्र. ७.२४**

**बदनापूर तालुक्यातील कुटुंबांकडील जास्तीचे उत्पन्नासंबंधी माहिती**

| | बदनापूर | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | लागू नाही | | ०-१० | | ११-२५ | | २६-५० | | ५१-७५ | | ७६-१ लाख | | एकूण | |
| | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी |
| बीपीएल | ७१ | ७४.७४ | १५ | १५.७९ | ८ | ८.४२ | १ | १.०५ | ० | ०.० | ० | ०.० | ९५ | १०० |
| एपीएल | ५४ | ५६.८४ | २० | २१.०६ | ८ | ८.४२ | ११ | ११.५८ | १ | १.०५ | १ | १.०५ | ९५ | १०० |

संदर्भ : प्रस्तुत अभ्यासाकरिता केलेले प्राथमिक सर्वेक्षण

वरील तक्ता क्र. ७.२४ वरुन असे दिसते की, बदनापूर तालुक्यातील दारिद्र्यरेषेखालील १५.७९ टक्के कुटुंबाना उदरनिर्वाहावरील खर्च होऊन ०-१० हजार इतके रुपये अधिकचे उत्पन्न शिल्लक राहते, ८.४२ टक्के कुटुंबाना ११-२५ हजार इतके तर १.०५ टक्के कुटुंबांना २६-५० हजार रुपये इतके अधिकचे उत्पन्न मिळते. याच तालुक्यातील दारिद्र्यरेषेवरील २१.०६ टक्के कुटुंबाना उदरनिर्वाहावरील खर्च होऊन ०-१० हजार इतके रुपये अधिकचे उत्पन्न शिल्लक राहते, ८.४२ टक्के कुटुंबाना ११-२५ हजार इतके, ११.५८ टक्के कुटुंबांना २६-५० हजार इतके, तर १.०५ टक्के कुटुंबास ७६- १ लक्ष इतके रुपये अधिकचे उत्पन्न मिळते. या कुटुंबांच्या मते याचे कारण, शेतीतील अन्नधान्यपिके, नगदीपिके व फळबाग यांना कधीकधी मिळणारा योग्य बाजारभाव व जवळपास उपलब्ध असलेली औरंगाबाद व जालना शहराची बाजारपेठ होय.

### ७.४.९ **रोजगार हमी योजना संबंधी माहिती**:

जालना जिल्ह्यातील भोकरदन व बदनापूर तालुक्यातील दारिद्र्यरेषेखालील व दारिद्र्यरेषेवरील कुटुंबांना रोजगार हमी योजनेविषयी माहिती आहे किंवा नाही यासंबंधी माहिती खालील तक्ता क्र. ७.२५ मध्ये दिलेली आहे.

**तक्ता. क्र. ७.२५**

**भोकरदन व बदनापूर तालुक्यातील कुटुंबांकडील रोजगार हमी योजनेसंबंधी माहिती**

| | **भोकरदन** | | | | | | **बदनापूर** | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | **होय** | | **नाही** | | **एकूण** | | **होय** | | **नाही** | | **एकूण** | |
| | **संख्या** | **टक्केवारी** | **संख्या** | **टक्केवारी** | **संख्या** | **टक्केवारी** | **संख्या** | **टक्केवारी** | **संख्या** | **टक्केवारी** | **संख्या** | **टक्केवारी** |
| बीपीएल | ४९ | ५१.५८ | ४६ | ४८.४२ | ९५ | १०० | २७ | २८.४२ | ६८ | ७१.५८ | ९५ | १०० |
| एपीएल | ६५ | ६८.४२ | ३० | ३१.५८ | ९५ | १०० | ४५ | ४७.३७ | ५० | ५२.६३ | ९५ | १०० |

संदर्भ : प्रस्तुत अभ्यासाकरिता केलेले प्राथमिक सर्वेक्षण

वरील तक्ता क्र. ७.२५ वरुन असे दिसते की, भोकरदन तालुक्यातील दारिद्र्यरेषेखालील ५१.५८ टक्के कुटुंबांना रोजगार हमी योजनेची माहिती आहे. तर ४८.४२ टक्के कुटुंबांना रोजगार हमी अशी योजना आहे हे माहिती नाही. याच तालुक्यातील दारिद्र्यरेषेवरील ६८.४२ टक्के कुटुंबांना रोजगार हमी योजनेविषयी माहिती आहे तर ३१.५८ टक्के कुटुंबाना रोजगार हमीयोजनेची माहिती नाही.

बदनापूर तालुक्यातील दारिद्र्यरेषेखालील २८.५८ टक्के कुटुंबांना रोजगार हमी योजनेची माहिती आहे. तर ७१.५८ टक्के कुटुंबांना रोजगार हमी अशी योजना आहे हे माहिती नाही. याच तालुक्यातील दारिद्र्यरेषेवरील ४७.३७ टक्के कुटुंबांना रोजगार हमी योजनेविषयी माहिती आहे तर ५२.६३ टक्के कुटुंबाना रोजगार हमीयोजनेची माहिती नाही.

थोडक्यात असे दिसते की, बदनापूर तालुक्यातील कुटुंबापेक्षा भोकरदन तालुक्यातील बीपीएल व एपील या दोन्ही प्रकारातील कुटुबांना रोजगार हमी योजनेची माहिती अधिक आहे.

### ७.४.१० रोजगार हमी योजनेच्या लाभाविषयी माहिती :

जालना जिल्ह्यातील भोकरदन व बदनापूर तालुक्यातील दारिद्र्यरेषेखालील व दारिद्र्यरेषेवरील कुटुंबांना रोजगार हमी योजनेच्या लाभाविषयीची माहिती खालील तक्ता क्र. ७.२६ व ७.२७ मध्ये दिलेली आहे.

**तक्ता. क्र. ७.२६**

**भोकरदन तालुक्यातील रोजगार हमी योजनेचा लाभ घेतलेल्या कुटुंबांसंबंधी माहिती**

| | भोकरदन | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | लागू नाही | | होय | | नाही | | एकूण | |
| | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी |
| बीपीएल | ४६ | ४८.४२ | ३१ | ३२.६३ | १८ | १८.९५ | ९५ | १०० |
| एपीएल | ३० | ३१.५८ | ४३ | ४५.२६ | २२ | २३.१६ | ९५ | १०० |

संदर्भ : प्रस्तुत अभ्यासाकरिता केलेले प्राथमिक सर्वेक्षण

वरील तक्ता क्र. ७.२६ वरुन असे दिसते की, भोकरदन तालुक्यातील दारिद्र्यरेषेखालील ३२.६३ टक्के कुटुंबांनी रोजगार हमी योजनेचा लाभ घेतलेला आहे. तर १८.९५ टक्के कुटुंबांना रोजगार हमी योजनेची माहिती असून पण योजनेचा लाभ घेतलेला नाही. याच तालुक्यातील दारिद्र्यरेषेवरील ४५.२६ टक्के कुटुंबांनी रोजगार हमी योजनेचा लाभ घेतलेला आहे. तर २३.१६ टक्के कुटुंबांनी रोजगार हमी योजनचा लाभ घेतलेला नाही.

**तक्ता. क्र. ७.२७**

**बदनापूर तालुक्यातील रोजगार हमी योजनेचा लाभ घेतलेल्या कुटुंबांसंबंधी माहिती**

| | बदनापूर | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | लागू नाही | | होय | | नाही | | एकूण | |
| | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी |
| बीपीएल | ६८ | ७१.५८ | ६ | ६.३२ | २१ | २२.१० | ९५ | १०० |
| एपीएल | ५० | ५२.६३ | ९ | ९.४८ | ३६ | ३७.८९ | ९५ | १०० |

संदर्भ : प्रस्तुत अभ्यासाकरिता केलेले प्राथमिक सर्वेक्षण

वरील तक्ता क्र. ७.२७ वरुन असे दिसते की, बदनापूर तालुक्यातील दारिद्र्यरेषेखालील ६.३२ टक्के कुटुंबांनी रोजगार हमी योजनेचा लाभ घेतलेला आहे. तर २१.१० टक्के कुटुंबांना रोजगार हमी योजनेची माहिती असून पण योजनेचा लाभ घेतलेला नाही. याच तालुक्यातील दारिद्र्यरेषेवरील ९.४८ टक्के कुटुंबांनी रोजगार हमी योजनेचा लाभ घेतलेला आहे. तर ३७.८९ टक्के कुटुंबांनी रोजगार हमी योजनचा लाभ घेतलेला नाही.

थोडक्यात असे स्पष्ट होते की, रोजगार हमी योजनेचा लाभ घेण्यामध्ये बदनापूर तालुक्याच्या तुलनेत भोकरदन तालुक्यातील कुटुंबांचे प्रमाण अधिक आहे.

**७.४.११ रोजगार हमी योजना व कुटुंबाच्या उत्पन्नातील वाढीसंबंधी माहिती** :

जालना जिल्ह्यातील भोकरदन व बदनापूर तालुक्यातील दारिद्र्यरेषेखालील व दारिद्र्यरेषेवरील कुटुंबांना रोजगार हमी योजनेच्या लाभा घेतल्यामुळे सदर कुटुंबाच्या उत्पन्नातील वाढ याविषयीची माहिती खालील तक्ता क्र. ७.२८ व ७.२९ मध्ये दिलेली आहे.

**तक्ता. क्र. ७.२८**

**भोकरदन तालुक्यातील रोजगार हमी योजना व उत्पन्नातील वाढीसंबंधी माहिती**

| | भोकरदन | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | लागू नाही | | होय | | नाही | | एकूण | |
| | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी |
| बीपीएल | ६४ | ६७.३७ | ३० | ३१.५८ | १ | १.०५ | ९५ | १०० |
| एपीएल | ५२ | ५४.७४ | ४२ | ४४.२१ | १ | १.०५ | ९५ | १०० |

संदर्भ : प्रस्तुत अभ्यासाकरिता केलेले प्राथमिक सर्वेक्षण

वरील तक्ता क्र. ७.२८ वरुन असे दिसते की, भोकरदन तालुक्यातील दारिद्र्यरेषेखालील कुटुंबानी रोजगार हमी योजनेचा लाभ घेतलेल्यामुळे ३१.५८ टक्के कुटुंबांच्या उत्पन्नात वाढ झालेली आहे. तर केवळ १.०५ टक्के कुटुंबांच्या उत्पन्नात रोजगार हमी योजनेचा लाभ घेऊन पण वाढ झालेली नाही. याच तालुक्यातील

दारिद्र्यरेषेवरील कुटुंबानी रोजगार हमी योजनेचा लाभ घेतलेल्यामुळे ४४.२१ कुटुंबांच्या उत्पन्नात वाढ झालेली आहे. तर केवळ १.०५ टक्के कुटुंबांच्या उत्पन्नात रोजगार हमी योजनेचा लाभ घेऊन पण वाढ झालेली नाही.

**तक्ता. क्र. ७.२९**

**बदनापूर तालुक्यातील रोजगार हमी योजना व उत्पनातील वाढीसंबंधी माहिती**


| | बदनापूर | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | लागू नाही | | होय | | नाही | | एकूण | |
| | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी |
| बीपीएल | ८९ | ९२.६३ | २ | २.१० | ४ | ५.२६ | ९५ | १०० |
| एपीएल | ८६ | ९०.५३ | ८ | ८.४२ | १ | १.०५ | ९५ | १०० |

संदर्भ : प्रस्तुत अभ्यासाकरिता केलेले प्राथमिक सर्वेक्षण

वरील तक्ता क्र. ७.२९ वरुन असे दिसते की, बदनापूर तालुक्यातील दारिद्र्यरेषेखालील कुटुंबानी रोजगार हमी योजनेचा लाभ घेतलेल्यामुळे २.१० टक्के कुटुंबांच्या उत्पन्नात वाढ झालेली आहे. तर ५.२६ टक्के कुटुंबांच्या उत्पन्नात रोजगार हमी योजनेचा लाभ घेऊन पण वाढ झालेली नाही. याच तालुक्यातील दारिद्र्यरेषेवरील कुटुंबानी रोजगार हमी योजनेचा लाभ घेतलेल्यामुळे ८.४२ कुटुंबांच्या उत्पन्नात वाढ झालेली आहे. तर केवळ १.०५ टक्के कुटुंबांच्या उत्पन्नात रोजगार हमी योजनेचा लाभ घेऊन पण वाढ झालेली नाही.

**आकृती क्र. ७.७**

**भोकरदन व बदनापूर तालुक्यातील रोजगार हमी योजना व उत्पनातील वाढीसंबंधी माहिती**




थोडक्यात वरील आकृती क्र. ७.७ वरुन असे स्पष्ट होते की, बदनापूर तालुक्याच्या तुलनेत भोकरदन तालुक्यातील रोजगार हमी योजनेच्या लाभार्थींच्या उत्पन्नात वाढ झालेल्या कुटुंचाचे प्रमाण अधिक आहे.

### ७.४.१२ उत्पन्न वाढीसंदर्भात इतर आवश्यक सुविधांची माहिती :

जालना जिल्ह्यातील भोकरदन व बदनापूर या तालुक्यातील उत्पन्न वाढीच्या अनुषंगाने इतर सुविधाच्या स्थितीचे निरिक्षण करुन संकलित केलेली माहिती खालील तक्ता क्र. ७.३० मध्ये दिलेली आहे.

## तक्ता क्र. ७.३०

## भोकरदन व बदनापूर या तालुक्यातील उत्पन्न वाढीच्या अनुषंगाने इतर सुविधांची माहिती

| तपशील | भोकरदन | | बदनापूर | | एकूण गांवाची संख्या |
|---|---|---|---|---|---|
| | होय | नाही | होय | नाही | |
| अ) गावांच्या जमिन क्षेत्रात नदी आहे काय? | ११ | ०८ | १० | ९ | ३८ |
| ब) गांवाच्या जमीन क्षेत्रात नाले आहेत काय? | १८ | ०१ | १८ | ०१ | ३८ |
| क) गांवात येण्यासाठी पक्के रस्ते आहे काय? | १० | ०९ | १२ | ०७ | ३८ |
| ड) गांवात वाहतूक व दळणवळणाची साधने आहेत काय? | १३ | ०६ | १३ | ०६ | ३८ |
| इ) गांवात व परिसरात नियमित विजपुरवठा आहे काय? | ०९ | १० | १० | ०९ | ३८ |
| ई) गांवात शिक्षणाच्या सोई आहे काय? | १४ | ०५ | १९ | ० | ३८ |
| उ) गांवात आरोग्यासंबंधित सोई-सुविधा आहेत काय? | ५ | १४ | ६ | १३ | ३८ |
| ऊ) गांवात राष्ट्रीयकृत बँक सेवा आहे काय? | २ | १७ | २ | १७ | ३८ |
| क) गांवात पिण्यासाठी पुरेसे पाणी आहे काय? | ४ | १५ | ३ | १६ | ३८ |
| ख) गांवात व परिसरात शेतीसाठी बारमाही पाणी आहे काय? | ० | १९ | ० | १९ | ३८ |
| ग) गांवात शेतमाल साठवणूक व्यवस्था आहे काय? | १ | १८ | ३ | १६ | ३८ |
| घ) गांवात व परिसरात सिंचन सोई (तलाव/तळी/धरणे इ.) आहे काय? | ० | १९ | ७ | १२ | ३८ |
| य) गांवात बाजारपेठ आहे काय? | १ | १८ | २ | १७ | ३८ |
| र) गांवात कारखाने आहेत काय? | ० | १९ | ० | १९ | ३८ |
| व) गांवात पर्जन्यमान कसे आहे? (सरासरी/सरासरीपेक्षा कमी) | ७ | १२ | ० | १९ | ३८ |
| श) गावात रोजगार हमी योजनेची कामे चालतात काय? | १४ | ५ | १० | ०९ | ३८ |

संदर्भ : प्रस्तुत अभ्यासाकरिता केलेले प्राथमिक सर्वेक्षण

वरील तक्ता क्र. ७.३० मध्ये एकूण १६ सुविधांसंबंधित भोकरदन व बदनापूर तालुक्यातील स्थितीचा आढावा घेण्यात आलेला आहे. वरील तक्त्यावरुन असे दिसते की, भोकरदन तालुक्यातील सरासरी पाऊस पडत असलेल्या गावांचे प्रमाण बदनापूर

तालुक्यापेक्षा अधिक आहे. तर याऊलट सिंचनाची व्यवस्था असलेल्या गांवाचे प्रमाण भोकरदन तालुक्याच्या तुलनेत बदनापूर येथे अधिक आहे.

आरोग्य सुविधा, राष्टीयकृत बँका, गांवात पुण्यासाठी पाणी, शेतीसाठी बारमाही पाणी, शेतमाल साठवणूक व्यवस्था, बाजारपेठ इ. सुविधा दोन्ही तालुक्यात उपलब्ध असलेल्या गावांचे प्रमाण खूपच कमी आहे. तर बदनापूर व भोकरदन तालुक्यातील अनुक्रमे ११ व १० गांवात नदी तर अनुक्रमे १८ व १८ गावामध्ये नाले आहेत परंतु या नदी व नाल्यास केवळ पावसाळ्यातच पाणी असते. या नदी नाल्यावर पाणी साठवणूक व्यवस्थेचा अभाव आहे. त्यामुळे सर्व पाणी वाहत जाते सबब या पण्याचा उत्पन्न वाढीसाठी काहीच उपयोग होत नाही.

## ७.५ **कारणमीमांसा संबंधित विश्लेषण :**

जालना जिल्ह्यातील दरडोई उत्पन्नाचे प्रमाण कमी असल्याच्या कारणांचा शोध संख्याशास्त्रीय साधनांच्या सहाय्याने संशोधकाने घेतलेला असून त्यासंबंधीचे स्पष्टीकरण खालील प्रमाणे करण्यात आलेले आहे.

जालना जिल्ह्यातील बदनापूर व भोकरदन या दोन्ही तालुक्यातील दारिद्र्यरेषेखालील व दारिद्र्यरेषेवरील अशा दोन्ही प्रकारच्या कुटुंबांकडून अनुसूचीच्या सहाय्याने कारणांचा शोध घेण्यात आलेला आहे. संशोधकांने संशोधनाच्या सुरुवातीस केलेल्या विविध सदर्भ साहित्याच्या अभ्यासावरुन अनुसूचीमध्ये समाविष्ट केलेली कारणे व त्यामधील कारणे शोधण्यासाठी SPSS यामध्ये करण्यात आलेले सांकेतिकरण खालील तक्ता क्र. ७.३१ मध्ये नमूद केलेली आहेत.

## तक्ता क्र. ७.३१
## जालना जिल्ह्यातील दरडोई उत्पन्नासंबंधित अनुसूचीमध्ये नमूद कारणे

| अ.क्र. | कारणे | SPSS मध्ये नमूद सांकेतांक |
|---|---|---|
| १. | घरातील सर्वच व्यक्ती शेती व शेतीपूरक व्यवसायच गुंतलेले असणे. | VAR00001 |
| २. | आमच्या गांवात/तालुक्यात उद्योगधंदे कमी असणे. | VAR00002 |
| ३. | तांत्रिक प्रगती/दृष्टिकोनाचा अभाव असणे. | VAR00003 |
| ४. | नैसर्गिक साधन संपत्तीचा अभाव असणे. | VAR00004 |
| ५. | उत्पादन व रोजगार संधीचा अभाव असणे. | VAR00005 |
| ६. | कृषी क्षेत्रातील उत्पादकता कमी असणे. | VAR00006 |
| ७. | कृषी क्षेत्रातील उत्पनापेक्षा त्यावरील खर्च जास्त असणे. | VAR00007 |
| ८. | कृषीला पाण्याची उपलब्धता नसणे. | VAR00008 |
| ९. | हंगामी शेती (पावसावर अवलंबून असलेली शेती) असणे. | VAR00009 |
| १०. | व्यापारविषयक सोयीचा अभाव असणे. | VAR00010 |
| ११. | शेतमालास योग्य बाजारभाव न मिळणे. | VAR00011 |
| १२. | भूमीहीन असणे. | VAR00012 |
| १३. | उत्पानसाठी मालमत्ता/साधने उपलब्ध नसणे. | VAR00013 |
| १४. | बागायत शेती नसणे. | VAR00014 |
| १५. | जमिनीमध्ये पाझरण्याची व पाणी साठवून राहण्याची क्षमता कमी असणे | VAR00015 |
| १६. | सिंचनाच्या सोयीची कमतरता असणे. | VAR00016 |
| १७. | पाणीपुरवठा व्यवस्था नसणे. | VAR00017 |
| १८. | घरात एकही नोकरदार किंवा व्यापारी नसणे. | VAR00018 |
| १९. | सावकाराकडून कर्ज घेतले असणे. | VAR00019 |
| २०. | बॅंकेकडून कर्ज घेतले असणे. | VAR00020 |
| २१. | कुटुंबाचा उत्पन्नापेक्षा खर्च जास्त असणे. | VAR00021 |
| २२. | घेतलेले कर्ज उदरनिर्वाहासाठीच खर्च होत असणे. | VAR00022 |
| २३. | शाळेत रोजगारविषयक ज्ञान मिळाले नसणे. | VAR00023 |
| २४. | रोजगारासंबंधित प्रशिक्षण घेतले नसणे. | VAR00024 |

संदर्भ : प्रस्तुत अभ्यासाकरिता केलेले प्राथमिक सर्वेक्षण

वरील तक्ता क्र. ७.३१ मध्ये दिलेल्या अनेक कारणांमध्ये दोन्ही तालुक्यातील प्रतिसादकांच्या मते प्रभावी कारणांचा शोध घेण्यासाठी 'मुख्य घटक विश्लेषण पध्दती'

या संख्याशास्त्रातील तंत्रांचा वापर केला. हे तंत्र कार्यान्वित करण्यासाठी SPSS या विश्लेषण साधनांचा वापर केला आहे. SPSS या विश्लेषण साधनानुसार मुख्य घटक विश्लेषण करतांना खालील तक्ता. क्र. ७.३२ व ७.३३ मध्ये नमूद बाबी आढळून येतात.

**तक्ता क्र. ७.३२**

**SPSS नुसार सर्व घटकांचे विश्लेषण**

**Total Variance Explained**

| Component | Initial Eigenvalues | | | Extraction Sums of Squared Loadings | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | Total | % of Variance | Cumulative % | Total | % of Variance | Cumulative % |
| 1 | 6.996 | 29.151 | 29.151 | 6.996 | 29.151 | 29.151 |
| 2 | 3.181 | 13.253 | 42.404 | | | |
| 3 | 1.392 | 5.798 | 48.202 | | | |
| 4 | 1.319 | 5.495 | 53.697 | | | |
| 5 | 1.058 | 4.407 | 58.104 | | | |
| 6 | 1.035 | 4.312 | 62.415 | | | |
| 7 | 1.019 | 4.244 | 66.659 | | | |
| 8 | .997 | 4.154 | 70.814 | | | |
| 9 | .940 | 3.916 | 74.730 | | | |
| 10 | .866 | 3.610 | 78.340 | | | |
| 11 | .821 | 3.419 | 81.759 | | | |
| 12 | .757 | 3.152 | 84.911 | | | |
| 13 | .675 | 2.812 | 87.724 | | | |
| 14 | .606 | 2.526 | 90.250 | | | |
| 15 | .499 | 2.080 | 92.330 | | | |
| 16 | .449 | 1.869 | 94.199 | | | |
| 17 | .445 | 1.855 | 96.053 | | | |
| 18 | .314 | 1.309 | 97.363 | | | |
| 19 | .243 | 1.011 | 98.374 | | | |
| 20 | .157 | .654 | 99.028 | | | |
| 21 | .108 | .450 | 99.478 | | | |
| 22 | .068 | .283 | 99.761 | | | |
| 23 | .038 | .160 | 99.921 | | | |
| 24 | .019 | .079 | 100.000 | | | |

Extraction Method: Principal Component Analysis.

वरील तक्ता क्र. ७.३२ नुसार एकुण २४ कारणांच्या समूहामध्ये ०१ कारणांचा समूह स्पष्ट होतो. या समूहामध्ये असलेली प्रमुख कारणे खालील तक्त्यात दिलेली आहेत.

**तक्ता क्र. ७.३३**

**SPSS नुसार मुख्य घटकांचे विश्लेषण**

**Component Matrix[a]**

| | Component |
|---|---|
| | 1 |
| VAR00001 | .486 |
| VAR00002 | .018 |
| VAR00003 | -.021 |
| VAR00004 | -.029 |
| VAR00005 | -.029 |
| VAR00006 | .956 |
| VAR00007 | .962 |
| VAR00008 | .052 |
| VAR00009 | .976 |
| VAR00010 | .898 |
| VAR00011 | .039 |
| VAR00012 | -.928 |
| VAR00013 | -.055 |
| VAR00014 | .119 |
| VAR00015 | .957 |
| VAR00016 | .874 |
| VAR00017 | -.111 |
| VAR00018 | -.027 |
| VAR00019 | -.258 |
| VAR00020 | .459 |
| VAR00021 | .188 |
| VAR00022 | .499 |
| VAR00023 | .124 |
| VAR00024 | -.074 |

Extraction Method: Principal Component Analysis.

a. 1 components extracted.

वरील तक्ता ५.३२ मध्ये सहसंबंध मूल्य पातळी ०.५ निर्धारित धरुन सहसंबंध पडताळण्यात आलेला आहे. या सहसंबंध पडताळणीवरुन असे दिसून येते की, हिंगोली जिल्ह्यातील महिला साक्षरता प्रमाण कमी असल्याच्या एकूण २४ कारणांपैकी १५ कारणे (धन संख्या) मुख्य कारणीभूत घटक आहेत. यामध्ये घरातील सर्वच व्यक्ती शेती व शेतीपुरक व्यवसायच गुंतलेले असणे, गांवात/तालुक्यात उद्योगधंदे कमी असणे, कृषि क्षेत्रातील उत्पादकता कमी असणे, कृषि क्षेत्रातील उत्पन्नापेक्षा त्यावरील खर्च जास्त असणे, कृषिला पाण्याची उपलब्धता नसणे, हंगामी शेती (पावसावर अवलंबून असलेली शेती) असणे, व्यापारविषयक सोयीचा अभाव असणे, शेतमालास योग्य बाजारभाव न मिळणे, बागायत शेती नसणे, जमिनीमध्ये पाझरण्याची व पाणी साठवून राहण्याची क्षमता कमी असणे, सिंचनाच्या सोयीची कमतरता असणे, बॅंकेकडून कर्ज घेतले असणे, कुटूंबाचा उत्पन्नापेक्षा खर्च जास्त असणे, घेतलेले कर्ज उदरनिर्वाहासाठीच खर्च होणे, शाळेत रोजगारविषयक ज्ञान मिळाले नसणे. इ. मुख्य कारणांचा समावेश होतो.

थोडक्यात जालना जिल्ह्यातील दरडोई उत्पन्न कमी असण्याचा कारणांचा शोध घेण्याच्या अनुषंगाने दुय्यम स्त्रोत, प्राथमिक स्त्रोत याद्वारे प्राप्त माहितीचे विश्लेषण वरील प्रमाणे करण्यात आलेले आहे.

***

# प्रकरण – ८
# सारांश, निष्कर्ष व शिफारशी

## ८.१ प्रस्तावना :

"मराठवाड्यातील मानव विकास निर्देशांक निम्न असल्याची कारणमीमांसा : एक अभ्यास" या प्रबंधातील एकूण आठ प्रकरणामध्ये केलेल्या अभ्यासाचा थोडक्यात परामर्श व संशोधनाच्या अनुषंगाने केलेल्या विश्लेषणासंबंधीत निष्कर्ष या प्रकरणात मांडण्यात आलेले आहेत तसेच या प्रकरणाच्या शेवटी शासनास व समाजास उद्देशून संशोधनातील निष्कर्षाच्या आधारे प्रमुख शिफारशी सुचविण्यात आलेल्या आहेत.

## ८.२ सारांश :

या संशोधनातील प्रकरणनिहाय सारांश खालील प्रमाणे मांडण्यात आलेला आहे.

पहिल्या प्रकरणामध्ये मानव विकासाचा दृष्टिकोन, मानव विकास संकल्पनेची वैशिष्ट्ये, मानव विकास संकल्पना व व्याख्या, मानव विकासाची आवश्यकता, मानव विकास निर्देशांक, निर्देशांकाचे घटक व गणनपध्दती, संयुक्त राष्ट्रसंघ व त्यांची भूमिका, सहस्त्रावधी विकास लक्ष्ये इ. बाबतचा आढावा घेण्यात आला आहे.

दुसऱ्या प्रकरणामध्ये मराठवाडा प्रादेशिक विभागाची ऐतिहासिक पार्श्वभूमी, स्थान विस्तार सीमा, भौगोलिक वैशिष्ट्ये, प्रमुख शहरे, लोकसंख्या, आर्थिक विकास, वाहतूक व दळणवळण, शिक्षण, प्रसिध्द व्यक्ती इ. ची माहिती दिलेली आहे. तसेच मराठवाड्यातील या संशोधनासाठी निवडलेल्या हिंगोली, उस्मानाबाद व जालना या जिल्ह्याचे स्थान व व्याप्ती, भौगोलिक संरचना, लोकसंख्या, सिंचन, उद्योग, पर्यटन व प्रशासकीय यंत्रणा इ. बाबतचा आढावा घेण्यात आला आहे.

तिसऱ्या प्रकरणामध्ये भारताच्या मानव विकास निर्देशांकाची स्थिती व वार्षिक वाढ, राष्ट्रीय मानव विकास अहवालात महाराष्ट्र राज्याचे स्थान, भारतातील विविध

राज्य व जिल्ह्याचे मानव विकास अहवाल, महाराष्ट्र मानव विकास अहवालात मराठवाडा विभागाचे स्थान, मानव विकास अहवाल व पारितोषिके इ. बाबतचा आढावा घेण्यात आला आहे.

चौथ्या प्रकरणामध्ये संशोधनासाठी मराठवाडा विभाग निवडीची कारणे, संशोधन विषय निवडीची कारणे व महत्त्व, संशोधनाची उद्दिष्टये, गृहितकृत्ये, कार्यात्मक व्याख्या, संशोधन कालावधी, संशोधनाची व्याप्ती व मर्यादा, संशोधन पध्दती, माहिती संकलन साधने, सांख्यिकी विश्लेषण पध्दती, माहिती संकलन व त्यातील अडचणी, प्रबंधाचा आकृतीबंध इत्यादी संबंधित माहिती दिलेली आहे तसेच मानव विकासांच्या अनुषंगाने विविध संदर्भ साहित्याचा आढावा घेण्यात आलेला आहे.

पाचव्या प्रकरणामध्ये प्रकरणाची रुपरेखा, हिंगोली जिल्ह्यातील महिला साक्षरते संबंधित दुय्यम स्त्रोताकडे उपलब्ध व प्राथमिक स्वरुपात संकलित केलेल्या सांख्यिकी माहितीचे विश्लेषण करण्यात आलेले आहे. तसेच महिला साक्षरतेचे प्रमाण कमी असल्याच्या कारणमीमांसा करण्यात आलेली आहे.

सहाव्या प्रकरणामध्ये प्रकरणाची रुपरेखा, उस्मानाबाद जिल्ह्यातील अर्भक मृत्यू संबंधित दुय्यम स्त्रोताकडे उपलब्ध व प्राथमिक स्वरुपात संकलित केलेल्या सांख्यिकी माहितीचे विश्लेषण करण्यात आलेले आहे. तसेच अर्भक मृत्यू प्रमाण अधिक असल्याच्या कारणमीमांसा करण्यात आलेली आहे.

सातव्या प्रकरणामध्ये प्रकरणाची रुपरेखा, जालना जिल्ह्यातील दरडोई उत्पन्न संबंधित दुय्यम स्त्रोताकडे उपलब्ध व प्राथमिक स्वरुपात संकलित केलेल्या सांख्यिकी माहितीचे विश्लेषण करण्यात आलेले आहे. तसेच दरडोई उत्पन्न कमी असल्याच्या कारणांची मीमांसा करण्यात आलेली आहे.

वरील प्रकरण पाच, सहा व सात मधील माहितीच्या विश्लेषणातून काढलेल्या निष्कर्ष या प्रकरणात मांडलेले आहेत. हे निष्कर्ष संशोधनाची उद्दिष्टये लक्षात घेऊन मांडलेली आहेत.

## ८.३ **निष्कर्ष :**

हिंगोली, उस्मानाबाद व जालना जिल्ह्यातील माहितीच्या विश्लेषणावरुन खालील निष्कर्ष निघतात.

- हिंगोली जिल्ह्यातील एकूण साक्षरता व महिला साक्षरता प्रमाणात २००१ ते २०१० मध्ये अनुक्रमे ९.१८ व १३.५६ टक्के इतकी वाढ झालेली आहे. यावरुन महिला साक्षरतेच्या बदलासंबंधीत मांडलेले उद्दिष्ट साध्य होते.
- हिंगोली जिल्ह्यातील शाळांच्या संख्येमध्ये २००६-०७ हे शैक्षणिक वर्ष वगळता वाढ होत गेली आहे.
- हिंगोली जिल्ह्यातील कळमनुरी तालुक्यामध्ये २००३-०४ पासून २००९-१० पर्यत केवळ १२ शाळांची वाढ झालेली आहे.
- हिंगोली जिल्ह्यातील कळमनुरी तालुक्यामध्ये २००३-०४ पासून २००९-१० पर्यत ३० शाळांची वाढ झालेली आहे.
- हिंगोली जिल्ह्यातील मुलींच्या पटनोंदणीमध्ये २००८-०९ मध्ये लक्षणीय वाढ झालेली आहे.
- औंढा नागनाथ तालुक्यामधील निरक्षर महिलामध्ये विवाहित महिलांचे प्रमाण ७७.७ टक्के असून कळमनुरी तालुक्यात हे प्रमाण ६७.४ टक्के आहे. तर औंढा नागनाथ तालुक्यातील साक्षर महिलांमध्ये विवाहित महिलांचे प्रमाण ३६.६ टक्के व कळमनुरी तालुक्यात हे प्रमाण ४० टक्के आहे.

- औंढा नागनाथ तालुक्यामधील निरक्षर महिलांमध्ये दारिद्र्यरेषेखालील महिलांचे प्रमाण २६.६ टक्के असून कळमनुरी तालुक्यात हे प्रमाण २६.६ टक्के आहे. तर औंढा नागनाथ तालुक्यातील साक्षर महिलांमध्ये दारिद्र्यरेषेखालील महिलांचे प्रमाण ३० टक्के व कळमनुरी तालुक्यात हे प्रमाण ६६.६ टक्के आहे.
- औंढा नागनाथ तालुक्यामधील निरक्षर महिलांमध्ये १८ वर्षापेक्षा कमी वयात विवाह झालेल्या महिलांचे प्रमाण ६२.२ टक्के असून कळमनुरी तालुक्यात हे प्रमाण ३.३ टक्के आहे. तर औंढा नागनाथ तालुक्यातील साक्षर महिलांमध्ये दारिद्र्यरेषेखालील महिलांचे प्रमाण ३२.२ टक्के व कळमनुरी तालुक्यात हे प्रमाण ०.० टक्के आहे.
- औंढा नागनाथ तालुक्यामधील निरक्षर महिलांमध्ये आई साक्षर असलेल्या महिलांचे प्रमाण ३.३ टक्के असून कळमनुरी तालुक्यात हे प्रमाण ४७.७ टक्के आहे. तर औंढा नागनाथ तालुक्यातील साक्षर महिलांमध्ये आई साक्षर असलेल्या महिलांचे प्रमाण ३६.६ टक्के व कळमनुरी तालुक्यात हे प्रमाण ९५.५ टक्के आहे.
- औंढा नागनाथ तालुक्यामधील निरक्षर महिलांमध्ये वडील साक्षर असलेल्या महिलांचे प्रमाण ६.६ टक्के असून कळमनुरी तालुक्यात हे प्रमाण ५० टक्के आहे. तर औंढा नागनाथ तालुक्यातील साक्षर महिलांमध्ये वडील साक्षर असलेल्या महिलांचे प्रमाण ४७.७ टक्के व कळमनुरी तालुक्यात हे प्रमाण ९८.८ टक्के आहे.
- औंढा नागनाथ तालुक्यामधील निरक्षर महिलांमध्ये वडिलांचा व्यवसाय हा शेती व मजुरी असलेल्या महिलांचे प्रमाण ९७.७ टक्के असून कळमनुरी तालुक्यात हे प्रमाण ९७.७ टक्के आहे. तर औंढा नागनाथ

तालुक्यातील साक्षर महिलांमध्ये वडिलांचा व्यवसाय हा शेती व मजुरी असलेल्या महिलांचे प्रमाण ९५.५ टक्के व कळमनुरी तालुक्यात हे प्रमाण ९७.७ टक्के आहे.

- औंढा नागनाथ तालुक्यामधील निरक्षर महिलांमध्ये त्यांचा मोठा भाऊ शिक्षण घेत असलेल्या महिलांचे प्रमाण ३.३ टक्के असून कळमनुरी तालुक्यात हे प्रमाण ८.८ टक्के आहे. तर औंढा नागनाथ तालुक्यातील साक्षर महिलांमध्ये त्यांचा मोठा भाऊ शिक्षण घेत असलेल्या महिलांचे प्रमाण २५.५ टक्के व कळमनुरी तालुक्यात हे प्रमाण ७० टक्के आहे.
- औंढा नागनाथ तालुक्यामधील निरक्षर महिलांमध्ये त्यांची मोठी बहिण शिक्षण घेत असलेल्या महिलांचे प्रमाण १.१ टक्के असून कळमनुरी तालुक्यात हे प्रमाण ४.४ टक्के आहे. तर औंढा नागनाथ तालुक्यातील साक्षर महिलांमध्ये त्यांची मोठी बहिण शिक्षण घेत असलेल्या महिलांचे प्रमाण ६.६ टक्के व कळमनुरी तालुक्यात हे प्रमाण ७१.१ टक्के आहे.
- औंढा नागनाथ तालुक्यामधील निरक्षर महिलांमध्ये त्यांच्या घरापासून ५ किमी पेक्षा जास्त अंतरावर शाळा असलेल्या महिलांचे प्रमाण ५१.१ टक्के असून कळमनुरी तालुक्यात हे प्रमाण ३३.३ टक्के आहे. तर औंढा नागनाथ तालुक्यातील साक्षर महिलांमध्ये त्यांच्या घरापासून ५ किमी पेक्षा जास्त अंतरावर शाळा असलेल्या महिलांचे प्रमाण ७०.१ टक्के व कळमनुरी तालुक्यात हे प्रमाण ६.६ टक्के आहे.
- हिंगोली जिल्ह्यातील महिला साक्षरतेचे प्रमाण कमी असल्याची प्रमुख कारणे –

  अ) शाळेत जाण्यासाठी वाहतुकीची सोय नाही.

  ब) घरची आर्थिक परिस्थिती गंभीर आहे.

क) आईला घरकामात मदत करावी लागते

ड) लहान भावंडाना सांभाळावे लागते.

इ) दुरून पाणी भरावे लागते.

ई) लाकूडफाटा/सरपण गोळा करण्यासाठी जावे लागते.

यावरुन हिंगोली जिल्ह्यातील महिला साक्षरता कमी असल्याच्या कारणांसंबधीचे उद्दिष्ट साध्य होते.

- उस्मानाबाद जिल्ह्यातील अर्भक मृत्यूचे प्रमाण २००८ च्या तुलनेत २००९ मध्ये ४.७१ टक्क्यांनी घटलेली आहे. यावरुन अर्भक मृत्यूदर बदलासंबंधित मांडलेले उद्दिष्ट साध्य होते.
- उस्मानाबाद जिल्ह्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रांची संख्या २००२-०३ ते २००९-१० या कालावधीत स्थिर आहे.
- उस्मानाबाद जिल्ह्यातील आरोग्य उपकेंद्राची संख्या २००९-१० मध्ये केवळ ०२ ने वाढलेली आहे.
- उस्मानाबाद जिल्ह्यातील प्रसुती गृहाची संख्या २००८-०९ मध्ये २३४ ने वाढलेली आहे.
- उस्मानाबाद जिल्ह्यातील संस्थात्मक प्रसुतीचे प्रमाण वाढलेले असून २००६ मध्ये ५५.६५ टक्यावरुन २००९ मध्ये ८६.४७ टक्क्यापर्यत पोहोचलेले आहे.
- उस्मानाबाद जिल्ह्यातील ॲनिमियाक मुलींचे प्रमाण ४४.४५ टक्के आहे.
- वाशी तालुक्यामधील संस्थात्मक प्रसुती झालेल्या महिलांमध्ये साक्षर असलेल्या महिलांचे प्रमाण ९७.७८ टक्के असून उस्मानाबाद तालुक्यात हे प्रमाण ९८.८९ टक्के आहे. तर वाशी तालुक्यातील घरी प्रसुती

झालेल्या महिलांमध्ये साक्षर असलेल्या महिलांचे प्रमाण ८८.८९ टक्के असून उस्मानाबाद तालुक्यात हे प्रमाण ८३.३३ टक्के आहे.

- वाशी तालुक्यामधील संस्थात्मक प्रसुती झालेल्या महिलांमध्ये त्यांचा पती साक्षर असलेल्या महिलांचे प्रमाण १०० टक्के असून उस्मानाबाद तालुक्यात हे प्रमाण ९८.८९ टक्के आहे. तर, वाशी तालुक्यातील घरी प्रसुती झालेल्या महिलांमध्ये त्यांचा पती साक्षर असलेल्या महिलांचे प्रमाण ९२.२२ टक्के असून उस्मानाबाद तालुक्यात हे प्रमाण ८५.५६ टक्के आहे.
- वाशी तालुक्यामधील संस्थात्मक प्रसुती झालेल्या महिलांमध्ये त्यांचे सासरे साक्षर असलेल्या महिलांचे प्रमाण ३१.११ टक्के असून उस्मानाबाद तालुक्यात हे प्रमाण २० टक्के आहे. तर वाशी तालुक्यातील घरी प्रसुती झालेल्या महिलांमध्ये त्यांचे सासरे साक्षर असलेल्या महिलांचे प्रमाण ३२.२२ टक्के असून उस्मानाबाद तालुक्यात हे प्रमाण ११.११ टक्के आहे.
- वाशी तालुक्यामधील संस्थात्मक प्रसुती झालेल्या महिलांमध्ये दारिद्र्यरेषेखाली असलेल्या महिलांचे प्रमाण ३० टक्के असून उस्मानाबाद तालुक्यात हे प्रमाण ३३.३३ टक्के आहे. तर वाशी तालुक्यातील घरी प्रसुती झालेल्या महिलांमध्ये दारिद्र्यरेषेखाली असलेल्या महिलांचे प्रमाण ३१.११ टक्के असून उस्मानाबाद तालुक्यात हे प्रमाण ४१.११ टक्के आहे.
- वाशी तालुक्यामधील संस्थात्मक प्रसुती झालेल्या महिलांमध्ये १८ वर्षापेक्षा कमी वयात विवाह झालेल्या महिलांचे प्रमाण १४.४४ टक्के असून उस्मानाबाद तालुक्यात हे प्रमाण ८.८९ टक्के आहे. तर वाशी

तालुक्यातील घरी प्रसुती झालेल्या महिलांमध्ये १८ वर्षापेक्षा कमी वयात विवाह झालेल्या महिलांचे प्रमाण १६.६७ टक्के असून उस्मानाबाद तालुक्यात हे प्रमाण १२.२२ टक्के आहे.

- वाशी तालुक्यामधील संस्थात्मक प्रसुती झालेल्या महिलांमध्ये ज्यांच्या घरापासून शासकीय आरोग्य सुविधा ५ किमी अंतरापेक्षा जास्त आहेत अशा महिलांचे प्रमाण ६५.५६ टक्के असून उस्मानाबाद तालुक्यात हे प्रमाण ७६.६७ टक्के आहे. तर वाशी तालुक्यातील घरी प्रसुती झालेल्या महिलांमध्ये ज्यांच्या घरापासून शासकीय आरोग्य सुविधा ५ किमी अंतरापेक्षा जास्त आहेत अशा महिलांचे प्रमाण ६६.६७ टक्के असून उस्मानाबाद तालुक्यात हे प्रमाण ८३.३३ टक्के आहे.
- वाशी तालुक्यामधील संस्थात्मक प्रसुती झालेल्या महिलांमध्ये प्रसुतीपूर्व तपासणी केलेल्या महिलांचे प्रमाण ९६.६७ टक्के असून उस्मानाबाद तालुक्यात हे प्रमाण ९८.८९ टक्के आहे. तर वाशी तालुक्यातील घरी प्रसुती झालेल्या महिलांमध्ये प्रसुतीपूर्व तपासणी केलेल्या महिलांचे प्रमाण ८२.२२ टक्के असून उस्मानाबाद तालुक्यात हे प्रमाण ६३.३३ टक्के आहे.
- वाशी तालुक्यामधील संस्थात्मक प्रसुती झालेल्या महिलांमध्ये बाळाचा उपजत मृत्यू झालेल्या महिलांचे प्रमाण २.२२ टक्के असून उस्मानाबाद तालुक्यात हे प्रमाण ३.३३ टक्के आहे. तर, वाशी तालुक्यातील घरी प्रसुती झालेल्या महिलांमध्ये बाळाचा उपजत मृत्यू झालेल्या महिलांचे प्रमाण २.२२ टक्के असून उस्मानाबाद तालुक्यात हे प्रमाण २.२२ टक्के आहे.

- वाशी तालुक्यामधील संस्थात्मक प्रसुती झालेल्या महिलांमध्ये अर्भक मृत्यू झालेल्या महिलांचे प्रमाण ०.० टक्के असून उस्मानाबाद तालुक्यात हे प्रमाण २.२२ टक्के आहे. तर, वाशी तालुक्यातील घरी प्रसुती झालेल्या महिलांमध्ये अर्भक मृत्यू झालेल्या महिलांचे प्रमाण ५.५६ टक्के असून उस्मानाबाद तालुक्यात हे प्रमाण २.२२ टक्के आहे.

- उस्मानाबाद जिल्ह्यातील अर्भक मृत्यूचे प्रमाण अधिक असण्याचे प्रमुख कारण -

  अ) प्रसुतीसाठीचा (सिझर) खर्च जास्त आहे.

  ब) महिलांच्या निर्णय क्षमतेचा अभाव आहे.

  क) स्त्री डॉक्टर्स उपलब्ध नाहीत.

  ड) आरोग्य केंद्रात प्रसुतीची व्यवस्था नाही.

  इ) आरोग्य केंद्रात आवश्यक त्या वेळेत डॉक्टर्स व नर्स उपलब्ध नाहीत.

  ई) आरोग्य केंद्रात डॉक्टर्स व नर्स यांच्याकडून मिळणारी वागणूक व असहकार्याची भावना आहे.

  उ) आरोग्य केंद्रातील डॉक्टर्स व नर्स यांच्यावर कमी विश्वास आहे.

यावरुन उस्मानाबाद जिल्ह्यातील अर्भक मृत्यू संबंधित कारणांसंबधीचे उद्दिष्ट साध्य होते.

- जालना जिल्ह्यातील दरडोई उत्पन्नात २००५-०६ ते २००९-१० या कालावधीत वाढ झालेली असून सन २००९-१० मध्ये ५,४४,९९५ इतकी वाढ झालेली आहे. यावरुन दरडोई उत्पन्नाच्या बदलासंबंधित मांडलेले उद्दिष्ट साध्य होते.

- जालना जिल्ह्यातील चालू कारखान्याची स्थिती २००५-०६ ते २००९-१० या कालावधीत स्थिर आहे.

- जालना जिल्ह्यातील दारिद्र्यरेषेखालील कुटुंबाच्या संख्येत वाढ झालेली असून २००८-०९ मध्ये ३५,३९१ इतक्या कुटुंबाची वाढ झालेली आहे.
- जालना जिल्ह्यामध्ये शेतकरी व शेतमजूरी करणाऱ्या कामगारांचे प्रमाण सर्वाधिक असून त्यामध्ये ५५७०९० इतके कामगार काम करतात.
- जालना जिल्ह्यातील जालना तालुक्यामध्ये २००९-१० मध्ये सर्वाधिक औद्योगिक प्रकल्प संख्या असून भोकरदन व बदनापूर तालुक्यामध्ये अनुक्रमे ३४ व २८ औद्योगिक प्रकल्प आहेत.
- जालना जिल्ह्यामध्ये २००९-१० च्या तुलनेत २०१०-११ मध्ये रोजगार हमी योजने अंतर्गत मागणी केलेल्या कुटुंबापैकी रोजगार उपलब्ध करुन देण्याचे प्रमाण ४.०९ टक्क्यांनी घटलेले आहे.
- जालना जिल्ह्यातील ओलिताखालील जमीनीचे क्षेत्र २००५-०६ च्या तुलनेत २००६-०७ मध्ये १०.११ टक्यांनी घटलेले असून २००९-१० पर्यत ते स्थिर आहे.
- भोकरदन तालुक्यामधील दारिद्र्यरेषेखालील कुटुंबामध्ये कमावत्या सदस्यांचे प्रमाण ३४.५९ टक्के असून बदनापूर तालुक्यात हे प्रमाण ३२.३८ टक्के आहे. तर भोकरदन तालुक्यातील दारिद्र्यरेषेवरील कुटुंबामध्ये कमावत्या सदस्यांचे प्रमाण ३५.२० टक्के असून बदनापूर तालुक्यात हे प्रमाण ३९.२७ टक्के आहे.
- भोकरदन तालुक्यामधील दारिद्र्यरेषेखालील कुटुंबामध्ये प्राथमिक व्यवसाय गुंतलेल्या कुटुंबाचे प्रमाण १०० टक्के असून बदनापूर तालुक्यात हे प्रमाण ७२.६३ टक्के आहे. तर, भोकरदन तालुक्यातील

दारिद्र्यरेषेवरील कुटुंबामध्ये प्राथमिक व्यवसाय गुंतलेल्या कुटुंबाचे प्रमाण १०० टक्के असून बदनापूर तालुक्यात हे प्रमाण ६९.४७ टक्के आहे.

- भोकरदन तालुक्यामधील दारिद्र्यरेषेखालील कुटुंबामध्ये कोरडवाहू शेती असलेल्या कुटुंबाचे प्रमाण ९६.८४ टक्के असून बदनापूर तालुक्यात हे प्रमाण ४७.३७ टक्के आहे. तर, भोकरदन तालुक्यातील दारिद्र्यरेषेवरील कुटुंबामध्ये कोरडवाहू शेती असलेल्या कुटुंबाचे प्रमाण ९३.६८ टक्के असून बदनापूर तालुक्यात हे प्रमाण ५२.६३ टक्के आहे.
- भोकरदन तालुक्यामधील दारिद्र्यरेषेखालील कुटुंबामध्ये बागायती शेती असलेल्या कुटुंबाचे प्रमाण २.११ टक्के असून बदनापूर तालुक्यात हे प्रमाण १४.७४ टक्के आहे. तर, भोकरदन तालुक्यातील दारिद्र्यरेषेवरील कुटुंबामध्ये बागायती शेती असलेल्या कुटुंबाचे प्रमाण ५.२६ टक्के असून बदनापूर तालुक्यात हे प्रमाण ३७.८९ टक्के आहे.
- भोकरदन तालुक्यामधील दारिद्र्यरेषेखालील कुटुंबामध्ये शेतीमालास योग्य बाजारभाव मिळत नसलेल्या कुटुंबाचे प्रमाण ५७.८९ टक्के असून बदनापूर तालुक्यात हे प्रमाण ५७.८९ टक्के आहे. तर, भोकरदन तालुक्यातील दारिद्र्यरेषेवरील कुटुंबामध्ये शेतीमालास योग्य बाजारभाव मिळत नसलेल्या कुटुंबाचे प्रमाण ७५.७९ टक्के असून बदनापूर तालुक्यात हे प्रमाण ७४.७३ टक्के आहे.
- भोकरदन तालुक्यामधील दारिद्र्यरेषेखालील कुटुंबामध्ये उदरनिर्वाहासाठी खर्च होऊन अधिकचे उत्पन्न मिळत नसलेल्या कुटुंबाचे प्रमाण ८७.३७ टक्के असून बदनापूर तालुक्यात हे प्रमाण ७२.६३ टक्के आहे. तर, भोकरदन तालुक्यातील दारिद्र्यरेषेवरील कुटुंबामध्ये उदरनिर्वाहासाठी

खर्च होऊन अधिकचे उत्पन्न मिळत नसलेल्या कुटुंबाचे प्रमाण ८६.३२ टक्के असून बदनापूर तालुक्यात हे प्रमाण ५३.६८ टक्के आहे.

- भोकरदन तालुक्यामधील दारिद्र्यरेषेखालील कुटुंबामध्ये रोजगार हमी योजनेचा लाभ घेतल्यामुळे कुटुंबाच्या उत्पन्नात वाढ झालेल्या कुटुंबाचे प्रमाण ३१.५८ टक्के असून बदनापूर तालुक्यात हे प्रमाण २.१० टक्के आहे. तर, भोकरदन तालुक्यातील दारिद्र्यरेषेवरील कुटुंबामध्ये रोजगार हमी योजनेचा लाभ घेतल्यामुळे कुटुंबाच्या उत्पन्नात वाढ झालेल्या कुटुंबाचे प्रमाण ४४.२१ टक्के असून बदनापूर तालुक्यात हे प्रमाण ८.४२ टक्के आहे.

- जालना जिल्ह्यातील दरडोई उत्पन्न कमी असल्याचे प्रमुख कारण –

  अ) कृषि क्षेत्रातील उत्पादकता कमी आहे.

  ब) कृषि क्षेत्रातील उत्पन्नापेक्षा त्यावरील खर्च जास्त आहे.

  क) हंगामी शेती (पावसावर अवलंबून असलेली शेती) आहे.

  ड) व्यापारविषयक सोयीचा अभाव आहे.

  इ) शेतमालास योग्य बाजारभाव नाही.

  ई) सिंचनाच्या सोयीची कमतरता आहे.

यावरुन जालना जिल्ह्यातील दरडोई उत्पन्न कमी असल्याच्या कारणांसंबधीचे उद्दिष्ट साध्य होते.

## ८.४ गृहितकृत्याची पडताळणी :

संशोधकाने संशोधन अभ्यास करताना विचारात घेतलेल्या गृहितकाची पडताळणी केली आहे. त्याचे सविस्तर विवेचन खालील प्रमाणे करण्यात आलेले आहे. तर गृहितकांच्या संख्याशास्त्रीय परिगणना परिशिष्ट 'अ' मध्ये दिलेली आहे.

**८.४.१ गृहितक क्र. १.** हिंगोली जिल्ह्यातील महिला साक्षरतेचे प्रमाण कमी असल्याच्या कारणांची मीमांसा करताना संशोधकाने विचारात घेतलेले गृहितकाच्या पडताळणीचे स्पष्टीकरण खालील प्रमाणे आहे.

- **गृहितकः** हिंगोली जिल्ह्यात महिला साक्षरता प्रमाण कमी आहे कारण, मुलींना शाळेत जाण्यासाठी घराच्या जवळ शाळा उपलब्ध नाही.
- **संशोधन प्रश्नः** महिला साक्षरता प्रमाण कमी असणे व त्यांच्या घराजवळ शाळा उपलब्ध नसणे यांच्यात लक्षणीय संबंध आहे काय?
- **शून्य गृहितकः** महिला साक्षरता कमी असण्याचा व त्यांच्या घराच्या जवळ शाळा उपलब्ध नसणे यांच्यात लक्षणीय संबंध नाही.
- **पर्यायी गृहितकः** महिला साक्षरता कमी असण्याचा व त्यांच्या घराच्या जवळ शाळा उपलब्ध नसणे यांच्यात लक्षणीय संबंध आहे.
- **स्पष्टीकरणः** काय वर्ग चाचणीच्या (chi-square test) सहाय्याने महिला साक्षरता प्रमाण कमी असणे व त्यांच्या घराजवळ शाळा उपलब्ध नसणे यांच्यातील लक्षणीय संबंधाची तपासणी केल्यानंतर असे स्पष्ट होते की, काय वर्ग सांख्यिकी ($\chi^2$) मूल्य हे ($t_{cal}$ =(d.f=3) =16.03 p=0.001) पी मूल्यापेक्षा मोठे असल्यामुळे शून्य गृहितक स्विकारता येत नाही. म्हणजे महिला साक्षरता कमी असणे व महिलांच्या घराजवळ शाळा उपलब्ध नसणे यात लक्षणीय संबंध आहे. थोडक्यात आलेला निष्कर्ष हा योगायोगाने आलेला नसून तो खरा आहे.

८.४.२. **गृहितक क्र. २.** उस्मानाबाद जिल्ह्यातील अर्भकमृत्यूचे प्रमाण अधिक असल्याच्या कारणमीमांसा करताना संशोधकाने विचारात घेतलेले गृहितकाच्या पडताळणीचे स्पष्टीकरण खालील प्रमाणे आहे.

- **गृहितकः** उस्मानाबाद जिल्ह्यात अर्भकमृत्यूचे प्रमाण जास्त आहे कारण, येथे संस्थात्मक प्रसुतीचे प्रमाण कमी आहे.
- **संशोधन प्रश्नः** उस्मानाबाद जिल्ह्यातील अर्भकमृत्यूचे प्रमाण जास्त असण्याचे व संस्थात्मक प्रसुतीचे प्रमाण कमी यांच्यात लक्षणीय संबंध आहे काय?
- **शून्य गृहितकः** अर्भकमृत्यूचे प्रमाण जास्त असण्याचा व संस्थात्मक प्रसुतीचे प्रमाण कमी असणे यांच्यात लक्षणीय संबंध नाही.
- **पर्यायी गृहितकः** अर्भकमृत्यूचे प्रमाण जास्त असण्याचा व संस्थात्मक प्रसुतीचे प्रमाण कमी असणे यांच्यात लक्षणीय संबंध आहे.
- **स्पष्टीकरणः** काय वर्ग चाचणीच्या (chi-square test) सहाय्याने अर्भकमृत्यूचे प्रमाण जास्त असणे व संस्थात्मक प्रसुतीचे प्रमाण कमी असणे यांच्यातील लक्षणीय संबंधाची तपासणी केल्यानंतर असे स्पष्ट होते की, काय वर्ग सांख्यिकी ($\chi^2$) मूल्य हे ($t_{cal}$ =(d.f=3) =222.42 p=0.000) पी मूल्यापेक्षा मोठी असल्यामुळे शून्य गृहितक स्विकारता येत नाही. उस्मानाबाद जिल्ह्यातील अर्भकमृत्यूचे प्रमाण जास्त असण्याचे व संस्थात्मक प्रसुतीचे प्रमाण कमी असणे यांच्यात लक्षणीय संबंध आहे. थोडक्यात आलेला निष्कर्ष हा योगायोगाने आलेला नसून तो खरा आहे.

८.४.३. **गृहितक क्र. ३.** जालना जिल्ह्यातील दरडोई उत्पन्न कमी असल्याच्या कारणांची मीमांसा करताना संशोधकाने विचारात घेतलेले गृहितकाच्या पडताळणीचे स्पष्टीकरण खालील प्रमाणे आहे.

- **गृहितकः** जालना जिल्ह्यात दरडोई उत्पन्नाचे प्रमाण कमी आहे कारण, या जिल्ह्यात दुय्यम व तृतीय व्यवसायात गुंतलेल्या कुटुंबांचे प्रमाण प्राथमिक व्यवसाय गुंतलेल्या कुटुंबांच्या तुलनेत कमी आहे.
- **संशोधन प्रश्नः** जालना जिल्ह्यात दरडोई उत्पन्नाचे प्रमाण कमी असणे व जिल्ह्यात दुय्यम व तृतीय व्यवसायात गुंतलेल्या कुटुंबांचे प्रमाण प्राथमिक व्यवसाय गुंतलेल्या कुटुंबांच्या तुलनेत कमी असणे यांच्यात लक्षणीय संबंध आहे काय?
- **शून्य गृहितकः** जिल्ह्यात दरडोई उत्पन्नाचे प्रमाण कमी असणे व जिल्ह्यात दुय्यम व तृतीय व्यवसायात गुंतलेल्या कुटूंबांचे प्रमाण प्राथमिक व्यवसाय गुंतलेल्या कुटूंबांच्या तुलनेत कमी असणे यात लक्षणीय संबंध नाही.
- **पर्यायी गृहितकः** जिल्ह्यात दरडोई उत्पन्नाचे प्रमाण कमी असणे व जिल्ह्यात दुय्यम व तृतीय व्यवसायात गुंतलेल्या कुटुंबांचे प्रमाण प्राथमिक व्यवसाय गुंतलेल्या कुटुंबांच्या तुलनेत कमी असणे यात लक्षणीय संबंध आहे.
- **स्पष्टीकरणः** काय वर्ग चाचणीच्या (chi-square test) सहाय्याने जिल्ह्यात दरडोई उत्पन्नाचे प्रमाण कमी आहे व जिल्ह्यातील दुय्यम व तृतीय व्यवसायात गुंतलेल्या कुटुंबांचे प्रमाण प्राथमिक व्यवसाय गुंतलेल्या कुटुंबांच्या तुलनेत कमी असणे यांच्यातील लक्षणीय संबंधाची तपासणी केल्यानंतर असे स्पष्ट होते की, काय वर्ग सांख्यिकी ($\chi^2$) मूल्य हे ($t_{cal}$ =(d.f=3) =0.19 p=0.979) पी मूल्यापेक्षा लहान असल्यामुळे शून्य गृहितक स्विकारता येते. दरडोई उत्पन्नाचे प्रमाण कमी आहे व जिल्ह्यातील दुय्यम व तृतीय व्यवसायात गुंतलेल्या कुटुंबांचे प्रमाण प्राथमिक व्यवसाय गुंतलेल्या कुटुंबांच्या तुलनेत कमी असणे यांच्यात

लक्षणीय संबंध नाही. थोडक्यात आलेला निष्कर्ष हा योगायोगाने आलेला असून तो खरा नाही असे म्हणावे लागेल.

## ८.५ शिफारशी :

हिंगोली, उस्मानाबाद व जालना जिल्ह्यातील अभ्यासातील निष्कर्षाच्या अनुषंगाने मराठवाड्यातील मानव विकास निर्देशांक उंचावण्यासाठी खालील शिफारशी सुचविण्यात आलेल्या आहेत.

- **विविध विभागातर्फे राबविण्यात येणाऱ्या योजनांची प्रभावी अमंलजावणी व लोकजनजागृती** :- महाराष्ट्र शासनाच्या शिक्षण, आरोग्य, कृषि, सहकार, नियोजन इ. विभागामार्फत समाजहिताच्या व संबंधित क्षेत्रामध्ये सकारात्मक सुधारणा करण्यासाठी विविध योजना उदा. मोफत शिक्षण, उपस्थिती भत्ता, शालेय पोषण आहार, मोफत पुस्तके, मोफत गणवेश, बुडीत मजूरी, प्रसुतीपूर्व तपासणी शिबिरे, राजीव गांधी जीवनदायी योजना, किशोरी मुलींचे आरोग्य तपासणी, परसबाग, बेरोजगारांना औद्योगिक प्रशिक्षण, बागायती शेतीस अनुदान इ. कोट्यावधी रुपये खर्च करुन योजना राबविण्यात येतात. परंतु याचा अपेक्षित परिणाम दिसून येत नाही. त्यामुळे अशा योजनांची प्रभावी अमंलबजावणी करण्यासाठी शासन स्तरावरुन प्रयत्न होणे गरजेचे आहे. तसेच अशा योजनेची माहिती लाभार्थींना व सामान्य नागरिकांना साध्या व सोप्या भाषेत करुन देण्यात यावी.
- **ग्रामपंचायत व शाळांना विशेष पुरस्कार :-** ग्रामस्तरावर १०० टक्के मुलींची पटनोंदणी करुन त्यांना शाळेत टिकविण्यासाठी प्रयत्न करणाऱ्या गावांना व शाळांना जिल्हा, विभाग व राज्य अशा स्तरावर विशेष

पुरस्कारांने सन्मानित करण्यात यावे. ज्यामुळे ग्रामपंचायती व शाळांना प्रोत्साहन मिळण्यास मदत होईल.

- **मोफत व सुरक्षित बससेवा** :- ग्रामीण व शहरी भागातील मुलींच्या सुरक्षिततेचा व आर्थिक बाब विचारात घेता बहुतांश पालक मुलींना शाळेत पाठवत नाहीत. यासाठी शासनातर्फे मोफत व सुरक्षित बससेवा सुरु करावी.
- **प्रोत्साहनपर वातावरणाची निर्मिती** :- शाळेत येण्यासाठी मुलींना प्रवृत्त करण्यासाठी शाळेत प्रोत्साहनपर वातावरणाची निर्मिती करणे गरजेचे आहे. मुलींचा आत्मविश्वास वाढविण्यासाठी शाळेत विविध गुणदर्शन कार्यक्रमात त्यांना सहभागी करुन घेणे, व्यासपीठ उपलब्ध करुन देणे, निर्णय प्रक्रियेत सहभागी करुन घेणे, लहान निवडणूकामध्ये सहभागी करुन घेणे अशा बाबी करण्यात याव्यात. मुलींच्या सृजनशीलतेस वाव मिळवून देण्यासाठी विज्ञान व गणित विषयातील विविध स्पर्धा, उदाः आविष्कार स्पर्धा इ. अशा प्रकारच्या स्पर्धामध्ये त्यांचा सहभाग वाढविण्यासाठी प्रयत्न करण्यात यावेत.
- **शाळास्तरावर किशोरी समस्या निवारण मंचाची स्थापना** :- किशोरावस्थेतील मुली त्यांच्या समस्या इतरांजवळ बोलत नाहीत, त्यामुळे त्याचा आत्मविश्वास कमी होत जातो. कालांतराने त्या शाळेपासून दूर जाऊ लागतात. ही बाब घडू नये यासाठी त्यांना विश्वासात घेणे आवश्यक आहे. मुलींच्या समस्या वेळीच जाणून घेऊन त्यावर उपयायोजन करण्यासाठी शाळा स्तरावर शिक्षिकेच्या अध्यक्षतेखाली शाळेतील मुलींच्या सहभागातून किशोरी समस्या निवारण मंचाची स्थापना करावी.

- **स्वच्छ आणि शुध्द पाणीपुरवठा** :- गावांत स्वच्छ व शुध्द पाण्याचा पुरवठा होत नसल्यामुळे मुलींचा बहुतांश वेळ पाणी भरण्याठीच जातो. तसेच अशुध्द पाण्यामुळे घरात आरोग्यासंबंधित प्रश्न निर्माण होतात. या बाबी विचारात घेता गावामध्ये जलस्वराज्य योजनेच्या अतर्गत सर्वांना स्वच्छ आणि शुध्द पाण्याचा पुरवठा करण्यात यावा.
- **प्राथमिक आरोग्य केंद्राचे सक्षमीकरण** :- प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये प्रसुतीची योग्य व्यवस्था न होणे, औषधांचा तुटवडा, तज्ज्ञ डॉक्टर्सचा अभाव इ. मुळे बहुतांश महिला खाजगी दवाखान्यात दाखल होतात. खाजगी दवाखान्यात प्रसुतीसंबंधी भीती घालून सिझर करण्यास भाग पाडण्यात येते व त्यातून जास्तीत जास्त पैसा उकळण्यात येतो. या अवाजवी व खर्चिक बाबीमुळे महिला प्रसुतीसाठी दवाखान्यात जात नाहीत. सबब प्राथमिक आरोग्य केंद्रातील प्रसुती सुविधा सर्वच अंगांनी सक्षम करणे आवश्यक आहे. यासोबतच लोकसंख्येच्या प्रमाणात जिल्ह्यात प्राथमिक आरोग्य केंद्र वाढविणे गरजेचे आहे.
- **डॉक्टर्स व नर्स यांना विशेष प्रशिक्षण** :- प्राथमिक आरोग्य केंद्रातील डॉक्टर्स व नर्स यांना रुग्णासंबंधित आत्मियता निर्माण करणे, कामातील कार्यक्षमता व कौशल्य विकसित करणे इ. बाबी गरजेच्या आहेत. यासाठी सक्षम व अद्ययावत प्रशिक्षण संस्थेतर्फे वर्षातून सहा ते आठ दिवसाचे विशेष प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यात यावेत.
- **महिला डॉक्टर्स यांची विशेष भरती मोहिम** :- महाराष्ट्रामध्ये तज्ञ महिला डॉक्टर्सची संख्या कमी आहे. ज्या काही महिला डॉक्टर्स आहेत त्या ग्रामीण भागात राहून नोकरी करण्यास तयार नसतात. जिल्ह्यातील ग्रामिण भागातील अनेक गरजू मुलीं आर्थिक अडचणीमुळे इच्छा असून

देखील वैद्यकीय शिक्षण घेऊ शकत नाहीत. अशा गरजू मुलींनी ग्रामीण भागात सेवा देण्याच्या अटीवर त्यांच्या वैद्यकीय शिक्षणाच्या खर्चाची जबाबदारी शासनाने घ्यावी. शिक्षण पूर्ण झाल्यानंतर त्यांना ग्रामीण भागात वैद्यकीय सेवा पुरविण्यासाठी नियुक्त करावे. अशा प्रकारे महिला डॉक्टर्स यांची विशेष भरती मोहिमेतून मोठ्या प्रमाणात तज्ञ महिला डॉक्टर्सची भरती करता येईल.

- **शेती क्षेत्रातील संशोधनास चालना देणे** :- शेती क्षेत्रातील उत्पादकता वाढविण्याच्या दृष्टीने शेती क्षेत्रामध्ये स्थानिक समस्या विचारात घेऊन नवनवीन व उपयुक्त असे संशोधन होणे आवश्यक आहे. यासाठी शासनाने प्रत्येक तालुकास्तरावर स्वतंत्र 'कृषी संशोधन केंद्राची' स्थापना करावी. या संशोधन केंद्रामध्ये स्थानिक शेतीची उत्पादन क्षमता वाढीसाठी संशोधने व्हावीत. ही संशोधने साध्या व सोप्या भाषेत शेतकऱ्यांपर्यंत पोहचविण्यात यावे.
- **शेतमाल खरेदीची कायमस्वरुपी केंद्रे** :- शेतीचा खर्च जास्त व उत्पादनाची किंमत कमी अशी स्थिती असल्यामुळे शेतकऱ्यांस कोणत्याही प्रकारे आर्थिक नफा होत नाही. यासाठी मालाच्या उत्पादन खर्चावर भाव मिळाल्यास शेती व शेतकऱ्यांच्या विकासास वाव मिळेल. यासोबतच शेतमालास किफायतशीर हमी भाव मिळण्यासाठी तालुकास्तरावर कायमस्वरुपी खरेदी केंद्रे स्थापन करावीत.
- **सिंचन क्षमतेमध्ये वाढ** :- सिंचनाशिवाय शेती ही फायद्यामध्ये येऊ शकत नाही. शेतकऱ्यांच्या विकासासाठी सिंचन क्षेत्रामध्ये वाढ होणे आवश्यक आहे. यासाठी जिल्ह्यातील लघु, मध्यम व मोठी धरणे उभारण्याकडे लक्ष देणे गरजेचे आहे. या धरणांच्या मदतीने पाण्यांचा थेंब ना थेंब

अडविल्यास तसेच त्याचे यॊग्य नियॊजन केल्यास सिंचन क्षमतेत वाढ हॊऊन शेतकऱ्यांची स्थिती सुधारण्यास मदत हॊईल.

- **कृषी प्रक्रिया उद्यॊगास चालना द्यावी** :- स्थानिक ठिकाणी उत्पादित हॊणाऱ्या शेती मालावर प्रक्रिया करणारे लहान-लहान प्रक्रिया उद्यॊग उभारण्यासाठी प्रॊत्साहन देण्यात यावे. तसेच या उद्यॊगातून उत्पादित हॊणाऱ्या मालास शासनाने बाजारपेठ उपलब्ध करुन द्यावी. यासॊबतच कृषि उत्पादन व मॊठे उद्यॊग यांच्या यॊग्य समन्वय साधल्यास कृषि प्रक्रिया उद्यॊगाना चालना मिळेल. व राज्यातील उद्यॊगाचे विकेंद्रीकरण करण्यासाठी मदत हॊईल.

तात्पर्य, मराठवाड्याचा मानव विकास निर्देशांक वाढविण्याच्या अनुषंगाने वरील शिफारशीचा विचार करणे आवश्यक आहे. असे प्रयत्न झाले तर मराठवाड्याचा तसेच महाराष्ट्राचा मानव विकास निर्देशांक वाढण्यास निश्चित मदत हॊईल असे म्हटले तर यात मुळीच वावगे ठरणार नाही.

***

# संदर्भ

## ❖ ग्रंथ :


- आगलावे प्रदीप (२०१०), 'सामाजिक संशोधन पध्दतीशास्त्र व तंत्रे', तिसरी आवृत्ती, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर.
- कटारे अनिल व नागराळे एन. एन. (१९९९), 'मराठवाड्याचा इतिहास', प्रथमावृत्ती, कल्पना प्रकाशन, नांदेड.
- कुंभोजकर जी.व्ही. (१९८२), 'संशोधन पध्दती व संख्याशास्त्र', प्रथमावृत्ती, एम.व्ही. फडके ॲन्ड कंपणी, कोल्हापूर.
- सोळुंके आर.एस. व जिभकाटे बी. एल.(२००६), 'अर्थशास्त्र', प्रथमावृत्ती, हिमालय पब्लिशिंग हाऊस, मुंबई.
- पाटील जे. एफ. (२०१०), 'सुर्वणमहोत्सवी महाराष्ट्राची बदलती अर्थव्यवस्था', प्रथमावृत्ती, सकाळ प्रकाशन, पुणे.
- भांडवलकर एस.एस. व हनवते यु.एस. (१९९९), 'मराठवाड्याचा इतिहास', प्रथमावृत्ती, अभिजित प्रकाशन, लातूर.
- वेंगुर्लेकर योगिनी , धायगुडे एम.जी., लिमये दत्ता, राजमाचीकर अनुजा,(२००६) 'नरेद्र अर्थशास्त्र', प्रथमावृत्ती, नरेंद्र प्रकाशन, पुणे.
- Bhardwaj Aparna & Thakur Anil Kumar (2012), 'Amrtya Sen and Human Development Poverty, Gender Disparity, Ethics', First dition, The Indian Economics Association, Deep & Deep Publication Pvt. Ltd., New Delhi
- Fukuda-Parr Sakiko & Shiva Kumar A.K. (2009), 'Handbook of Human Development concepts, Measures and Policies', First edition, Oxford University Press, New Delhi.
- Kar Sandip, Robert Michale, Ali Ershad (2013), 'Human Development in the New Millennium', First edition , Gegal Publication, New Delhi.
- Roy Hiranmoy, (2009), 'Human Development Scenario', First edition, Serials Publications, New Delhi.

- Rao Hanumantra K., Shrinivas S.P, (2012), 'Research Methodology Techniques and Applications', First edition, Discovery Publishing House Pvt. Ltd, New Delhi.

- Sengupta Keya (2011), 'Human Development multi dimensional approach to human well being Concept', First edition, Publishing Company PVT. LTD, New Delhi.

- Thakur Bevendra (1997), 'Research Methodology in Social Sciences', First edition, Deep and Deep Publishing House, New Delhi.

- Wilkinsin & Bhandarkar (1990), 'Methodology and Techniques of Social Research', First edition, Himalaya Publishing House, Bombay.


## ❖ **अहवाल :**


- महाराष्ट्र शासन (२००३ ते २०११), 'जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन जिल्हा हिंगोली' सन २००२-०३ ते २०१०-११, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई.

- महाराष्ट्र शासन (२००३ ते २०११), 'जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन जिल्हा उस्मानाबाद' सन २००२-०३ ते २०१०-११, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई.

- महाराष्ट्र शासन (२००३ ते २०११), 'जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन जिल्हा जालना' सन २००२-०३ ते २०१०-११, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई.

- महाराष्ट्र शासन (२००४ ते २०१०), 'महाराष्ट्राची आर्थिक पाहणी' २००४ ते २०१०, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई.

- महाराष्ट्र शासन (२००४ ते २०१०), 'महाराष्ट्राची संक्षिप्त सांख्यिकी' सन २००४ ते २०१०, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई.

- महाराष्ट्र शासन (२०११), ‘मानव विकास मिशन शिबिर अहवाल’, २००९ ते २०११, जिल्हा आरोग्य विभाग, जिल्हा उस्मानाबाद.

- मुटाटकर रा.के. (२००४), ‘महाराष्ट्र मानव विकास कृती संशोधन अभ्यास : नंदूरबार जिल्ह्यातील आरोग्य व्यवस्था आणि आधारभूत शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण’, इंदिरा गांधी विकास संशोधन संस्था, मुंबई.

- Center for Women and Children (2010), ‘Research Abstracts on Education 1998-2009’, Center for Women and Children, National Institute of Public Cooperation and Child Development, New Delhi.

- Government of Andhra Pradesh (2007), ‘Human Development Report 2007 Andhra Pradesh’, Centre for Economic and Social Studies, Hyderabad

- Government of Arunachal Pradesh (2005), ‘Arunachal Pradesh Human Development Report 2005’, Department of Planning, Government of Arunachal Pradesh, Itanagar

- Government of Assam (2003), ‘Assam Human Development Report 2003’, Planning & Development Department, Government of Assam, Guwahati.

- Government of Chhattisgarh (2005), ‘Chhattisgarh Human Development Report 2005’. Chhattisgarh

- Government of Gujarat (2004), ‘Gujarat Human Development Report 2004’, Mahatma Gandhi Labour Institute, Ahmedabad

- Government of Himachal Pradesh (2002), ‘Himachal Pradesh Human Development Report 2002’, Himachal Pradesh.

- Government of India (2002), ‘National Human Development Report 2001’, Planning Commission, Government of India, New Delhi.

- Government of India (2011), ‘India Human Development Report 2011’, Institute of Applied Manpower Research, Planning Commission, Government of India, Oxford University Press, New Delhi.

- Government of Karnataka (1999), ‘Karnataka Human Development Report 1999’, Planning department, Government of Karnataka, Bangalore

- Government of Kerala (2005), ‘Human Development Report 2005 Kerala’, Centre for Development Studies, Thiruvananthapuram.

- Government of Madhya Pradesh (1995), ‘Madhya Pradesh Human Development Report 1995’, Government of Madhya Pradesh, Bhopal

- Government of Maharashtra (2002), ‘Human Development Report Maharashtra 2002’, Planning Department, Government of Maharashtra, Mumbai.

- Government of Nagaland (2005), ‘Nagaland State Human Development Report 2004’, Department of Planning & Coordination, Government of Nagaland.

- Government of NCT of Delhi (2006), ‘Delhi Human Development Report 2006’, Government of National Capital Territory of Delhi, Oxford University Press, New Delhi

- Government of Orissa (2004), ‘Human Development Report 2004 Orissa’, Planning and Coordination Department, Government of Orissa, Bhubaneswar

- Government of Punjab (2004), ‘Human Development Report 2004 Punjab’, Government of Punjab, Chandigarh.

- Government of Tamil Nadu (2003), ‘Tamil Nadu Human Development Report 2003’, Government of Tamil Nadu, Madras

- Government of Uttar Pradesh (2008), ‘Uttar Pradesh Human Development Report 2008’, Government of Uttar Pradesh.

- Government of West Bengal (2004), ‘West Bengal Human Development Report 2004’, Government of West Bengal, Kolkata.

- Municipal Corporation of Greater Mumbai (2009), ‘Mumbai Human Development Report 2009’, Oxford University Press, New Delhi.
- United Nations Development Programme (1990), ‘Human Development Report 1990’, UNDP, New York, USA.
- United Nations Development Programme (1991), ‘Human Development Report 1991’, UNDP, New York, USA.
- United Nations Development Programme (1992), ‘Human Development Report 1992’, UNDP, New York, USA.
- United Nations Development Programme (1993), ‘Human Development Report 1993’, UNDP, New York, USA.
- United Nations Development Programme (1994), ‘Human Development Report 1994’, UNDP, New York, USA.
- United Nations Development Programme (1995), ‘Human Development Report 1995’, UNDP, New York, USA.
- United Nations Development Programme (1996), ‘Human Development Report 1996’, UNDP, New York, USA.
- United Nations Development Programme (1997), ‘Human Development Report 1997’, UNDP, New York, USA.
- United Nations Development Programme (1998), ‘Human Development Report 1998’, UNDP, New York, USA.
- United Nations Development Programme (1999), ‘Human Development Report 1999’, UNDP, New York, USA.

- United Nations Development Programme (2000), ‘Human Development Report 2000’, UNDP, New York, USA.

- United Nations Development Programme (2001), ‘Human Development Report 2001’, making new technologies work for human development, UNDP New York, USA.

- United Nations Development Programme (2002), ‘Human Development Report 2002’, Deepening democracy in a fragmented world, UNDP, New York, USA.

- United Nations Development Programme (2003), ‘Human Development Report 2003’, Millennium Development Goals: A compact among nations to end human poverty, UNDP, New York, USA.

- United Nations Development Programme (2004), ‘Human Development Report 2004’, Cultural liberty in today’s diverse world, UNDP, New York, USA.

- United Nations Development Programme (2005), ‘Human Development Report 2005’, International cooperation at a crossroads aid, trade and security in an unequal world, UNDP, New York, USA.

- United Nations Development Programme (2006), ‘Human Development Report 2006’, Beyond Scarcity: Power, Poverty and the global water crisis, UNDP, New York, USA.

- United Nations Development Programme (2008), ‘Human Development Report 2007/2008’, Fighting Climate Change: Human solidarity in a divided world, UNDP, New York, USA.

- United Nations Development Programme (2009), ‘Human Development Report 2009’, Overcoming Barriers: Human mobility and development, UNDP, New York, USA.

- United Nations Development Programme (2010), ‘Human Development Report 2010’, The Real Wealth of Nations: Pathways to Human Development, UNDP, New York , USA.

- United Nations Development Programme (2011), ‘Human Development Report 2011’, Sustainability and Equity: A Better Future for all, UNDP, New York, USA.

- United Nations Development Programme (2013), 'Human Development Report 2013, The Rise of the South: Human Progress in a diverse world', UNDP, New York, USA.

- United Nations Development Programme (2008), 'Introduction to Human Development -Training Manual', Lecture Day 1 Session 1, UNDP, New York, USA


## ❖ प्रबंध :


- कर्वे यशश्री (२००४), 'पुणे शहर झोपडपट्यातील १५-३५ वयोगटातील स्त्रीयांच्या निरंतर शिक्षणाच्या गरजा, संधी, सोयी व सुविधा यांचा विश्लेषणात्मक अभ्यास करुन निरंतर शिक्षणाच्या धोरणाच्या अमंलबजावणीत सूचना करणे', पीएच.डी. प्रबंध, पुणे विद्यापीठ, पुणे.

- पवार जीवन (२००३), 'उस्मानाबाद जिल्ह्याच्या औद्योगिक समस्या व उपाययोजना', पुणे विद्यापीठास पीएच.डी.पदवीसाठीचा प्रबंध, पुणे विद्यापीठ, पुणे.

- पाटील नलिनी (१९९७), 'धुळे जिल्ह्यातील (सर्व शैक्षणिक स्तरावरील शासकीय व निमशासकीय) शैक्षणिक संस्थामध्ये काम करणाऱ्या आदिवासी महिलांच्या शैक्षणिक समस्यांचा चिकित्सक अभ्यास', पीएच.डी. प्रबंध, पुणे विद्यापीठ, पुणे.

- पाटील सुषमा (२००९), 'नंदूरबार आदिवासी जिल्ह्यातील शासकीय पोष्ट बेसिक आश्रमशाळेतील कुमारावस्थेतील विद्यार्थ्योनींच्या गळतीची कारणे शोधणे व त्यावर शिफारशी सुचविणे', पीएच.डी. प्रबंध, पुणे विद्यापीठ, पुणे.

- Bashumiyan L. T. (2008) **:** 'A Study of the Relation Between the Process of Economics Development and Women's Empowerment among Indian muslim population : Case study of Latur Districts', Maharashtra, Ph.D. Theses, University of Pune, Pune.

- Bhide Manoj B. (2007) **:** 'A Statistical study of Human Development Index of Maharashtra state for the period of 1991 to 2001', Ph.D. Theses, S.R.T.M. University, Nanded.

- Erdene-us Bayud (2011), 'The Role of Agriculture in Economics Growth of Mongolia', Ph.D. Theses, University of Pune, Pune .

- Kejariwal S.K. (2003) **:** 'The Impact of Adult Education Programme on Life Style of Tribal Women in Andra Pradesh : An Analytical Study and Critical Evaluation', Ph.D. Theses, University of Pune, Pune.

## ❖ मासिके :

- कडव्हेकर एस. व्ही. (२०१३), 'वाणिज्यविद्या', जर्नल ऑफ कॉमर्स ॲंड मॅनेजमेंट थॉट, वाणिज्य शास्त्र विभाग व संशोधन केंद्र, पुणे विद्यापीठ व असोसिएशन फॉर बिझनेस एज्युकेशन ॲंड आंत्रप्रेन्युरशिप डेव्हलपमेंट, पुणे.

- Thakur Anil Kumar (2011), Challenges of Inclusive Growth, Issues on 'Enhancing Human Resources for Inclusive Growth, Employment and Welfare', The Indian Economic Journal, The Indian Economics Association Publication, Pathna, Bihar.

- Thakur Anil Kumar (2011), Challenges of Inclusive Growth, Issues on 'Sustainable Growth and Transformation', The Indian Economic Journal, The Indian Economics Association Publication, Pathna, Bihar.

- Thakur Anil Kumar (2011), Challenges of Inclusive Growth, Issues on 'Governance Reform Though Decentralization', The Indian Economic Journal, The Indian Economics Association Publication, Pathna, Bihar.

- Thakur Anil Kumar (2011), Challenges of Inclusive Growth, Issues on 'Market Reforms for Efficiency and Inclusiveness', The Indian Economic Journal, The Indian Economics Association Publication, Pathna, Bihar.

## ❖ मार्गदर्शिका :

- गुजरात शासन (२००८), 'मानव विकास एक प्रस्तावना', मानव विकास निर्देशांक डायरी, गुजरात शासन, गुजरात राज्य, अहमदाबाद.

- महाराष्ट्र शासन (२००९), 'कार्यपूर्ती अहवाल १ जुलै २००६-३० जून २००९', महाराष्ट्र मानव विकास मिशन, औरंगाबाद.

- माथूर रितू (२०११), 'मानव विकास संकल्पना', यशदा, पुणे येथील सादरीकरण

## ❖ शब्दकोश :

- जोशी श्रीपाद (१९८७), ‘अभिनव शब्दकोश’, तिसरी आवृत्ती, आशरदा-सारस्वत पब्लिकेशन्स् प्रा.लि. पुणे.
- भिडे गणेश (१९७१), ‘अभिनव मराठी ज्ञानकोश’, भाग १ ते ५, ज्ञानकोश मंडळ कोल्हापूर
- रारावीकर यशवंत, गोडबोले वि.ज., बोर्जेस जॉन्सन (२००८), ‘डायमंड अर्थशास्त्र कोश’, प्रथमावृत्ती, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे.
- Hanson J. L. (1965), ‘A Dictionary of Economics and Ecommerce’, First edition, Malconald & Evans Ltd, London.
- Logman (2009), ‘Dictionary of Contemporary English’, Fifth edition, Pearson Education Limited, UK.
- Prabhudesai Sudhakar R., Natu Vasant G. (2002) : ‘Navneet Advanced Dictionary’, Thirteenth edition, Navneet Publication (India) Limited, Mumbai.
- Wehmeier Sally (2005), ‘Oxford Advanced Learner’s Dictionary’, Seventh edition, Oxford University Press, New York.

## ❖ वृत्तपत्र लेख :

- गोविलकर विनायक (२००९), ‘मानव विकास निर्देशांक : अर्थबोध’, दैनिक सकाळ वृत्तपत्रातील लेख, पुणे.

## ❖ शासन निर्णय :

- महाराष्ट्र शासन (२००८), ‘महाराष्ट्र राज्याची अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्गाची यादी’, शासन निर्णय क्र. सकीर्ण-२००८/यादी/प्र.क्र.५५३/मावक-५, दि. २६ सप्टेंबर २००८, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई.

- महाराष्ट्र शासन (२०११), 'महाराष्ट्र राज्याचा मानव विकास अहवाल प्रसिध्द करणेबाबत', शासन निर्णय क्र. ममावि-२०११/प्र.क्र.२१/का.१४१८, दि. १३ एप्रिल २०१०, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.

## ❖ वेबसाईट्स :


- www.businessmanedge.com
- www.dies.in
- www. hdr. undp.org
- www.marathi.webdunia.com
- www. mr.wikipedia.org
- www.narega.inc.in/hp.css
- www.semisonline.net
- www. undp.org.in

# परिशिष्ट्ये

## परिशिष्ठ '१'

प्रस्तुत संशोधनासाठी मराठवाड्यातील हिंगोली, उस्मानाबाद व जालना जिल्ह्यातील ज्या गावातून माहितीचे संकलन करण्यात आले, अशा गावांची तालुकानिहाय यादी खालील प्रमाणे आहे.

**१. औंढा नागनाथ तालुक्यातील गावांची यादी :**

| अ.क्र. | गावांचे नांव | अ.क्र. | गावांचे नांव | अ.क्र. | गावांचे नांव |
|---|---|---|---|---|---|
| १. | महाळजगांव | ७. | अजरसोंडा | १३. | जडगांव |
| २. | काकडदाभा | ८. | काठोडा तांडा | १४. | बोरजा |
| ३. | अंजनगांव तांडा | ९. | देवाळी | १५. | भगवा |
| ४. | हिवरा जा. | १०. | दौडगांव | १६. | धार |
| ५. | पिंपळा | ११. | शेंदूरसना | १७. | नागेशवाडी |
| ६. | सिरला | १२. | अनखळी | १८. | शिरड (श.) |

**२. कळमनुरी तालुक्यातील गावांची यादी :**

| अ.क्र. | गावांचे नांव | अ.क्र. | गावांचे नांव | अ.क्र. | गावांचे नांव |
|---|---|---|---|---|---|
| १. | गौळ बाजार | ७. | महारी (बु) | १३. | बऊर |
| २. | कांडली | ८. | नांदापूर | १४. | डोंगरगांव पुल |
| ३. | भाटेगांव | ९. | डिग्रस (बु) | १५. | साळवा |
| ४. | वसपांगरा | १०. | महालिंगी | १६. | दाती |
| ५. | खडकद | ११. | रामेश्वर तांडा | १७. | घोळवा |
| ६. | कृष्णालूर (तर्फे जवळा) | १२. | मसोड | १८. | आराठी |

## ३. उस्मानाबाद तालुक्यातील गावांची यादी :

| अ.क्र. | गावांचे नांव | अ.क्र. | गावांचे नांव | अ.क्र. | गावांचे नांव |
|---|---|---|---|---|---|
| १. | कौडगांव (बाबी) | ७. | जाहागोंदरवाडी | १३. | चिखली |
| २. | भिकार सारोळा | ८. | वरवंटी | १४. | महाळंगी |
| ३. | रुई (ढोकी) | ९. | कावलदारा (तांडा) | १५. | पोहनेर |
| ४. | वाघोली | १०. | बरमगांव (बु) | १६. | लासोना |
| ५. | अंबेहोळ | ११. | धारूर | १७. | ढोकी |
| ६. | भडारवाडी | १२. | वाडी (बा) | १८. | पिंपरी |

## ४. वाशी तालुक्यातील गावांची यादी :

| अ.क्र. | गावांचे नांव | अ.क्र. | गावांचे नांव | अ.क्र. | गावांचे नांव |
|---|---|---|---|---|---|
| १. | जानकापूर | ७. | सेलू | १३. | खानापूर |
| २. | लाखनगांव | ८. | डोंगरेवाडी | १४. | सोनारवाडी |
| ३. | ब्रह्मगांव | ९. | सारोळा (मा) | १५. | खामकरवाडी |
| ४. | इजोरा | १०. | सोनेगांव | १६. | सटवाईवाडी |
| ५. | सरमकुंडी | ११. | सारोळा | १७. | बाबी |
| ६. | शेंडी | १२. | इसरप | १८. | पिंपळगांव (कमळेश्वर) |

५. **बदनापूर तालुक्यातील गावांची यादी :**

| अ.क्र. | गावांचे नांव | अ.क्र. | गावांचे नांव | अ.क्र. | गावांचे नांव |
|---|---|---|---|---|---|
| १. | डोंगरगाव दाभाडी | ७. | नजिकपांगरी | १३. | दुधनवाडी |
| २. | वाघुळ डोंगरगाव | ८. | मात्रेवाडी | १४. | गेवराई |
| ३. | मेहुणा | ९. | शेलगाव | १५. | कस्तुरवाडी |
| ४. | लोंढेवाडी | १०. | हलदोला | १६. | नानेगाव |
| ५. | पठार देऊळगाव | ११. | पिरसावंगी | १७. | बुटेगाव |
| ६. | भरडखेडा | १२. | ढासला | १८. | मांडवा |
| | | | | १९. | मान देऊळगाव |

६. **भोकरदन तालुक्यातील गावांची यादी :**

| अ.क्र. | गावांचे नांव | अ.क्र. | गावांचे नांव | अ.क्र. | गावांचे नांव |
|---|---|---|---|---|---|
| १. | हिसोडा | ७. | भायडी | १३. | खंडाळा |
| २. | पिंपळगाव रे | ८. | वालसा | १४. | पिंपळगाव कोलते |
| ३. | करजगाव | ९. | कोदोली | १५. | ललिपपुर |
| ४. | पळसखेडा मु. | १०. | सावरखेडा | १६. | खापरखेडा |
| ५. | मोहळाई | ११. | तांदुळवाडी | १७. | पळसखेडा |
| ६. | दगडवाडी | १२. | जैनपुर | १८. | पिंपळगांव बारो |
| | | | | १९. | राजुर |

***

H_E_1

परिशिष्ठ '२'

साक्षर/निरक्षर

## "मराठवाड्यातील मानव विकास निर्देशांक निम्न असल्याची कारणमीमांसा: एक अभ्यास"
## या पीएच.डी च्या शोधप्रबंधासंबंधित माहिती संकलनासाठीची

### अनुसूची
(निरक्षर/साक्षर स्त्रियांच्याशी चर्चा करून माहिती संकलित करण्यासाठीची प्रश्नसूची)

---

सुचना : १) प्रश्नासमोर दिलेल्या गोलामध्ये √ अशी खूण करावी. तसेच जेथे संख्या लिहिणे आवश्यक आहे तेथे संख्या नमूद करावी
२) आवश्यक ठिकाणी आपले मत ३ ते ४ वाक्यात नमुद करावे.
३) आपण दिलेल्या माहितीचा उपयोग केवळ माझ्या संशोधन कार्यासाठी करण्यात येईल.
४) आपण दिलेल्या सहकार्याबद्दल धन्यवाद!

संशोधक
**(अतुल सं. नौबदे)**

---

जिल्हा: ▭ तालुका: ▭ गावाचे नांव: ▭

- महिलेचे पूर्ण नांव: ------------------------------------------------------------
- वय: ▭ (१५ -२५ वर्षाच्या आतील महिला/स्त्री)
- वैवाहिक स्थिती: विवाहित ○ अविवाहित ○
- संवर्ग:

अनुसूचित जाती (SC) ○ अनुसूचित जमाती (ST) ○ विमुक्त जाती (VJ) ○

भटक्या जमाती (NT) ○ विशेष मागास प्रवर्ग (S.B.C) ○ इतर मागासवर्ग (OBC) ○

अल्पसंख्यांक (Minority), ○ सर्वसाधारण (Open) ○

१. दारिद्र्य रेषेखाली आहात काय ?

होय ○ नाही ○

२. तुमचा विवाह साधारणतः वयाच्या कितव्या वर्षी झाला?

१५ वर्षापेक्षा कमी ○ १५ व्या वर्षी ○ १६ व्या वर्षी ○ १७ व्या वर्षी ○ १८ व्या वर्षी ○

१८ वर्षापेक्षा जास्त ○

३. तुमची आई साक्षर आहे/होती काय?

होय ⬭ नाही ⬭

४. प्रश्न क्र ३ चे उत्तर होय असेल तर खालील पैकी एका उत्तरास टीक करा.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| प्राथमिक पुर्ण (१ली - ४थी) | ⬭ | उच्च प्राथमिक पुर्ण (५वी - ८वी) | ⬭ | माध्यमिक पुर्ण (८वी - १०वी) | ⬭ |
| उच्च माध्यमिक पुर्ण (११वी — १२वी) | ⬭ | पदवी पुर्ण | ⬭ | इतर | ⬭ |

५. तुमचे वडील साक्षर आहेत/होते काय?

होय ⬭ नाही ⬭

६. प्रश्न क्र ५ चे उत्तर होय असेल तर खालील पैकी एका उत्तरास टीक करा

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| प्राथमिक पुर्ण (१ली - ४थी) | ⬭ | उच्च प्राथमिक पुर्ण (५वी - ८वी) | ⬭ | माध्यमिक पुर्ण (८वी - १०वी) | ⬭ |
| उच्च माध्यमिक पुर्ण (११वी — १२वी) | ⬭ | पदवी पुर्ण | ⬭ | इतर | ⬭ |

७. तुमच्या वडीलाचा व्यवसाय कोणता आहे/होता?

शेती ⬭ मजुरी ⬭ नोकरी ⬭ स्वतःचा व्यवसाय ⬭ शेती व मजुरी ⬭

८. तुमच्या आईचा व्यवसाय कोणता आहे/होता?

शेती ⬭ मजुरी ⬭ नोकरी ⬭ स्वतःचा व्यवसाय ⬭ शेती व मजुरी ⬭

घरकाम ⬭

९. तुमचा भावंडांत कितवा क्रमांक आहे?

पहिला ⬭ दुसरा ⬭ तीसरा ⬭ चौथा ⬭ पाचवा ⬭ सहावा ⬭ इतर ---

१०. तुमच्या घरातील लहान भावंडांची संख्या किती आहे/होती?

एक ⬭ दोन ⬭ तीन ⬭ चार ⬭ पाच ⬭ सहा ⬭ इतर ----

११. तुमचा मोठा भाऊ शाळेत जातो/जात होता काय?

होय ⬭ नाही ⬭ लागू नाही ⬭

१२. तुमची मोठी बहिण शाळेत जाते/जात होती काय?

होय ⬭ नाही ⬭ लागू नाही ⬭

१३. तुम्हाला शाळेत जायची आवड होती काय?

होय ⬭ नाही ⬭

१४. तुमच्या मैत्रीणी/शेजारच्या मुली शाळेत जातात/जात होत्या काय?

होय ⬭ नाही ⬭

१५. तुम्ही कितवी पास आहात?

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ली | ⬭ | ४थी | ⬭ | ७वी | ⬭ | १०वी | ⬭ | लागू नाही |
| २री | ⬭ | ५वी | ⬭ | ८वी | ⬭ | ११वी | ⬭ | ⬭ |
| ३री | ⬭ | ६वी | ⬭ | ९वी | ⬭ | १२वी | ⬭ | |

१६. शाळा घरापासून साधारणत किती अंतरावर होती/आहे?

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १ किमी पेक्षा कमी | ⬭ | १-२ किमी | ⬭ | २-३ किमी | ⬭ |
| ३-४ किमी | ⬭ | ४-५ किमी | ⬭ | ५ किमी पेक्षा जास्त | ⬭ |
| सांगता येत नाही | ⬭ | गावात शाळा नाही/नव्हती | ⬭ | | |

१७. खाली नमुद केलेल्या विधानासमोरील योग्य त्या पर्यायास √ अशी खुण करा.

**शाळेच्या उपलब्धते संबंधी घटक**

१७.१ शाळेत जाण्यासाठी वाहतुकीची सोय ------------------ आहे/होती ⬭ नाही/नव्हती ⬭

१७.२ शाळेत जाण्याच्या वाटेत डोंगर/नदी/नाला/घाट/जंगल इ. अडथळे- आहेत/होते ⬭ नाहीत/नव्हते ⬭

१७.३ शाळा घरापासून दूर अंतरावर ----------------------------- आहे/होती ⬭ नाही/नव्हती ⬭

१७.४ गावात शाळा ------------------------------------------ आहे/होती ⬭ नाही/नव्हती ⬭

**कौटुबीक व आर्थिक घटक**

१७.५ घरची आर्थिक परिस्थिती गंभीर --------------------- आहे/होती ⬭ नाही/नव्हती ⬭

१७.६ आईला घरकामात मदत करावी लागत ---------------- ते/होती ⬭ नाही/नव्हती ⬭

१७.७ वडिलांना शेतीच्या कामात मदत करण्यासाठी शेतीवर जावे लागत ते/होते ⬭ नाही/नव्हते ⬭

१७.८ आर्थिक परिस्थिती चांगली नव्हती त्यामुळे पैसे कमाविण्यासाठी जावे लागत ते/होते ⬭ नाही/नव्हते ⬭

१७.९ लहान भावंडाना साभाळावे लागत ------------------------- ते/होते ⬭ नाही/नव्हते ⬭

१७.१० दूरून पाणी भरावे लागत -------------------------------- ते/होते ⬭ नाही/नव्हते ⬭

१७.११ लाकूडफाटा/सरपण गोळा करण्यासाठी जावे लागत ----------- ते/होते ◯ नाही/नव्हते ◯

१७.१२ आई -------------------------------------------------- आहे/होती ◯ नाही/नव्हती ◯

१७.१३ वडील ---------------------------------------------- आहेत/होते ◯ नाहीत/नव्हते ◯

**सामाजिक घटक**

१७.१४ सामाजिक सुरक्षितता (छेडछाड, वाट अडवणे इ. सारख्या अडचणी) आहे/होती ◯ नाही/नव्हती ◯

१७.१५ गावातील खूपच कमी मुली शाळेत जात ------------------ आहे/होती ◯ नाही/नव्हती ◯

**शाळेतील उपलब्ध सुविधा व शिक्षणासंबंधीत**

१७.१६ असे तुम्ही ऐकले की, शाळेत शिक्षक मारत ----------------- आहेत/होते ◯ नाहीत/नव्हते ◯

१७.१७ असे तुम्ही ऐकले होते की, शाळेत शिक्षक शिकवत ---------- आहेत/होते ◯ नाहीत/नव्हते ◯

१७.१८ शाळेत वर्गखोल्या -------------------------------------- आहेत/होते ◯ नाहीत/नव्हते ◯

१७.१९ शाळेत पिण्याचे पाणी ---------------------------------- आहे/होते ◯ नाही/नव्हते ◯

१७.२० शाळेत दुपारचे जेवण/खिचडी मिळत --------------------- आहे/होते ◯ नाही/नव्हते ◯

१७.२१ शाळेत मुलींसाठी स्वतंत्र स्वच्छतागृह -------------------- आहे/होते ◯ नाही/नव्हते ◯

१७.२२ असे वाटत होते जी, शाळेत जाऊन (काहीच) फायदा ------- आहे/होतो ◯ नाही/नव्हता ◯

१८. जास्तीत जास्त स्त्रिया साक्षर व्हाव्यात यासाठी कोणत्या उपाययोजना सुचवाल.

------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------

***

O_H_1

# परिशिष्ट '३'

संस्थात्मक प्रसुती/घरी प्रसुती

## "मराठवाड्यातील मानव विकास निर्देशांक निम्न असल्याची कारणमीमांसा: एक अभ्यास"
## या पीएच.डी च्या शोधप्रबंधासंबंधित माहिती संकलनासाठीची

## अनुसूची

(संस्थात्मक प्रसुती/घरी प्रसुती झालेल्या स्त्रिया यांच्याशी चर्चा करून माहिती संकलित करण्यासाठीची अनुसूची)

---

सुचना : १) प्रश्नासमोर दिलेल्या गोलामध्ये √ अशी खूण करावी. तसेच जेथे संख्या लिहिणे आवश्यक आहे तेथे संख्या नमूद करावी

२) आवश्यक ठिकाणी आपले मत ३ ते ४ वाक्यात नमुद करावे.

३) आपण दिलेल्या माहितीचा उपयोग केवळ माझ्या संशोधन कार्यासाठी करण्यात येईल.

४) आपण दिलेल्या सहकार्याबद्दल धन्यवाद!

संशोधक
(अतुल सं. नौबदे)

---

जिल्हा: ☐ तालुका: ☐ गावाचे नांव: ☐

❖ महिला/स्त्रीचे पूर्ण नांव: ------------------------------------------------------------

❖ वय: ☐

❖ तुमची शैक्षणिक स्थिती :- साक्षर ◯ निरक्षर ◯

❖ पतीची शैक्षणिक स्थिती :- साक्षर ◯ निरक्षर ◯

❖ सासरे यांची शैक्षणिक स्थिती साक्षर ◯ निरक्षर ◯

❖ सासू यांची शैक्षणिक स्थिती :- साक्षर ◯ निरक्षर ◯

❖ संवर्ग:

अनुसूचित जाती (SC) ◯ अनुसूचित जमाती (ST) ◯ विमुक्त जाती (VJ) ◯

भटक्या जमाती (NT) ◯ विशेष मागास प्रवर्ग (S.B.C) ◯ इतर मागासवर्ग (OBC) ◯

अल्पसंख्यांक (Minority), ◯ सर्वसाधारण (Open) ◯

१. तुम्ही दारिद्र्यरेषेखाली आहात काय?

होय ◯ नाही ◯

२. तुमचे लग्न वयाच्या कितव्या वर्षी झाले आहे?

१५ वर्षापेक्षा कमी ◯ १५ व्या वर्षी ◯ १६ व्या वर्षी ◯ १७ व्या वर्षी ◯ १८ व्या वर्षी ◯

१८ वर्षापेक्षा जास्त ◯

३. तुमच्या गांवात आरोग्यासंबंधी खालील पैकी कोणत्या सुविधा आहेत?

आरोग्य उपकेंद्र ◯ प्राथमिक आरोग्य केंद्र ◯
ग्रामीण रूग्णालय ◯ सुविधा नाही ◯

४. तुमच्या गांवात खाजगी दवाखाना आहे काय?

होय ◯ नाही ◯

५. प्रश्न क्र. ३ मधील सुविधा असतील तर त्या तुमच्या घरापासून किती अंतरावर आहेत?

१ किमी पैक्षा कमी ◯ १-२ किमी ◯ २-३ किमी ◯
३-४ किमी ◯ ४-५ किमी ◯ ५-६ किमी ◯
६-७ किमी ◯ ७-८ किमी ◯ ८-९ किमी ◯
९ किमी पैक्षा जास्त ◯ लागू नाही ◯

६. प्रश्न क्र. ४ चे उत्तर होय असेल तर घरापासून किती अंतरावर आहे?

१ किमी पैक्षा कमी ◯ १-२ किमी ◯ २-३ किमी ◯
३-४ किमी ◯ ४-५ किमी ◯ ५-६ किमी ◯
६-७ किमी ◯ ७-८ किमी ◯ ८-९ किमी ◯
९ किमी पैक्षा जास्त ◯ लागू नाही ◯

७. तुमचे कितवे बाळंतपण आहे/होते?

१ ले ◯ २ रे ◯ ३ रे ◯ ४ थे ◯ ५ वे ◯ ५ पेक्षा जास्त ◯

८. तुमच्या यापूर्वीच्या प्रसुती कोठे झालेल्या आहेत?

घरी ◯ दवाखान्यात ◯

९. प्रसुती घरी झाली असेल तर ती खालीलपैकी कोणी केली?

घरातील/शेजारील अनुभवी महिला ◯ गांवातील अप्रशिक्षित दाई ◯
गांवातील प्रशिक्षित महिला ◯ गांवातील वैद्य ◯
नर्स/डॉक्टर्स इ. ◯ लागू नाही ◯

१०. तुम्ही प्रसुतीपूर्व तपासण्या केल्या आहेत काय?

होय ◯ नाही ◯

११. तुम्ही प्रसुतीपूर्व किती तपासण्या करून घेतल्या आहेत?

१ ◯ २ ◯ ३ ◯
४ ◯ ५ ◯ ६ ◯
७ ◯ ७ पैक्षा जास्त ◯ लागू नाही ◯

१२. तुमच्या बाळाचा जन्म झाल्यानंतर आरोग्य स्थिती कशी आहे/होती?

व्यवस्थित ◯ कमी वजनाचे ◯ उपजतमृत्यू ◯

१३. अर्भकमृत्यू झाला आहे काय?

होय ◯ नाही ◯

१४. अर्भकमृत्यू झाला झाला असेल तर कितव्या दिवशी झाला.

०-१ दिवस ◯ १-८ दिवस ◯ ९ – ३० दिवस ◯ १ महिना – १ वर्ष ◯ लागू नाही ◯

१५. खाली नमुद केलेल्या विधानासमोरील योग्य त्या पर्यावर √ अशी खुण करा.

अ) कौटुंबिक व आर्थिक कारणे-

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १५.१ कटुंबाची आर्थिक परिस्थिती | चांगली | ◯ | बिकट | ◯ |
| १५.२ प्रसुतीसाठीचा (सिझर) खर्च जास्त लागतो. | जास्त लागतो. | ◯ | जास्त नाही | ◯ |
| १५.३ वाहतुकीचा खर्च (रात्री/मध्यरात्री दवाखान्यात घेऊन जाण्यासाठीचा) | परवडतो | ◯ | परवडत नाही | ◯ |
| १५.४ कुटूंब प्रमुखाची अनास्था व निर्णयास विलंब | असतो | ◯ | नसतो | ◯ |
| १५.५ प्रसुतीचे ठिकाण घरातील कर्ता स्त्री/पुरूष निश्चित करतात | होय | ◯ | तसे नाही | ◯ |
| १५.६ प्रसुतीची भीती | वाटते | ◯ | नाही | ◯ |
| १५.७ प्रसतीपूर्व तपासण्या नीट न झाल्यामुळे | होय | ◯ | नाही | ◯ |
| १६.८ स्थलांतर | झाल्यामुळे | ◯ | नझाल्यामुळे | ◯ |
| १६.९ महिला पोट दुखण्याबाबत तत्काळ सांगत नाहीत | होय | ◯ | नाही | ◯ |
| ब) पायाभत सुविधा संबंधी कारणे | | | | |
| १६.१० वाहतुकीच्या साधनांचा अभाव | आहे/असतो | ◯ | नाही/नसतो | ◯ |
| १६.११ रस्त्याची वाईट आवस्था | आहे/होती | ◯ | नाही/नव्हती | ◯ |
| १६.१२ आरोग्य केंद्रापासून अंतर जास्त | आहे/होता | ◯ | नाही/नव्हता | ◯ |
| क) सांस्कतिक व सामाजिक कारणे | | | | |
| १६.१३ पारंपारिक पध्दतीवर विश्वास | आहे/होता | ◯ | नाही/नव्हता | ◯ |
| १६.१४ निरक्षर महिला | आहे/होती | ◯ | नाही/नव्हती | ◯ |
| १६.१७ महिलांच्या निर्णय क्षमतेचा अभाव | आहे | ◯ | नाही | ◯ |
| ड) आरोग्य केंद्रासंबंधी कारणे | | | | |
| १६.१८ संस्थात्मक प्रसुतीच्या विविध सोई/सुविधाच्या फायद्यापासून अज्ञान | आहे/होते | ◯ | नाही/नव्हते | ◯ |
| १६.१९ निकृष्ट दर्जाच्या सेवा/सुविधा | आहेत/होत्या | ◯ | नाहीत/नव्हत्या | ◯ |
| १६.२० स्त्री डॉक्टर्स उपलब्ध | आहेत/होत्या | ◯ | नाहीत/नव्हत्या | ◯ |
| १६.२१ आरोग्य केंद्रात प्रसुतीची व्यवस्था | आहे/होती | ◯ | नाही/नव्हती | ◯ |
| १६.२२ आरोग्य केंद्रात आवश्यक त्या वेळेत डॉक्टर्स व नर्स उपलब्ध | असतात | ◯ | नसतात | ◯ |
| १६.२३ डॉक्टर्स व नर्स यांच्याकडून मिळणारी वागणूक व असहकार्याची भावना | होय | ◯ | नाही | ◯ |
| १६.२४ दवाखान्यात गेल्यास डॉक्टर्स सिजर करावयास सांगतातच | सांगतात | ◯ | नाही | ◯ |
| १६.२५ आरोग्य केंद्रातील डॉक्टर्स व नर्स यांच्यावर कमी विश्वास | आहे | ◯ | नाही | ◯ |
| १६.२६ इतर ------------------------------------------ | | | | |

१७ संस्थात्मक प्रसुतीचे प्रमाण वाढविण्यासाठी कोणत्या उपायोजना सुचवाल.

------------------------------------------------------------------------------

१८ अर्भक मृत्यू रोखण्यासाठी/प्रमाण कमी करण्यासाठी कोणत्या उपायोजना सुचवाल.

------------------------------------------------------------------------------

***

J_G_1

# परिशिष्ठ '४'

बीपीएल/एपीएल

## "मराठवाड्यातील मानव विकास निर्देशांक निम्न असल्याची कारणमीमांसा: एक अभ्यास"
## या पीएच.डी च्या शोधप्रबंधासंबंधीत माहिती संकलनासाठीची

## अनुसूची

(गांवातील दारिद्र्यरेषेखालील व दारिद्र्य रेषेखाली नसलेल्या कुटुंबाकडून संकलित करण्यासाठीची अनुसूची)

---

सुचना : १) प्रश्नासमोर दिलेल्या गोलामध्ये √ अशी खूण करावी. तसेच जेथे संख्या लिहिणे आवश्यक आहे तेथे संख्या नमूद करावी

२) आवश्यक ठिकाणी आपले मत ३ ते ४ वाक्यात नमुद करावे.

३) आपण दिलेल्या माहितीचा उपयोग केवळ माझ्या संशोधन कार्यासाठी करण्यात येईल.

४) आपण दिलेल्या सहकार्याबद्दल धन्यवाद!

संशोधक

(अतुल सं. नौबदे)

---

जिल्हा: जालना तालुका: गावाचे नांव

- प्रतिसादकाचे पूर्ण नांव: ------------------------------------------------------------
- वय:
- शैक्षणिक स्थिती :- साक्षर ◯ निरक्षर ◯
- वैवाहिक स्थिती :- विवाहित ◯ अविवाहित ◯
- संवर्ग:

अनुसूचित जाती (SC) ◯ अनुसूचित जमाती (ST) ◯ विमुक्त जाती (VJ) ◯
भटक्या जमाती (NT) ◯ विशेष मागास प्रवर्ग (S.B.C) ◯ इतर मागासवर्ग (OBC) ◯
अल्पसंख्यांक (Minority), ◯ सर्वसाधारण (Open) ◯

१.प्रतिसादकाच्या कुटुंबाची माहिती :

कुटुंबातील एकूण सदस्यांची संख्या कुटुंबातील कमावत्या सदस्यांची संख्या

२. खालील पैकी तुम्ही कोणता व्यवसाय करता?

प्राथमिक व्यवसाय ◯
(शेती □ जंगलव्यवसाय □ मत्सव्यवसाय □ पशुपालन खाणी व खनिज उत्पादने □ नैसर्गिक साधन संपत्तीवर आधारित इतर पुरक व्यवसाय □------------------------)

द्वितीय व्यवसाय ◯
(कारखाने□ बांधकाम□ वीजनिर्मिती नैसर्गिक वायू□ पाणी पुरवठा □ खाण व्यवसाय आधारित उद्योग □ प्राथमिक व्यवसायातील साधनसामुग्रीवरील प्रक्रिया इ. □------------------------ )

तृतीय व्यवसाय ◯
(बॅंका व वित्त व्यवहार □ विमा□ व्यापार□ वाहतूक □दळणवळण□ संरक्षण□ व्यावसायिक□ प्रशासकीय□सामाजिक□ शिक्षण□ आरोग्य□ इतर प्रकारच्या सामुदाईक व वैयक्तिक सेवा □---------------)

३.तुमच्या कुटुंबाचे सर्वसाधारण एकूण वार्षिक उत्पन्न किती आहे?

०-१० हजार ◯ १०-२५ हजार ◯ २५-५० हाजार ◯
५०-७५ हजार ◯ ७५ हजार - १ लाख ◯ १ लाखापेक्षा अधिक ◯

४. तुमच्याकडे शेती असेल तर ती शेती खालीलपेकी कोणत्या प्रकारातील आहे?

बागायती ◯ कोरडवाहू ◯ जिरायत ◯ लागू नाही ◯

५. तुमची शेती बागायती असेल तर शेतीत तुम्ही खालीलपेकी कोणती पिके घेता?

नगदी पिके ◯ फळबाग ◯ अन्नधान्य पिके ◯ लागू नाही◯

६.तुमच्या शेतमालास बाजारपेठेत योग्य भाव मिळतो काय?

होय ◯ नाही ◯ कधीकधी ◯ लागू नाही ◯

७. प्राथमिक व्यवसायापासून मिळणारे वार्षिक उत्पन्न किती आहे?

शेती ------- जंगलव्यवसाय ------- खाणी व खनिजउत्पादने -----
पशुपालन ------- मत्सव्यवसाय ------- इतर नैसर्गिक साधन संपत्तीवर आधारित व्यवसाय -----
लागू नाही ◯

८. दवीतीय व्यवसायापासून मिळणारे वार्षिक उत्पन्न किती आहे?

कारखाने ------------- बांधकाम --------- पाणी पुरवठा ---------
वीजनिर्मिती ------------- नैसर्गिक वायू --------- इतर ---------
लागू नाही ◯

९.तृतीय व्यवसायापासून मिळणारे वार्षिक उत्पन्न किती आहे?

विमा --------- व्यापार --------- बॅका व वित्त व्यवहार -------
वाहतुक --------- दळणवळण --------- आरोग्य -------
संरक्षण --------- व्यावसायिक --------- इतर प्रकारच्या सामुदाईक व वैयक्तिक सेवा -------
प्रशासकीय --------- शिक्षण --------- लागू नाही ◯

१०. तुमच्या व्यवसायातून मिळणाऱ्या उत्पन्नातून उदर्निवाहासाठी खर्च होऊन जास्तीचे उत्पन्न मिळते काय?

होय ◯ नाही ◯ सांगता येत नाही ◯ लागू नाही ◯

११. अतिरिक्त उत्पादन मिळत असेल तर खालील पैकी किती?

०-१० हाजार ◯ १०-२५ हाजार ◯ २५-५० हाजार ◯
५०-७५ हाजार ◯ ७५ हाजार - १ लाख ◯ १ लाखापेक्षआ अधिक ◯
लागू नाही ◯ सांगता येत नाही ◯

१२. तुम्हाला रोजगार हमी योजनेची माहिती आहे काय?

होय ◯ नाही ◯

१३. तुम्ही किंवा तुमच्या कुटुंबातील इतर सदस्या या योजचेचा लाभ घेतात काय?

होय ◯ नाही ◯ लागू नाही ◯

१४. प्रश्न क्र. १३ चे उत्तर होय असेल तर तुमच्या उत्पन्न वाढीमध्ये याचा फायदा झाला आहे काय?

होय ◯ नाही ◯ सांगता येत नाही ◯ लागू नाही ◯

१५. खाली नमूद केलेल्या पर्यायापैकी योग्य त्या पर्यायासमोर √ अशी खूण करावी.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १. | घरातील सर्वच व्यक्ती शेती व शेतीपुरक व्यवसायच → | होय | ◯ | नाही | ◯ |
| २. | आमच्या गांवात/तालुक्यात उद्योगधंदे → | कमी आहेत | ◯ | योग्य प्रमाणात आहेत | ◯ |
| ३. | तांत्रिक प्रगती/दृष्टिकोनाचा अभाव → | आहे | ◯ | नाही | ◯ |
| ४. | नैसर्गिक साधन संपत्तीचा → | अभाव आहे | ◯ | मुबलक आहे | ◯ |
| ५. | उत्पादन व रोजगार संधी → | अभाव आहे | ◯ | मुबलक आहेत | ◯ |
| ६. | कृषी क्षेत्रातील उत्पादकता → | कमी आहे | ◯ | जास्त आहे | ◯ |
| ७. | कृषी क्षेत्रातील उत्पनापेक्षा त्यावरील खर्च → | जास्त आहे | ◯ | कमी आहे | ◯ |
| ८. | कृषीला पाण्याची उपलब्धता नसणे → | नाही | ◯ | आहे | ◯ |
| ९. | हंगामी शेती (पावसावर अवलंबून असलेली शेती) → | आहे | ◯ | नाही | ◯ |
| १०. | व्यापारविषयक सोयीचा → | अभाव आहे | ◯ | मुबलक आहेत | ◯ |
| ११. | शेतमालास योग्य बाजारभाव → | मिळत नाही | ◯ | मिळतो | ◯ |
| १२. | भूमीहीन → | आहे | ◯ | नाही | ◯ |
| १३. | उत्पानसाठी मालमत्ता/साधने → | नाही | ◯ | आहे | ◯ |
| १४. | बागायत शेतीचा → | नाही | ◯ | आहे | ◯ |
| १५. | जमीनीमध्ये पाझरण्याची व पाणी साठवून राहण्याची क्षमता → | कमी आहे | ◯ | चांगली आहे | ◯ |
| १६. | सिंचनाच्या सोयीची कमतरता → | आहे | ◯ | नाही | ◯ |
| १७. | पाणीपुरवठा व्यवस्था → | नाही | ◯ | आहे | ◯ |
| १८. | घरात एकही नोकरदार किंवा व्यापारी → | नाही | ◯ | आहे | ◯ |
| १९. | सावकाराकडून कर्ज घेतले → | आहे | ◯ | नाही | ◯ |
| २०. | बँकेकडून कर्ज घेतले → | आहे | ◯ | नाही | ◯ |
| २१. | कुटुंबाचा उत्पन्नापेक्षा खर्च जास्त → | आहे | ◯ | नाही | ◯ |
| २२. | घेतलेले कर्ज उदर्निवाहासाठीच खर्च → | होते | ◯ | नाही | ◯ |
| २३. | शाळेत रोजगारविषयक ज्ञान मिळाले → | नाही | ◯ | आहे | ◯ |
| २४. | रोजगारासंबंधित प्रशिक्षण घेतले → | नाही | ◯ | आहे | ◯ |
| २७. | इतर (खाली नमूद करावीत) | | | | |

----------------------------------------------

१६. तुमचे उत्पन्न वाढविण्यासाठी शासनामार्फत कोणत्या उपायोजना करता येतील?

--------------------------------------------------------------------------------

***

J_G_2

## परिशिष्ठ '५'

"मराठवाड्यातील मानव विकास निर्देशांक निम्न असल्याची कारणमीमांसा: एक अभ्यास"
या पीएच.डी च्या शोधप्रबंधासंबंधीत माहिती संकलनासाठीची

### निरीक्षण अनुसूची

(अभ्यासकांने गांवात निरीक्षण (तलाठी व ग्रामसेवक यांच्या सहकार्याने) करून भरावयाची निरीक्षणसूची)

---

सुचना : १) प्रश्नासमोर दिलेल्या गोलामध्ये √ अशी खूण करावी. तसेच जेथे संख्या लिहिणे आवश्यक आहे तेथे संख्या नमूद करावी
२) आवश्यक ठिकाणी आपले मत ३ ते ४ वाक्यात नमुद करावे.
३) आपण दिलेल्या माहितीचा उपयोग केवळ माझ्या संशोधन कार्यासाठी करण्यात येईल.
४) आपण दिलेल्या सहकार्याबद्दल धन्यवाद!

संशोधक
(अतुल सं. नौबदे)

---

जिल्हा: जालना तालुका: ______ गावाचे नांव ______

१. गावांतील उत्पन्न वाढीच्या अनुषंगाने इतर सेवा व सुविधांची माहिती

**तपशिल**

अ) गावाच्या जमीन क्षेत्रात नदी आहे काय? → होय☐ नाही☐
ब) गावाच्या जमीन क्षेत्रात नाले आहेत काय? → होय☐ नाही☐
क) गावात येण्यासाठी पक्के रस्ते आहे काय? → होय☐ नाही☐
ड) गावात वाहतुक व दळणवळणाची साधने आहेत काय? → होय☐ नाही☐
इ) गावात व परिसरात नियमित वीजपुरवठा आहे काय? → होय☐ नाही☐
ई) गावात शिक्षणाच्या सोई आहे काय? → होय☐ नाही☐
उ) गावात आरोग्यासंबंधीत सोई-सुविधा आहेत काय? → होय☐ नाही☐
ऊ) गावात राष्ट्रीयकृत बॅंक सेवा आहे काय? → होय☐ नाही☐
क) गावात पिण्यासाठी पुरेसे पाणी आहे काय? → होय☐ नाही☐
ख) गावात व परिसरात शेतीसाठी बारमाही पाणी आहे काय? → होय☐ नाही☐
ग) गावात शेतमाल साठवणूक व्यवस्था आहे काय? → होय☐ नाही☐
घ) गावात व परिसरात सिंचन सोई (तलाव/तळी/धरणे इ.) आहे काय? → होय☐ नाही☐
य) गावात बाजारपेठ आहे काय? → होय☐ नाही☐
र) गावात कारखाने आहेत काय? → होय☐ नाही☐
असल्यास कोणते कारखाने? → ------------------------
व) गावात पर्जन्यमान कसे आहे? → सरासरी ☐ सरासरीपेक्षा कमी ☐ सरासरीपेक्षा जास्त☐

श) गावात रोजगार हमी योजनेची कामे चालतात काय? → होय ☐ नाही ☐

***